# ज्ञान प्रबोधिनी

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)




# वार्षिक वृत्त

(राष्ट्रीय शके १९४६-४७)

दि.१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५



प्रतिज्ञाग्रहण



युवती विभाग, पुणे – क्रीडा प्रात्यक्षिके



किशोरी विकास प्रकल्प हराळी




स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) – किशोरींची क्रीडा प्रात्यक्षिके



संवादिनी रौप्य महोत्सव मेळावा – ठाणे, बोरीवली, डोंबिवली-भाईंदर




संवादिनी रौप्य महोत्सव मेळावा – स्मरणिका प्रकाशन




विडी कामगार महिला मेळावा, सोलापूर

# ज्ञान प्रबोधिनी
(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

# वार्षिक वृत्त

(सौर शके १९४६-४७)
दि.१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५


| | | |
|---|---|---|
| पत्ता | : | ज्ञान प्रबोधिनी भवन<br>५१०, सदाशिव पेठ,<br>पुणे ४११०३०<br>महाराष्ट्र, भारत |
| दूरभाष क्र. | : | +९१-०२० २४२०७००० |
| संकेत स्थळ | : | www.jnanaprabodhini.org |
| ई-मेल | : | contact@jnanaprabodhini.org |

## ई-वृत्त पाहाण्यासाठी... विशेष रचना

(हव्या त्या वृत्तावर थेट जाण्यासाठी आधी खालील सूचना वाचा व त्यानुसार कृती करा.)

- (स्क्रोल केल्यानंतर) 'हितगुज' व 'विशेष अभिनंदन'चे पान येईल त्यानंतर 'अंतरंग'चे पान दिसेल.
- अंतरंगात वृत्तातील हितगुज, विशेष अभिनंदन, मध्यवर्ती कार्यक्रम व सर्व विभागांची यादी पाहायला मिळेल. त्यापैकी ज्याविषयीचे वृत्त तुम्ही वाचू इच्छिता त्या 'शीर्षका'वर क्लिक केल्यावर तुम्ही थेट त्या वृत्तावर जाऊन ते वृत्त वाचू शकाल.
- पान क्रमांक असलेल्या पट्टीवर क्लिक केल्यास परत तुम्ही अंतरंगावर येऊ शकाल व पुन्हा तुम्हाला हव्या त्या विभागाच्या शीर्षकावर क्लिक करता येईल.
- ज्या लेखांना क्यू आर कोड दिले आहेत तेथे क्यू आर कोडवर क्लिक केल्यावर थेट तो दुवा उघडेल व ते साहित्य ऐकता/वाचता/पाहाता येईल.

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे
## सन्माननीय सदस्य, पदाधिकारी

### सन्माननीय सदस्य

| | |
|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | माजी महासंचालक, CSIR नवी दिल्ली |
| श्री. आण्णा हजारे | सामाजिक कार्यकर्ते |
| श्रीमती अनु आगा | माजी खासदार, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या |
| डॉ. जयंत नारळीकर | माजी संचालक, आयुका, पुणे |
| जनरल मनोज नरवणे (निवृत्त) | माजी चीफ ऑफ आर्मी स्टाफ |

### पदाधिकारी

१. डॉ. रघुनाथ माशेलकर (अध्यक्ष)
२. डॉ. विजय केळकर (उपाध्यक्ष)
३. श्री. श. बा. तथा रवी पंडित (कार्याध्यक्ष)
४. वाच. गिरीश श्री. बापट (संचालक)
५. प्रा. महेंद्र के. सेठिया (कार्यवाह)
६. श्री. आशुतोष बारमुख (सहकार्यवाह)
७. श्री. मोहन चि. गुजराथी (निधिधारक)
८. श्री. सचिन गाडगीळ (संपदाधिकारी)

### कार्यकारी मंडळ

१. श्री. श. बा. तथा रवी पंडित (कार्याध्यक्ष)
२. वाच. गिरीश श्री. बापट (संचालक)
३. प्रा. महेंद्र के. सेठिया (कार्यवाह)
४. श्री. आशुतोष बारमुख (सहकार्यवाह)
५. श्री. मोहन चि. गुजराथी (निधिधारक)
६. श्री. सचिन गाडगीळ (संपदाधिकारी)
७. प्रा. वि. शं./सुभाष देशपांडे
८. प्रा. विश्वनाथ ध. गुर्जर
९. वाच. विवेक बा. कुलकर्णी
१०. वाच. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. वाच. मनोज देवळेकर
१३. वाच. अनघा लवळेकर
१४. प्रा. सुवर्णा गोखले
१५. वाच. मिलिंद नाईक

### संचालक नियुक्त सदस्य

१६. प्रा. प्रशांत दिवेकर
१७. प्रा. संगीता कुलकर्णी
१८. श्रीमती शर्मिष्ठा चिपळूणकर
१९. श्रीमती विभावरी ताम्हनकर
२०. श्री. नचिकेत नित्सुरे

### संस्थात्मक सदस्य

१. ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था
२. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश
३. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर
४. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था
५. ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे

(या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात. त्यातील काही सारांश या वृत्तात दिले आहेत.)

### संलग्न कंपन्या

१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युम्नाय फौंडेशन (JPPAF)
२. ACIC Jnana Prabodhini Innovation Foundation
३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका (JPF, USA)

### केंद्रे

#### मुख्य केंद्रे

१. पुणे
२. निगडी
३. सोलापूर
४. हराळी (जि. धाराशिव)

#### उपकेंद्रे

१. पुणे केंद्र : शिवापूर, वेल्हे, शिरवळ (जिल्हा सातारा)
२. निगडी केंद्र : साळुंब्रे

#### विस्तार केंद्रे

१. अंबाजोगाई विस्तार केंद्र (जिल्हा बीड)
२. डोंबिवली विस्तार केंद्र

# हितगुज

सस्नेह नमस्कार व शुभचिंतन !

ज्ञान प्रबोधिनीच्या मुख्य, सदस्य व संलग्न न्यासांच्या व विविध केंद्रांच्या कार्याचे शके १९४६-४७ म्हणजेच सन २०२४-२५ या कालावधीचे वार्षिक वृत्त आपल्यापर्यंत पोहोचवताना आनंदाची व कृतज्ञतेची भावना मनामध्ये आहे.

या वर्षात ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या वाचस्पती उषाताई खिरे व वाचस्पती स्वर्णलताताई भिशीकर यांचे निर्वाण सर्वच प्रबोधिनीयांसाठी दुःखद होते. आयुष्याच्या अखेरपर्यंत कार्यरत असलेल्या या दोघीही कर्मयोगिनींना विनम्र, भावपूर्ण श्रद्धांजली ! त्यांचा वारसा प्रबोधिनीच्या आजच्या व पुढच्या पिढ्या नक्कीच सांभाळतील, वर्धिष्णू करतील असा विश्वास प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांच्या वतीने व्यक्त करतो.

या वर्षात शिक्षण, संशोधन, ग्रामविकसन, स्त्री-शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता या दिशांनी प्रबोधिनीचे काम वाढते राहिले आहे, भौगोलिक दृष्ट्याही ते विस्तारते आहे. विविध नियमित व प्रासंगिक उपक्रमांमधून गेल्या वर्षात सुमारे ३ लक्ष ६२ हजार शालेय विद्यार्थी तर ३,७७४ महाविद्यालयीन विद्यार्थी व युवक-युवतींपर्यंत ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रक्रिया, प्रशिक्षण व अनुभव शिक्षण पोहोचले आहे.

शिक्षणातील प्रबोधिनीच्या प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग राज्य व राष्ट्रीय पातळीवर शासकीय धोरणांमध्ये, धोरणांच्या अंमलबजावणीमध्ये होण्याच्या दृष्टीने प्रबोधिनीच्या अनेक कार्यकर्त्यांची विविध समित्यांवर नियुक्ती झाली असून त्यात ते महत्त्वाचे योगदान करत आहेत. विद्यारंभ, वर्षारंभ, विद्याव्रत, आचार्यव्रत, वीरव्रत, प्रतिज्ञाग्रहण या शैक्षणिक व मनुष्यघडणीच्या संस्कारांची व्याप्ती वाढत आहे. प्रबोधिनीच्या प्रशालांव्यतिरिक्त अन्यही अनेक शाळांमध्ये हे संस्कार रुजत आहेत. प्रबोधिनीच्या विविध शाळांमध्ये पालकसंघ आपल्या कार्याला पोषक अशा रीतीने कार्यरत झाले आहेत. शालेय वातावरण समृद्ध करण्यातील व प्रबोधिनीच्या कामातीलही त्यांचे योगदान वाढते आहे ही विशेष आनंदाची गोष्ट नोंदवावीशी वाटते. निगडीच्या पालाकसंघाचे याबाबतीत विशेष कौतुक !

ग्रामीण, शहरी व नागरी वस्त्यांमधील सुमारे ११,६०० महिलांपर्यंत विविध उपक्रमांद्वारे पोहोचलो आहोत. त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढतो आहे, त्यातील काहींच्या उद्योजकतेच्या, नेतृत्वाच्या क्षमता विकसित होत आहेत, अनेकजण जबाबदारी घेऊन उत्साहाने काम करत आहेत. कातकरी समाज व एकल महिलांच्या विकासासाठी व त्यांच्यापर्यंत शासकीय योजना पोहोचविण्यासाठी यावर्षात विशेष प्रयत्न केले गेले.

वाढणाऱ्या कार्याला आस्थापनांची जोड मिळावी या हेतूने वेल्हे येथील ‘कै. लीलनताई तांबे महिला शैक्षणिक संकुल’ व ‘कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र’ यांच्या इमारतींचे काम पूर्ण होऊन त्या वापरत्या झाल्या आहेत. ११ महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे नवदृष्टी गिरिकन्या वसतिगृह सुरू झाले व महिलांच्या प्रशिक्षणाचे अनेक कार्यक्रम, मेळावे, बैठकी तेथे झाल्या. १२५ जणांचे सुसज्ज निवासी प्रशिक्षण केंद्रही १४५ दिवस वापरले गेले.

शुक्रवार पेठेतील संशोधन भवनाच्या वास्तूचे बांधकामही अंतिम टप्प्यात आले असून ७ मजली वास्तू मार्च २०२६ मध्ये पूर्ण होण्याच्या दृष्टीने कामे प्रगतिपथावर आहेत.

पाषाण येथील जागेवर शैक्षणिक संकुल उभारण्याच्या संकल्पनेला आकार येत आहे. सन २०२६ च्या प्रारंभी भूमिपूजन व प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्याचे संकल्पित आहे.

पुण्यातील खडकवासला धरणाच्या जवळ नांदोशी गावात राष्ट्रीय स्तरावरील नेतृत्व संवर्धन व संशोधन केंद्राच्या प्रस्तावित वास्तूसाठी जमीन खरेदी केली असून २०२८ च्या सुमारास तेथील बांधकाम सुरू करण्याचे मनात आहे. या सर्व आस्थापनांसाठी व त्या कार्यरत होण्यासाठी मोठ्ठेच अर्थबळ व मनुष्यबळ लागणार आहे. आपण या दोन्हींसाठी भरीव योगदान करावे असे विनम्र आवाहन!

२०२२ ते २०३२ या दहा वर्षांच्या कालावधीसाठी ज्ञान प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांनी, विभागांनी मांडलेल्या भवितव्य लेखाचा नियमित पाठपुरावा करण्यासाठी क्रियान्वयन समिती कार्यरत आहे. त्यामुळे केंद्रांना व विभागांना उद्दिष्टांची स्पष्टता यायला, त्यानुसार उपक्रमांची, निष्पत्तींची साखळी जोडायला व कार्यवाहीला गती द्यायला या सहामाही आढाव्याच्या बैठकींचा विशेष उपयोग होतो आहे

देशविदेशातील माजी विद्यार्थी, समाजातील हितचिंतक, औद्योगिक व व्यापारी जगतातील देणगीदार या सर्वांचेच या कार्यामध्ये वेळेचे, तज्ज्ञतेचे, संपर्काचे व संपत्तीचे भरीव योगदान लागणार आहे. आपण सर्वजण ते सातत्याने व मनःपूर्वक द्याल असा विश्वास वाटतो.

या वृत्तावरील आपल्या अभिप्रायाचे, चिकित्सक प्रतिसादाचे व पुढील वाटचालीसाठी सहभागाचे स्वागत आहे.

आपले स्नेहांकित,

श्री. महेंद्र के. सेठिया
कार्यवाह

वाच. गिरीश श्री. बापट
संचालक

# विशेष अभिनंदन

१. टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळ, डोंबिवली या संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या **'तेजस' पुरस्काराने मा. संचालक वाच. गिरीशराव बापट** यांना सन्मानित केले. शैक्षणिक-सामाजिक क्षेत्रात स्वतःच्या प्रज्ञेने मोलाची भर घालणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

२. मातृमंदिर विश्वस्त संस्थेमार्फत ज्ञान प्रबोधिनीच्या चतुर्थ प्रतिज्ञित कार्यकर्त्या, नागरी वस्ती अभ्यासगटाच्या प्रमुख **श्रीमती हर्षाताई किर्वे** यांना **'कार्यकर्ता गुणगौरव'** पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

३. भारतीय शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या **Vision for Vikasit Bharat** या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेत प्रबोधिनीमधून **प्रा. शिवराज पिंपुडे, स्मिताताई माने, प्रसन्नाताई अलोने, ज्योतीताई खरे** आणि **जान्हवी क्षीरसागर** या पाच संशोधकांचे संशोधन निबंध निवडले गेले आहेत. दि. १६ ऑक्टोबर रोजी राज्य स्तरावरील पुरस्कार प्राप्त होऊन राष्ट्रीय स्तरावरील परिषदेसाठी निवड झाली. सदर परिषद नोव्हेंबर महिन्यात गुरुग्राम (हरियाणा) येथे संपन्न झाली.

४. ग्रामविकसन विभागातील **सुनील जोरकर** या वेल्हे तालुक्यातील खोपडेवाडी गावातील कार्यकर्त्याला यंदाचा फेरोसिमेंट सोसायटीचा **उत्कृष्ट फेरोसिमेंट कारागीर** हा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांचे विभागातील विहीर आणि टाकी बांधकामाच्या कामात महत्त्वाचे योगदान आहे.

५. नैसर्गिक संसाधने या विभागातील सदस्य **श्री. विवेक गिरीधारी** यांना नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील युवामित्र संस्थेतर्फे राज्यस्तरीय **'जलयोद्धा पुरस्कार'** प्रदान करण्यात आला. पाण्याच्या क्षेत्रात किमान दोन दशके उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात येते.

६. **क्रीडाकुल, निगडी** मधील इ. १०वीतील **कु. तनिष्का बोरकर** हिची पटना, बिहार या ठिकाणी होणाऱ्या किशोरी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली.

७. **आंतरराष्ट्रीय सुवर्ण पदक** - भारतीय तिरंदाजांनी शांघाय, चीन येथे झालेल्या तिरंदाजी विश्वचषकात कंपाऊंड पुरुष सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. सदर स्पर्धेमध्ये क्रीडाकुलचा माजी विद्यार्थी **प्रथमेश फुगे** हा सुवर्णपदाकाचा मानकरी ठरला. मेक्सिको येथे दि. १९ ते २० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या विश्वचषक अंतिम फेरीसाठी तो पात्र ठरला.

८. प्रा. शिवराज पिंपुडे यांच्या **'धमाल भटकंतीची'** या पुस्तकाला यशवंतराव चव्हाण सेंटर - शिक्षण विकास मंच यांच्या तर्फे दिला जाणारा **कै. कुमुद बन्सल लक्षवेधक शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार** खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते मिळाला.

९. **मणिपुरी विद्यार्थ्यांचे यश -** मणिपुरी विद्यार्थ्यांनी शालेय फुटबॉल स्पर्धा (महाराष्ट्र राज्य) जिल्हास्तरीय वयोगट १४ वर्षांखालील स्पर्धेमध्ये पाच सामने जिंकत प्रथम क्रमांक पटकावला. संपूर्ण संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१०. लोकमत आयोजित **Campus Clubs, Solapur, Children Run** मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. १५ वर्षाखालील गटात सात कि.मी. स्पर्धेत २९७ मुलांमधून आपले विद्यार्थी प्रेशस होराम (७वी) दुसरा तर सिमका होराम (७वी) याने तिसरा क्रमांक मिळवला.

**११. शिक्षक भारती** ह्या शिक्षक संघटनेकडून **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर शाळेस 'उपक्रमशील शाळा'** म्हणून पुरस्कार मिळाला.

१२. इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड यांच्या वतीने इनरव्हील **एज्युकेशन ईस्ट अवॉर्ड** ग्राम प्रबोधिनी विद्यालयातील **श्री. विलास फड व श्री. सुपे** यांना प्राप्त झाला.

**१३. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'** अंतर्गत तपासणीमध्ये **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे विद्यालयाने** मावळ तालुक्यात सर्व शाळांमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला.

१४. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे डोंबिवली विस्तार केंद्रातील **सुचेताताई वर्तक** यांचा तसेच स्फूर्ती महिला सामाजिक संस्थेतर्फे **स्नेहाताई गोगटे** यांचा पौरोहित्य क्षेत्रातील कार्यासाठी सन्मान करण्यात आला.

## ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्र, नागरी व वनसेवा परीक्षा निर्णय आणि अधिकाऱ्यांचे विशेष यश

१. यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२३ चा अंतिम निकाल लागला असून एकूण **१९ विद्यार्थ्यांची अंतिम यादीत निवड** झाली. भारतीय **वनसेवा (IFoS)** परीक्षेद्वारे केंद्राचे **सात विद्यार्थी अंतिम यादीमध्ये** निवडले गेले. **प्रतीक्षा काळे** ही विद्यार्थिनी **भारतात दुसऱ्या क्रमांकाने** उत्तीर्ण झाली.

२. **अरुणाचल प्रदेश लोकसेवा आयोग परीक्षा** (APPSCE) वर्गातील ३० जणांची मुख्य परीक्षेसाठी व मुलाखत वर्गातील पंधरा पैकी **नऊ विद्यार्थ्यांची अधिकारी म्हणून अंतिम निवड** झाली.

३. **श्रीमती गीता चव्हाण** Dy. SP. यांना कर्तव्यामध्ये उल्लेखनीय सेवेसाठी पोलीस कर्मचाऱ्यांना दिला जाणारा **Director General's Insignia हा पुरस्कार** देण्यात आला.

४. **श्रीमती सरिता नरके** (उपजिल्हाधिकारी, पुणे) आणि **तेजस्वी सातपुते** (IPS, उपायुक्त पोलीस, मुंबई) यांनी निर्णायक आव्हानांना तोंड देताना धाडसी कल्पना मांडल्या, त्या पूर्ण केल्या आणि सार्वजनिक सेवा उत्कृष्टपणे दिल्या त्याबद्दल यांना अरुण बोंगीरवार यांच्या नावाचा **Public Service Excellence Award** देण्यात आला.

◈-◈-◈

# अंतरंग


- ज्ञान प्रबोधिनी, पुणे सन्माननीय सदस्य, पदाधिकारी — २
- हितगुज — ३
- विशेष अभिनंदन — ४
- आजची ज्ञान प्रबोधिनी — ६
- शिक्षण विस्तार संख्यात्मक आढावा — ७
- श्रद्धांजली — ८
- मध्यवर्ती कार्यक्रम — १०


## ज्ञान प्रबोधिनी, पुणे केंद्र


१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे — १४
२. शैक्षणिक उपक्रम संशोधिका — १६
३. शैक्षणिक साधन केंद्र — १८
४. शिक्षक प्रशिक्षण केंद्र — २०
५. मुक्त विद्या केंद्र — २१
६. छात्र प्रबोधन — २२
७. नेतृत्व संवर्धन केंद्र — २४
८. स्पर्धा परीक्षा केंद्र — २६
९. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर — २८
१०. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र — ३०
११. उद्योजकता विकास केंद्र — ३१
१२. प्रज्ञा मानस संशोधिका — ३२
१३. संस्कृत संस्कृति संशोधिका — ३६
१४. स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) व राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर — ३८
१५. संवादिनी (मध्यवर्ती व विस्तार ) — ४२
१६. जिजामाता दल — ४५
१७. युवती विभाग — ४६
१८. युवक विभाग — ४८
१९. नागरी वस्ती अभ्यासगट — ५०
२०. नैसर्गिक संसाधने विभाग (शिवप्रदेशसह) — ५२


## महाराष्ट्रातील अन्य मुख्य केंद्रे उप केंद्रे / विस्तार केंद्रे / सदस्य न्यास व संलग्न कंपन्या


२१. ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्र — ५४
२२. ज्ञान प्रबोधिनी, सोलापूर केंद्र — ५८
२३. ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र — ६०
२४. ज्ञान प्रबोधिनी, साळुंब्रे उपकेंद्र — ६२
२५. अंबाजोगाई विस्तार केंद्र — ६४
२६. डोंबिवली विस्तार केंद्र — ६६
२७. चिपळूण स्थायी संपर्क केंद्र — ६८
२८. ठाणे स्थायी संपर्क केंद्र — ६९
२९. बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र — ७०
३०. ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ — ७१
३१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युमनाय फौंडेशन (JPPAF) — ७२
३२. ज्ञान प्रबोधिनी इनोव्हेशन फौंडेशन (ACIC) — ७३
३३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF) — ७४
३४. भौगोलिक विस्तार (महाराष्ट्र) — ७६
३५. सीमावर्ती राज्यांतील विस्तार — ७८

- **सन्माननीय देणगीदार**


◈-◈-◈

| | | | |
|---|---|---|---|
| ज्ञान प्रबोधिनी इन्स्टाग्राम खाते | ज्ञान प्रबोधिनी एक्स् (ट्विटर) खाते | ज्ञान प्रबोधिनी फेसबुक खाते | ज्ञान प्रबोधिनी लिंक्डइन खाते |

# आजची ज्ञान प्रबोधिनी - (ज्ञान प्रबोधिनी, पुणे आणि सदस्य संस्था)

## शके १९४६ (मार्च २०२५ अखेर)

- **केंद्रे** – पुणे, निगडी, सोलापूर, हराळी
- **उपकेंद्रे** – साळुंब्रे, शिवापूर, वेल्हे, शिरवळ
- **विस्तार केंद्रे** – अंबाजोगाई, डोंबिवली
- **उपक्रम केंद्र** – चिपळूण
- **संपर्क केंद्रे** – ठाणे, बदलापूर
- **कार्यक्षेत्रे** – शिक्षण, संशोधन, प्रदेश विकसन, आरोग्य, नेतृत्व संवर्धन, स्त्री-शक्ती प्रबोधन, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक उद्योजकता

### १. शिक्षण

- **ज्ञान प्रबोधिनी, पुणे**

**१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे**(माध्यमिक, मुलांसाठी मर्यादित सहनिवास)
**संकेतस्थळ :** prashala.jnanaprabodhini.org

**२. ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक – मराठी व इंग्रजी माध्यम, गुरुकुल, क्रीडाकुल) **संकेतस्थळ :** jpnvnigdi.org

**३. शैक्षणिक उपक्रम संशोधिका, पुणे**
(ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक प्रणालीचा विस्तार)
**संकेतस्थळ :** www. earc.jnanaprabodhini.org

**४. वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र**

**५. शैक्षणिक साधन केंद्र, पुणे** (शैक्षणिक व्हिडिओ व ॲप निर्मिती)
**संकेतस्थळ:** jnanaprabodhini.org/educational-resource-centre

**६. छात्र प्रबोधन, पुणे** (मासिक, स्पर्धा, प्रकाशन, उपक्रम)
**संकेतस्थळ :** chhatraprabodhan.org & jpprakashane.org

**७. मुक्त विद्या केंद्र**

**८. पूरक शिक्षण प्रकल्प – पुणे, निगडी, वेल्हे, डोंबिवली, रोहा, ठाणे, सोलापूर, बदलापूर, अंबाजोगाई, हराळी, चिपळूण, लातूर, नाशिक, कराड, अमरावती**
(विकासिका, शिबिरे, विद्याव्रत संस्कार, उपासना केंद्र, क्रीडादल, अभ्यासगट इ.)

- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर**

**९. ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, सोलापूर**
(पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक)
**संकेतस्थळ :** jnanaprabodhinisolapur.org

**१०. शिशु अध्यापिका विद्यालय, सोलापूर**

**११. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, हराळी** (प्राथमिक, माध्यमिक, सहनिवास)
**संकेतस्थळ :** www.jnanaprabodhini.org/harali

**१२. कृषी पदविका महाविद्यालय, हराळी**

- **ग्राम प्रबोधिनी, साळुंब्रे**

**१३. ग्राम प्रबोधिनी विद्यालय, साळुंब्रे** (माध्यमिक, सहनिवास)

**१४. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र – साळुंब्रे**

- **ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश**

**१५. कौशल्य प्रशिक्षण केंद्र - शिवापूर**
**संकेतस्थळ** – www.sdc.jnanaprabodhini.org

### २. संशोधन -

- **ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था**

**१. प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे** (संशोधन, प्रशिक्षण, बुद्धीमापन, संवर्धन, समुपदेशन, शैक्षणिक) **संकेतस्थळ :** jpip.org

**२. संस्कृत संस्कृति संशोधिका, पुणे**
(संशोधन, संस्कार पोथ्या, पौरोहित्य, व्याख्याने, अभ्यासगट, मुस्लिम महिला विषयक अभ्यास प्रकल्प)
**संकेतस्थळ :** www.jnanaprabodhini.org/santrika/

### ३. प्रदेश विकसन

**१. नैसर्गिक संसाधने विकास विभाग– गुंजवणी खोरे, हराळी, अंबाजोगाई** (पाणलोट क्षेत्र विकास, सौर ऊर्जा, कृषी)

**२. सर्वंकष ग्रामविकास प्रकल्प – साळुंब्रे, हराळी, अंबाजोगाई**

### ४. आरोग्य -

- **ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास**

**१. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय व्यवस्थापन, पुणे**
**संकेतस्थळ :** dmhospital.org

**२. कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ** (नियमित तपासणी, शिबिरे, शस्त्रक्रिया)

### ५. समूहगुण विकसन व नेतृत्व संवर्धन

**१. युवक विभाग - पुणे, निगडी, सोलापूर, हराळी**

**२. युवती विभाग - पुणे, निगडी, सोलापूर, हराळी, अंबाजोगाई**

**३. नेतृत्व संवर्धन केंद्र, पुणे** (स्पर्धा परीक्षा, सामाजिक नेतृत्व यांसाठी प्रशिक्षण वर्ग, शिबिरे, कार्यशाळा)
**संकेतस्थळ :** www.netrutwavikas.jnanaprabodhini.org

**४. स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे**
(स्पर्धात्मक क्षमता चाचणीच्या आधारे केंद्रीय व राज्य लोकसेवा परीक्षांचे मार्गदर्शन आणि अधिकारी नेटवर्क)
**संकेतस्थळ :**
www.jnanaprabodhini.org/competitive-examinations-centre

### ६. स्त्री-शक्ती प्रबोधन

**१. स्त्री शक्ती प्रबोधन-ग्रामीण-शिवगंगा व गुंजवणी खोरे**
(बचत गट, आरोग्य, किशोरी-युवती-महिला विकास, स्वयंरोजगार)

**२. संवादिनी - पुणे, सोलापूर, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर, ठाणे, शिरूर** (समतोल द्वैमासिक, उमलत्या वयाशी जुळवून घेताना, मासिक कार्यक्रम, विद्याव्रत)

### ७. राष्ट्रीय एकात्मता

**१. नागरी वस्ती अभ्यासगट, पुणे**

**२. ईशान्य भारत शैक्षणिक विस्तार प्रकल्प**
(अभ्यास सहली, मैत्री अभियाने, प्रशिक्षण वर्ग)

**३. ज्ञानसेतू प्रकल्प**
(ईशान्य भारत, छत्तीसगड, झारखंड, जम्मू, काश्मीर, लेह-लडाख, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश)
**संकेतस्थळ :** https://gyansetu.earc.jnanaprabodhini.org/

**४. तंत्रस्नेही प्रकल्प (मणिपूर)**

**५. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र**
(व्याख्याने, अभ्यासगट, संशोधन प्रकल्प, अभ्यासक्रम, प्रशिक्षण वर्ग)
**संकेतस्थळ :**
www.jnanaprabodhini.org/social-sciences-study-centre/

### ८. सामाजिक उद्योजकता

**१. उद्योजकता विकास केंद्र, पुणे**

**मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, पुणे – ३०** ☎ ०२०-२४२०७००० **संकेतस्थळ :** jnanaprabodhini.org, **Email : contact @jnanaprabodhini.org**

# ज्ञान प्रबोधिनी औपचारिक शिक्षण व शिक्षण विस्तार

## संख्यात्मक आढावा : शके १९४६

| औपचारिक शिक्षण | | | शिक्षण विस्तार |
|---|---|---|---|
| प्राथमिक वयोगट | १,९४१ | २६,०१४ | प्राथमिक वयोगट |
| माध्यमिक वयोगट | ३,१४७ | ३,३६,३८१ | माध्यमिक वयोगट |
| एकूण शालेय संख्या | ५,०८८ | ३,६२,३९५ | एकूण शालेय संख्या |
| | | ३७७४ | महाविद्यालयीन व पदव्युत्तर युवक-युवती गट |

उपक्रमनिहाय तपशील

**एकूण सहभागी संख्या**

**३,७१,२५७**

# – ईश्वर चरणी समर्पिता –



## – प्रा. उषाताई खिरे यांना विनम्र श्रद्धांजली –

(जन्म : ७ जुलै १९३५, मृत्यू : २३ नोव्हेंबर २०२४)

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वाच. वि.वि. तथा आप्पा पेंडसे यांच्या मा. उषाताई या पुणे विद्यापीठातील विद्यार्थिनी होत्या. पुणे विद्यापीठातून १९७१ मध्ये मानसशास्त्र या विषयात विद्यावाचस्पती पदवी मिळाल्यानंतर वाच. पेंडसे यांच्या आवाहनानुसार ज्ञान प्रबोधिनीमध्ये त्यांनी कामास सुरुवात केली. १९७१ पासून ते अखेरपर्यंत ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचा विस्तार-प्रभाव, शिक्षण-संशोधन हाच त्यांचा ध्यास होता.

ज्ञान प्रबोधिनी प्रज्ञा मानस संशोधिकेची पायाभरणी त्यांनी केली होती. या संस्थेची दखल आज आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते. गिलफोर्ड यांच्या स्ट्रक्चर-ऑफ-इंटलेक्टच्या संकल्पनेवर आधारित १२० मानसशास्त्रीय चाचण्या तयार करण्यासाठीच्या प्रकल्पाच्या त्या प्रमुख होत्या. या चाचण्या नंतर करिअर मार्गदर्शनासाठी वापरल्या गेल्या. शालेय मानसशास्त्रातील भारतातील पहिला पदव्युत्तर डिप्लोमा ज्ञान प्रबोधिनीमध्ये सुरू करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ९ विद्यार्थ्यांनी त्यांचे पीएच. डी.चे संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

कै. वाच. उषाताई खिरे यांच्या प्रकाशनांमध्ये बुद्धिमत्ता, प्रतिभासंपन्नता, सर्जनशीलता आणि बुद्धिमत्तेचे पोषण यावर अनेक पुस्तके आणि शोधनिबंध समाविष्ट आहेत. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले होते, त्यात प्रमुख म्हणजे फुलब्राइट सिनियर रिसर्च फेलो (१९९०); महात्मा गांधी सेंटर फॉर व्हॅल्यूज अँड थॉट्स (GIF-सिंगापूर) तर्फे जीवनगौरव पुरस्कार (२०१०); सिग्मंड फ्राईड मेंटल हेल्थ रिसर्च आणि सायको ॲनालिसिस इन्स्टिट्यूट, पुणे; इंडियन सायकियाट्रिक सोसायटी, पुणे आणि पुणे सायकियाट्रिस्ट असोसिएशन, पुणे तर्फे 'मैत्र मनाचे' पुरस्कार (२०१९) आणि कावेरी कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स व कावेरी गिफ्टेड एज्युकेशन आणि रिसर्च सेंटर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'Recognition of Lifetime Contribution' पुरस्कार (२०२४). त्यांचे नुकतेच एक पुस्तक 'Khire, U., Sowani, D. (2021). Intelligence, Creativity and Giftedness : An Indian Perspective, Mumbai : Himalaya Publishing House' प्रकाशित झाले. हे पुस्तक कदाचित या विषयावरील पहिले पुस्तक असेल, ज्यात बुद्धिमत्तेसंबंधी भारतीय आणि पाश्चात्य संकल्पनांचा समावेश आहे.

वयाच्या नव्वदीतही कृतिशील राहण्यातून त्यांनी एक आदर्श उभा केला. तो नव्या पिढीसाठी मोलाचा आहे. शांतपणे बोलणे, विषयाच्या खोलात जाणे, पुढच्या पिढीशी संवादी राहणे, उत्तमतेचा काटेकोर आग्रह आणि दुर्दम्यता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये मानसशास्त्रज्ञांसाठी एक दीपस्तंभ आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या मानसतज्ज्ञांच्या निदान तीन पिढ्या आज प्रबोधिनी व अन्य शिक्षणसंस्थांत कार्यरत आहेत. उषाताई यांचे संपूर्ण जीवनच संशोधन, अध्यापन आणि मार्गदर्शनासाठी समर्पित आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. अनेक शारीरिक व्याधींवर तसेच अडचणींवर मात करून शेवटपर्यंत अदम्य उत्साहाने त्या कार्यरत होत्या.

दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी संध्या. ६ ते ८ यावेळात मा. उषाताई खिरे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा घेण्यात आली होती. या सभेसाठी ९०-१०० सदस्य उपस्थित होते. उषाताईंसोबतच्या आठवणी सर्व सदस्यांना सांगता याव्यात म्हणून सभेच्या आधी अर्धातास गट चर्चा ठेवली होती. त्यामध्ये सदस्यांनी मोकळेपणाने आपल्या अनेक प्रसंगांच्या भावपूर्ण आठवणी गटात सांगितल्या. असे केल्यामुळे सगळ्यांना मनातील भावना व्यक्त करता आल्या. या दरम्यान 'असती का ऐसे कुणी' या पद्याच्या पार्श्वभूमीवर उषाताईंचा प्रवास दाखविणारी चित्रफीत पडद्यावर सुरू होती. त्यानंतर औपचारिक सभेत काही निवडक सदस्यांनी त्यांची मनोगते व्यक्त केली. यामध्ये कुटुंबीय व कामातील सहकाऱ्यांचा समावेश होता. तर देश-विदेशातील सुहृद/सहकारी सदस्यांनी पाठविलेले संदेश वाचण्यात आले. प्रबोधिनी, प्रज्ञा मानस ची पुढील कामाची दिशा काय असावी या बाबतचे उषाताईंचे काही रेकॉर्डिंग दाखवण्यात आले. अत्यंत हृद्य वातावरणात भैरवीने सभेचा समारोप झाला.

## – श्री भा. र. तथा चंदूकाका रायरीकर यांना विनम्र श्रद्धांजली –

श्री. चंदूकाका रायरीकर ज्ञान प्रबोधिनीचे सन १९६९ पासूनचे सदस्य होते. त्यांनी १९७० च्या दशकात ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकास विभागात शिवगंगा खोऱ्यामध्ये चिकाटीने काम केले. सूर्यफूल व भुईमूग यांच्या बियाणांवर गॅमा किरणांची प्रक्रिया करून उत्पन्न वाढते का असे प्रयोग त्यांनी केले. वेल्हे तालुक्यामध्ये छोट्या शेतकऱ्यांची डेअरी सुरू करण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. हिंदुत्ववादी विचारांचे श्री. रायरीकर आचरणाने गांधीवादी व वृत्तीने संन्यस्त होते. सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांचे दुःखद निधन झाले.

◈-◈- ◈



## – वा. लताताई भिशीकर यांना विनम्र श्रद्धांजली –

(जन्म : १ मे १९५१, मृत्यू : ३ मार्च २०२५)

ज्ञान प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या, ज्ञान प्रबोधिनी सोलापूर संस्थेच्या विश्वस्त आणि हराळी केंद्राच्या उभारणीच्या पहिल्या दिवसापासून केंद्र उभारणीत आणि विस्तारासाठी अविरत कार्य केले त्या सर्वांचा आधार असणाऱ्या मा. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांचे दिनांक ३ मार्च २०२५ रोजी सोलापूर येथे दु:खद निधन झाले. मा. लताताई ह्या १९६७ पासून प्रबोधिनीमध्ये समर्पित वृत्तीने कार्यरत होत्या. पुण्यातील युवती विभाग, प्रज्ञा मानस संशोधिका या विभागांमध्ये तसेच प्रबोधिनीचे संचालक कै. आप्पा व कै. आण्णा यांच्या स्वीय सचिवा म्हणूनही त्यांनी समर्थपणे दीर्घकाळ काम केले. १९८९ नंतर सोलापूर व १९९५ नंतर हराळी येथे प्रबोधिनीच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका निभावली.

दि. ४ मार्च रोजी हराळी मध्ये, दि. १४ मार्च रोजी पुण्यात आणि दि. १६ मार्च रोजी सोलापूर येथे श्रद्धांजली सभा झाल्या. तसेच प्रबोधिनीच्या सगळ्या केंद्रांवर आणि विभागांमधुन श्रद्धांजली सभा झाल्या. आ. लताताई आपल्यात नाहीत हे स्वीकारणे अवघड होते. पुणे, सोलापूर, हराळी या प्रत्येक केंद्रावर त्यांच्या कामाचा ठसा कायम राहील. अभ्यासू वृत्ती, सगळ्यांना दिलेले प्रेम आणि जिव्हाळा याच्या आठवणी पुढे येत होत्या. प्रबोधिनीच्या अमूर्त तत्त्वज्ञानाला शब्दरूप देण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यांनी लिहिलेली अर्थपूर्ण पद्ये, चरित्रे आणि इतर लेखन असा अमूल्य ठेवा प्रबोधिनीकडे आहे.

पुण्यात सभेच्या सुरुवातीला गोलात बसून आठवणी सांगताना अनेकांचा गळा भरून येत होता. डोळे वाहत होते. सगळ्या कामांना आध्यात्मिक अधिष्ठान असलेले जीवन त्या जगल्या हे आठवणींमधून येत होते. अनेक सामाजिक संस्थांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध त्या–त्या संस्थेच्या प्रतिनिधींनी श्रद्धांजली वाहताना उलगडले. आ. लताताईंचा जीवनपट दाखवण्यात आला.

सोलापूरमध्ये अयोध्या राम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आणि सोलापूर प्रबोधिनीचे अध्यक्ष पू. स्वामीजी गोविंददेव गिरी यांचा दृक्-श्राव्य संदेश ऐकवण्यात आला. सोलापुरातील अनेक दिग्गज व्यक्तींनी आदरणीय लताताईंबद्दलच्या आपल्या आठवणी, भावना व्यक्त केल्या.

हराळी ग्रामस्थांच्या वतीने गावाच्या मंदिरात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. प्रातिनिधिक स्वरूपात माजी सैनिक सुरेश सूर्यवंशी व निर्मलाताई यांनी ताईंच्या आठवणी सांगितल्या. सगळीकडे जमलेले सुहृद, आप्त, विद्यार्थी, साधक वेळेचे बंधन न राहता बोलत होते. प्रत्येकाला आपण अगदी जवळचे आहोत असे वाटण्याइतके प्रेम, माया देणाऱ्या लताताईंची कमी नेहमीच जाणवत राहील.

### असति का ऐसे कुणी?...

बहुत असती जे यशाचे मिरविती माथी तुरे
वैभवाची शीग चढता म्हणती ना केव्हा पुरे
यश-सुखाची मीठ मोहर मातृमुखी ओवाळुनी
मुक्त झाले जीवनी या असति का ऐसे कुणी ।। ध्रु. ।।

रेखिल्या परिघात ज्यांची रमुनी गेली मनमती
बहुत ऐसे घरकुलाच्या सुखद स्वप्नी रंगती
होऊनी नि:संग परि जे श्रमती विजनी काननी
हिंदुराष्ट्रा जे समर्पित असति का ऐसे कुणी ।। १ ।।

शिंपिती फुलबाग कोणी फुलविती वनवैभवे
रम्य उद्याने कुणाची गंध भरले ताटवे
बांधवांच्या आर्त हृदयी मेघसे ओसंडुनी
शिंपिती जे प्रेम अपुले असति का ऐसे कुणी ।। २ ।।

उजळती कोणी पसा अन् उजळती अंगण कुणी
उजळती देवालये अन् उजळती नगरे कुणी
त्रिभुवनाला उजळणारे प्रखर ते तेजोमणी
प्राणदायी जे प्रचोदक असति का ऐसे कुणी ।। ३ ।।

पद्य ऐकण्यासाठी ▶

# मध्यवर्ती कार्यक्रम

## ज्ञान प्रबोधिनी, पुणे वार्षिक सर्वसाधारण सभा

दि. २५ जाने. २०२५ रोजी ज्ञान प्रबोधिनी, पुणे न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी डॉ. रघुनाथजी माशेलकर होते. या वर्षीच्या सभेमध्ये औपचारिक कामकाज झाल्यावर मुख्यतः कार्यनिवेदने झाली. यामध्ये स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या विभागाच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने सौ. सुवर्णाताई गोखले यांनी ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी चालू असणाऱ्या कामाचा गेल्या तीस वर्षांतील पट थोडक्यात सभेसमोर मांडला. नंतर वाच. वीणाताई लिमये यांनी शहरी भागातील स्त्री-शक्ती प्रबोधन कामाच्या रौप्यमहोत्सवाबद्दल वर्षभरात घेतलेल्या उपक्रमांची माहिती दिली. वेल्हे येथे ज्ञान प्रबोधिनी भवन ही नवीन वास्तू बांधण्यात आली. यामागील हेतू काय आहे आणि काय प्रकारे तिथे काम केले जाईल याचे निवेदन वाच. सौगंधदादा देशमुख यांनी केले. यानंतर वाच. मिलिंदराव नाईक यांनी प्रबोधिनीच्या विविध ठिकाणी असलेल्या जागा व त्यावरील प्रस्तावित बांधकाम याबद्दल सभेला माहिती दिली. निगडीच्या क्रीडाकुलतर्फे टाटा ट्रस्ट च्या साहाय्यातून ग्रामीण भागामध्ये खेळाडू घडवण्यासाठी नवीन प्रकल्प चालू केला आहे, त्याची माहिती वाच. मनोजराव देवळेकर यांनी सभेला दिली. प्रा. प्रशांत दिवेकर यांनी चेन्नईमध्ये शिक्षण विस्ताराच्या कामाचे निवेदन केले.

कार्याध्यक्ष मा. रविजी पंडित यांनी प्रबोधिनीचे काम दिवसेंदिवस वाढत आहे त्यासाठी आर्थिक बळ आणि मनुष्यबळ याची आवश्यकता आहे असे नमूद केले. अध्यक्ष डॉ. रघुनाथजी माशेलकर यांनी उपस्थितांशी संवाद साधताना प्रबोधिनीच्या कामाविषयी आनंद व्यक्त केला. सध्याच्या युगात Digital media, आणि एआय याचे महत्त्व त्यांनी विशद केले. संचालक वा. गिरीशराव बापट यांनी बैठकीचा समारोप केला.

## प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम

ज्ञान प्रबोधिनीमध्ये प्रतिज्ञांना विशेष महत्त्व आहे. प्रतिज्ञेद्वारा स्वतःला राष्ट्रसेवेसाठी अधिकाधिक सक्षम व समर्पित बनविणे अभिप्रेत असते. विविध प्रतिज्ञांमधील मुख्य सूत्र पुढीलप्रमाणे –

प्रथम – कोणत्याही क्षेत्रात आयुष्यभर राष्ट्रसेवेसाठी काम करणे.

द्वितीय – हे राष्ट्रसेवेचे कार्य प्रबोधिनीद्वारे, उत्तरदायी राहून करणे.

तृतीय – हे राष्ट्रसेवेचे कार्य प्रबोधिनीच्या आदेशानुसार ठराविक काळासाठी व्यवहारास अनुसरून अथवा वैराग्यपूर्ण रीतीने करणे.

चतुर्थ – संन्यासीवृत्तीने तनमनधनपूर्वक पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून आयुष्यभर करणे.

वर्षभरात विविध केंद्रे व विभागांमधील १९७ सदस्यांनी प्रथम प्रतिज्ञा, ३९ सदस्यांनी द्वितीय तर १० सदस्यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली.

- **स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)** – वेल्हे येथे या विभागाच्या त्रिदशकपूर्ती निमित्त विभागातल्या ३० सदस्यांनी मा. सुभाषराव देशपांडे यांच्याकडून प्रथम (१५), द्वितीय (१३) आणि तृतीय (२) प्रतिज्ञा घेतली.
- **स्त्री-शक्ती प्रबोधन (शहरी)** – संवादिनीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त दि. १४ डिसेंबर रोजी प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात प्रज्ञा मानस संशोधिका, संवादिनी आणि विद्याव्रत जोपासना सत्रातील काही पालक अशा १५ जणींनी प्रथम आणि १० जणींनी द्वितीय (एकूण २५ जणी) प्रतिज्ञा घेतली. संवादिनी विस्तार गटाच्या दशकपूर्तीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात १३ जणींनी प्रथम व एकीने द्वितीय प्रतिज्ञा घेतली.
- **युवक विभाग, पुणे** – गुढीपाडव्याच्या दिवशी (९ एप्रिल २०२४) सकाळच्या ध्वजारोहण कार्यक्रमाला जोडून युवक विभागाने प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम आयोजित केला. यात ५४ युवकांनी प्रथम, ९ युवकांनी द्वितीय आणि श्रीरंगदादा टोके यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली.
- **निगडी केंद्र** – निगडी केंद्रात मातृमंदिर वर्धापन दिनाच्या दिवशी प्रतिज्ञाग्रहण झाले. यात मराठी माध्यमाच्या इयत्ता नववीच्या १०९ विद्यार्थ्यांनी तर इंग्रजी माध्यमाच्या दहावीच्या ५० विद्यार्थ्यांनी शालेय प्रतिज्ञा घेतली. तसेच २२ प्रौढ सदस्यांनी पहिली प्रतिज्ञा तर तीन सदस्यांनी द्वितीय प्रतिज्ञा व ३ सदस्यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली.
- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर** – ज्ञान प्रबोधिनी सोलापूर संस्थेचे अध्यक्ष पूजनीय स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या उपस्थितीत दि. २१ सप्टेंबर रोजी प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम संपन्न झाला. त्यामध्ये प्रथम प्रतिज्ञा – युवक ४९, युवती १७, संवादिनी गटातील महिला सदस्या ३ – एकूण ६९, तर द्वितीय प्रतिज्ञा – ३, एकूण ७२ प्रतिज्ञार्थींनी प्रतिज्ञा घेतली.
- **हराळी केंद्र** – दि. १५ जून रोजी हराळी केंद्राची वर्षारंभ उपासना आणि प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम झाला. हराळी केंद्रावरील महेश राजे, अनिल कांबळे, सचिन सूर्यवंशी आणि निखिल कोकाटे या चार सदस्यांनी पाच वर्षांसाठी तृतीय प्रतिज्ञा घेतली.



आचार्य व्रत, हराळी



रूप पालटू व्याख्यानमाला

## आचार्यव्रत कार्यक्रम

आचार्य व्रत घेऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तिसऱ्या तुकडीची पहिली बैठक दि. ५ डिसेंबरला झाली. सुरुवातीला गटाची संख्या २६ होती. यामध्ये प्रबोधिनीच्या पाचही शाळांमधील शिक्षकांबरोबरच प्रथमच शिक्षण विस्ताराचे काम करणारे सदस्यही सहभागी होते. पंधरा दिवसांनी एकदा ऑनलाईन स्वरूपात अभ्यास बैठका झाल्या. या बैठकांमधून काही शैक्षणिक लेखांचे वाचन व चर्चा तसेच काही अभ्यासकार्य घेण्यात आले. प्रबोधिनीचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, वेगळे प्रयोग करणाऱ्या कार्यकर्त्यांशी गप्पा, आचार्य होणे म्हणजे काय असे विविध विषय बैठकांमधून घेतले गेले.

- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर -** दि. १२ जून रोजी आचार्यव्रताच्या दुसऱ्या तुकडीचा दीक्षाग्रहण कार्यक्रम झाला. या वेळी सौ. प्रवीणाताई जोशी, सौ. श्वेताताई औरसंग, सौ. अक्षताताई केळकर व श्री. बाळासाहेब शेळके यांना आ. संचालकांनी आचार्यव्रताची दीक्षा दिली. या सोहळ्यास मा. श्री. अनंत गवळी (ज्येष्ठ कार्यकर्ते, विवेकानंद केंद्र), संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. इरेशजी स्वामी तसेच विश्वस्त, श्री. बसवराजजी बिराजदार हे उपस्थित होते.
- **ज्ञान प्रबोधिनी हराळी -** दि. १४ जून रोजी आचार्यव्रताचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला शाळा विभाग, कृषी विभाग आणि पूरक शिक्षण विभागातील सदस्य उपस्थित होते. केंद्रातील महेशदादा राजे, संदीप भोसले, श्रुतीताई फाटक आणि गौरीताई कापरे या चौघांनी आचार्यव्रत घेतले. मा. संचालक मार्गदर्शन करताना म्हणाले की, ''विद्याव्रत हा प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीचा गाभा आहे आणि फक्त विद्यार्थ्यांनीच व्रत न घेता त्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांनी देखील व्रत घ्यायला पाहिजे. आ. भाऊ तथा वामनराव अभ्यंकरांसारखं उदाहरण डोळ्यासमोर ठेवावे''. सदैव प्रसन्न चेहरा, त्याग, विद्याभ्यास, स्वाध्याय प्रवचन, परमेश्वर चिंतन (उपासना), आचार, संकल्प या संकल्पनेवर प्रकाश टाकला आणि शेवटी आचार्य व्रत चिन्हावर दिलेल्या आठ संकल्पांचे पालन करावं असं सुचवलं.
- **ज्ञान प्रबोधिनी निगडी -** ज्ञान प्रबोधिनीतील ज्ञान कौशल्ये व वर्तनपद्धती शिकवणाऱ्या सर्वच शिक्षक व मार्गदर्शकांना त्याचे व्रताचरण कसे असावे याबाबत नेहमीच मार्गदर्शन केले जाते. हा प्रशिक्षणाचा भाग केवळ अध्यापक या पायरीपर्यंत मर्यादित न राहता आचार्य पर्यंतचा मनुष्यघडणीचा प्रवास करण्याची संधी आचार्यव्रत संस्कारातून मिळावी असा विचार दोन वर्षांपासून होत आहे. हा आचार्य व्रत संस्कार दि. २० जुलै रोजी निगडी केंद्रात झाला.

## रूप पालटू व्याख्यानमाला

ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक/ आद्य संचालक कै. वि.वि. तथा आप्पा पेंडसे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ यावर्षी सर्व केंद्रांवर आणि काही विभागांत अनेक कार्यक्रम झाले. आ. आप्पांच्या जन्मशताब्दी पासून सुरू झालेल्या रूप पालटू व्याख्यामालेचे हे दहावे वर्ष ! या व्याख्यानमालेत प्रबोधिनीमध्ये शिकून देशप्रश्नांवर काम करणारे विद्यार्थी आपल्या कामाबद्दल मांडणी करतात.

यावर्षी झालेल्या रूप पालटू व्याख्यानमालेत वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या दोन जणांची मांडणी झाली.

- **श्री. विनय चुटके (तुकडी – १९९३) :** यांनी वेगाने बदलणारे वैद्यकीय तंत्रज्ञान – भारतासमोरची आव्हाने आणि संधी या विषयी त्यांचे अभ्यासपूर्ण अनुभव मांडले. दीनानाथ रुग्णालयात सोळा वर्षे काम करताना आलेल्या अडचणी, आव्हाने आणि त्यासाठी केलेल्या उपाय योजना, स्वतः सुरू केलेली वैद्यकीय उपकरणांची निर्मिती व मोठी रुग्णालये उभारण्यासाठीची सेवा, औद्योगिक संस्था मार्गदर्शन अशा २४ वर्षांच्या अनुभवांची मांडणी केली.
- **डॉ. नीलांगी नानल–सरदेशपांडे (तुकडी –१९८९) :** यांनी स्त्रियांच्या आरोग्याचा स्त्री केंद्रित दृष्टिकोनातून केलेला चिकित्सक अभ्यास याविषयी मांडणी केली. सर्व पातळीवर असलेल्या महिलांचे आरोग्य, त्यातले प्रश्न यावर संशोधन आणि त्याचा sustainable development goal शी असलेला संबंध ह्याबद्दल भाष्य केले.

संचालक मा. गिरीश बापट यांनी समारोप केला. कार्यक्रमाला ८० जण प्रत्यक्ष उपस्थित होते. तर तेवढेच त्याच वेळात दूरस्थ पद्धतीने सहभागी होते.

## ❀ पुस्तक प्रकाशन ❀

डॉ. विवेक कुलकर्णी यांनी १९९० पासून 'प्रचिती' या उपक्रमा अंतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींबरोबर सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, तंत्रज्ञान या क्षेत्रातील अनेक प्रकल्प केले. यातील अनेकांनी पुढे त्याच क्षेत्रात भरीव योगदान दिले. अशा ७ प्रकल्पांच्या आणि २० कार्यकर्त्यांच्या वाटचालीवर आणि अनुभवांवर आधारित 'हे तो प्रचितीचे जगणे' हे पुस्तक वाच. विवेक कुलकर्णी आणि वाच. अजित कानिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली अश्विनी धर्माधिकारी, वैशाली कणसकर आणि जयश्री काटीकर यांनी संपादित केले. पुस्तकाला ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. गिरीश कुलकर्णी (संस्थापक, स्नेहालय) यांनी प्रस्तावना लिहिली आहे. दिनांक २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताकदिनी ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

## ❀ विशेष भेटी ❀

- Dr. R. Balsubramaniam (प्रमुख HR, Capacity Building Commission, मिशन कर्मयोगी) यांची प्रबोधिनीच्या मध्यवर्ती समितीसोबत भेट व गप्पा झाल्या. त्यांनी 'विकसित भारत आणि युवकांना विविध क्षेत्रात संधी' या विषयावर स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- DESPU (DES पुणे युनिव्हर्सिटी) चे उपकुलगुरू डॉ. प्रसाद खांडेकर यांनी आपल्या संस्थेला भेट दिली. एकत्र काम करण्याबाबतच्या विविध संधींवर चर्चा झाली. सुरुवात करताना मुख्यतः एकत्रित संशोधन प्रकल्प व आपले चार अभ्यासक्रम तेथील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत निश्चिती झाली.
- **चेन्नई पाहुणे- प्रबोधिनी परिचय भेट –** सौर आषाढ ७ ते ९ (२८ ते ३० जून) रोजी तामिळनाडू मधील सात शैक्षणिक संस्थांमधील सतरा संचालक, मुख्याध्यापक तीन दिवस प्रबोधिनी परिचय करून घेण्यासाठी आले होते. गटासोबत अन्य दोन संस्थांचे ८-१० प्रतिनिधीही आले होते.
- गणेशोत्सवामध्ये गणरायाच्या आरतीसाठी केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ आले होते.
- मा. श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या मंडळात प्रबोधिनीच्या बरचीनृत्य आणि वाद्यगटाला प्रात्यक्षिकाचे निमंत्रण मिळाले होते. या प्रसंगी प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट झाली व त्यांना मातृभूमीची प्रतिमा भेट दिली.

◈-◈- ◈



**मा. श्री. मुरलीधर मोहोळ गणेशोत्सवामध्ये गणरायाच्या आरतीसाठी आले होते.**



**Dr. R. Balsubramaniam (प्रमुख HR, Capacity Building Commission, मिशन कर्मयोगी) यांची प्रबोधिनीस भेट.**

# हे विश्वात्मक

हे विश्वात्मक तव भक्ताचा स्वीकारी प्रणिपात
प्रार्थना हीच आज हृदयात ।। ध्रु. ।।

अन्तरात जी वसे हीनता
मोह असूया आणि अहन्ता
दृढ वज्राने त्यांच्यावरती
करि निर्मम आघात ।। १ ।।

सुखात किंवा विपदाकाली
अविचल राहो शान्ति आतली
प्रसन्नतेचे दैवी स्मित रे
नित विलसो ओठात ।। २ ।।

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात ।। ३ ।।

सेवेतच सार्थक गवसावे
जीवशिवाचे मैत्र जुळावे
विश्वच अवघे सिंचित व्हावे
स्नेहामृत सेकात ।। ४ ।।

आर्तांना हृदयासि धरावे
श्रान्तांसाठी छाया व्हावे
मात्र खलांच्या सत्तेपुढती
जुळोत ना कधि हात ।। ५ ।।

तू दिधलेले हे तेजोबल
सहज तुझ्या चरणांशी वाहिल
अशी लीनता उमलो आता
माझ्या मनमर्मात ।। ६ ।।

पद्य ऐकण्यासाठी ▶

# १. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**प्रारंभ – शके १८९१/ इ.स. १९६९**

## नित्य स्वरूप

१. प्रशालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक प्रयोग
२. संस्कार कार्यक्रम
३. नेतृत्वगुण संवर्धन
४. बुद्धिगुण शोधन
५. संशोधन, दस्तऐवजीकरण
६. क्षमता व अभिरुचीनुसार शिक्षण

## संख्यात्मक आढावा

❖ ४८० प्रशालेय व ३५ अन्य प्रशालेय विद्यार्थ्यांसाठी काम
❖ १२५हून अधिक अध्यापक, माजी विद्यार्थी, पालक व तज्ज्ञांच्या साहाय्याने काम
❖ २९२ देणगीदारांचा हातभार



श्री गणेशाची प्रतिष्ठापना करताना मा. मालतीताइ कलमाडी



अध्यापक निगडी केंद्र भेट

### अनुभव संकल्पपूर्तीचा !

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला कार्यालयीन कर्मचारी व ग्रंथालय सदस्य गटाने दोन संकल्प केले होते. पहिला संकल्प प्रत्येक सदस्याने एक छान पुस्तक वाचून मासिक बैठकीत त्याचा परिचय करून देणे व दुसरा संकल्प होता दर दोन महिन्यातून एकदा एका सामाजिक संस्थेला भेट देऊन तेथील कार्यपद्धती समजवून घेणे व त्यादिवशी तेथील कामकाजाला हातभार लावणे आणि जमेल तशी आर्थिक मदत करणे.

पहिल्या संकल्पाविषयी - कोणी चरित्र, तर कोणी ऐतिहासिक कादंबरी, कोणी प्रवास वर्णन, कोणी अध्यात्म विषयातील पुस्तकांचाही परिचय करून दिला. डिजिटल युगात आपण फक्त मोबाईल मध्ये डोके घालून बसत असतो, त्यामुळे पुस्तक वाचनाची सवय कमी झाली होती. या संकल्पामुळे काही काळ मोबाईल बाजूला राहिला, तसेच आपल्या व्यस्त दिनचर्येतून काही काळ वाचन करून बैठकीत पुस्तक परिचय करून दिला, त्यामुळे ते पुस्तक बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांपर्यंत एकाच वेळी पोहोचले, तसेच बैठकीत जे सदस्य बोलत नव्हते. त्यांना या संधीचा खूप फायदा झाला असे वाटते. या संकल्पामुळे त्यांच्यातही सभाधीटपणा येण्यास मदत झाली असे वाटते.

दुसरा संकल्प - एक गटकार्य होते. प्रत्येक गटाने त्यांनी ठरवलेल्या संस्थेची आधी माहिती घेऊन, जो भेटीचा दिवस ठरला आहे त्या दिवशीचे नियोजन करायचे असे ठरले. डेविड ससून वृद्धाश्रम, द सोसायटी ऑफ सेंट मेरी द व्हर्जिन इन इंडिया, गुरुवार पेठ व असीम फाउंडेशन या संस्थांना भेटी झाल्या. या संकल्पामुळे गटातील प्रत्येक सदस्याला गटकार्याचा उत्तम अनुभव मिळाला.

सामाजिक संस्थांना भेट दिल्याने त्यांची कार्यपद्धती, उद्दिष्टे आणि समाजातील ते करीत असलेल्या कामाची माहिती सर्व गटाला मिळाली. वृद्धाश्रमामधील आजी-आजोबांशी संवाद साधून त्यांचे दुःख जवळून पाहता आले. अनाथ महिला व बालकांसाठी काम करणाऱ्या संस्थेला भेट दिल्यामुळे जीवनातील खरी मूल्ये कळली, इतरांच्या दुःखात एकरूप होण्याची आणि मदतीसाठी पुढे येण्याची गरज वाटली. काश्मीर प्रश्न जवळून समजावून घेता आला. यामुळे एक वेगळाच आत्मविश्वास मिळाला. आपल्यावर असलेल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव झाली आणि सामाजिक संस्था कशा प्रकारे समाजात बदल घडवून आणू शकतात हे समजले.


● लष्करी प्रदर्शनास भेट


● अग्रणी शिबिर - मार्गदर्शक मा. महेंद्रभाई


● कवितालेखन कार्यशाळा

### ◈ विशेष उल्लेखनीय ◈

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिक व शारीरिक विकासाचे कार्यक्रम राबवले. गतिमान प्रभुत्व अध्ययन पद्धतीद्वारे इ. ५वी ते ८वीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि गणित विषयात स्तर-आधारित शिक्षण दिले. विशेष उद्दिष्ट गट तयार करून कायदा, ऊर्जा, पर्यावरण, ग्रामविकसन, मानसशास्त्र यावर व्याख्याने घेऊन विद्यार्थ्यांना विषयनिवडीसाठी सजग केले.

२. प्रत्येक इयत्तेसाठी वेगळे प्रकल्प कार्य केले गेले. इ. ५वीसाठी संग्रह, ६वीसाठी प्रतिकृती, ७वीसाठी सर्जनशील लेखन, ८वीसाठी संशोधन, ९वीसाठी भविष्यवेध, तर १०वीसाठी निवड अधिष्ठित प्रकल्प राबवले. बुद्धिगुण विकास योजनेतून १२ शिष्यवृत्तीधारक व १० बक्षिसपात्र विद्यार्थी निवडले. अभिव्यक्ती क्षेत्रात तबला, गायन, चित्रकला, लेखन, नृत्य इ. कौशल्यविकासासाठी शिबिरे, व्याख्याने व प्रात्यक्षिके झाली.

### ◈ गणेशोत्सव ◈

१. गणेशोत्सवात दप्तरविरहित शाळा, विशेष सत्रे, आरती, अभिव्यक्ती सादरीकरणे व कार्यशाळा घेतल्या गेल्या. लहान व मोठ्या गटांसाठी वेगवेगळ्या विषयांवरील अभ्यागतांचे मार्गदर्शन झाले. बौद्धिक प्रगल्भतेसाठी वर्षभर विशेष व्याख्याने (लष्कर, कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरण, करिअर, आर्थिक साक्षरता) घेण्यात आली.

२. अभिव्यक्ती योजनेअंतर्गत संगीत संयोजन शिबिर (कौशल इनामदार), काव्यलेखन (श्रीरंग गोडबोले), संहिता लेखन (अमित वझे), कार्यशाळा व प्राचीन नाण्यांचे प्रदर्शन हे उपक्रम लक्षवेधी ठरले. ९वी व १०वीमधील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे विशेष वर्ग (पुनर्भरण व सराव) चालवले गेले. ५वी ते ७वीसाठी धडपड प्रयोगशाळा, जर्मन भाषा, चित्रकला इ. अभिरुची गट स्थापन करण्यात आले.

### ◈ सहाध्याय दिन ◈

सामाजिक जाणीव निर्माण करणाऱ्या सहाध्याय दिन उपक्रमात विविध वर्गांनी गुंजवणे, चिरमोडी गावे, विज्ञानाश्रम, केळकर संग्रहालय, विज्ञान केंद्रे, मूक-बधिर विद्यालय, लष्कर प्रदर्शन, इ. ठिकाणी भेटी दिल्या. विद्यार्थ्यांनी विविध जैवविविधता, तंत्रज्ञान, सामाजिक संस्था व ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास केला.

वारीचा सामाजिक, सांस्कृतिक अनुभव विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभागी होऊन घेतला. पुण्यातील दिंड्यांमध्ये संवाद साधणे, अभंग गायन, वारीत चालणे, मंदिर दर्शन या गोष्टींचा समावेश होता. स्वातंत्र्य व प्रजासत्ताकदिनी विविध विषयांवर व्याख्याने व सादरीकरण झाले.

वस्ती भाग परिचय उपक्रमात ३६ विद्यार्थी सहभागी झाले. दैनंदिन अभ्यास, वाचन, लेखन, जीवनकौशल्य, कला, पाककला, नृत्य, आरोग्यसाक्षरता यांचे वर्ग झाले. पौष्टिक खाऊचे आयोजन, वैयक्तिक स्वच्छतेकडे लक्ष, शालेय कार्यक्रम साजरे करणे, पुस्तक वाचनाची सवय लावणे अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी झाली.

### ◈ विद्याव्रत संस्कार ◈

मानसिक समृद्धीसाठी विद्यारंभ, वर्षारंभ, विद्याव्रत हे शैक्षणिक संस्कार व शिबिर आयोजित करण्यात आले. विद्याव्रत व्याख्यानमालेत शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक विकसनाचे सत्र घेऊन विद्यार्थ्यांना एक सुदृढ मूल्यसंस्कारित जीवनशैलीचा पाठ दिला. सज्जनगडावर शिबिर व रामदासींच्या अनुभवातून सेवा, स्वावलंबन व संकल्पशक्तीचा अनुभव मिळाला.

साप्ताहिक उपासना व चिंतनात भारतीय संस्कृती, महान व्यक्तिमत्त्वे, उपनिषदे, निसर्ग, विज्ञान, आत्मपरिक्षण, नेतृत्व, राष्ट्रीय ओळख यावरील विचार विद्यार्थ्यांपुढे मांडले गेले.

### ◈ दैनंदिन क्रीडा दले ◈

शारीरिक कौशल्यासाठी युवक-युवती दले सक्रिय होती. क्रीडा, संचलन, दुर्गभ्रमण, मातृभूमिपूजन, किल्ले स्पर्धा, वारी सहभाग अशा सर्वांगीण शिक्षणाच्या उपक्रमांत सहभाग घेतला. राजगड, विसापूर, सिंधुदुर्ग, हरिश्चंद्रगड आदी किल्ल्यांवरील सहलींद्वारे विद्यार्थ्यांनी इतिहास, भौगोलिक रचना, गटकार्य व आत्मविश्वास आत्मसात केला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच विचारशक्ती, निर्णयक्षमता, गटदक्षता, अभिव्यक्ती, सामाजिक बांधिलकी, संस्कार व देशप्रेम निर्माण करणारे कार्यप्रवण वातावरण प्रशालेने दिले. विद्याव्रत समारंभात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत, समाजसेवकांचे अनुभव व मार्गदर्शन मुलांच्या आयुष्याला ठोस दिशा देणारे ठरले.

प्रबोधनातून प्रेरणा, सहभागातून शिकणे, आणि अनुभवातून विकास साधण्याचा प्रयत्न झाला. शाळा ही केवळ शैक्षणिक केंद्र नसून मनुष्यनिर्माण व राष्ट्रनिर्माणाची कार्यशाळा बनली आहे, हे या वर्षीच्या उपक्रमातून स्पष्ट झाले.

◈-◈-◈

# २. शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**प्रारंभ – शके १९१४/ इ.स. १९९२**

**ज्ञान प्रबोधिनीमध्ये विकसित झालेले शिक्षणातील यशस्वी प्रयोग इतर शैक्षणिक संस्थांमध्ये व विविध समाजगटातील विद्यार्थ्यांमध्ये प्रभावीपणे रुजवणे !**



**शैक्षणिक उपक्रम संशोधिका विभागातील कार्यकर्ता गट**

## नित्य स्वरूप

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प आशय | वयोगट | कार्यक्षेत्र | वारंवारिता |
|---|---|---|---|---|
| गणित प्रभुत्व परीक्षा | गणित सखोल समजून घेण्याची संधी | इ. ५वी व ८वी | पुणे जिल्हा | वार्षिक |
| अनुभव शाळा | मूलभूत अध्ययन क्षमता, मूल्य व संस्कार | इ. १ली ते ६वी | पुणे शहर – नागरी वस्ती | दैनंदिन |
| प्रज्ञा विकास | व्यक्तिमत्त्व विकसन, कौशल्य प्रशिक्षण, वृत्ती घडण | इ. ७वी ते १०वी | पुणे शहर – नागरी वस्ती | साप्ताहिक |
| LearnEng | इंग्रजी शिक्षणातून आत्मविश्वास वृद्धी | इ. ६वी व ७वी | वेल्हे व पानशेत भागांतील शाळा | दैनंदिन |
| विकासमित्र | अभ्यास कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकसन, राष्ट्रीय जाणीव जागृती | इ. ५वी ते १०वी | वेल्हे तालुका, रोहा तालुका, पडसरे आदिवासी आश्रमशाळा | साप्ताहिक |
| छोटे सायंटिस्टस् | विज्ञानपूरक कौशल्य प्रशिक्षण, प्रयोग व खेळण्यांद्वारे संकल्पना अध्ययन | इ.५वी ते ९वी | महाराष्ट्रातील १३ जिल्हे व ८ अन्य राज्ये | मासिक |
| स्वयंअध्ययन कौशल्य | अभ्यासाची कौशल्ये व तंत्रे | इ.१०वी | महाराष्ट्र | प्रासंगिक |
| प्रेरणासेतू | वेगवेगळ्या क्षेत्रांची माहिती व त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे अनुभव कथन | इ. ८वी ते १०वी | दूरस्थ माध्यमातून | साप्ताहिक |
| ज्ञानसेतू | राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडण्यासाठी अन्य राज्यातील प्रवास | महाविद्यालयीन गट | सीमावर्ती व दुर्गम राज्ये | वार्षिक |

## संख्यात्मक आढावा

- **विद्यार्थी** – १,७३,४५०
- **मार्गदर्शक सदस्य** – १,४१८
- **शाळा** – १,३४०
- **महाराष्ट्रातील जिल्हे** – १३
- **अन्य राज्ये** – १५



**प्रज्ञा विकास-दुर्गभ्रमण सहल**



**विकासमित्र : इ. ८वी अभ्यास शिबिर**

### प्रतिसाद

छोटे सायंटिस्टस् हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षणशक्ती, जिज्ञासा आणि प्रयोगशीलता निर्माण करणारा अनोखा शैक्षणिक प्रवास आहे. यात विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता, प्रत्यक्ष प्रयोग करून शिकल्यामुळे 'विज्ञान' हा त्यांच्या आयुष्याचा भाग होतो. 'का?' व 'कसं?' या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेतांना, शिक्षक मार्गदर्शक आणि प्रेरक होतात. या वर्गापलिकडच्या अनुभवामुळे शिकणं एक आनंददायी प्रक्रिया होते, मुलांचा आत्मविश्वास वाढतो, विचार करण्याची वृत्ती विकसित होते, आणि ते खरे 'छोटे सायंटिस्टस्' बनतात.

**– रोहित बोंदर, विज्ञानदूत, छोटे सायंटिस्टस्**

'विकासमित्र' या प्रकल्पाद्वारे ग्रामीण व आदिवासी पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी विज्ञानाची गोडी, अभ्यास कौशल्ये, वाचनाची सवय, हस्ताक्षर सुधारणे, निरीक्षण व विचारशक्ती संवर्धन असे विविध परिणामकारक उपक्रम राबवले गेले. १ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन अधिक व्यापक झाला. योग व व्यायाम शिबिरांमुळे आरोग्याविषयी जागरूकता व आत्मविश्वास वाढला. पुढील वर्षीही हा प्रकल्प सुरू राहावा, ही मनापासून अपेक्षा.

**– श्री. शिंदे संदीप यशवंत, मुख्याध्यापक, आश्रमशाळा, पडसरे**



• छोटे सायंटिस्टस्- चेन्नई शिक्षक प्रशिक्षण



• अनुभव शाळा-परिसर फेरी, भाजी मंडई



• LearnEng प्रकल्प-मासिक प्रशिक्षण

गेल्या वर्षात प्रथमच विभागाचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर प्रबोधिनीच्या वेल्ह्यातील वास्तूत झाले. शिक्षण क्षेत्रासाठी लागणारी विविध कौशल्ये शिकणे, प्रबोधिनीचा इतिहास आणि तत्त्व विचार समजून घेणे आणि अंतर्गत गटबांधणी असे शिबिराचे मुख्य हेतू होते. शिबिरात विभागातील व प्रबोधिनीच्या विविध केंद्रातील सदस्य सहभागी झाले, ज्यापैकी ९ सदस्यांनी कामाप्रती बांधिलकी वाढवणाऱ्या प्रबोधिनीच्या प्रतिज्ञा घेतल्या.

### ◈ प्रज्ञा विकास प्रकल्प ◈

प्रज्ञा विकास प्रकल्पात पुणे शहरातील ५ नागरी वस्ती भागात इ. ७वी ते १०वीतील विद्यार्थ्यांसाठी अभ्यास पूरक कौशल्य, जीवनव्यवहार कौशल्य यांचे मार्गदर्शन झाले. २०१ विद्यार्थ्यांपैकी २५ निवडक विद्यार्थ्यांसाठी ५ नेतृत्व विकसन कार्यशाळा झाल्या. प्रतिभा विकसन, समस्या परिहार, सामाजिक जाणीव जागृती, स्थळभेटी इ. सत्रे झाली. या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम, शिबिर, सहली याच्या संयोजनात पुढाकार घेतला. अनुभव शाळा प्रकल्पात 'कारक कौशल्ये' हा नवा घटक यावर्षात समाविष्ट करण्यात आला. विद्यार्थ्यांना स्थूल कारक कौशल्ये (Gross Motor Skills) आणि सूक्ष्म कारक कौशल्ये (Fine Motor Skills) शिकवण्यात आली.

### ◈ विकासमित्र प्रकल्प ◈

विकासमित्र प्रकल्पात शाळेत विकासिका घेणाऱ्या शिक्षणदूतांचे वर्षाच्या सुरुवातीला निवासी शिबिर घेण्यात आले. आशयाच्या प्रशिक्षणासोबत शैक्षणिक प्रक्रियांचे देखील प्रशिक्षण या शिबिरात झाले. यावर्षी प्रथमच वेल्हे भागातील इ. १०वी मधल्या निवडक विद्यार्थ्यांचे वर्षभर स्वयं अध्ययन प्रशिक्षण झाले व वर्षाच्या शेवटी एक निवासी अभ्यास शिबिर देखील झाले. आशय, स्वयं अध्ययन कौशल्ये, विविध अभ्यास तंत्रे, प्रश्नपत्रिका सोडवण्याची तंत्रे इ. संदर्भात यात सत्रे झाली. रोहा तालुक्यात वर्षभर विकासिकांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना सुट्टीत उन्हाळी शिबिराची मजा घेता यावी यासाठी प्रथमच स्थानिक महाविद्यालयीन विद्यार्थी गटाचा संयोजक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. त्या गटातील ताई-दादांनी दहा शाळांत व तीन वाडी वस्त्यांवर उन्हाळ्यात शिबिर घेतले. सुमारे ५५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले. पडसरे येथे विज्ञान प्रकल्प प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विज्ञान संकल्पनांवर आधारित मॉडेल्सचे प्रदर्शन भरवले.

### ◈ छोटे सायंटिस्टस् ◈

छोटे सायंटिस्टस् प्रकल्पात विज्ञानाची गोडी वाढविण्यासाठी ग्रामीण भागातील ४ शाळांमध्ये पाठ्यपुस्तकपूरक आशयावर वर्षभर २५ साप्ताहिक तासिका झाल्या. विज्ञान आवडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्यांना कुतूहल वाटणाऱ्या विषयांवर OTB (out of the box) कार्यशाळा पुणे व हराळी इथे झाल्या. डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेचे मार्गदर्शन वर्ग (सेमी इंग्रजी माध्यम) दूरस्थ पद्धतीने घेतले. या स्पर्धेमध्ये मीरा काळे हिने रौप्य पदक मिळवले.

### ◈ LearnEng ◈

LearnEng या प्रकल्पात ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दररोज इंग्रजी भाषा व जीवन कौशल्यासाठी तासिका झाल्या. वर्षभर दररोज शिकलेल्या इंग्रजीचा सराव सुट्टीतही राहावा यासाठी १० दिवस दररोज २ तास असे उन्हाळी वर्ग घेतले. इंग्रजीची कार्यपत्रके सोडवत असतानाच मुलांनी गावातील पोस्ट ऑफिस व ग्रामपंचायत येथे भेट देऊन तेथील कामकाज समजून घेण्याचा अनुभव घेतला.

### ◈ गणित प्रभुत्व परीक्षा ◈

गणित प्रभुत्व परीक्षेला बसलेल्या ५वी आणि ८वीतील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी ३०-३२ सत्रांचा दूरस्थ मार्गदर्शन वर्ग घेतला. इ. ५वीसाठी नवीन पुस्तक तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

### ◈ प्रेरणासेतू प्रकल्प ◈

प्रेरणासेतू प्रकल्पात सात राज्यांतील विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक सत्रे झाली. यामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांनी आपापल्या क्षेत्राबद्दल तसेच आपल्या व्यक्तिगत प्रवासाबद्दल मार्गदर्शन केले.

### ◈ ज्ञानसेतू प्रकल्प ◈

ज्ञानसेतू प्रकल्पामधून वेगवेगळ्या राज्यात जाणाऱ्या युवक-युवती गटावर दौऱ्याचा नेमका काय परिणाम होतो हे पूर्व-उत्तर चाचणी घेऊन तपासले गेले. यावर्षी पहिल्यांदाच बिहार राज्यात कार्यशाळा घेतली.

◈-◈-◈

सविस्तर वार्षिक वृत्त
मराठी व इंग्रजी ▶

# ३. शैक्षणिक साधन केंद्र

प्रारंभ – शके १९३०/ इ.स. २००८

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. ज्ञान प्रबोधिनीत तयार झालेल्या शिक्षण प्रणालीचा विस्तार महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात होण्यासाठी विविध प्रकारच्या शैक्षणिक साधनांची निर्मिती व प्रसार.

२. ई-साहित्य निर्मिती, प्रबोध आभासी प्रयोगशाळा, Virtual Kiosk , आनंदी शिक्षण प्रकल्प, निसर्ग मित्र ऑलिंपियाड स्पर्धेमध्ये, तंत्रज्ञान प्रशिक्षण आणि दृक्श्राव्य माध्यमे असे ७ प्रकल्प.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

❖ **ई-साहित्य निर्मिती** – विविध विषयांच्या एकूण १७५ चित्रफितींची निर्मिती, आजवर एकूण २,५०० चित्रफितींची निर्मिती.

❖ **Virtual Kiosk** - ७ ठिकाणी स्थापित

❖ **प्रबोध आभासी कार्यशाळा** – एकूण ६ ठिकाणी, ३५ प्रयोगांचा समावेश

❖ **आनंदी शिक्षण** – ५२ केंद्रात मिळून १,३१३ विद्यार्थी

❖ **निसर्गमित्र ऑलिंपियाड** – १४ राज्ये, ५,४६५ विद्यार्थी

❖ **माध्यम केंद्र** – ३ माहितीपट, २ मालिका, १ अभिरुची वर्ग

❖ **तंत्रज्ञान प्रशिक्षण** – ४ कार्यशाळा

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



प्रबोध आभासी प्रयोगशाळा उद्घाटन, पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क



आनंदी शिक्षण, रायगड केंद्र, बालजत्रा

### ◇ ठळक घडामोडी ◇

१. नातू फौंडेशनकडून आनंदी शिक्षण प्रकल्पाला रु. ५०,०००/- देणगी मिळाली.

२. 'पुणे नगर वाचन मंदिर' या संस्थेसोबत चाललेल्या प्रकल्पात अमराठी भाषिकांमध्ये सोप्या व संवादी पद्धतीने मराठी भाषा शिकवण्याच्या प्रकल्पासाठी नऊ चित्रफितींची निर्मिती.

३. शैक्षणिक साधन केंद्र विभागातील २५ नियमित सदस्य, १०० अभ्यागत विषय तज्ज्ञ, कार्यकर्ते, तंत्रज्ञ यांनी काम केले.

४. ३० शालेय विद्यार्थी, २२ महाविद्यालयीन युवक-युवती यांनी इंटर्नशिपमधून काम केले. ज्ञान प्रबोधिनीच्या विविध केंद्र, विस्तार केंद्र यांच्या साहचर्याने काम झाले.

### प्रतिसाद

ज्ञान प्रबोधिनीने सुरू केलेला आनंदी शिक्षण हा अभिनव उपक्रम आहे. यावर्षी प्रथमच चिंचवड मूक बधिर विद्यालयाने आनंदी शिक्षण प्रकल्पात सहभाग घेतला असून, इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित आणि मराठी हे विषय घेतले. या प्रकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कृती-आधारित शिक्षण, ज्यामध्ये प्रत्यक्ष सहभागावर भर दिला जातो. शाळेतील शिक्षकांना श्री. पाठक आणि श्री. गुरव या तज्ज्ञांकडून सखोल प्रशिक्षण मिळाले. त्यांनी शिकवण्याच्या प्रभावी पद्धती आणि साध्या साधनांचा वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिक दाखवले.

रंगीत कार्डस्, वाक्य पट्ट्या, magic box, Pen drive मधील गाणी आणि कथा, चित्रभाषा पुस्तके, सराव पत्र अशा विविध साधनांचा वापर केला. या प्रकल्पातील एक मोठे यश म्हणजे 'छोटे शेतकरी' उपक्रम. विद्यार्थ्यांनी उत्साहाने झाडे लावली, पेरण्यापासून ते रोपांच्या वाढीपर्यंत आणि फळे-भाज्या काढण्यापर्यंत सर्व गोष्टींचे बारकाईने निरीक्षण केले. या व्यावहारिक अनुभवामुळे भाषा आणि गणिताच्या संकल्पनांचा वास्तविक जगाशी संबंध जोडला गेला. विद्यार्थी आपणहून दररोज दुपारी २:१५ वाजता 'सराव पत्रिका सोडवायला घेऊ का?' असे विचारत असत. 'चित्रभाषा पुस्तक' देखील एक शक्तिशाली साधन ठरले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना चित्रे पाहून त्यांचे विचार व्यक्त करता येतात. शिवाय, सापशिडीचा खेळ भाषा विकासासाठी एक उत्कृष्ट पद्धत असल्याचे सिद्ध झाले आहे, कारण विद्यार्थ्यांनी त्याला एक खेळ मानून आनंदाने खेळले, अभ्यास म्हणून नाही. आनंदी शिक्षण प्रकल्पाने चिंचवड बधिर मूक विद्यालयात एक उत्तम सर्वसमावेशक शैक्षणिक वातावरण यशस्वीरीत्या तयार केले आहे.

– गीता अभ्यंकर, मूक बधिर विद्यालय, चिंचवड




• प्रबोध आभासी प्रयोगशाळा



• निसर्गमित्र ऑलिंपियाड मणिपूर



• TUI भूमी Interactive Table

## ◈ ई-साहित्य निर्मिती ◈

१. २०२४-२५ या वर्षी इ. ५वीसाठी परिसर अभ्यास आणि इ. ६वी आणि ९साठी गणित या विषयामधील शालेय अभ्यासक्रमावर आधारित १७५ शैक्षणिक चित्रफिती तयार केल्या.

२. कर्णबधिर विद्यार्थांसाठी भारतीय सांकेतिक भाषेत व्हिडिओंची निर्मिती या विषयांतर्गत एकूण ७ घटकांवर सांकेतिक भाषांमध्ये २८८ पानांचा Flipbook शब्दसंग्रह तयार केला.

**3. Virtual Kiosk** - Bharat virtual kiosk मध्ये १,२३२ व्हिडियो आणि Maharashtra Virtual Kiosk मध्ये १,७०० शैक्षणिक व्हिडियो खेळ व कार्यपत्रके उपलब्ध करून देण्यात आली. ७ ठिकाणी Virtual Kiosk देण्यात आले.

## ◈ प्रबोध आभासी प्रयोगशाळा ◈

**प्रबोध आभासी प्रयोगशाळा (Virtual Reality Lab)** - शालेय अभ्यासक्रमातील विज्ञान व सामाजिक शास्त्र या विषयांवर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ई-प्रात्यक्षिकांची निर्मिती करण्याचे काम आभासी प्रयोगशाळेत चालते. त्यात १) Virtual Reality Science Lab २) Augmented Reality App आणि ३) भूमी : Tangible User Interface (TUI) यांचा समावेश आहे.

**१) Virtual Reality Science Lab** - इ. ८वी ते १०वीचे ३५ विज्ञान प्रयोग Virtual Realityमध्ये इंग्रजी आणि मराठी माध्यमात तयार करण्यात आले आहेत. Virtual Realityच्या माध्यमातून विज्ञान आणि पर्यावरण शिक्षण देणारी ही महाराष्ट्रातील पहिली आभासी प्रयोगशाळा आहे. दुर्गम भागांतील शाळांमध्ये या आभासी प्रयोगांद्वारे विद्यार्थ्यामध्ये स्वयंअध्ययन, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणाबद्दल जागरूकता इ. कौशल्यांचे विकसन होत आहे. यावर्षी विविध संस्थांच्या साहचर्याने ६ ठिकाणी प्रबोध आभासी प्रयोगशाळा सुरू झाल्या.

**२) Augmented Reality App** - प्रबोध AR लॅब हे ऑगमेंटेड रिॲलिटी तंत्रज्ञानाचे एक नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपयोजन आहे. या तंत्रज्ञानामुळे मुलांना स्मार्टफोनवर अनुभवांच्या माध्यमातून विज्ञान आणि गणितामधील संकल्पना समजून घेण्यात मदत होते.

**३) भूमी TUI Application**-शालेय विद्यार्थ्यांसाठी भारतीय संस्कृती, इतिहास, भूगोल याविषयांची रंजक आणि सर्जनशील पद्धतीने ओळख करून देण्यासाठी Image processing based TUI Application 'भूमी' विकसित करत आहोत. विद्यार्थ्यांना खजिन्याचा शोध जसा घेतला जातो तसे खेळून मातृभूमीचा परिचय करून घेता येईल. अनुभवाधारित व सहभागात्मक शिक्षण (Interactive Education) देण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग आहे.

## ◈ आनंदी शिक्षण ◈

आनंदी शिक्षण हा १०० तासांचा अभ्यासक्रम सर्व केंद्रात घेतला जातो. प्रत्येक पाठावर आधारित शैक्षणिक चित्रफिती, गाणी, गोष्टी, कृती आणि खेळ विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळतात. पुण्यातील नागरी वस्तीमधील ८ वस्त्या, हराळी केंद्रातील २० केंद्र, सांगलीमधील ५ केंद्र, रायगडमधील ११ कातकरीवाड्या, ८ कर्णबधिर मुलांच्या शाळा अशा ५२ केंद्रांमधून १३१३ विद्यार्थी या प्रकल्पाचा लाभ घेत आहेत. ४४ केंद्रातील ४४ आनंद मित्र आणि ८ कर्णबधिर शाळातील १६ शिक्षक, ६ केंद्र समन्वयक आणि प्रकल्प साहाय्यक, प्रकल्प प्रमुख असे एकूण ६८ कार्यकर्ते सदस्य नियमितपणे यासाठी काम करतात.

## ◈ निसर्गमित्र ऑलिंपियाड ◈

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्ञान प्रबोधिनी 'निसर्ग मित्र ऑलिंपियाड' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दूरस्थ माध्यमातून पर्यावरण साक्षरता, निरीक्षण कौशल्य, प्रकल्प पद्धती वापरणारा हा प्रकल्प आहे. १४ राज्यातील ५,४६५ विद्यार्थी, २०० पेक्षा अधिक शाळा या स्पर्धेत सहभागी झाल्या आहेत.

## ◈ माध्यम केंद्र ◈

१. **दृक्श्राव्य माध्यमे - माहितीपट निर्मिती** - ५ सामाजिक प्रकल्पांवर माध्यम केंद्राने विस्तृत माहितीपटांची निर्मिती केली. ज्ञान प्रबोधिनीद्वारे चालणाऱ्या ३ प्रकल्पांचा यामध्ये समावेश होता. तर Capacity Building Commission च्या gender of workplace वरील अभ्यासक्रमात चित्रफितींची निर्मिती केली. तसेच, 'महावन' संस्थेसाठी महाराष्ट्रातील निवडक १२ सामाजिक संस्थांच्या कामावर आधारित 'ये ताना बाना बदलेगा' या podcast मालिकेसाठी ९ भागांची निर्मिती केली.

२. **सीमावर्ती राज्य तंत्रज्ञान प्रशिक्षण** - अरुणाचल प्रदेश, मणिपूर, जम्मू-काश्मीर, आसाम या राज्यांमध्ये Cultural Documentation, तंत्रज्ञानाचे शिक्षण यावर प्रशिक्षणे पार पडली. २००+ शिक्षकांनी यामध्ये सहभाग नोंदवला.

◈-◈-◈

**सविस्तर वार्षिक वृत्त ▶**

# ४. शिक्षक प्रशिक्षण केंद्र

प्रारंभ – शके १९१८ / इ.स.१९९६



विद्यार्थी प्रयोग करताना




आचार्यव्रत शिबिर

## नित्य काम

१. **स्वरुप** – शिक्षक प्रशिक्षणे, निवासी शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने, प्रबोधिनी परिचय सहली.

२. **विषय** – प्रकल्प पद्धती, शैक्षणिक संस्कार, अध्यापन पद्धती, सामाजिक शास्त्रे अध्यापन, स्वयं अध्ययन कौशल्ये

३. **राज्ये** – महाराष्ट्र, आसाम, नागालँड, तेलंगना, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुदुचेरी

## संख्यात्मक आढावा

| अ. क्र. | विषय | शिक्षक संख्या | विद्यार्थी संख्या | शाळा संख्या |
|---|---|---|---|---|
| | **प्रकल्प पद्धती** | | | |
| १. | चेन्नई | ७० | ४६५० | १३ |
| २. | करिमनगर | ४० | ८०० | ४ |
| ३. | चाळीसगाव | ७५ | – | १ |
| ४. | अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प | ४४ | १५७५ | २६ |
| ५. | वर्षारंभ-वर्षांत शैक्षणिक संस्कार | ५०० | ११४०० | २५ |
| ६. | समाजशास्त्र अध्यापन | ४५ | – | २० |
| ७. | स्वयंअध्ययन कौशल्य | १८५ | १८० | १ |
| ८. | निवासी शिक्षक प्रशिक्षण शिबिरे | ८२ | – | ३० |
| | **एकूण –** | १०४१ | १८६०५ | १२० |

## ◇ आर्यभट्ट अनुसंधानात्मक विज्ञान प्रकल्प ◇

या उपक्रमांतर्गत आसाम व नागालँडमधील ३१५ प्रकल्प सहभागी झाले. ६ प्रकल्पांना पारितोषिके मिळाली. परामिता ग्रुप ऑफ स्कूल्स व दयानंद अँग्लो वैदिक स्कूल्स (चेन्नई) यांच्या शाळांमध्ये ४,८०० हून अधिक विद्यार्थी व ७० शिक्षकांनी ३०० हून अधिक प्रकल्पांत भाग घेतला. चाळीसगाव येथील गुरुकुल ट्रस्टसाठीही प्रकल्पपद्धतीचे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.

वर्षारंभ-वर्षांत उपासना उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संकल्पशक्ती जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला. तामिळनाडूमधील २५ शाळांमधील ११,४०० विद्यार्थ्यांनी आणि ५०० शिक्षकांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला.

## ◇ अन्य प्रशिक्षणे ◇

१. **संकल्पना आधारित अध्ययन** – प्रशिक्षणांतर्गत चेन्नई, चाळीसगाव आणि रोटरी क्लब संलग्न शाळांतील २७० अध्यापकांना आधुनिक अध्यापन पद्धती, अभ्यास साहित्य निर्मिती, शैक्षणिक मूल्यमापन आणि शैक्षणिक नवप्रयोगांवर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या विविध मार्गदर्शकांनी सत्रे घेतली.

२. **समाजशास्त्र अध्यापन** या विषयावर दर्शन एज्युकेशन फाउंडेशनमार्फत आठ राज्यांतील २० शाळांतील शिक्षकांसाठी तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली, जिथे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यावरही चर्चा झाली.

३. **स्वयं-अध्ययन कौशल्य विकसित** करण्यासाठी आंध्रप्रदेशमधील कुप्पम येथील श्री श्री योगानंद विद्यालयातील २५ शिक्षकांचे चार दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच, चेन्नई आणि चाळीसगाव येथील शाळांतील १६० शिक्षकांनी या प्रशिक्षणात भाग घेतला. द्वारकादास गोवर्धनदास कॉलेज, चेन्नई येथे १८० विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक विचारसरणी विषयक कार्यशाळा घेण्यात आली.

४. **निवासी प्रशिक्षण वर्ग** पुदुचेरी, चेन्नई येथील वैदिक विद्या केंद्रात दयानंद अँग्लो वैदिक स्कूलच्या ५० शिक्षकांसाठी तीन दिवसीय आणि सोलापूर येथे ३२ शिक्षकांसाठी चार दिवसीय 'रूप पालटू शिक्षणाचे' प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

## ◇ ई-प्रशिक्षक अंक ◇

शिक्षकांचे, शिक्षकांसाठी, शिक्षकांनी चालवलेले मासिक म्हणजे ई-प्रशिक्षक. महाराष्ट्रातील प्रयोगशील शिक्षकांनी विविध शैक्षणिक संकल्पांवर मासिकात लेखन केले. दरमहा सुमारे २,२०० जणांपर्यंत ई-अंक पोहोचला.

## ◇ ठळक घडामोडी ◇

१. प्रा. प्रशांत दिवेकर यांनी राष्ट्रीय स्तरावर विविध शैक्षणिक उपक्रमात सहभाग नोंदवला. त्यांनी पाठ्यपुस्तक लेखन गटात योगदान दिले, तसेच 'नॅशनल मेंटॉरिंग मिशन'मध्ये मार्गदर्शक सदस्य म्हणून काम पाहिले. या उपक्रमांचा उद्देश शिक्षकांचा व्यावसायिक विकास, शाळांमधील अध्यापन पद्धतीत नवप्रयोग व गुणवत्ता वृद्धी आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबी, चिंतनशील व उपक्रमशील शिकवण घडवणे हा होता.

२. प्रबोधिनी परिचय सहल उपक्रमात तामिळनाडूमधील २५ शाळांतील ५३ शिक्षक व व्यवस्थापकांनी ज्ञान प्रबोधिनीची प्रत्यक्ष भेट घेऊन शैक्षणिक प्रक्रिया अनुभवली.

# ५. मुक्त विद्या केंद्र

**प्रारंभ – सौर शके १९४६/ इ. स. २०२४**

**ज्ञान प्रबोधिनीच्या मुक्त शिक्षण दृष्टिकोनाची क्रियाशील वाटचाल ! महाविद्यालये आणि प्रौढ गटासाठी आंतरशाखीय अभ्यासक्रम !**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## या वर्षातील अभ्यासक्रम

१. प्रतिभा विकसन
२. भविष्यवेधशास्त्राची ओळख
३. सामाजिक नेतृत्व
४. CSR प्रकल्प व्यवस्थापन

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

- महाविद्यालये – २, खुला गट – २,
- प्रबोधिनी अंतर्गत– २ एकूण ६ वर्ग प्रत्येक अभ्यासक्रम १० सत्रांचा.
- एकूण सहभागी सदस्य संख्या – १६०
- प्रशिक्षक संख्या – १०

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇




**पुणे विद्यार्थी गृहातील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा सामाजिक नेतृत्व अभ्यासक्रम**



**नेतृत्व संवर्धन केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी प्रतिभा विकसन अभ्यासक्रम**

- वर्षभरात झालेल्या ८ बैठकींमधून अभ्यासक्रमांची निश्चिती, सत्रनियोजन, प्रचार व महाविद्यालय यांबरोबरच्या साहचर्याचा आराखडा ठरवण्यात आला. या बैठकींमध्ये सुमारे ४० सदस्य सहभागी झाले.
- वर्षभरात केंद्राने प्रबोधिनी परिसर, पुण्यातील महाविद्यालये आणि प्रौढ गटासाठी प्रतिभा विकसन, भविष्यवेध, सामाजिक नेतृत्व, यांसारखे अभ्यासक्रम शिकवले. पुणे विद्यार्थीगृहाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी २ क्रेडिटचे २ वर्ग पूर्ण केले. टाटा ट्रस्टने अर्थसाहाय्य केलेला ग्रामीण क्रीडा संकुल, या प्रकल्पातील कार्यकर्त्यांच्या गटासाठी निगडी येथे दीड-दोन दिवसांच्या प्रकल्प व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आल्या.
- या विविध अभ्यासक्रमांसाठी १० प्रशिक्षित प्रशिक्षक अध्यापकांचा संच कार्यरत आहे.
- संकेतस्थळाची निर्मिती पूर्ण झाली असून लवकरच नव्या अभ्यासक्रमांसह प्रचार सुरू होणार आहे. अभ्यासक्रम दूरस्थ पद्धतीने शिकविण्यासाठी Learning Management System चा वापर करण्याचे ठरवले आहे. प्रचारासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ इ. ११ महाविद्यालयांना भेटी देण्यात आल्या. सर्व ठिकाणी मुक्त अभ्यासक्रम कल्पनेचे स्वागत झाले. पुढील वर्षात १० ते १२ नवीन अभ्यासक्रम तयार करून महाविद्यालय अंतर्गत अध्ययन, खुले अभ्यासक्रम, दूरस्थ पद्धतीने व संमिश्र या चार पद्धतींनी पोहोचवण्याचे नियोजन आहे.
- पुढील वर्षात हे केंद्र महाराष्ट्र व देशभरात 'मुक्त शिक्षणाचे मॉडेल' म्हणून विकसित होण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे. २०२५-२६ मध्ये १० विषयांवरील वर्ग घेण्यात येतील. श्रीमती ललिता थत्ते यांनी दिलेली ५ लक्ष रुपयांची देणगी यासाठी राखीव ठेवण्यात आली असून त्याचा उपयोग २०२५-२६ या वर्षात होणार आहे.

◈-◈-◈

# ६. छात्र प्रबोधन

प्रारंभ – शके १९१४/ इ.स.१९९२

**कुमारांसाठी कृतिशीलता जोपासणारे मासिक! निव्वळ मासिक नव्हे ! विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. मासिके–द्वैमासिक : नित्य, सुबोध (ग्रामीण) इंग्रजी.

२. दिवाळी अंक

३. पुस्तक निर्मिती व विक्री

४. स्पर्धा, उपक्रम, कार्यशाळा, शिबिरे

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

**सभासद / सहभागी विद्यार्थी**

- **छात्र प्रबोधन मासिक** – २०५०
- **सुबोध ग्रामीण द्वैमासिक** – ३०००
- **दिवाळी अंक** (३ मिळून) – ३०,५०० प्रती
- **दिनदर्शिका** – ८००० प्रती
- **पुस्तके विक्री** – १५,००० पुस्तके
- **जोडीकार्य स्पर्धा** (एप्रिलमध्ये) – ४५
- **'ऐपावाक' उपक्रम** (मेमध्ये) – १००
- **गावोगावी ग्रंथालये** (एप्रिलमध्ये) – २०० ग्रंथालये / २१०० विद्यार्थी
- **वर्गोद्दिष्ट स्पर्धा (मासिक)** – ५५० विद्यार्थी
- **कुमार साहित्य मेळावे** – ६ शाळा/३००
- **लेखन–अभिवाचन निवासी कार्यशाळा** – ३०
- **हस्तलिखित–अभिवाचन स्पर्धा** – ६० संघ, ४३०
- **प्रबोधन दूत योजना** – १२५ शिक्षक, ८०००

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



**लेखन-अभिवाचन निवासी कार्यशाळा**

### विकसता विकसता विकसावे...!

ज्ञान प्रबोधिनी - छात्र प्रबोधन तर्फे प्रबोधन दूत ही प्रयोगशील शिक्षकांसाठी एक योजना! या प्रबोधन दूत योजनांतर्गत शिक्षकांना त्यांच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी काही पुस्तकांचे मोफत संच देण्यात येतात. दरमहा ऑनलाईन बैठका व वर्षातून किमान दोनदा शिक्षकांसाठी निवासी शिबिर आयोजित केले जाते. त्याचबरोबर वर्गोद्दिष्ट स्पर्धा, कल्पक स्पर्धा, घरोघरी ग्रंथालय, सुट्टीतील उपक्रम, जिज्ञासा ग्रंथालय, अभिवाचन स्पर्धा- कार्यशाळा, हस्तलिखित स्पर्धा इत्यादी अनेक उपक्रम या प्रबोधन दूत योजनांतर्गत आमच्या शाळेत राबविण्यात आले. या स्पर्धांच्या मधून यश मिळो अथवा न मिळो पण आपल्यामध्ये ती क्षमता आहे की नाही हे या मुला-मुलींना तपासून पाहता आलं आणि खऱ्या अर्थाने त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसन होत गेलं.

आमच्या शाळेत येणाऱ्या दुर्गम भागातील गोरगरीब व शिकण्याची जिद्द असणाऱ्या मुलींसाठी चाकोरीच्या बाहेर जाऊन काहीतरी तळमळीने करण्याची इच्छेला प्रबोधन दूत योजनेमुळे संधी मिळाली. शाळेतील मुलींनी जवळजवळ सर्व वर्गोद्दिष्ट स्पर्धांमध्ये भाग घेण्यासह बक्षिसेसुद्धा मिळवली. या वर्गोद्दिष्ट स्पर्धेत भाग घेत असताना संबंधित वर्ग पूर्ण एकाच उद्दिष्टाने झपाटून जात होता. 'घरोघरी ग्रंथालय' उपक्रमांमधून आमच्या शाळेतील मुलींना वाचनाची अत्यंत गोडी लागली. दर आठवड्याला शुक्रवारी शाळा सुटल्यानंतर आमच्या शाळेत चालणाऱ्या कट्ट्यावर प्रबोधन दूत योजनांतर्गत मिळालेल्या पुस्तकांची आणि स्वतः विकत घेतलेल्या छात्र प्रबोधन दिवाळी अंकांवर मनसोक्त चर्चा होते.

प्रबोधन दूत योजनांतर्गत आणखी आपल्यासाठी नवीन काय येणार आहे? याची उत्सुकता, आतुरताही आमच्या शाळेतील मुलींना कायमच लागून राहिलेली असते. महाराष्ट्रातील धडपडणाऱ्या, संवेदनशील, उपक्रमशील शिक्षकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी नम्र आवाहन...!

**– श्री. दिगंबर रंगराव गिरीबुवा, परशुराम विद्यामंदिर व ज्यु. कॉलेज, गगनबावडा, जि. कोल्हापूर**



**घरोघरी ग्रंथालय योजना**



**दिवाळी अंक वितरण**







● हस्तलिखित अभिवाचन स्पर्धा बक्षीस समारंभ ● पुणे पुस्तक जत्रा-फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ● जोडीकार्य उपक्रमातील कार्य करताना

### ◈ प्रकाशने ◈

१. वर्षभरात ९ नित्य अंक, १ विद्यार्थी विशेषांक, १ दिवाळी अंक व १ वासंतिक विशेषांक असे १२ अंक प्रकाशित करण्यात आले. सुबोध ग्रामीण द्वैमासिकाचे ५ अंक, इंग्रजी द्वैमासिकाचे ५ ई-अंक प्रकाशित झाले.

२. छात्र प्रबोधनद्वारा ९ पुस्तकांचे पुनर्मुद्रण/आवृत्त्या प्रकाशित केल्या गेल्या. पुणे-निगडी येथे चार ठिकाणी **पुस्तक प्रदर्शन व विक्री** करण्यात आली. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात अंबाजोगाई, परभणी, अकोला, पुणे, इचलकरंजी, नाशिक व बदलापूर या ७ ठिकाणी स्थानिक पुस्तक विक्रेत्यांमार्फत विक्री केंद्रांना प्रारंभ झाला.

### ◈ कुमारांसाठीचे उपक्रम ◈

१. अंकातील साहित्याभोवती २ ते ३ तासांचे **कुमार साहित्य मेळावे** घेतले गेले. राज्यस्तरीय हस्तलिखित (१८वे वर्ष) व अभिवाचन (६वे वर्ष) स्पर्धा घेतली गेली. स्पर्धेची गुणवत्ता वाढवण्यासाठी स्पर्धेपूर्वी दूरस्थ पद्धतीने कार्यशाळा घेण्यात आली. एकूण १७ संघांना बक्षिसे व प्रशस्तिपत्रके देण्यात आली. प्रशस्तीपत्रकावर त्या-त्या संघाच्या हस्तलिखिताचा/अभिवाचनाचा QR कोड घालण्यात आला होता. कै. दत्ता टोळ, मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी यांच्या अर्थसाहाय्यातून ही स्पर्धा संपन्न झाली.

२. **वर्गोद्दिष्ट स्पर्धा** – वर्गाने मिळून एकत्रितपणे उद्दिष्ट पूर्ण करावे, यासाठी दरमहा एक वर्गोद्दिष्ट दिले होते. सामूहिक भजन, प्रसंगनाट्य सादरीकरण, समूहनृत्य, विक्री उपक्रम, सायकल सहल, छोट्यांसाठी गंमत जत्रेचे आयोजन अशा प्रकारची उद्दिष्टे त्यामध्ये होती. दरमहा उत्तमरीत्या वर्गोद्दिष्ट पूर्ण केलेल्या ३ वर्गांना १००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून पाठवण्यात आली.

३. **सुट्टीतील उपक्रम** – घरोघरी ग्रंथालयांतर्गत ४५ शाळांमधील २०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ पुस्तके/अंक दिले होते. त्यांनी आपल्या घराच्या परिसरातील १०-१२ मित्र-मैत्रिणींना जमवून सुट्टीत किमान १५ दिवस रोज २ तास ग्रंथालय चालवले. जोडीकार्य उपक्रमांतर्गत सुट्टीत जोडीने मिळून ५ आव्हानात्मक कामे पूर्ण करायची होती. दूरभाष करुन कामे मिळवणे व काम पूर्ण झाल्यावर निवेदन करून पुढचे काम मिळवणे असे स्वरूप होते. विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता. ऐपावाक (ऐका-पहा-वाचा-करा) हा २५ दिवस रोज दूरस्थ पद्धतीने उपक्रम ॲपद्वारे चालू होता.

### ◈ प्रौढांसाठीचे उपक्रम ◈

१. **प्रबोधन दूत योजना :** २०२२ साली सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत एकूण २२५ शाळांमध्ये प्रत्येकी एक शिक्षक सहभागी होते. सध्या त्यातील ११५ शिक्षक उत्साहाने कार्यरत आहेत. वर्षभरात २००० रुपयांचे शैक्षणिक साहित्य भेट, मासिक दूरस्थ बैठकी व वर्षातून **१ निवासी शिबिर** असे या योजनेचे स्वरूप आहे.

२. इंडियन रुट्स्, अमेरिका, ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन अमेरिका व भारतातील सुमारे ४०० देणगीदार, जाहिरातदारांच्या भरीव आर्थिक साहाय्यातून यातील अनेक उपक्रम राबविले गेले. त्या सर्वांना मनापासून धन्यवाद !

### ◈ ठळक घडामोडी ◈

१. दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मा. संचालकांनी छात्र प्रबोधन विभागाला वार्षिक भेट दिली. आ. संचालकांनी 'प्रबोधनदूत' या योजनेतील शिक्षकांशी ऑनलाइन संवाद साधला व मार्गदर्शन केले. त्याला ४५ शिक्षक उपस्थित होते. संपादकीय व व्यवस्थापकीय गटातील सदस्यांशी संचालकांनी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.

२. **प्रतिज्ञा ग्रहण** – १६ जून २०२४ रोजी युवती विभागाद्वारे योजलेल्या प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रमात छात्र प्रबोधन विभागातील शिल्पाताई कुलकर्णी व शुभदाताई कुलकर्णी यांनी प्रथम तर रूपालीताई बापट यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

३. विभागप्रमुख मा. महेंद्रभाई सेठिया यांची ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह म्हणून नियुक्ती झाल्यावर, आधीपासून कार्यरत असलेल्या शिल्पाताई कुलकर्णी व रूपालीताई बापट या जोडीने विभागाची जबाबदारी स्वीकारली आहे.

◈-◈-◈

**सविस्तर वार्षिक वृत्त ▶**

## ७. नेतृत्व संवर्धन केंद्र

प्रारंभ – शके १९३४/इ.स. २०१२

### नित्य स्वरूप

१. प्रशासकीय नेतृत्व विकसन वर्ग (स्पर्धा परीक्षा तयारीसाठी)
२. सामाजिक नेतृत्वासाठीचा **अग्रदूत** प्रकल्प
३. प्रशिक्षण सुविधांनी सज्ज वेल्हे येथे नेतृत्व प्रशिक्षण केंद्र
४. अध्यापकांसाठी शैक्षणिक नेतृत्वगुण विकसन वर्ग
५. संशोधन परिषदांमध्ये सादरीकरण

### संख्यात्मक आढावा

१. **प्रशासकीय नेतृत्व विकसन वर्ग** – ७० विद्यार्थी

२. **सामाजिक नेतृत्व विकसन** –
२.१ अग्रदूत प्रकल्प – ३६१ नोंदणी
२.२ NEP अंतर्गत क्रेडिट कोर्सेस – ५० जणांचे प्रशिक्षण

३.विविध उपक्रमांद्वारे १५० युवक-युवतींचा सहभाग.

३. **शैक्षणिक नेतृत्वगुण विकसन वर्ग** – १२ अध्यापक सहभागी

४. **नेतृत्व प्रशिक्षण केंद्र, वेल्हे –** १४५ दिवस, ३,५०० व्यक्तींनी या केंद्राची सुविधा वापरल्या.



**साहस शिबिर - मढेघाट, ता. वेल्हे**




**नेतृत्व शिबिरातील मार्गदर्शन सत्र**

### प्रतिसाद

नेतृत्व संवर्धन केंद्रामध्ये दोन वर्षाच्या (जिज्ञासा १८ आणि आकांक्षा ११) अनुभवातून स्पर्धा परीक्षेसाठीचा birds eye view मिळाला. ह्या दोन वर्षातील उपक्रमांमधून Personality Development साठीचे skills जसे की, Communication skills, confidence building, goal setting and vision building, emotional management त्याच सोबत, UPSCच्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेल्या study skills, critical thinking skills, questioning skills, time management अशा अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. प्रबोधिनीच्या माध्यमातून मिळालेल्या ज्ञानाच्या गाठोड्याचं पुढच्या learning life साठी नक्कीच मदत होईल, त्यासाठी मी प्रबोधीनीची कायम ऋणी असेन.

''प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया, समर्थ मायभूमीला जगी करावया...''

**- गौरवी जयश्री जयेंद्र दिनकर** (प्रशासकीय नेतृत्व विकसन वर्ग विद्यार्थिनी)

''शिबिरातील गीतांजली देवगांवकर यांच्या अनुभव कथनातील एक वाक्य स्मरणात राहिले की, आपल्याला दररोज काही नवीन आव्हानाला सामोरे जायचे आहे त्यासाठी आपण सदैव कृतिशील राहिले पाहिजे. नवीन अनुभव घेतले पाहिजेत. या शिबिरात मला अशा अनेक गोष्टी मिळाल्या ज्या शाळा-कॉलेजमध्ये मिळाल्या नाहीत.''

**- प्रतीक बर्गे** (अग्रदूत प्रकल्प विद्यार्थी)

''समाजासाठी काहीतरी करायला मिळालं, याचं समाधान वाटले. मी माझ्या कामामधून काहीतरी मूल्यवर्धन (value addition) करू शकले, मदत करू शकले, म्हणून चांगलं वाटलं. **- अदिती नागवे** (अग्रदूत प्रकल्प विद्यार्थिनी)







• वर्षारंभ समारंभ - अधिकारी मार्गदर्शन • Creative thinking विषयावरील सत्र • वेल्हे येथील प्रशिक्षण केंद्र

## ◈ प्रशासकीय नेतृत्व विकसन ◈

नेतृत्व संवर्धन केंद्रातर्फे दोन वर्षांचा जिज्ञासा (१९वी तुकडी) आणि आकांक्षा (११वी तुकडी) अभ्यासक्रम राबवण्यात आला. UPSC अभ्यास, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व कौशल्य इ. विषयांवरील सत्रे व नेतृत्व पायाभरणी उपक्रम घेण्यात आले. सुधागड, बारामती, भोर येथे तालुका अभ्यास सहली व ग्रामीण भाग भेटी, नेतृत्व शिबिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार अभ्यास शिबिर यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

१. **गणेशोत्सवातील विशेष उपक्रम** – जिज्ञासा वर्गातील १४ विद्यार्थ्यांनी गणेशोत्सवामध्ये लक्ष्मी रस्त्यावर पोलीस मित्र म्हणून रहदारी नियंत्रण केले. त्याबरोबर मा. अजितराव कानिटकर यांचे शेती प्रश्नावर आधारित वैचारिक व्याख्यान झाले.

२. **ग्रेट–भेट मुलाखत स्पर्धा** – वर्गात शिकलेल्या कौशल्यांचे उपयोजन करण्याकरता सहभागी विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रेट–भेट मुलाखत स्पर्धेचे आयोजन केले.

## ◈ सामाजिक नेतृत्व विकसन ◈

**१) महाविद्यालयातील क्रेडिट कोर्सेस** – यावर्षी पुणे विद्यार्थी गृह महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांसाठी सामाजिक नेतृत्व या विषयावरील २० तासांचा क्रेडिट कोर्स झाला. याशिवाय बारा महाविद्यालयांमध्ये संपर्क झाला.

**२) अग्रदूत प्रकल्प** –

- **टप्पे :** व्यक्तिकार्य स्पर्धा, गटकार्य कार्यशाळा, निवासी नेतृत्व शिबिरे, सामाजिक प्रकल्प, आंतरवासिता व अभ्यास सहल.
- **भौगोलिक क्षेत्र :** पुणे, पिंपरी–चिंचवड, बारामती, शिरूर, खंडाळा, राजगुरुनगर या ६ केंद्रांवर कार्यक्रम.
- **संख्या :** १०४ युवकांची निवड, प्रशिक्षण, आणि १४ सामाजिक प्रकल्प यशस्वी.

**टप्पा १ : व्यक्तिकार्य स्पर्धा, गटकार्य कार्यशाळा** – व्यक्तिकार्य स्पर्धेत स्वच्छता, भाषण, सुधारणा, विक्री अशा क्षेत्रांमध्ये काम. मूल्यांकनाचे निकष : पुढाकार, स्वसंयम, संवाद कौशल्य, कल्पकता, आत्मविश्वास. ६ केंद्रांमधून एकूण ११८ विद्यार्थी सहभागी. त्यातील ७३ जणांना बक्षिसे व पुढील टप्प्यांसाठी निवड.

**टप्पा २ : निवासी नेतृत्व शिबिरे आशय**

- वेल्हे येथील ले. कर्नल सुहास गोगटे केंद्रात ही शिबिरे झाली.
- कार्यसंघ नियोजन, वैयक्तिक विकास, सामाजिक समस्या, जागतिक दृष्टिकोन, प्रबोधन गप्पा, मैदानी खेळ व उपासना इ. सत्रांची रचना होती.
- याबरोबरच समस्या विश्लेषण, प्रकल्प लेखन, नियोजन, सहकार्य, आणि प्रेरणा यावर भर होता.

**पुढील टप्पे** –

- मे–जूनमध्ये आंतरवासिता, प्रकल्प सादरीकरण.
- सहभागी सदस्यांना १५+ तासांची व्यावहारिक अनुभव संधी. सामाजिक प्रकल्पांत २० विद्यार्थ्यांचा सहभाग असेल.
- शिक्षण, कौशल्य विकास, पर्यावरण, स्वदेशी उत्पादने प्रचार यावर आधारित प्रकल्प करणे अपेक्षित आहे..

## ◈ अन्य महत्त्वाचे ◈

- **युवोन्मेष** – वर्षभरात एकूण सहा अंक प्रकाशित झाले. ‘सामाजिक नेतृत्त्व’ या विषयावरील दिवाळी अंक प्रकाशित.
- **वेल्हे प्रशिक्षण केंद्र** – वेल्हे येथे कै. ले. कर्नल सुहास गोगटे नेतृत्व प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम पूर्ण होऊन, दि. ९ एप्रिल रोजी वास्तूपूजन झाले. नेतृत्व संवर्धन केंद्राकडून एकूण २१ दिवस १८५ प्रशिक्षणार्थी व ज्ञान प्रबोधिनी इतर विभागांचे ८३ दिवस, २,७०८ प्रशिक्षणार्थी यांचे केंद्रात प्रशिक्षण झाले. अन्य संस्था, संघटना यांच्याकडून ३४ दिवस ६०० प्रशिक्षणार्थी पर्यंत पोहोचलो.
- **आंतरराष्ट्रीय सादरीकरण** – वाच. सौगंध देशमुख यांनी जपानमधील ताकामात्सु येथे आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रशासकीय नेतृत्व विकसन वर्गाच्या परिणामासंदर्भातील एक संशोधन प्रकल्प सादर केला. टोकियो, ओसाका, ताकामात्सु येथे कार्यकर्ते भेटी घेतल्या.

◈-◈- ◈

सविस्तर वार्षिक वृत्त ▶

## ८. स्पर्धा परीक्षा केंद्र

**प्रारंभ – शके १९१७/ इ. स. १९९५**

**राष्ट्रीय एकात्मतेसाठी काम करू शकणाऱ्या युवा गटाचा शोध, सक्षमीकरण आणि त्यांचे संपर्क जाळे निर्माण करणे**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य कार्य

१. केंद्रीय व राज्य सेवा आयोगांच्या परीक्षांच्या तयारीसाठी विविध टप्प्यांवर मार्गदर्शन वर्ग.

२. सीमावर्ती, आकांक्षी राज्यांमधील युवा व वंचित गटांसाठी स्पर्धा परीक्षा आणि करियर मार्गदर्शन.

3. Competitive Aptitude Assessment Test (CoApt) चाचणी आणि अहवालाच्या आधारे क्षमता संवर्धनासाठी मार्गदर्शन.

४. १५००+ केंद्र आणि राज्य पातळीवरील अधिकाऱ्यांचे संपर्क – अभ्यास – कॉन्वर्जन्स – मेंटॉरिंग यासाठीचे सक्षम नेटवर्क.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

१. पुणे केंद्रावरील विविध वर्गांत सहभागी विद्यार्थी : एकूण १५४, अभ्यासिका १७०

२. सीमावर्ती आणि अखिल भारतीय वर्गात सहभागी विद्यार्थी : अरुणाचल प्रदेश : Prelims - 40, Mains - 30, All India Online UPSC Prelims Test Series : अरुणाचल प्रदेश, मणिपूर, आसाम, छत्तीसगड, जम्मू कश्मीर येथील एकूण ६८

3. CoApt चाचणी आणि समुपदेशन – एकूण २४८

४. अधिकारी नेटवर्क : मेळावे – ३ (पुणे, संबलपूर – ओडिशा, रायपूर – छत्तीसगड), भेटी – चंडीगढ, मुंबई, ठाणे, अगरतला – त्रिपुरा, रोईंग – अरुणाचल प्रदेश, चेन्नई, भुवनेश्वर – ओडिशा, सोलापूर, हराळी, धाराशीव, व पुणे कार्यालय




**श्रीमती सरिता नरके (उपजिल्हाधिकारी, पुणे) आणि तेजस्वी सातपुते (IPS, उपायुक्त पोलीस, मुंबई) यांना Public Service Excellence Award मिळाले.**



**अरुणाचल प्रदेश मधील विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा परीक्षा केंद्राच्या विद्यार्थ्यांची दिवाळी २०२४**

**अरुणाचल प्रदेशातील अनुभव-चिन्मय कुलकर्णी (विद्यार्थी आणि समन्वयक)**

: UPSC Mains नंतर ज्ञान प्रबोधिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्राच्या अरुणाचल प्रदेश मधील रोईंग व तवांग येथील वर्गांसाठी जाण्याची संधी मिळाली. रोईंगमधील RIWATCH या संस्थेच्या परिसरातील हिरवे डोंगर, धुक्याची चादर, स्वच्छता आणि तिथली शांतता मन भारावून टाकणारी होती. त्यात विजय स्वामी सरांचे अनुभव आणि त्यांचे काम हे तर थक्कच करणारे होते. वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये आदिवासी समूहातील -आदि, मिश्मी, न्यिशी- विद्यार्थी होते. त्यांच्यासोबत संवाद साधताना त्यांच्या परंपरा, भाषा व संस्कृती जाणून घेता आल्या. हळूहळू ओळखी मैत्रीत बदलल्या आणि या परिसराशी एक वेगळीच नाळ जुळली. दोन आठवडे चीन व्याप्त तिबेट शेजारीच असलेल्या भारताच्या एका टोकाला म्हणजे तवांग येथे वर्गासाठी जायला मिळाले. निसर्ग सौंदर्य, भौगोलिक परिस्थिती, लोकांचे राहणीमान, चेहरा-मोहरा, यामध्ये स्पष्ट फरक दिसला. तवांगमध्ये ऐन दिवाळीच्या काळात होतो. दिवाळीच्या सणात घरापासून दूर असलो तरी सोनम डार्गे यांच्या परिवाराने घरचं प्रेम दिलं. एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली - या भागाकडे आपण पूर्वग्रहांशिवाय, कोऱ्या मनाने पाहिलं पाहिजे. इथे लोक साधे, सच्चे आणि मनमोकळे आहेत. आकांक्षांपेक्षा समाधान त्यांना महत्त्वाचं वाटतं. 'Small is beautiful' संकल्पना प्रत्यक्ष लोकं जगतात. आपल्यासारख्या चालीरीती तिथेही होत्या- बाळंतपणाची काळजी, सुतक, आत्म्याच्या गोष्टी- या समानतेमुळे आपलेपणा वाटत राहिला. विविधतेतली एकता केवळ पुस्तकात नसून, ती प्रत्यक्ष अनुभवता आली.







- Co-Apt Test नेतृत्व साधन केंद्र, रायपूर
- अरुणाचल प्रदेश लोकसेवा आयोग – पूर्व परीक्षा वर्ग, RIWATCH रोईंग
- चेन्नई अधिकारी भेटी आणि मेळावा

### ◈ नियमित व विशेष वर्ग ◈

1. **UPSC Regular Batch** (२०२४-२५) – ४५ विद्यार्थी. मार्गदर्शन सत्रे, सराव परीक्षा, विषयवार प्रशिक्षण, पालक मेळावे, समुपदेशन व ग्रामीण अभ्यासभेटी आयोजित झाल्या. Critical Thinking, निबंधलेखन, चालू घडामोडी, प्रश्न-विश्लेषण या विषयांवर तज्ज्ञ सत्रे झाली.
2. UPSC Complete Batch **२०२४-२५** - या वर्गात सर्व अनिवार्य विषयांचे, निबंध लेखनाचे, आणि चालू घडामोडी विश्लेषणाचे मार्गदर्शन, अधिकारी आणि टॉपर विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन, अभ्यास कौशल्ये, नियोजन कौशल्ये, सराव परीक्षा, वैयक्तिक समुपदेशन होते. वृत्तिघडणीसाठी ग्राम अभ्यास भेट, ज्येष्ठ अधिकाऱ्यांचे अनुभवकथन होते. या वर्गाची अंकिता पाटील ह्या विद्यार्थिनीने UPSC CSE २०२४ मध्ये AIR 303 मिळवला.
3. **Mission Mains Batch** (२०२४) – ३२ विद्यार्थी. दर आठवड्याला उत्तरलेखन सराव, निबंध व नीतिशास्त्र चाचण्या. IAS/IFoS अधिकारी व तज्ज्ञांचे मार्गदर्शन. या वर्गात UPSC CSE Mains साठी Complete Batch च्या पुढील पातळीवर उत्तर लेखनाची तयारी होते.

४. **प्रेरणा वर्ग** (२०२४) – मुलाखत वर्ग, २३ विद्यार्थी. गटचर्चा, Mini Mocks, Detailed Application Form आधारित तयारी, IAS/IPS अधिकाऱ्यांचे अनुभव, Know Yourself आणि MBTI व्यक्तिमत्तव चाचण्या. जिल्हा अभ्यास दौरे (सोलापूर, धाराशीव, हराळी) विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रशासनाचा अभ्यास केला.

५. **अरुणाचल प्रदेश लोकसेवा आयोग** Prelims वर्ग – तवांग व रोइंग येथे सहा आठवडे अध्यापन. १५ विद्यार्थी यशस्वी. Mains तयारीसाठी Mentoring Programme व All India Test Series (ईशान्य भारतातील ६८ विद्यार्थी).

6. **Ability Building Programme (ABP)** – २८ विद्यार्थी. Newspaper Analysis, Memory Skills, Presentation Skills यासारखी कौशल्य सत्रे.
7. **Co-Apt Testing and Counseling** - या चाचणीमध्ये १) संज्ञानात्मक कौशल्ये आणि क्षमता, २) अभ्यास कौशल्ये आणि अभ्यास सवयी, ३) मेटाकॉग्निशन आणि स्व-नियमन आणि ४) स्पर्धात्मक भावना यांचे मापन होऊन प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक अहवाल तयार होतो. त्यावर आधारित समुपदेशनात विद्यार्थ्यांना या चारही परिमाणांवर नेमके प्रयत्न करण्याचे मार्गदर्शन मिळते.

### ◈ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नेटवर्क ◈

वर्षभरात मुंबई, ठाणे, चंदीगढ, चेन्नई, ईशान्य भारत, ओरिसा, छत्तीसगड, सोलापूर-धाराशिव-हराळी येथे अधिकारी मेळावे झाले. IAS, IPS, IRS, IFoS व इतर सेवेतील अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांशी अनुभवांची देवाणघेवाण झाली.

### ◈ विशेष व सांस्कृतिक उपक्रम ◈

१. **विकासमित्र प्रकल्प –** वेल्हे तालुक्यात विद्यार्थ्यांनी शाळेत अध्यापन व ग्रामीण शिक्षणवर्धन.

२. **आरोग्य शिबिर –** पूना डायग्नॉस्टिक्स सहकार्याने रक्त तपासणी शिबिर, ८२ सहभागी.

३. **गणेश आरती, भोंडला, दिवाळी फराळ** – विद्यार्थी व कार्यकर्त्यांचा सहभाग.

४. **अधिकारी पत्नी गट मेळावा** – UPSC वयमर्यादा वाढवण्याबाबत संशोधन पेपर चर्चेत.

५. **विशेष सत्र –** डॉ. नितीन कुलकर्णी (IAS) व सौ. सुमन गुप्ता (IPS) यांनी UPSC व प्रशासनाविषयी मार्गदर्शन केले.

◈-◈- ◈

सविस्तर ▶
वार्षिक वृत्त

# ९. कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

**प्रारंभ – शके १९०५/१९८३**

## नित्य स्वरूप

१. ज्ञान प्रबोधिनी शिवापूरचे कौशल्य प्रशिक्षण केंद्र १९८३ पासून खेड शिवापूर येथे कार्यरत असून युवकांना व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहे.

२. एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत विविध कोर्सेस, उद्योगभेटी, कार्यशाळा, प्रकल्प व समाजोपयोगी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्याचे महत्त्वाचे कार्य केंद्राने केले आहे.

३. शिवापूर केंद्राने २०२४-२५ मध्ये प्रशिक्षण, उद्योग अनुभव, प्रकल्प, तांत्रिक कौशल्ये आणि समाजभिमुख उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला.

४. 'कमवा आणि शिका', उद्योग सहकार्य, मान्यवर भेटी यामुळे केंद्र एक प्रगत कौशल्य विकास हब म्हणून पुढे येत आहे. हे शिक्षण रोजगाराभिमुख असून विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने घडवणारे ठरते आहे. याची शालेय स्तरावर पायाभरणी व्हावी म्हणून 'छोटे इंजिनिअर्स' हा उपक्रम ५ शाळांमधील इ.८वी-९वीच्या ४०५ विद्यार्थ्यांसाठी राबवला गेला.

हे कोर्सेस तांत्रिक शिक्षण आणि व्यवहारिक अनुभव यावर आधारित असून प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

## संख्यात्मक आढावा

**वर्षभरात पुढील कोर्सेस घेण्यात आले.**

- **लेथ + CNC ऑपरेटर (१ वर्ष) :** १८ विद्यार्थी
- **CNC ऑपरेटर (६ महिने) :** ७ विद्यार्थी
- **इलेक्ट्रिशियन (१ वर्ष) :** ७ विद्यार्थी
- **वेल्डर (१ वर्ष) :** २ विद्यार्थी
- **संगणक प्रशिक्षण (३ महिने) :** ११ विद्यार्थी
- एकूण – ४५ प्रशिक्षणार्थी



**छोटे इंजिनिअर्स शाळांमधील तासिका**





**१५ ऑगस्ट ध्वजवंदन..... प्रशिक्षणार्थी विद्यार्थी**

### प्रतिसाद

मी राजेश मुजुमले राहणार कोंढणपूर, शिक्षण वेल्हे आयटीआय मधून कोपा हा ट्रेड केला आहे तर मला असा ट्रेड हवा होता की ज्याने माझे करियर चांगले व्हायला पाहिजेल. मी माझे मित्रांच्या कडून माहिती घेतली. त्यानंतर मला प्रबोधिनीमध्ये आयटीआयचे courses चालू आहे असे कळाले. त्यानंतर मी येथे प्रत्यक्ष भेट दिली व मी इथे ॲडमिशन घेतली. तर मी लेथ मशीन ऑपरेटर व सी. एन. सी. या ट्रेड मध्ये ॲडमिशन घेतली या ट्रेड मध्ये लेथ मशीन माहिती, व्हर्निअर मायक्रोमीटर, त्याचप्रमाणे लेथवर केल्या जाणाऱ्या क्रिया, cutting tools चे मटेरियल्स आणि त्यांची भौमितिक रचना, cutting speed ॲंड feed तसेच मशीनची देखभाल, मोजमपाची साधने आणि त्यांचा वापर, सुरक्षिततेची साधने आणि त्याचे महत्त्व इ. तसेच येथील शिक्षक खूप छान पद्धतीने समजावून सांगतात. सर्व गोष्टी मला व माझ्या मित्रांना खूप व्यवस्थित शिकता आल्या. 'कमवा आणि शिका' या योजनेच्या अंतर्गत माझ्या सहकारी मित्रांना Ask या कंपनी मध्ये Internship भेटली. तर काम करत असताना जे काय शिकले होतो त्याची सर्वांना मदत झाली. मला माझे घरगुती कारणास्तव internship चा फायदा घेता आला नाही परंतु माझ्या मित्रांना त्याचा खूप फायदा झाला. फक्त technical नाही तर soft skill या गोष्टी शिकवल्या. या सर्वांचा उपयोग मला माझ्या placement मध्ये झाला. माझे मित्र जे Internship करत होते त्यांना stipend सुद्धा भेटत होते, त्या stipend मध्ये मित्रांची course ची फी आणि येण्या-जाण्याचा खर्च निघाला व थोडे फार पैसे मित्रांना घरी देता आले. या course मुले मला माझं career दृष्टिकोन व placement मध्ये खूप चांगली मदत झाली. स्वतः मध्ये बदल दिसला व मी ज्ञान प्रबोधिनी मध्ये प्रवेश घेतल्याचा मला निश्चितच उपयोग झाला आहे.

**श्री. राजेश मुजुमले, कोंढणपूर, ता. हवेली, जि. पुणे**



• छोटे इंजिनिअर्स स्पर्धा




• मणिपूर संगणक प्रशिक्षण



• कार्यशाळा उपक्रम

### ◈ महत्त्वाचे उपक्रम आणि कार्यक्रम ◈

१. **विद्यारंभ उपासना (जुलै २०२४) :** पालकांसह २५ विद्यार्थी सहभागी झाले.

२. **१५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्यदिन :** गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण आणि भाषण झाले.

३. **प्रमाणपत्र वितरण (ऑगस्ट २०२४) :** मागील वर्षीचे कोर्स पूर्ण केलेल्या १२ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरण.

४. **खंडेनवमी यंत्रपूजन (सप्टेंबर २०२४) :** उद्योजकांच्या उपस्थितीत पूजन व उद्योजकता मार्गदर्शन.

### ◈ औद्योगिक क्षेत्रभेटी आणि प्रत्यक्ष शिक्षण ◈

१. **अनिरुद्ध इंडस्ट्रीज आणि श्री प्रेस (नोव्हेंबर २०२४) :** उत्पादन प्रक्रिया, यंत्रसामग्री यांचे प्रात्यक्षिक

2. **Tech Tool व आर्यन इंजिनीअरिंग कंपनी (CNC-१७) :** CNC, लेथ, ग्राइंडिंग, मिलिंग मशिन्स व प्रात्यक्षिक ज्ञान.

3. **AASK ME Precision Engineers (डिसेंबर २०२४) :** १० विद्यार्थ्यांचे सवेतन औद्योगिक प्रशिक्षण (दरमहा ₹१०,००० शिष्यवृत्ती).

### ◈ मणिपूर प्रकल्प संगणक प्रशिक्षण ◈

१. **प्रथम वर्ग (ऑक्टोबर २०२४) :** तमेंगलोंग येथे ११ विद्यार्थ्यांसाठी, पैकी ४ जणांना स्थानिक रोजगार मिळाला.

२. **द्वितीय वर्ग (मार्च २०२५) :** संगणक प्रणालीवर आधारित ऑनलाईन कोर्स, १८ विद्यार्थ्यांचे प्रवेश.

३. **संगणक प्रणाली उभारणी :** स्वतःच्या वेबसाईटवर कार्यान्वित, तांत्रिक व्यवस्थापन व असाइनमेंट तपासणी स्थानिक स्तरावर.

### ◈ पूरक शिक्षण विभाग 'छोटे इंजिनियर्स' प्रकल्प ◈

१. **सहभाग :** ५ शाळांतील ४०५ विद्यार्थी, ३० सत्रे (डिसेंबर २०२४ पर्यंत)

२. **प्रकल्प स्पर्धा (फेब्रुवारी २०२५) :** अंतिम फेरीत २८ गट (११७ विद्यार्थी). चालणाऱ्या प्रतिकृती बनविण्याचा उपक्रम.

### ◈ करिअर मार्गदर्शन कौशल्य शिक्षण कार्यशाळा ◈

**३३१ विद्यार्थ्यांचा सहभाग (८वी, १०वी) :** १० शाळांमध्ये कार्यशाळा.**प्रमुख मार्गदर्शक :** एकनाथ सर व अभिजीत सर.

**उद्देश :** दहावी-बारावी नंतरच्या संधी, तांत्रिक शिक्षणाचे महत्त्व.

### ◈ मान्यवरांच्या भेटी आणि संवाद ◈

१. **कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ (नोव्हेंबर २०२४) :** शिक्षण, ग्रामीण विकास व उद्योजकतेवर चर्चा झाली.

२. **मेळघाट मैत्री संस्था (एप्रिल २०२५) :** ११ गावमित्र कार्यकर्त्यांना यंत्रशाळा व महिला प्रशिक्षणाची माहिती दिली.

३. टाटा ट्रस्ट मृदुला मॅडम, डॉ. सुभाषराव पुराणिक यांची भेट व प्रेरणादायी संवाद झाला.

### ◈ उत्पादन व उपक्रम विभाग ◈

१. **औद्योगिक जॉब्स :** श्री प्रेस ११,३४४ स्पॉट वेल्डिंग, माऊली एंटरप्रायजेस ३,७३८ जॉब्स, विघ्नहर्ता एंटरप्रायजेस २४ जॉब्स, पीसीबी बॉक्स मिग वेल्डिंग ७,५७२ जॉब्स.

२. **इतर प्रकल्प :** दरवाजे, स्टँड, फोल्डिंग स्टूल, बेड, इलेक्ट्रिकल वायरिंग इत्यादी वस्तू विद्यार्थ्यांनी तयार केल्या.

३. 'कमवा व शिका' योजना: प्रत्यक्ष उत्पादनातून आर्थिक मदत व तांत्रिक कौशल्य प्राप्ती.

४. **नवीन वेल्डिंग वर्कशॉप (मार्च २०२४) :** विद्यार्थ्यांच्या मदतीने शॉपचे शेड तयार. अर्थसाहाय्य ब्लूम कंबशन इंडिया प्रा.लि.

◈-◈- ◈

सविस्तर वार्षिक वृत्त ▶

# १०. सामाजिक शास्त्रे अध्ययन केंद्र

**प्रारंभ – शके १९४५/इ.स. २०२३**

**व्यक्ती, समाज आणि सृष्टी यांच्या संतुलित विकासासाठी आवश्यक असलेला दृष्टिकोन व कौशल्ये, वृत्ती नागरिकांमध्ये विकसित करण्यासाठी कार्यरत !**

## नित्य काम

१. **चिकित्सक विचारपद्धती अभ्यासक्रम,** कार्यशाळा (महाविद्यालयीन व पुढील गटांसाठी)

२. **संशोधन प्रकल्प**
  २.१ समावेशक विकास
  २.२ राजकोषीय संघराज्यवाद आणि विकेंद्रीकरण
  २.३ आर्थिक साक्षरता

३. **कार्यशाळा**
  ३.१ वैयक्तिक आर्थिक नियोजन
  ३.२ केंद्रीय अर्थसंकल्प विश्लेषण
  ३.३ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता प्रकल्प

### ◈ अभ्यासक्रम व कार्यशाळा ◈

**चिकित्सक विचारपद्धती (Critical Thinking) अभ्यासक्रम–** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'एम.ए.पत्रकारिता' विद्यार्थी, डी. जी. व्ही. चेन्नई पत्रकारिता कॉलेज 'बी. ए., एम.ए. विद्यार्थी, डेक्कन ए. सो. पुणे विद्यापीठ बी.ए. मानसशास्त्र विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आला. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ डेमोक्रेटिक लीडरशिप (IIDL), रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये 'नेतृत्व, राजकारण आणि प्रशासन' या विषयावर पदव्युत्तर अभ्यासक्रम करणाऱ्या सदस्यांसाठी, पी.जी. डिप्लोमा फॉर स्कूल सायकोलॉजी, प्रज्ञा मानस संशोधिकेच्या विद्यार्थ्यांसाठी, 'मानव्यशास्त्र आणि सामाजिक शास्त्रांच्या शिक्षकांसाठी 'चिकित्सक विचारपद्धती' या विषयावरच्या कार्यशाळा घेतल्या.

अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र या विद्याशाखांमधील महत्त्वाच्या संकल्पना, प्रकल्पपद्धती स्पष्ट करण्यासाठी कार्यशाळा, 'भारताचा केंद्रीय अर्थसंकल्प' समजून घेण्यासाठी तसेच 'व्यक्तिगत आर्थिक नियोजन', 'सामाजिक उत्तरदायित्व आणि गटकार्य' अशा विषयांवर कार्यशाळा घेतल्या.



डी.जी.व्ही. चेन्नई कॉलेज पत्रकारिता -चिकित्सक विचारपद्धती अभ्यासक्रम.



आंतरवासिता प्रकल्पातील विद्यार्थी



कार्यशाळा -अर्थसंकल्प

### संख्यात्मक आढावा

| क्र. | उपक्रम (एकूण सहभागी सदस्य ४५०) | उपक्रम संख्या | विद्यार्थी/सहभागी सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १ | चिकित्सक विचारपद्धती २ क्रेडीट (३० तास) अभ्यासक्रम | ३ | १५६ |
| २ | चिकित्सक विचारपद्धती कार्यशाळा | ४ | ५५ |
| ३ | अर्थसंकल्प कार्यशाळा | ३ | ७८ |
| ४ | व्यक्तिगत आर्थिक नियोजन कार्यशाळा | १ | २१ |
| ५ | 'सामाजिक उत्तरदायित्व आणि गटकार्य' कार्यशाळा | १ | २६ |
| ६ | इतर संकीर्ण सत्रे व कार्यशाळा | ५ | ९० |
| ७ | आंतरवासिता (internrhip) प्रकल्प | ४ | ८ |
| ८ | अभ्यासगट | २ | १६ |

### ◈ संशोधन/अभ्यास प्रकल्प ◈

उन्हाळी सुट्टीमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता (internrhip) प्रकल्प राबवण्यात आले. या प्रकल्पांमध्ये 'समावेशक विकास' या विषयाच्या अंतर्गत 'घरकाम करणाऱ्या महिलांचा अभ्यास', 'आर्थिक साक्षरता', 'ग्रामीण महिलांची आर्थिक साक्षरता मापनपद्धती', 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणाम' या विषयाच्या अंतर्गत 'Auditing and Accounting क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे परिणाम', 'केंद्र व राज्य सरकारांमध्ये वित्त आयोगामार्फत होणाऱ्या निधीवाटप व दक्षिणी राज्यांचे आक्षेप' या विषयांवर अभ्यास व प्रकल्प अहवाल लिहिण्यात आले.

'राज्यांचे उत्पादन व्यवस्थेतील परस्परावलंबन', 'केंद्र व राज्य सरकारांमध्ये वित्त आयोगामार्फत होणाऱ्या निधी वाटप', 'व्यक्तिगत आर्थिक नियोजन या विषयांवर लेख लिहिण्यात आले. 'श्रीअरविंदांचे तत्त्वज्ञान' व Data Analysis' या विषयावर अभ्यासगट चालले.

**सविस्तर वार्षिक वृत्त ▶**

## ११. उद्योजकता विकास केंद्र

प्रारंभ – शके १९३४/इ.स. २०१२

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### नित्य स्वरूप

१. युवक-युवतींमधील उद्योजकतेची वृत्ती मानसशास्त्रीय चाचण्यांच्या आधारे शोधणे व त्यांना मार्गदर्शन करणे.
२. आपापल्या जोखमीवर खाजगी उद्योग, व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे.
३. सामाजिक उद्योजकतेचा प्रसार करणे.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### या वर्षातील संख्यात्मक आढावा

१. मार्गदर्शन उद्योग – ४
२. अधिवेशने व प्रशिक्षणे सहभाग – २

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇




हराळी शेती अवजारे बँक उद्घाटन



कागदी व कापडी पिशव्या उद्योग, सोलापूर

- या केंद्राचे काम प्रबोधिनीच्या विविध विभागांना व समाजातील युवक-युवतींना उद्योजकतेकडे वळविणे असे अपेक्षित आहे. वृत्तांत वर्षात केंद्रासाठी फिरते मनुष्यबळ उपलब्ध नसले, तरी विविध केंद्रांशी संपर्क साधला गेला व काही कार्यक्रमांना उपस्थिती लावता आली.
- पुणे केंद्रातील युवकांनी चालविलेल्या युवक प्रबोधन उद्योग या व्यवसायामध्ये यंदा भर पडली. शिवापूर केंद्रात वेल्डींगचा जो विभाग सुरू झाला आहे त्यातील सदस्यांना बाहेरील कामे मिळविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. CRCA sheets मधून बनविण्यात येणाऱ्या काही बॉक्सेसना Spot welding करून देणे असे काम तेथील विद्यार्थ्यांनी मिळवले व त्याचा नियमित पुरवठा सुरू केला आहे. प्रशिक्षण संपल्यावर हे विद्यार्थी आपल्या स्वतःच्या जोखमीवर या बॉक्सेसचा पुरवठा करू लागतील.
- पुण्यातील उद्योजक श्री. अमित वेलणकर यांच्या कारखान्यातून यंत्रांचे काही सुटे भाग निर्यात केले जातात. त्यांच्या कारखान्यात शिवापूरच्या १० प्रशिक्षणार्थींना तेथे रोज कार्यानुभव देण्यात येत आहे. सहा महिन्यांनी त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर काहींना त्यातील काम स्वतःच्या जोखमीवर करता येऊ शकेल.
- निगडी येथे अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर या विभागात नव-उद्योजकांना मार्गदर्शन केले जाते. यासाठी स्वतंत्र सेक्शन ८ कंपनी तेथील कार्यकर्त्यांनी तयार केली आहे. केंद्र शासनाचे अपेक्षित अनुदान काही कारणांमुळे लांबले असले, तरी या विभागाने भोर, आव, कोंडीवडे ता. मावळ हे पुणे जिल्ह्यातील व धाराशिव जिल्ह्यातील हराळी येथे विविध गटांच्या उद्योजकता कार्यशाळा घेतल्या. त्याचा तपशील स्वतंत्रपणे अटल सामाजिक नवोन्मेष केंद्राच्या वृत्तात दिला आहे.
- हराळी केंद्रामध्ये शेती अवजारे बँकेचा प्रयोग यशस्वी होत आहे. आता संबंधित तरुणांची फार्मर प्रोड्युसर कंपनी तयार करण्याच्या दृष्टीने हालचाल सुरू केली आहे.
- वेल्हे तालुक्यातील महिलांच्या बचत गटांना सायबेज कंपनीच्या संपदा प्रकल्पामध्ये खाद्यवस्तू व शोभेच्या वस्तू यांच्या उत्पादनाचे प्रशिक्षण देण्यात येते. यातील महिलांनी वर्षभरात विविध ठिकाणी २० स्टॉल्स लावले व त्यातून सुमारे रु. १५ लक्षची विक्री केली. आडवली गावात चालू असलेले नेपिअर गवतापासून इंधन कांड्यांचे (Pelletsचे) उत्पादन तांत्रिकदृष्ट्या मार्गी लागले आहे. पुण्यातील थरमॅक्स कंपनीला अशा ५ टन कांड्या हरितऊर्जा महिला बचत गटाने विकल्या.
- सोलापूर येथील युवकांनी विडी कामगार महिलांना पर्यायी उद्योग म्हणून कागदी व कापडी पिशव्या बनविण्याचा उद्योग दोन वर्षांपूर्वी सुरू केला. सामाजिक उद्योजकतेचे ते एक उत्तम उदाहरण ठरत आहे. त्याची उलाढाल सुमारे रु. १ कोटी पर्यंत पोहोचली आहे.
- वृत्तांत वर्षात अन्य औद्योगिक संस्थांशी संपर्क साधण्यात आले. त्यात ज्ञानदा प्रतिष्ठान, पुणे बिल्डर्स असोसिएशन, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांचा समावेश आहे. दि. २० फेब्रुवारी रोजी झालेल्या एशिया इकॉनॉमिक फोरमच्या अधिवेशनास केंद्रातर्फे श्री. सुभाष देशपांडे उपस्थित होते.

◈-◈-◈

## १२. प्रज्ञा मानस संशोधिका

प्रारंभ – शके १८९७/ इ.स. १९७५

### नित्य स्वरूप

१. **संशोधन** – विविध मानसशास्त्रीय विषयांवर संशोधन.
संस्था पातळीवरील कामकाजाचे मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्लेषण.

२. **मनोमापन** – मानसशास्त्रीय चाचण्या तयार करून त्याचे प्रत्यक्षात उपयोजन.

३. **शैक्षणिक** – मानसशास्त्र विषयाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी अभ्यासक्रम राबविणे व मानसशास्त्रीय संकल्पनांच्या उपयोजनांसाठी प्रशिक्षित व्यक्ती तयार करणे.

४. **क्षमता संवर्धन** – कृतीखेळाच्या माध्यमातून बाल व किशोरांच्या क्षमतांचे संवर्धन.

५. **समुपदेशन** – बाल ते प्रौढ वयोगटामधील समस्यांवर वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन.

६. **मानव संसाधन** – औद्योगिक क्षेत्रामधील चाचणीकाम, प्रशिक्षणे, अधिकारी नियुक्ती चाचणीकाम.

७. **अभिक्षमता मापन व करिअर मार्गदर्शन** – इ. १०वी व त्यापुढील करिअर संदर्भात अभिक्षमता मापन चाचणीकाम व करिअर मार्गदर्शन.

### संख्यात्मक आढावा

- **एकूण चाचणीकाम** – ७१५७ व्यक्ती
- **कृती प्रकल्प** – ५९३५८ व्यक्ती
- **प्रौढ प्रशिक्षण** – २५१० व्यक्ती
- **संशोधन निबंध सादरीकरण** – १४ संशोधक
- **विविध अन्य संस्था सहयोग** – २४



संशोधन पद्धती कार्यशाळा



महिला सहभाग - उद्योगिनी प्रकल्प

### प्रतिसाद

**पदव्युत्तर विद्यार्थी :** My awareness and intuition has sharpened ! I have become very calm and able to stay alone in case need be which was not there earlier ! Become congruent and empathetic towards others and myself ! Zero over thinking ! more in love with Books now ! 🙂 Identify my strengths and weaknesses ! Able to let go of small small things that may hurt me earlier ! Able to help others get into a better thinking space ! Able to hold space for another and lots more ! Thank you JPIP. You have been a life changer for me !

**- Dolly Mandhyan, Advanced Course In School Psychology**

**उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्याची प्रतिक्रिया (इयत्ता सातवी) :** ''मला मागच्या वर्षी निर्धारची सत्रे अजिबात आवडत नव्हती. कारण त्याच्यात खूप विचार करायला लावतात. आणि मला स्वतः ला 'व्हेप' चे व्यसन होते. त्याबद्दल ताई मला रागवेल किंवा मारेल अशी भीती वाटत होती. पण ताई मला कधीच रागावली नाही. ती नेहमीच सगळ्यांशी खूप प्रेमाने वागते-बोलते. तितक्याच प्रेमाने तिने खूप वेळा आम्हाला व्यसन केल्यामुळे काय त्रास होऊ शकतो याबद्दल सांगितले. आणि व्यसन करणार नाही असे वचनही घेतले. त्यामुळे मी हळूहळू माझे 'व्हेप' चे व्यसन कमी केले. आणि आता तर मला 'व्हेप' ओढावसं वाटलं तर ताईचा चेहरा माझ्या डोळ्यासमोर येतो आणि मी 'व्हेप' ओढत नाही. त्यामुळे या वर्षभरात माझे 'व्हेप' चे व्यसन जवळपास बंद झाले आहे.''







• शैक्षणिक अभ्यासक्रम • मनशोध चाचणी प्रशिक्षण • ओळख स्पर्शाची प्रकल्प साहित्य

### ⟐ संशोधन ⟐

**उद्योगिनी** प्रकल्पासाठी माहिती संकलन करत असताना संशोधिकेला अनेक महिलांना भेटण्याची संधी मिळाली, ज्यांच्याकडून विचार करण्याचा एक नवीन दृष्टिकोन शिकायला मिळाला. नेहमीच शहरांमध्ये राहिल्याने आणि शिक्षित असल्याने स्वतःला स्वतंत्र आणि स्वायत्त समजत होते. मात्र, महिला उद्योजिकांना भेटल्यावर लक्षात आले, खरी स्वतंत्रता काय असते. त्यांनी अनेक अडथळ्यांवर मात करत वेगवेगळ्या कारणांसाठी आपले व्यवसाय सुरू केले आणि आतापर्यंत टिकवून ठेवले आहेत. काहींना त्यांच्या कुटुंबाकडून पाठिंबा मिळतो, तर काही जणींना तोही मिळत नाही. काही महिला आर्थिक व्यवहार, मुलांचे शिक्षण, गुंतवणूक अशा सर्व निर्णयांमध्ये स्वतंत्रपणे निर्णय घेतात. व्यवसाय उभा करताना त्यांना अनेक चढ-उतारांचा सामना करावा लागतो, पण त्यांच्या चिकाटीमुळे व जिद्दीमुळे त्या पुढे जातात.

मानसिक स्वास्थ्य, जीवनशैलीतील संतुलन, कुटुंब व समाजाकडून मिळणारा (किंवा न मिळणारा) पाठिंबा याबद्दल या आधी कोणी त्यांना विचारलेच नव्हते. मुलाखतीनंतर अनेक महिलांनी धन्यवाद दिले, कारण यामुळे त्यांना स्वतः चा विचार, आत्मपरीक्षण व आत्ममूल्यांकन करायला प्रवृत्त केले. त्यांनी सांगितले की, आता पुढे यावरही विचार करतील. या महिलांची एक उल्लेखनीय बाब म्हणजे, एकदा यश मिळवल्यावर त्या इतर महिलांच्या उन्नतीसाठीही सक्रियपणे काम करतात.

**ओळख स्पर्शाची ३६०°** हा प्रकल्प २०२२ ते २४ यादरम्यान बजाज फिनसर्वच्या मदतीने राबवला गेला. यातून पहिली ते आठवीच्या हजारो विद्यार्थ्यांपर्यंत विद्यार्थी स्नेही माध्यमातून स्पर्शाची भाषा आणि त्यातून होऊ शकणारे शोषण रोखणे या दोन्हीबद्दल जाणीव-जागृती पोचवली गेली. केवळ सर्वसामान्य शाळांमधील मुलांसाठीच नव्हे, तर तीन प्रकारच्या दिव्यांग गटांसाठी सुद्धा प्रशिक्षण साहित्य निर्मिले गेले व प्रत्यक्ष मुलांसाठी जाणीव-जागृती सत्रे तज्ज्ञांच्या मदतीने योजली गेली. दृष्टी दिव्यांगांसाठी त्यांना हाताळता येतील अशा छोट्या- छोट्या वस्तूंचा वापर करून स्पर्श जाणिवेचे प्रकार शिकवले गेले. काही मॉडेल्स वापरून शरीर रचनाही स्पर्शाच्या माध्यमातूनच अवगत करण्यात आली. कर्णबधिर मुलांसाठीही हाच आशय त्यांच्या सूचक भाषेमध्ये रूपांतरित करून वेगवेगळ्या दृश्य चित्र व कटपुतळ्यांच्या साहाय्याने समजावून सांगितले. सुहृद मंडळाच्या तज्ज्ञ सल्लागार साधन व्यक्ती आणि प्रत्यक्ष तेथील शिक्षिका यांच्या साहाय्याने हे काम सहज करता आले. पुण्यातील फिनिक्स शाळेतील तज्ज्ञांच्या मदतीने शारीरिक वय ८ ते १२ परंतु बौद्धिक वय ४ ते ७ असणाऱ्या मुलांसाठीही संपूर्णतः स्वतंत्र अशा चित्रपुस्तिका व छोट्या-छोट्या वस्तूंच्या निर्मितीतून स्वतःच्या सुरक्षेसाठी काय करायला पाहिजे हे पोचवता आले. दिव्यांग मुले अशा प्रकारच्या शोषणाला बळी पडण्याची जास्त शक्यता असते म्हणूनच या गटापर्यंतसुद्धा हा विषय त्यांना समजेल, रुचेल आणि वापरता येईल अशा पद्धतीने पोहोचवता आला.

### ⟐ शैक्षणिक ⟐

डी. ई. एस. पुणे विद्यापीठासोबत ज्ञान प्रबोधिनी व ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था असा त्रिपक्षीय करार झाला. MA च्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करियर समुपदेशनाचे दोन व युवा लैंगिकतेविषयी एक असे प्रत्येकी २ क्रेडिट्सचे तीन अभ्यासक्रम राबविले गेले. तीनही अभ्यासक्रमांचे मिळून १७० विद्यार्थी होते. अध्ययन पद्धतीतील वैविध्य व उपयोजनात्मक शिक्षणामुळे मुलांचा सहभाग व प्रतिसाद उत्तम होता. तज्ज्ञ करियर समुपदेशक सत्र घेताना विद्यार्थ्यांनी निरीक्षण केले, तसेच अनेक तज्ज्ञांची विविध क्षेत्रातील करियर संधींविषयी व्याख्यानेही झाली. विद्यार्थ्यांनी सर्वच अभ्यासक्रमांबाबत अतिशय सकारात्मक feedback दिला. तेथील शिक्षकांचेही उत्तम सहकार्य लाभले. ह्या सत्रांमध्ये प्रेरणा सेठिया आणि प्रतिक जोशी ह्या दोन पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या युवा व्यावसायिकांची खुली मुलाखत घेतली. ह्या मुलाखतीतून मुलांना असे लक्षात आले की एखाद्याच्या मनातील ध्यास (passion) कोणत्या शाखेत शिक्षण झाले ह्यापेक्षाही जास्त महत्त्वाची असते. ह्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी दोनही विषयांबद्दल अनुकूल मत व्यक्त केले.

### ⟐ क्षमता संवर्धन ⟐

**निर्धार** या प्रकल्पातून जसा मुलांना त्याचा निश्चित फायदा होतो तसा प्रशिक्षकांनाही होतोय आणि विभाग म्हणून पाठीमागे काम करणाऱ्या, रचना करणाऱ्या, प्रशिक्षण देणाऱ्या, म्हणजे प्रशिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या, सगळ्यांनाच त्याचा फायदा झाला.

सगळ्यात महत्त्वाचा भाग असा की बाल विकास उपक्रमाचे आत्तापर्यंतचे बरेचसे काम हे मुलांमधली बलस्थाने शोधणे आणि त्याला उजाळा व चालना देणे अशासाठी म्हणून चालू होते.



निर्धार प्रकल्प



कार्यशाळा - किशोर वयाशी जुळवून घेतांना

निर्धार हा प्रकल्पच वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक व वर्तणुकीचे प्रश्न असलेल्या मुलांसाठी रचना करण्यात आलेला आहे. विशेष करून व्यसन परावृत्तीसाठी त्याची रचना केली आहे. म्हणजे एक प्रश्न डोळ्यासमोर धरून त्या प्रश्नाकडे मुलांनी जाऊ नये, या दृष्टीने वाटचाल करणे हा त्यातला सगळ्यात आव्हानात्मक भाग होता.

सुरुवातीचा काही काळ व्यसने, त्याचे स्वरूप, मुलांपर्यंत हे कसं पोहोचतं किंवा मुलांवर त्याचे होणारे परिणाम असा सगळ्याचा विचार यातून असे लक्षात आले की निर्धार उपक्रमामधल्या मुलांसाठी कृतिखेळ रचना करत असताना त्याचा आम्हाला उपयोग झाला.

समाजातले वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न खूप जवळून बघायला, अनुभवायला मिळाले. मुलांच्या असणाऱ्या भावनिक गरजा आणि त्याला प्रशिक्षकांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद आणि त्या सगळ्यातून मुलांमध्ये पडलेला फरक हा आमच्यासाठी खूप दिलासादायक होता.

### ◇वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन◇

सोलापूर माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी आणि ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'किशोर वयाशी जुळवून घेताना' ही कार्यशाळा घेण्यात आली. १४० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये मुलामुलींना मोठ्या माणसांशी बोलता येत नाहीत त्या शंका किंवा प्रश्न लिहून बॉक्समध्ये टाकायला सांगितले होते. मुलांनी जवळजवळ सव्वा दोनशे प्रश्न चिठ्ठ्यांच्या स्वरूपात टाकले होते. शारीरिक बदल, धार्मिक शंका, पाळी, शारीरिक संबंध इथपासून ते येणारा राग, उदासीनता, पालकांचे, शिक्षकांचे वागणे, त्यांचा अन्याय इथपर्यंत असंख्य भावोत्कट प्रश्न त्यात होते.

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन शाळा, येरवडा व वनाज परिवार शाळेत अभ्यास कौशल्ये शिबिर घेतले. या शिबिरासाठी बुद्धिमापन चाचण्या करून मुले निवडली. म.न. पा. शाळेमध्ये अभ्यास कौशल्ये शिकवणे खऱ्या अर्थाने डोळे उघडवणारा अनुभव होता. मुलांची पार्श्वभूमी मध्यम वर्गापेक्षा खूपच वेगळी होती. बहुतांश मुले हातावर पोट असणाऱ्या पालकांची ज्यांना मुलांच्या अभ्यासाबाबत फारसा रस नाही, शाळेमध्ये पण अनुकूल वातावरण कमी. त्यामुळे अभ्यास कौशल्ये समजून घेणे ही त्यांच्यासाठी तशी अवघड गोष्ट. पण दोन दिवस मुलांच्या कलाने घेऊन, विषयांशी जोडत, स्मृती, वाचन, लेखन कौशल्ये बरीच प्राथमिक पातळीवर आणून हे कौशल्य मुलांपर्यंत आम्ही पोहोचवू शकलो.

### ◇ मानव संसाधन ◇

महिंद्रा कंपनी, चाकण यांचा कामगार वर्ग आणि त्यांचे जोडीदार यांच्यासाठी 'जोडी तुझी माझी' हा कौटुंबिक संबंध अधिक बळकट करण्यासाठीचा एक दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आला. ज्यामध्ये पती-पत्नी नाते, Men are from Mars Women are from Venus यावर आधारित चर्चा, आर्थिक नियोजन, पालकत्व, आरोग्य, मोबाईल वापर असे विषय घेण्यात आले.

कंपनीच्या दृष्टीने ताण, आत्महत्या, कुटुंब कलह, शहरी-ग्रामीण जीवनशैली आणि त्याचा परिणाम, व्यसन असे मुद्दे महत्त्वाचे म्हणून अधोरेखित होते. कृती खेळ, दृक्‌श्राव्य, चर्चा आदी माध्यमांतून प्रशिक्षण रंजकतेने घेण्यात आले. सर्वांशी कमी वेळात rapport establish करून त्यांना बोलते करण्याचे आव्हान या वेळेस होते. विभागात उपलब्ध प्रगतीशील कुटुंब संकल्पना, नात्यांवर आधारित ERPMH अभ्यासक्रम या उपलब्ध ज्ञानाचा हा कार्यक्रम तयार करताना, प्रत्यक्ष घेताना विशेष लाभ झाला. आजवर करत असलेल्या कामात कर्मचारी व जोडीदार असे प्रशिक्षण प्रथमच केले.

### ◇ अभिक्षमता मापन ◇

प्रज्ञा मानस संशोधिका मैत्री संस्थेबरोबर करत असलेला प्रकल्प 'उपेक्षित किशोर गट विकास क्षमता-मेळघाट' या प्रकल्पासाठी 'क्षमता ओळख' आणि 'व्यक्तिमत्त्व' असा नवीन चाचणीसंच तयार केला. हे काम हिंदी भाषेतून करायचे असल्यामुळे जरा दडपण होते. चाचणीकाम आणि मार्गदर्शन यातील काही गोष्टी शिकून, कमीत कमी चुका करून नीट काम करायचे आहे एवढंच डोक्यात होतं. तिथे प्रत्यक्ष जाऊन काम करायची इच्छा मनात होती. यावेळी संधी समोर होती. एकूण नियोजन, हिंदी (!) भाषेतून तयारी, घरची तयारी ही सगळी प्रक्रिया धावपळीची पण तेवढीच मजा घेऊन केली.

घनदाट जंगलातून जाणारा रस्ता, हात शिवशिवायला लावणारे सागाचे लाकूड, निसर्ग आणि मैत्री संस्थेचा परिसर हे खरंच खूप मोहित आणि खोल शांतता देणारं होतं! अश्विनीताई धर्माधिकारी यांचे अनुभव, आव्हाने ऐकून आश्चर्य आणि प्रेरणा मिळत होती. वेगवेगळ्या पद्धतीने मुलांपर्यंत कसं पोहोचायचं, सर्वांगाने विचार कसा करायचा हे पाहत होतो. मार्गदर्शनाच्या वेळी मुली आणि पालकांशी झालेला संवाद; त्यांच्यातली शिकण्याची इच्छा आणि



• जोडी तुझी-माझी कार्यशाळा




• जपान परिषद

त्यासाठी पालकांची उपस्थिती, असलेला पाठिंबा हे पाहून खूप बरं वाटलं. आपण घेतलेल्या मुलाखतींमधून मुलांनी प्रामाणिकपणे सांगितलेली माहिती, त्यांच्या ध्येयाची डोळ्यात दिसणारी चमक, मैत्री गटातील ताई आणि दादा आदर्श व्यक्ती वाटणं आणि तसंच काहीसं भावूक होऊन सांगणं, ती निरागसता, सगळ्यांच्या सादरीकरणातून त्यांच्यातील दिसलेल्या अद्भुत क्षमता हे कायम स्मरणात राहील. गाव फेरी करताना, संध्याकाळी घराघरांत जाऊन बोलताना मनाची चोरवाट सापडल्याची जाणीव झाली. शाळेतील शिक्षक व गावमित्रांबरोबर संवाद साधताना प्रबोधिनी आत्ता इथे काय हेतू आणि कामासाठी आली आहे आणि आपल्या कामाविषयी थोडक्यात सांगता आले. त्या भागातील लोकजीवन, तिथल्या पद्धती प्रत्यक्ष बघता आल्या आणि समजून घेता आल्या. प्रबोधिनी म्हणून उपेक्षित गटाबरोबर काम करण्याचा अनुभव एकदम अनोखा आणि खूप काही शिकवणारा, दाखविणारा होता !

## ◈ विशेष संपादने ◈

- Kaveri Gifted Education Centre, पुणे तर्फे प्रज्ञा मानस संशोधिकेच्या माजी प्रमुख, संशोधन संस्थेच्या माजी कार्यवाह व प्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या प्रा. वाच. उषाताई खिरे यांना बुद्धिमत्ता, सृजनशीलता व प्रज्ञावंतता या विषयावरील अभ्यासपूर्ण योगदानाबद्दल 'Recognition of Lifetime Contribution' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- ताकामात्सू, जपान येथे पार पडलेल्या 18th Asia Pacific Conference on Giftedness या परिषदेत ५ विषयांवर ४ जणींनी सादरीकरण केले.
- Kaveri Gifted Education Centre, पुणे आयोजित International Conference for Gifted Education या परिषदेत ५ जणींनी सादरीकरण केले.
- बाल्टिमोर, मेरीलँड, USA येथे झालेल्या 5th Global conference on Addiction Medicine, Behavioral Health and Psychiatry (GAB24) या परिषदेमध्ये "Impact of Addiction abstinence facilitation program on adolescent girls in India" हा निबंध सादर करण्यात आला.
- नवी दिल्ली येथे झालेल्या 34th Convention of National Academy of Psychologyच्या परिषदेमध्ये Emerging trends and challenges in adolescent and preadolescent Mental Health: Post Covid Analysis of the Reported Counselling Cases हा निबंध सादर करण्यात आला.
- भारतीय शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या 'व्हिजन फॉर विकसित भारत युवा आयाम' यांनी लेखन स्पर्धेत 'The impact of skill development program on the transfer of learning in students from deprived section at the concrete operational stage'. या पेपरची उत्कृष्ट पेपर म्हणून निवड झाली.
- प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ दरम्यान Qualitative and Quantitative Research in Social Sciences; Methods, Data Analysis and Academic writing या विषयावर ७ दिवसांची कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट to understand characteristics of qualitative and quantitative research, data collection methods in qualitative and quantitative research, data analysis techniques using 'R' and NVivo software हे होते. या कार्यशाळेत शैक्षणिक लेखनातील कौशल्यांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले, ज्यामध्ये प्रबंधाचे लेखन, रचना आणि अहवाल लेखन यांचा समावेश होता. या कार्यशाळेत २३ जण सहभागी झाले होते. त्यापैकी ८ जण संशोधन अभ्यास करत आहेत. १४ तज्ज्ञांनी कार्यशाळेत विविध विषयांवर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला ICSSR, यांचे आंशिक अनुदान मिळाले होते.
- **संस्था सहयोग –** चैतन्य वाईज संस्था, ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट, संतुलन वेद, मैत्री संस्था, नवोन्मेष विद्यालय, Würth CSR, रोटरी ३१३१, Capacity Building Commission, DESPU, डॉ. कौस्तुभ बोन्द्रे, Army Institute of Technology, कल्याणी स्कूल, श्री. श्री. रवीशंकर विद्या मंदिर, केलीजंट कंपनी, हिताची अस्तीमो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गुडेल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, महिंद्रा कंपनी, महाराष्ट्र पोलीस अधीक्षक कार्यालय, परिवार सुपर मार्केट, भाग्यलक्ष्मी बँक, इंताया पब्लिक स्कूल, तेझूमधील बांबूसा लायब्ररी, करुणा ट्रस्ट.
- **पाक्षिक संशोधन सादरीकरणे** – विविध विषयांवर, स्तरांवर संशोधन कार्य करणाऱ्या सदस्यांची सादरीकरणे या उपक्रमामधून केली जातात. सदस्यांना संशोधनाची माहिती होणे व त्यातून प्रेरणा मिळणे हा उपक्रमाचा हेतू आहे. या वर्षभरात एकूण २१ सादरीकरणे झाली.

सविस्तर वार्षिक वृत्त ▶

◈-◈-◈

## १३. संस्कृत संस्कृति संशोधिका (संत्रिका)

**प्रारंभ – शके १८९७/ इ.स. १९७५**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### नित्य स्वरूप

१. संस्कार कार्यक्रम – नामकरण, उपनयन, विवाह, हिंदूकरण, देहदान, दाहकर्म, श्राद्ध, वर्षश्राद्ध.

२. शांती– वेदपूजन (उदकशांती), वास्तुशांती, साठीशांती, सहस्रचंद्र दर्शन. पूजा – गणेश स्थापना, लक्ष्मी पूजन, सत्यनारायण.

३. सामाजिक – विहीर लोकार्पण, मातृभूमी पूजन, पौरोहित्य वर्ग.

४. समृद्ध ग्रंथालय– १५००० हून अधिक दुर्मीळ ग्रंथसंग्रह.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### संख्यात्मक आढावा

❖ पुणे, महाराष्ट्र व भारतभरातील ५,६७६ कुटुंबांपर्यंत ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने होणारे संस्कार पोहोचवले.

❖ पुणे व डोंबिवली येथील ५० पुरोहित यासाठी कार्यरत होते.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



**असोसिएशन ऑफ इनरव्हील क्लब इंडिया, सामूहिक विवाह संस्कारात सहभाग**



**वारजे येथील सामूहिक महालय श्राद्ध**

### प्रतिसाद


दि. २० मार्चची पहाट आम्हा कुटुंबियांच्या दृष्टीने अतिशय दुःखदायक आणि क्लेशदायक होती. आमचे बाबा कै. अभय गोपाळराव चापोरकर यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांनी ठरवल्याप्रमाणे देहदान करून एक चांगले उदाहरण सर्वांसमोर ठेवले. मृत्यू पश्चात कोणतेही क्रियाकर्म करायचे नाही, हेसुद्धा त्यांनी ठरवले होते. आयुष्यभर त्यांनी आपली संस्कृती जपली आणि त्याचे आचरणसुद्धा केले. केवळ त्यासाठीच आम्हीसुद्धा आपले संस्कार आणि संस्कृती यांचा आदर करून १२वा, १३वा तसेच उदक शांती करायचे ठरवले; मात्र योग्य पद्धतीने. या क्रिया विधीला कोणत्याही कर्मकांडाचा शिक्का न लागता योग्य पद्धतीने करावे असा विचार करून पुणे ज्ञान प्रबोधिनीच्या गुरुजींना बोलावून हा विधी करण्याचे ठरविले. आमच्यासाठी हा एक वेगळा अनुभव ठरला; कारण याविषयी ऐकले होतेच, मात्र बाबांच्या जाण्याने हे स्वतःच्या घरात अनुभवले.

श्री. प्रकाश विनायक पटवे गुरुजी हे सर्व क्रिया विधी करण्यास पुण्याहून नाशिकला आले होते. ज्ञान प्रबोधिनी संस्था आणि त्यांचे गुरुजी या सर्व गोष्टी आधुनिक प्रकारे मात्र तितक्याच संवेदनशीलपणे हाताळतात हे अनुभवातून सिद्ध झाले. गुरुजी पुण्यातून पहाटे निघून सांगितलेल्या वेळी सकाळी नाशिकला पोहचले. लागणाऱ्या सर्व गोष्टींची यादी आधीच करून दिल्याने पूर्वतयारी केली होती जेणेकरून विधी वेळेवर सुरू व्हावेत. गुरुजींनी विधी सुरू करायच्या आधी सर्व उपस्थितांना स्पष्ट सांगून विधीच्या जागी एकत्र बसायला सांगितले. जेणेकरून होणाऱ्या विधीचे अर्थ आणि त्याचे महत्त्व प्रत्येकाला समजेल; कारण शेवटी सगळे विधी ज्या व्यक्तीच्या स्मरणार्थ करायचे असतात, त्या व्यक्तीसाठीच आपण सर्व जमलेले असतो. विधी करताना का करायचे आणि ते करीत असताना प्रत्येक छोट्या छोट्या कृती आणि त्यामागील उद्देश समजावून सांगण्यात आले. जेणेकरून आपल्या ऋषीमुनींनी लिहून ठेवलेल्या प्रत्येक गोष्टी हे थोतांड नसून त्याक्रियेमागे विज्ञान आहे, हे समजणे आवश्यक आहे.

शेवटी इतकेच नमूद करावेसे वाटते की, ज्ञान प्रबोधिनीसारख्या संस्था हे धार्मिक काम विज्ञान रूपाने पुढे नेत आहे व त्याचा योग्यप्रकारे प्रसार करीत आहे. आपणसुद्धा त्यांना योग्य प्रकारे सहकार्य करूया, त्याचा आदर करूया. श्री. पटवे गुरुजींनी यथायोग्य मार्गदर्शन करून विधी योग्यप्रकारे केल्याबद्दल आम्ही सर्व कुटुंबीय त्यांचे मनापासून आभारी आहोत.

**– अभिजीत अभय चापोरकर, नाशिक.**







• गुरूपौर्णिमा कार्यक्रम • वेल्हे येथील शैक्षणिक संकुलाची वास्तुशां • दूरस्थ स्वयं पौरोहित्य वर्ग

## ◈ ठळक घडामोडी ◈

- गणेश प्रतिष्ठापना कार्यशाळा आयोजित केली होती त्याला ४१ सदस्य उपस्थित होते.
- पितृपक्षाच्या निमित्ताने दूरस्थ पद्धतीने आयोजित केलेल्या सामूहिक महालय श्राद्धाला ७० सदस्यांची उपस्थिती होती. तसेच ज्येष्ठ नागरिक संघ वारजे व संत्रिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामूहिक महालय श्राद्धाला १३० सदस्य उपस्थित होते.
- दीपावलीत लक्ष्मीपूजन कार्यशाळेचे आयोजन केले होते.
- इंग्लंड येथे प्रथमच परदेशस्थ सदस्यांसाठी स्वयं पौरोहित्य वर्गाचे आयोजन केले होते.

## ◈ विशेष ◈

१. **सुवर्ण महोत्सवी वर्षाची सुरुवात** – २३ जुलै २०२४ला विभागाच्या गुरुपौर्णिमा उत्सवात सर्व सदस्य उत्साहाने सहभागी झाले. संत्रिकेच्या स्थापनेला ४९ वर्ष पूर्ण होऊन ५०वे वर्ष सुरू झाले आहे. त्यानिमित्ताने गटाने मातृभूमि पूजन व पथदर्शकांचे प्रतिमा पूजन केले. या कार्यक्रमाला मा. सुभाषराव देशपांडे व मा. रामभाऊ डिंबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

२. **सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा** – ज्येष्ठ उद्योजक श्री. नितीनभाई देसाई, मदर्स रेसिपी, देसाई आय हॉस्पिटलचे संस्थापक यांच्या सहस्त्रचंद्र दर्शन सोहळ्याचे पौरोहित्य विभागाने केले.

३. **सामूहिक विवाह संस्कार** – असोसिएशन ऑफ इनरव्हील क्लब इंडिया, डिस्ट्रिक्ट ३१३ यांच्या वतीने सामूहिक विवाह संस्काराचा उपक्रम घेण्यात आला. निम्न आर्थिक गटातील ८ जोडपी (२ अंध) यामध्ये सहभागी झाली.

४. **मृत्युंजय शांती** – श्रीमती पुरंदरे आजींचा १०० वर्षे पूर्तीनिमित्त मृत्युंजय शांती संस्कार करण्यात आला.

## ◈ अन्य संस्था संपर्क ◈

१. परदेशात अनेकवेळा दाहकर्म विधींसाठी व्यक्ती उपलब्ध होऊ शकत नाही व काही तडजोड करावी लागते. या पार्श्वभूमीवर वीणाताई बेडेकर यांच्या पुढाकाराने सेवा इंटरनॅशनल संस्थेच्या मीनल जोशी यांच्या बरोबर दूरस्थ बैठक झाली. सेवा संस्थेला दाहकर्म विधीसाठी दूरस्थ रचना उपलब्ध करून देता येईल व आवश्यक असल्यास सेवाच्या अमेरिकेतील कार्यकर्त्यांना दाहकर्म पोथीचे मोफत प्रशिक्षण दिले जाईल असे सांगितले.

२. धरोहर संस्था, उदयपूर – यांच्या तर्फे भारतभरातील हस्तलिखित स्कॅन करून ती एकत्रित करण्याचे काम सुरू आहे. विभागात एकूण ६०८ लहानमोठी हस्तलिखिते आहेत.

## ◈ संशोधन ◈

ज्ञान प्रबोधिनी पद्धतीने होणारे विवाह संस्कार व अन्य विवाह संस्कार आणि अन्य विवाहपद्धती बाबत विवाहोत्सुक वधू-वरांच्या अपेक्षा (customised wedding) व धर्मशास्त्राचे अभ्यासक आणि पुरोहित सदस्यांचा अशा बदलाबाबतचा प्रतिसाद या विषयावर विभागात संशोधन सुरू झाले आहे.

## ◈ व्याख्याने ◈

1. ICCS, Pune chapter व संत्रिकेच्या वतीने डॉ. राम वैद्य यांचे ‘Balancing traditions and cultures with modernity in Europe’ या विषयावर २२ नोव्हेंबर २०२५ रोजी व्याख्यान झाले.

२. दि. १७ फेब्रुवारी रोजी गीता धर्म मंडळात, संत्रिकेच्या पुरोहित वाच. सुजाता बापट यांचे ‘समर्थ रामदासांची भिक्षा पद्धती- एक जगदुद्धाराचे साधन’ या विषयावर व्याख्यान झाले.

◈-◈-◈

# १४. स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) व राम-सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर

प्रारंभ - शके १९१७/ इ.स. १९९५




रौप्य महोत्सव, राम-सीता पुराणिक तंत्रनिकेतन भेट




ॲनिमिया निर्मूलन कार्यक्रम - आकाशवाणीसोबत

### नित्य काम

१. आर्थिक स्वावलंबन - बचत गट, खेळते भांडवल, स्वयंरोजगार, धनश्री प्रकल्प, सायबेज संपदा, अर्थसखी प्रकल्प
२. स्वाधार स्वयंरोजगार प्रकल्प
३. आरोग्य सखी-ग्रामीण महिलेच्या सर्वंकष आरोग्याची काळजी घेणारा प्रकल्प
४. ज्वाला (निर्धूर चुली) प्रकल्प
५. किशोर-किशोरी विकास उपक्रम
६. युवती विकास
७. नेतृत्व विकसन उपक्रम
८. उपेक्षितांचा विकास- जास्वंद गिरिकन्या व नवदृष्टी गिरिकन्या निवास, एकल महिला, कातकरी विकास प्रकल्प
९. भौगोलिक विस्तार - हिरकणी प्रकल्प
१०. नवी उमेद
११. तांबे शैक्षणिक संकुल

### ❖ संख्यात्मक आढावा ❖

- **आर्थिक स्वावलंबन :** बचत गट-१३७, महिला सभासद-२१०९, बचत-१.५४ कोटी, कर्ज -४.७० कोटी
- **स्वयंरोजगार :** धनश्री प्रकल्प- २३ वर्ग, २४२ प्रशिक्षणार्थी.
- **सायबेज संपदा -** १५ गावे, प्रशिक्षणे २६७. ७० महिलांनी मिळून ७,५०,०००/- रु. उत्पादन व ४९ स्टॉलवरून ८,१७,०००/- रुपयांची विक्री. ३ लाखांपेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्या १० महिला तयार झाल्या.
- **स्वाधार प्रकल्प -** ९ गावे ११ कौशल्य प्रशिक्षण वर्ग, देवराई सहलीतून ८२,६७०/- आर्थिक उलाढाल.
- **आरोग्य सखी प्रकल्प -** १६० गावांतून १८६ शिबिरे, १६२० जणांची तपासणी, ८० लोकांचा उपचारांसाठी पाठपुरावा. एकूण २६ महिलांनी आरोग्य सखी म्हणून काम केले.
- **ज्वाला प्रकल्प -** ५० महिलांना निर्धूर चूल वाटप.
- **किशोर-किशोरी विकास उपक्रम -** ३ शाळा, १२५ मुले-मुली, ७ मार्गदर्शक, १८ तासिका व १ निवासी शिबिर. ११६ जणांचे विद्याव्रत केले.
- **नेतृत्व विकसन उपक्रम -** २१ गावांतील ३६८ जणींसाठी तिळगूळ व ४६ गावांतील १,३७४ महिलांसाठी नवरात्र मेळावे.
- **उपेक्षितांचा विकास -**
  **जास्वंद गिरिकन्या निवास -** ५वी ते १० वीच्या २५ मुली निवासात,
  **नवदृष्टी गिरिकन्या निवास** -११ युवती
- **एकल महिला -** ३० जणींसाठी विविध योजनांसाठी काम केले. वर्षभरात साधारण १० लाख रु. महिलांच्या खात्यात शासनाकडून जमा झाले.
- **कातकरी विकास प्रकल्प :** १५ वस्त्या, १२९ मुले-मुली नित्य सहभाग, ४ वस्त्यांवर ३८ मुली विविध स्वयंरोजगार वर्गात सहभागी, ५१ महिला व ४३ बालकांची आरोग्य तपासणी, ३८ वस्त्यांवरील २२९ कातकरी-शासकीय कागदपत्रांचे काम केले.
- **विस्तार :** हिरकणी प्रकल्प-५ ठिकाणांहून ३३ प्रशिक्षिकांनी ३१ ठिकाणी ९१५ माता पालिकांसाठी सत्रे घेतली.
- **नवी उमेद -** ५१२ महिलांची आवश्यक शासकीय कागदपत्रांबाबत जाणीव-जागृती.
- **तांबे प्रशिक्षण संकुल :** संगणक आरंभिक २ वर्ग. १९ मुले व ६ महिला सहभागी. बालविकास वर्ग-१५ मुले-मुली सहभागी.



• हिरकणी माता प्रशिक्षण



• आ. सुभाषरावांची वेल्हे केंद्राला भेट



• संपदा प्रकल्पाची सोलापूर उद्योगाला भेट

## कामाची आकाशवाणीने दखल घेतली !

वेल्हे तालुक्यातील पंडुरोग निर्मूलन म्हणजेच ॲनिमियावर ज्ञान प्रबोधिनी करत असणाऱ्या कामाची पुणे आकाशवाणीने दखल घेतली. पुणे आकाशवाणीचा विकास यात्रा असा कार्यक्रम दर रविवारी सुरू होणार आहे. या कार्यक्रमामधल्या एका भागाचे ध्वनिमुद्रण आकाशवाणीतील सदस्यांनी स्वतः वेल्हे येथे येऊन केले. त्यासाठी पुणे आकाशवाणीचा गट तांबे संकुल महिला प्रशिक्षण केंद्रात आला होता.

आपल्या तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी सर, ज्ञान प्रबोधिनीच्या आरोग्य विभाग प्रमुख तृप्तीताई आणि प्रकल्पाधिकारी सुवर्णाताई यांनी गटासमोर निवेदन केले. हे निवेदन ऐकण्यासाठी भोर व वेल्ह्यातील २५ महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या. आकाशवाणीमधून गौरी लागू आणि नीलिमा पटवर्धन या समन्वयक म्हणून आल्या होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर शिवाजी सर यांनी ॲनिमिया संदर्भातील वैद्यकीय माहिती दिली. त्यातही ग्रामीण महिलांना वेगवेगळ्या वयोगटामध्ये येणारे प्रश्न सांगितले. तिघांचे बोलणे झाल्यानंतर आकाशवाणीने मानचिन्ह देऊन सन्मान केला. याशिवाय आडवली गावातील प्रिया इंगूळकर, वेल्ह्यातील शैलाताई भोंडेकर व प्रियांका सुतार यांनी आपल्या आरोग्य कामाचे निवेदन केले. आकाशवाणीच्या वतीने त्यांनाही प्रमाणपत्रे देण्यात आली. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दि. २१ जूनच्या रविवारी सकाळी १० वा. पुणे आकाशवाणी केंद्रावरून प्रसारित करण्यात आले!

## ◈ विशेष कार्यक्रम ◈

१. **कृतज्ञता सोहळा** – वेल्हे तालुक्यात गेली १८ वर्षं गरोदर माता तपासणी दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी नियमितपणे चालू होती. हे सगळे काम डॉ. वैशालीताई बिनीवाले त्यांच्या पाटणकर ट्रस्ट संबंधित तज्ज्ञांच्या मदतीने करत होत्या. गरोदर महिलांची तपासणी करून योग्य औषधोपचार करून महिलांचे व बाळाचे आरोग्य सुखकर होईल असे त्या बघत होत्या. काही कारणाने या पद्धतीने हे काम पुढे चालू ठेवता येणार नसल्यामुळे डॉक्टर गटाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा कृतज्ञता सोहळा मार्चमध्ये पार पडला.

२. **सहनिवासातील मुलींना दिली वेगळी संधी** – दि. १७ नोव्हें. या दिवशी साळुंगण, भोर येथे नीलांबर हिल रन (मॅरेथॉन) स्पर्धा झाली. त्यात १२५ जणांनी भाग घेतला होता. १० कि. मी. धावण्याच्या स्पर्धेत ५ जणी, ५ कि. मी. धावण्याच्या स्पर्धेत १० जणी अशा १५ मुली सहभागी झाल्या. १० कि. मी. धावण्याच्या स्पर्धेत ३ जणींनी पारितोषिके मिळवली.

३. **न फिटणारी उपकृतता/ समाज ऋण :** रक्षाबंधनाच्या दिवशी दापोडी येथल्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग येथे जाऊन ७ युवती व १ कार्यकर्ती अशा ८ जणींनी रक्षाबंधन उत्सव साजरा केला. मुख्य अधिकारी मा. अभिमन्यू आठल्ये सरांनी तिथे सर्व व्यवस्था केली होती. या कॉलेजमधील राष्ट्रीय एकात्मता केंद्रामध्ये रक्षाबंधन कार्यक्रम झाला. मा. आठल्येसरांनी कॉलेजमधील शिक्षण व कामकाज याविषयी माहिती दिली. त्यानंतर युवतींनी सैनिक अधिकारी व तेथील व्यवस्थापन करणाऱ्या बंधूंना राखी बांधली. अतिशय अभिमानास्पद, आनंददायी व अविस्मरणीय असे रक्षाबंधन साजरे झाले. अनेकींनी गणवेशातल्या सैनिकांशी प्रत्यक्ष बोलणे आयुष्यात पहिल्यांदाच केले.

४. यावर्षी स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या कामाला ३० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने आपण युवती, किशोर-किशोरी व कार्यकर्त्या असे सर्व मिळून ३०० राख्या बनवून त्या वेगवेगळ्या सैन्य दलातील सैनिक बांधवांना पोहोचवल्या.

५. **कमवा शिका योजना :** वेल्हे येथील जास्वंद गिरिकन्या निवास मधल्या ९ युवतींची घरची आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे पुढील शिक्षण थांबू शकेल म्हणून 'आम्ही सुट्टीत काम करून स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतः करू' असे त्यांनी ठरवले. २० एप्रिल ते २० जून असे २ महिने त्यांनी काम केले. त्यात सर्वेक्षण करायचे म्हणजे काय करायचे? ते कसे करायचे? हे शिकून १५ गावातील ६२ एकल महिलांचा व १० गावांतील ३५ मुलांचे आरोग्य सर्वेक्षण केले. उद्योग करायचा असेल तर त्याच्या लेखी नोंदी, फायदा तोटा कसा बघायचा? हे शिकून पापड, सांडगे, मुरंबा, करवंद, जाम असे बनवून विकले तर फोटो काढायलाही शिकल्या. हे करताना त्यांनी स्वतःचे शुल्क स्वतः कमावले हे विशेष!

२०२४-२०२५ हे स्त्री शक्ती प्रबोधनचे ग्रामीण भागात चालू असणाऱ्या कामाचे त्रिदशकपूर्ती वर्ष होते. दैनंदिन कामे सांभाळून भरगच्च २१ कार्यक्रमांनी वर्ष भरून गेले. शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यात ३० वर्षं स्थानिक महिला-शक्तीचा विकास करताना कामाला लागणारे सर्व मनुष्यबळ स्थानिकच उभे करायचे असा आग्रह पहिल्यापासून धरला. एखादा प्रकल्प, अन्य कोणीतरी सुचवला असला तरी फक्त तो प्रकल्प पूर्ण करायचा, असा हेतू कधीच नव्हता; तर प्रकल्प जिच्यासाठी करायचा ठरवला होता 'ती' ला पचेल, पटेल अशा गतीने करायचा; एवढेच नाही तर 'ती'ला गुंतवून घेत करायचा असा हेतू होता. एकदा का तिला पटले की हे ग्रामीण बाईच्या भल्यासाठी आहे की मग 'ती'च त्या कल्पनेची प्रवक्ती झाली पाहिजे! असे झाले की 'ती'चे भावविश्व बदलून जाते. रोजच्या कामाच्या रामरगाड्यात गुरफटून न जाता काहीतरी 'सापडले' आहे असे वाटून ती त्या कल्पनेचा प्रचार करू लागते, त्यासाठी काम करू लागते. या ३० वर्षांत अशा गावागावात काम करणाऱ्या २५० पेक्षा जास्त जणी तयार झाल्या. त्यापैकी १३५ जणी आज महत्त्वाची जबाबदारी घेऊन काम करत आहेत. त्यासाठी विभागाच्या ६ केंद्रांवर मिळून दरमहा ३६ बैठका होतात व त्यात त्या सहभागी असतात. या स्थानिक मनुष्य शक्तीमुळे आपण १०३ गावांत काम करत आहोत.

ज्ञान प्रबोधिनी स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण कामाच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने घेण्यात आलेल्या २१ कार्यक्रमांमध्ये १५०० जणींचा काहीना काही सहभाग होता.

त्यातल्या ३ महत्त्वाच्या कार्यक्रमांबद्दल-- कार्यकर्त्यांचे प्रेरणा वाढायला प्रतिज्ञाग्रहण झाले. भव्य क्रीडा प्रात्याक्षिके झाली, तर त्रिदशकाच्या कामाचे फलित विस्तारावे म्हणून सगळ्यांना उपयोगी पडणारी 'आत्म सन्मानाच्या गोष्टी' या परिषदेची योजना केली होती.



प्रकाशन : आत्मसन्मानाची गोष्ट



प्रतिज्ञित गट, वेल्हे

### ★ १२ जानेवारीला (जिजाऊ जयंतीला) प्रात्यक्षिके ★

- ज्ञान प्रबोधिनी स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण कामाच्या त्रिदशकपूर्ती निमित्ताने १२ जानेवारीला वेल्हे येथे प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते. यामध्ये नियमित काम करत असणाऱ्या महामार्गावरच्या वर्वे गावापासून वेल्ह्यातील शेवटचे टोक निगडे गावापर्यंतच्या २३ गावांतील महिला-मुलांचा सहभाग होता. सहभागी सदस्यांचे वय वर्षे ६ वर्षापासून ६७ वर्षांपर्यंत होते. प्रात्यक्षिकात २३४ जणांनी १६ प्रकार सादर केले.
- प्रात्यक्षिकांमध्ये बालवाडीतील मुलांनी तोल सांभाळण्यासाठी चमचा लिंबू, डोक्यावर रिकामा हंडा घेऊन चालणे केले, तर उखाणा घेऊन पारंपरिक खेळ सादर केले गेले. जिजाऊंचे गीत, मनोरे- योगासने तर होतीच सोबत झुंबाचेही प्रात्यक्षिक झाले. हिरकणींनी गीतावर नृत्य बसवले होते तर युवतींनी जिजाऊ स्मरणाचे गीत गायले. एवढेच काय पण पार्लर वर्गाने मॉडेल म्हणून जिजाऊ केल्या तर जानेवारीच्या संक्रांतीचे औचित्य राखून हलव्याच्या दागिन्यांनी मॉडेल सजवून त्याचेही प्रात्यक्षिक सादर केले.
- या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी केंद्राचे प्रमुख मा. अभिजितदादा कापरे उपस्थित होते. 'प्रात्यक्षिक कशासाठी तर एकत्र येऊन सगळ्यांनी एकसारखी समान कृती करत आपल्यातील एकीच्या शक्तीचे दर्शन सर्वांना घडवणे' अशा सोप्या शब्दातील प्रेरणादायी मार्गदर्शन अभिजितदादांनी सर्वांना केले. मा. सुवर्णाताईंनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना धन्यवाद देत प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

### ★ ''आत्मसन्मानाच्या गोष्टी'' परिषद ★

- दि. ४ जानेवारी २०२५ या दिवशी त्रिदशकपूर्ती कार्यक्रमाच्या निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी व बीज प्रकाशन या दोन्हींच्या संयुक्त विद्यमाने 'आत्मसन्मानाच्या गोष्टी' परिषद ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे केंद्रात योजली होती. या परिषदेत ग्रामीण महिलांबरोबर चालू असलेल्या कामात प्रभावी ठरलेल्या ४ उपक्रमांची निवेदने झाली.



• संस्था भेट





• जिजाऊ जयंती निमित्त क्रीडा प्रात्यक्षिके



• वृक्षारोपण, करंजावणे

१. गाव पातळीवरील मेळावे, २. स्वयंरोजगार, ३. सहली आणि अभ्यासदौर, ४. हिरकणी

यातील कुठलाही उपक्रम घेऊन प्रबोधिनीचे काम आपण विस्तारू शकू. यापैकी 'हिरकणी' हा उपक्रम स्त्री-शक्ती प्रबोधनने विस्तारासाठी यापूर्वीच निवडून काम सुरू केले आहे.

➤ या उपक्रमांची माहिती देण्यासाठी दृक्श्राव्य सादरीकरणे झाली. त्या सोबतच प्रत्यक्ष सहभागींनी अनुभवकथन केले. वरील चारही उपक्रमांच्या कार्यपद्धतीची तपशीलात माहिती देणारी पुस्तिका '**आत्मसन्मानाच्या गोष्टी**', बीज प्रकाशनच्यावतीने धनश्रीताई बेडेकर यांनी लिहिली.

➤ कार्यक्रमाला शिवगंगा, गुंजवणी खोऱ्यातील २९ गावांतून ४९ महिला आल्या होत्या. ३० संस्थांचे ४७ कार्यकर्ते महाराष्ट्रभरातून सशुल्क नोंदणी करून परिषदेला आले होते.

➤ बचत गटाच्या आद्य प्रणेत्या मा. वाच. सुधाताई कोठारी यांच्या हस्ते पुस्तिकेचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी मा. सुधाताई व प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुभाषराव देशपांडे यांचे मार्गदर्शन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. या परिषदेमध्ये ३० वर्षांच्या प्रवासातील ग्रामीण महिलांच्या घडणीच्या प्रक्रियेचे अनुभव प्रत्यक्ष त्यांच्याकडून ऐकणे ही सर्व सहभागी सदस्यांना खास मेजवानी होती.

### ★ प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम ★

➤ प्रतिज्ञाग्रहणाचा यापूर्वीचा कार्यक्रम द्विदशकपूर्तीच्या वेळी झाला होता. त्यानंतरच्या १० वर्षांत कामामध्ये समाविष्ट झालेल्या तुलनेने 'युवा' अशा गटाच्या सदस्यांनी प्रतिज्ञाग्रहणाचा अर्थ समजून घेतला, त्याचा अभ्यास केला आणि दैनंदिन कार्यक्रमामध्ये अजून नियोजनपूर्वक आणि परिणामकारक असे काही घेण्यासाठी प्रतिज्ञा घेऊयात असे ठरवले. या वेळच्या भवितव्य लेखनातही ज्यांनी सर्व बैठकींना उपस्थित राहून भवितव्य लेख तयार करण्यात सहभाग घेतला अशा उत्साही ३० सदस्यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या प्रतिज्ञा घेतल्या.

➤ त्रिदशकपूर्ती निमित्ताने वेल्हे येथे दि. १४ डिसेंबर रोजी प्रतिज्ञा-ग्रहण कार्यक्रम पार पडला. त्यात आधी तीन दशकातल्या महत्त्वाच्या कामाचे सादरीकरण झाले. २५ वर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मुलाखती झाल्या, तर मागील १० वर्षांत कामात जोडल्या गेलेल्या १० कार्यकर्त्यांची निवेदने झाली.

➤ मा. सुभाषराव देशपांडे यांनी गटाला प्रतिज्ञा दिल्या. कार्यक्रमात प्रथम प्रतिज्ञा-१५, द्वितीय प्रतिज्ञा-१३, तृतीय प्रतिज्ञा-२ अशा एकूण ३० सदस्यांचा प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

➤ आदरणीय सुभाषराव व मा. कार्यवाह महेंद्रभाई यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून गटाला प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

### ◈ अन्य कार्यक्रम ◈

१. प्रबोधिनीची अन्य केंद्रे आणि संस्था यांच्या भेटी घ्यायचे ठरवून ६८ जणी प्रबोधिनीच्याच ६ केंद्रांवर तर २९ जणी ७ निरनिराळ्या संस्थांना भेटी देऊन आल्या. वृक्षारोपण कार्यक्रमात ३५० झाडे लावली.

२. स्वयंरोजगाराच्या संदर्भात परदेशात १४ प्रकारच्या वस्तूंची विक्री करण्यापासून दूरस्थ नोंदणी करून रु. एक लक्षची भाजी विकली. २१ युवतींनी ३० ठिकाणी वस्तू विक्री करण्याची संधी घेतली, तर कौशल्य प्रशिक्षणांमध्ये २५ प्रशिक्षकांच्या मदतीने २८६ महिलांनी गावोगावी सहभाग घेतला. त्यातही सगळ्यात आगळे-वेगळे असे पासली येथे ३३ जणींनी रानभाज्यांची विक्री केली. स्वाधार प्रकल्पाअंतर्गत ४०० औषधी वनस्पतींची लागवड कोफोर्ज कंपनीतील कर्मचाऱ्यांसह करंजावणे येथे केली.

३. वेल्ह्यात प्रथमच ७ गावांहून आलेल्या ८१ आजी-आजोबांचा मेळावा घेण्यात आला. मुले जवळ राहत नसताना त्यांना कोणत्या अडचणी येत आहेत? त्यावर काही उपाय करू शकू का? हे जाणून घेणे हा मुख्य उद्देश होता. त्यात मुख्यतः आरोग्याच्या अडचणींच्या वेळी मदत उपलब्ध न होणे, ही अडचण लक्षात आली.

४. दहा ठिकाणी मिळून ५४४ जणींची हिमोग्लोबिन तपासणी, वेल्ह्यात लहान मुलांसाठीचा संस्कार वर्ग, एकल महिला मेळावा, पंतप्रधान विमा योजनेचे गावकऱ्यांसाठी काम अशीही कामे झाली

५. विभागप्रमुख सुवर्णाताईंनी या निमित्ताने 'मागे वळून पाहतांना' असे ३३ लेख त्यांच्या ३० वर्षांच्या अनुभवांवर लिहिले, तर ११ जणींच्या यशोगाथा चित्रित झाल्या !

**सविस्तर वार्षिक वृत्त** ▶

# १५. संवादिनी (मध्यवर्ती व संवादिनी विस्तार)

प्रारंभ – शके १९२२/ इ.स. २०००

**स्वयंविकासातून समाज परिवर्तन !**
**समाज परिवर्तनासाठी स्वयंविकास !**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. मासिक बैठक
२. समतोल द्वैमासिक
३. विद्याव्रत संस्कार
४. पालवी गट
५. उमलत्या वयाशी जुळवून घेताना
६. ओळख स्पर्शाची कार्यशाळा
७. विकासिका
८. महिलांचे कौशल्य प्रशिक्षण

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

❖ सत्र, मासिक बैठक, मेळावे, शिबिर इ. मार्फत ४,४५८ महिलांपर्यंत पोहोचलो

❖ प्रशिक्षण – ११९ महिला (ओळख..., उमलत्या वयाशी..., विकासिका)

१. **मासिक बैठक** – ५० महिला उपस्थित होत्या. कौटुंबिक, सामाजिक, व्यावहारिक विषयांवर बैठकी झाल्या.

२. विविध संस्था, कंपन्यांमध्ये प्रासंगिक कारणाने ५०० महिलांना मार्गदर्शन केले.

३. **गीताई अभ्यास गट** – रोज सकाळी दूरस्थ पद्धतीने २० मिनिटे वाचन व चर्चा असे या गटाचे स्वरूप होते.

४. **ओळख स्पर्शाची**–शिरूर व आसपासच्या ग्रामीण भागातील २५ शाळांमधील ९,००० मुलांसाठी कार्यशाळा झाल्या.

५. **उमलत्या वयाशी जुळवून घेताना** – ५ शाळांमध्ये ५०० मुलांपर्यंत पोहोचलो.

६. **शालेय प्रतिज्ञेचा अर्थ** – १,४५० मुलांपर्यंत भारतीय राज्यघटनेतील प्रतिज्ञेचा अर्थ पोहोचवला.

७. '**परिघाबाहेरील नाती**' या विषयाची २५ जणींचे लेख असलेली एक पुस्तिका तयार झाली.

**सर्व उपक्रमांत मिळून एकूण संख्या –**




**मध्यवर्ती संवादिनी - रौप्य महोत्सवी मेळावा आणि स्मरणिका प्रकाशन**



**मध्यवर्ती संवादिनी - रौप्य महोत्सवानिमित्त ठाणे, डोंबिवली, बोरीवली, भाईंदर मेळावा.**

### संवादिनी आणि कुमुदिनी ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर

➤ रक्तदान किती पुण्याचे काम, नाही का? पण स्त्रियांच्या कुठल्या गटात, मैत्रिणींच्या ग्रुपमध्ये, नातेवाईकांमध्येसुद्धा, रक्तदानावर कोणी बोलताना, चर्चा करताना कधी दिसत नाही. कुमुदिनी ट्रस्टतर्फे भाजलेल्या रुग्णांसाठीच्या मदतीसोबतच रक्तदान शिबिरही आयोजित केले जाते. जनकल्याण रक्तपेढीच्या अधिकाऱ्यांशी बोलताना असं कळलं की जवळजवळ चाळीस टक्के महिलांना रक्त द्यावे लागते पण महिलांचे रक्तदानाचे प्रमाण फक्त पाच ते सहा टक्के आहे. बऱ्याच महिलांना हिमोग्लोबिन कमी असल्यामुळे रक्तदान करता येत नाही, म्हणूनच या दृष्टीने काहीतरी करूयात असा मनात विचार आला. संवादिनीचा रौप्यमहोत्सवामुळे संवादिनी आणि कुमुदिनी ट्रस्टने एकत्रितरीत्या या शिबिराचे आयोजन करायचे ठरवले. नोंदणी झाल्यानंतर एक महिना आधी हिमोग्लोबिन तपासून ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे, त्यांना डॉक्टरी सल्ला देण्यात आला. गटावरही मार्गदर्शक माहिती व प्रश्नांची उत्तरे दिली जात होती.

➤ दि. ८ मार्च रोजी प्रबोधिनीच्या उपासना मंदिरात शिबिराचे आयोजन केले होते. १७ स्त्रियांनी प्रथमच रक्तदान केले, वय वर्षे १९ पासून ६० पर्यंतच्या स्त्रियांचा समावेश होता. यातल्या काही जणांचे मोफत तपासणी शिबिराला हिमोग्लोबिन कमी होते; पण त्यांनी ते प्रयत्नपूर्वक वाढवले. ११२ पैकी ८४ स्त्रिया म्हणजे जवळजवळ ७१ टक्के एवढे स्त्रियांच्या रक्तदानाचे प्रमाण झाले. या वर्षीसुद्धा आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त घेतलेल्या रक्तदान उपक्रमात रक्तदात्यांमध्ये ४५ स्त्रिया होत्या. एक विशेष अनुभव म्हणजे चौघी जणींना काही कारणामुळे, ८ मार्च रोजी रक्तदान करता येणार नव्हते, तर त्यांनी आदल्या दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान केले हे महत्त्वाचे.

➤ रक्तदानाविषयी केलेल्या जागृतीमुळे महिलांचे रक्तदानाचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षाही जास्त होऊ शकते, हे या निमित्ताने नमूद करावेसे वाटते. त्यामुळे असे आवाहन करावेसे वाटते की, प्रत्येक महिलेने वर्षातून दोनदा तरी रक्तदान करण्याचा संकल्प करावा.

**– डॉ. रोहिणी आठवले, संवादिनी सदस्या**



• मध्यवर्ती संवादिनी
प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम



• पौड रस्ता आणि औंध संवादिनी
दशकपूर्ती मेळाव्यात पद्यगायन



• संवादिनी मध्यप्रदेश
अभ्यासदौरा

## ◈ मध्यवर्ती संवादिनी ◈
## संवादिनी रौप्यमहोत्सवी वर्ष

**१) रौप्यमहोत्सवी वर्षाचा उद्देश :** संवादिनीची दृश्यमानता (visibility) वाढविणे आणि कार्यकर्त्यांची अंतर्गत गुणवत्ता वाढविणे अशा मुख्यतः दोन दिशा ठरविल्या आहेत.

**१.१ मातृभूमिपूजन** – सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ३ जानेवारी २०२४ रोजी मातृभूमिपूजनाने उपक्रमांना सुरुवात झाली. या वर्षभरात १०८ ठिकाणी मातृभूमिपूजन व्हावे असे आवाहनही केले. संवादिनीच्या रौप्यमहोत्सवी वर्षात केलेल्या मातृभूमिपूजनाच्या संकल्पपूर्तीचा कार्यक्रम २५ मार्च रोजी झाला. शंखनादाने सुरुवात करून १२५वे मातृभूमिपूजन झाले.

**१.२ अभ्यासगट** – समाजातील कुटुंबजीवनाचा अभ्यास करून ते समृद्ध करण्याचा प्रयत्न करणे व संवादिनीतील आणि संवादिनीव्यतिरिक्तच्या विविध वयोगटातील महिलांचे मानसिक आरोग्य जोपासण्यासाठी ठोस प्रयत्न करणे या संवादिनीच्या उद्दिष्टांचा विचार करून स्त्री-पुरुष संपूरकता गट आणि मानसिक आरोग्य गट असे दोन अभ्यासगट सुरू झाले आहेत.

**१.४ वैयक्तिक संकल्प** – रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ८७ जणींनी वैयक्तिक संकल्प केले. दर दोन महिन्यांनी या संकल्पांचा पाठपुरावा केला.

**१.५ संवादिनीची वाटचाल** – दि. ६ मार्च रोजी आकाशवाणीच्या पुणे केंद्रावर वनिता मंडळ कार्यक्रमात संवादिनी समन्वयक डॉ. वीणा लिमये व सौ. साधना सेठिया यांची मुलाखत प्रसारित करण्यात आली. आकाशवाणीच्या माध्यमातून हजारो लोकांपर्यंत संवादिनी पोहोचली.

**१.६ मेळावा क्र. १ नव्या दमाच्या** – दि. १९ एप्रिल रोजी गेल्या सात वर्षांपासून संवादिनीमध्ये सहभागी असणाऱ्या सदस्यांचा मेळावा झाला. एकूण ४१ सदस्या उपस्थित होत्या. संवादिनीच्या ज्येष्ठ सदस्यांनी संवादिनीच्या उद्दिष्टांना धरून अनुभवकथन केले.

**१.७ मेळावा क्र. २ जुन्या जाणत्या** – ३ मे २०२४ रोजी संवादिनीमध्ये प्रारंभीच्या सात-आठ वर्षांच्या काळात सामील झालेल्या 'जुन्या जाणत्या' एकूण ३९ मैत्रिणींनी यात सहभाग घेतला. संवादिनीने मला काय दिले यावर सगळ्यांनी आपले हृद्य म नोगत मांडले. संवादिनीच्या पुढच्या वाटचालीमध्ये आपला सक्रिय सहभाग असणार आहे, असे सर्वांनीच नोंदवले.

**१.८ मेळावा क्र. ३** – २१ सप्टेंबर या दिवशी संवादिनीचा सेतूबंधन मेळावा ठाण्यात पार पडला. पुणे, डोंबिवली, बदलापूर, बोरीवली, भाईंदर आणि ठाणे या केंद्रातील ४२ कार्यकर्त्यांसाठी खेळातून परिचय, आपापल्या कामाची निवेदने, अनुभवकथन, अनुभवी ताईंकडून स्त्री-शक्तीची उद्दिष्टे समजून घेतली. वेगवेगळ्या केंद्रांत चालू असलेले उपक्रम समजून घेताना येत असलेल्या अडचणी, त्यावरील उपाय, तसेच बोरीवली, पुणे मध्यवर्ती संवादिनी घेतानाचा अनुभव, उत्साही ताईंची निवेदने ऐकताना नवीन प्रेरणा मिळाली.

**१.९ मेळावा क्र. ४** – १६ नोव्हेंबर रोजी ज्ञान प्रबोधिनीमधील कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील महिलांचा मेळावा पार पडला. प्रबोधिनीमध्ये कुटुंबियांचा एकमेकांशी आणि आपल्या वैविध्यपूर्ण कामाशी परिचय होईल अशी संधी क्वचितच मिळते. ३० कुटुंबीय आणि २५ संवादिनी सदस्या अशा ५५ जणी अतिशय उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. 'प्रबोधिनीचा परीस स्पर्श' या विषयावर गटागटांमध्ये गप्पा झाल्या. विशाखाताई व अनघाताई यांनी लिहिलेले 'संवादिनी संकल्पना भारुड' संवादिनी सदस्यांनी सादर केले. आलेल्या सदस्यांनी प्रबोधिनीतील आपापल्या कुटुंबियांमध्ये जाणवलेले गुण व झालेला बदल किंवा स्वतःमध्ये झालेला बदल असे अनुभव सांगितले.

**१.१० मेळावा क्र. ५** – दि. १२ डिसेंबर रोजी संवादिनी गटांचा सेतुबंधन मेळावा पुणे येथे झाला. यामध्ये मध्यवर्ती संवादिनी, पौडरस्ता, औंध आणि सोलापूर येथील संवादिनी सदस्या सहभागी झाल्या होत्या. पुढील दहा वर्षात मी संवादिनीसाठी काय करेन? या विषयांवर चर्चा केली. विविध ठिकाणी गटाने केलेला अभ्यास, मुलाखती स्वरूपात गटाच्या सदस्यांनी मांडला. मेळाव्यातील उपस्थिती ३३ होती.

**१.११ प्रतिज्ञाग्रहण** – प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम १४ डिसेंबर रोजी उपासना मंदिरात झाला. २५ जणींनी प्रतिज्ञा घेतली. १५ जणींनी प्रथम प्रतिज्ञा व १० जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. मा. संचालकांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**१.१२ इतर**- २० मार्च रोजी ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे विनोबा

भावे लिखित 'सप्तशक्ती' सादरीकरण विकासिका गटाने केले. सामाजिक कामाचं कौतुक म्हणून **'नारीशक्ती'** पुरस्काराने संवादिनी शिरूरला सन्मानित केले.

**१.१३ रौप्यमहोत्सवी महामेळावा –** रौप्य महोत्सवी वर्षातील विविध नावीन्यपूर्ण विशेष उपक्रमांचा सांगता समारंभ १८ जानेवारी रोजी 'नाद घुमू दे मैत्रीचा' या विशाल स्नेह मेळाव्याने संपन्न झाला. या मेळाव्यासाठी ४५० महिला व अन्य नागरिक उपस्थित होते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजयाताई रहाटकर, महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर आणि नर्मदालय संस्थेच्या संस्थापक संचालिका आदरणीय भारतीताई ठाकूर (परिव्राजिका विशुद्धानंदा) या तिघीही प्रमुख अभ्यागता होत्या.

'स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवू' या गीताने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. आ. विजयाताई रहाटकर यांनी 'जॉय ऑफ गिव्हिंग' म्हणजेच संवादिनी सारखे गट परताव्याशिवाय करत असलेल्या समाजसेवेच्या संकल्पनेचे कौतुक करून कुटुंब प्रबोधनासाठी स्त्री–शक्ती प्रबोधनसारखे गट भरीव कामगिरी करू शकतात असे नोंदवले. डॉ. माधुरीताई कानिटकर यांनी स्त्री–पुरुष संपूरकता, कुटुंबातील सर्वांनाच पुढे जाण्यास कशी मदत करते हे स्वानुभवातून सांगितले. आ. भारतीताई यांनी अत्यंत सोप्या भाषेत भारतीय स्त्रियांच्या जीवनातून अध्यात्म कसे सहजतेने व्यक्त होते हे विविध उदाहरणांनी आणि स्व–अनुभवातील दाखल्यांनी उलगडून दाखवले. संवादिनीच्या कामावरील लघुचित्रफीत दाखविण्यात आली. रौप्यमहोत्सवी स्मरणिका आणि विविध उपक्रम गटांच्या साहित्यातून निर्माण झालेल्या संकलन पुस्तिकांचे प्रकाशन झाले.

## ◈ पौड रस्ता / औंध संवादिनी ◈

**१. मासिक बैठकांचे वैविध्य –** पर्यावरण, आरोग्य, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री–शक्ती, संत परंपरा, सामाजिक संस्था यावर संवाद. वाचले गेलेले विषय–, प्लॅस्टिकचा दुष्परिणाम, पुस्तकांचे महत्त्व, संत बहिणाबाई, शक्तिरूपेण संस्थिता, मातृभूमीपूजनाचे मर्म, पुष्पौषधी माहिती इ. विषय झाले

**२. गप्पा कट्टा व चर्चा –** राजकारण आणि महिलांचे योगदान, वारीतील अनुभव, सणांचे आरोग्यदायी स्वरूप, बदलती कुटुंबव्यवस्था, स्त्रीशक्ती व प्रेरणा यावर सख्यांनी विचार मांडले. निर्मलाताई पंडित यांचे मार्गदर्शन झाले.

**३. शिक्षण उपक्रम व तासिका –** महेश विद्यालय ७वीसाठी राष्ट्राभिमान, नियोजन कौशल्य, प्रश्न कौशल्य, संस्कृती जागृती, स्वच्छता, शारीरिक व मानसिक आरोग्य, सदाचार, संवाद कौशल्य,



पौड रस्ता/औंध संवादिनी - दशकपूर्ती मेळावा

लेखन कौशल्य यावर २७ तासिका घेतल्या. विविध क्रांतिकारकांवर गोष्टी, समूह चर्चा, शब्दफुलोरे, लेखन खेळ, अशी सत्रे झाली.

**४. पालक बैठक व मूलभूत प्रश्न –** इ. ५वी ते १०वी पालकांसाठी वर्तन समस्या, दायित्व, व्यसने, संवाद कौशल्य यावर चर्चा घेतली.

**५. जोपासना व विद्याव्रत –** विद्याव्रत घेतलेल्या मुलांसाठी ४ जोपासना सत्र. लेखवाचन 'गप्पा आपल्या देशाच्या', संस्कृत भाषेचे महत्त्व, गायत्री मंत्र, सोशल मीडिया, स्वच्छतेचे अर्थ, अक्कूबक्कू कविता, मुलांचा विचार व मनन प्रोत्साहन, अशी सत्रे झाली.

**६. मातृभूमिपूजन –** १८ मार्च रोजी महेश विद्यालयात मातृभूमिपूजन झाले. यासाठी २५० विद्यार्थी व शिक्षक सहभाग होते.

**७. औंध संवादिनी शाळा तासिका –** मुरकुटे विद्यालयात संवाद कौशल्य, राष्ट्र अर्चना, सामाजिक समता, वागणुकीचे मूल्य, क्रांतिकारक माहिती, गोष्टी व खेळ यांचा समावेश होता.

**८. मध्यप्रदेश अभ्यासदौरा –** २६ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५. स्थळे – इंदूर, महेश्वर, मांडू, उज्जैन, रावेरखेडी.

भेटी – सुमित्राताई महाजन, भारतीताई ठाकूर, रामकृष्ण मठ. मुलांशी संवाद, मातृभूमिपूजन, स्थानिक कार्यकर्त्यांशी संवाद, इतिहासाची उजळणी.

**९. दशकपूर्ती मेळावा व प्रतिज्ञा –** ८ मार्च २०२५ गटाची १० वर्षे पूर्ण झाली. १३ जणींनी प्रथम, १ जणीने द्वितीय प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे सादरीकरण पद्य, संवाद व गप्पा स्वरूपात झाले. संचालक मा. गिरीशराव बापट यांचे मार्गदर्शन झाले. १००+ निमंत्रित उपस्थित होते.

## ◈ खेड संवादिनी ◈

२०२४–२५ या वर्षांमध्ये ७ विविध ठिकाणी मातृभूमिपूजन झाले. 'स्वयं विकासातून समाज परिवर्तन' या संवादिनीच्या ब्रीदवाक्याला धरून आत्मभान व समाजभान या विषयावर विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली.

◈-◈-◈

सविस्तर वार्षिक वृत्त
स्त्री–शक्ती प्रबोधन कार्यदिशा

# १६. जिजामाता दल

**प्रारंभ – शके १९०५ /सन १९८३**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. अभ्यासाची गोडी लागावी, या उद्देशाने गेली ४२ वर्षे नित्यनेमाने हे दल चालू आहे. एखाद्या विषयावर सखोल अभ्यास करून प्रकल्प सादर करणे.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

❖ दलाच्या पटावर एकूण १८ सदस्य आहेत. त्यातील १०-१२ सदस्य दर बुधवारी जमतात.



मा. हर्षाताई कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना



जिजामाता दलास मा. संचालकांची भेट

१. दलाची सुरुवात दि. १२ जून रोजी प्रत्यक्ष बैठकीने झाली. त्या दिवशी काही दल सदस्या मा. उषाताईंचे मार्गदर्शन घेण्यासाठी त्यांच्याकडे गेल्या होत्या. त्यांनी या वर्षीसाठी दोन प्रकल्प सांगितलेले आहेत. दि. १० जुलै रोजी वर्षारंभ झाला. मा. बागेश्रीताई पोंक्षे यावर्षीच्या प्रमुख पाहुण्या होत्या. त्यांनी त्यांचे वेल्ह्यातील अनुभव सांगितले.
२. गोपाळकाला, नवरात्र, भोंडला हे सण साजरे केले. दि. १४ ऑक्टोबर रोजी मा. संगीताताई कुलकर्णी व्याख्यान देण्यास आल्या होत्या. स्त्रियांनी आत्मसंस्कार कसे करावेत यावर त्यांनी मार्गदर्शन केले.
३. दि. २७ नोव्हेंबर या रोजी मा. गौरीताई कापरे त्यांचे हराळीतील अनुभव सांगण्यास आल्या होत्या. दि.२७ जानेवारी मा. वनिताताई पटवर्धन 'देखणा देहांत तो, जो' या त्यांच्या नवीन लिहिलेल्या पुस्तकावर, बोलायला आल्या होत्या.
४. यावर्षीचे गुप्तदान मा. आनंद सराफ यांना त्यांच्या सामाजिक कार्यास छोटीशी मदत म्हणून देण्यात आले दि. ११ व १२ मार्च या दिवशी डॉक्टर सीमा दाबक 'ॐ साधने' वर बोलायला आल्या होत्या.
५. मा. उषाताई आणि मा. लताताई यांचे निधन ही दलासाठी सर्वात दुःखद घटना होती. माननीय उषाताईंनी जिजामाता दल सुरू केले आणि शेवटपर्यंत त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. माननीय लताताई या तर आमची मैत्रीणच होत्या, वेळोवेळी त्यांनी आम्हाला मार्गदर्शन केले आहे. आमची हराळीची सहल त्यांच्यामुळेच संस्मरणीय झाली होती. दलातील सर्वात जुन्या सदस्या झेलमताई वाटवे यांचे निधन झाले. त्यांना दलावर श्रद्धांजली देण्यात आली.
६. बुधवारी ३ एप्रिल रोजी संचालक भेट झाली.

◈-◈- ◈

- ''एकमेकांबद्दल व विषयाबद्दल आत्मीयता असेल तर सहकारी आत्मिक पातळीवर जोडले जातात.''
- भाग्यवंताचे लक्षण काय? तर वेळेचा सदुपयोग. कोणताही क्षण तो वाया दवडत नाही.
- कोणताही धर्म असू दे. ईश्वराचे सगुण रूप कोणतेही असू दे, कळवळून केलेली प्रार्थना त्यास पोचते व योग्य कृतीचे बळ मिळते.
- आपल्या उत्तम कार्याने, आचरणाने असा नावलौकिक मिळाला पाहिजे की आपल्या माघारीसुद्धा दीर्घकाळ आपली कीर्ती टिकून राहील.

**- कै. वाच. उषाताई खिरे**

# १७. युवती विभाग

**प्रारंभ – शके १८८४/ इ.स. १९६२**

**राष्ट्रघडणीसाठी विद्यार्थिनी व युवतींच्या प्रेरणाजागरणाचे व वृत्तीघडणीचे काम करणारा विभाग**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य काम

१. शालेय दले – शालेय मुलींसाठी नियमित क्रीडा दल, सहली, आषाढी वारी, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, शिबिरे, क्रीडा प्रात्यक्षिक.

२. प्रबोध शालेय व महाविद्यालयीन युवतींसाठी दल

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

- **गणेशोत्सव –** १५ ठिकाणी सादरीकरण, ३ प्रात्यक्षिके, ३ मिरवणुका.
- **दिवाळी विक्री उपक्रम–** रु. १ लक्ष नफा.
- **शिबिरे –** २४० मुली, १५ मार्गदर्शिका
- **क्रीडा प्रात्यक्षिक –** ३०० युवती

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



क्रीडा प्रात्यक्षिके - २०२५



क्रीडा प्रात्यक्षिके - २०२५

## ★ विशेष असे काही..... ★

वर्षभर चालणाऱ्या दलांमधून आपण किती प्रगती केली, किती उत्तमता आणू शकलो, हे स्वतः तपासण्याचा आणि इतरांसमोर सादर करण्याचा युवती विभागाचा उपक्रम म्हणजे क्रीडा प्रात्यक्षिके. यावर्षी २६ जानेवारीला सुमारे ११ वर्षांनंतर सर्व युवती दलांची एकत्रित क्रीडा प्रात्यक्षिके झाली. पाचवी मधल्या मुलींपासून (वय वर्ष १०) प्रौढ युवती गटातून सहभागी झालेल्या पालक (वय ३५+) इथपर्यंत सुमारे ३२५ युवतींनी सहभागी होऊन १५ क्रीडा प्रकारांचे सादरीकरण केले. वर्षभर आपापल्या नियमित दलांवर छोट्या-छोट्या गटांत सराव करणारा संपूर्ण युवती गट या निमित्ताने मैदानावर एकत्र पाहायला मिळाला.

अनेक वर्षांनंतर क्रीडा प्रात्यक्षिके करत असल्याने सहभागी झालेल्यांपैकी अगदी मोजक्याच युवतींना क्रीडा प्रात्यक्षिक म्हणजे काय, का आणि कसे असते याची कल्पना होती. जबाबदारी घेणारा संपूर्ण गट नवीन होता. त्यामुळे आपल्याला प्रात्यक्षिक म्हणजे नक्की काय करायचे आहे हे समजून घेणे यासाठी पुरेसा वेळ सगळ्यांनी घेतला. अनुभवी युवतींचे अनुभव कथन, आधीच्या प्रात्यक्षिकांच्या चित्रफिती, आणि प्रत्येकीच्या मनात तयार झालेल्या सादरीकरणाच्या कल्पना यातून डोळ्यासमोर चित्र उभे राहिले. मग वर्षभर त्यावर प्रयोग करून, वेगवेगळे क्रीडा प्रकार शिकवणाऱ्या युवतींना बोलावून, १५ प्रकार निश्चित झाले. खूप वर्षांनी एखादा मोठा उपक्रम करायचा तर तो उत्तमच करायचा ही भावना सगळ्या मार्गदर्शिकांच्या मनात पक्की होती. त्यामुळे दलांची नियोजनं अजून चांगली कशी करता येतील, छोट्या मोठ्या अडचणी कशा सोडवता येतील, आपल्याला मिळालेल्या कामाशिवायही अजून कुठे मदत करता येईल अशा सगळ्यासाठी मार्गदर्शिकांची धडपड चालू होती. प्रत्यक्ष कार्यक्रमात सहभागी होऊ शकणार नसू तरी शक्य तेवढी पूर्वतयारी करून ठेवणाऱ्या, कोणतंही काम करायची तयारी असणाऱ्या आणि 'आम्ही मदतीला आहोत' हा विश्वास देणाऱ्या मार्गदर्शिकांच्या गटकार्यातून हा कार्यक्रम चांगल्या प्रकारे पार पडला.

वैयक्तिक अडचणींपेक्षा आपल्या विभागाचा हा क्रीडा प्रात्यक्षिकाचा संकल्प जास्त महत्त्वाचा आहे हे ओळखून सहभागी होणाऱ्या सर्वच दलांमधल्या युवती एकमेकींच्या साहाय्यक बनत उत्तम सादरीकरणासाठी प्रयत्न करत होत्या. त्यामुळे गटबांधणी व्हायला आणि गटाचा आत्मविश्वास वाढायला मदत झाली. अनेक युवती जोडल्या गेल्या, अनेकांची आधी माहिती नसलेली कौशल्य समजली, आणि नव्याने ओळख झाली. या कार्यक्रमाच्या निमित्याने, युवती विभागात जाऊन आपल्या मुली काय शिकतात, विभागाबद्दल त्यांना आत्मीयता का वाटते हे सुद्धा पालकांपर्यंत पोहोचले.

एखाद्या उपक्रमाचे यश हे सादरीकरण किती उत्तम झाले, यावर फक्त नसून त्यामध्ये जबाबदारी घेऊन काम करणाऱ्यांचे गटकार्य कसे झाले यावरही अवलंबून असते हे जाणवले. क्रीडा प्रात्यक्षिकांच्या निमित्ताने आपण मिळवलेले कौशल्य इतरांना शिकवणे, गटाला जोडून घेणे हे शिकलो. असे सगळ्यांनी एकत्र अनुभव घ्यावेत, आणि अजून मोठे पराक्रम करावेत ही प्रेरणा आम्हा सर्व युवतींना मिळाली.





• प्रबोध दलांचा विद्याव्रत संस्कार कार्यक्रम • गणेशोत्सवात बर्चीनृत्य सादरीकरण • कलरीपयट्टू प्रात्यक्षिक

### ◈ शालेय दले ◈

१. **क्रीडा प्रात्यक्षिके –** दि. २६ जानेवारी रोजी युवती विभागाच्या सर्व दलांनी एकत्र येऊन क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. संचलनाने प्रात्यक्षिकांची सुरुवात झाली. नंतर मनोरे, सूर्यनमस्कार, एरोबिक्स, कराटे, लंगडी, लगोरी, ॲथलेटिक्स, अमेरिकन डॉजबॉल, कलरीपयट्टू, खो-खो, रोप योगासने, मर्दानी खेळ, बोथाटी, चक्र, बरचीनृत्य असे विविध प्रकार सादर झाले.

२. **आषाढी वारी –** इ. दहावीतील विद्यार्थिनी आळंदी ते पुणे, इ. आठवी मुली हडपसर ते दिवेघाट आणि इ. नववी मुली जेजुरी ते वाल्हे या टप्प्यात सहभागी झाल्या. यामध्ये मुलींनी दिंड्यांमध्ये मिसळून चालणे, अभंग म्हणणे, वारकऱ्यांशी संवाद साधणे असे अनुभव घेतले.

३. **गणेशोत्सव –** गणेशोत्सवात इ. पाचवी व सहावी मुलींनी अथर्वशीर्ष पठण, सातवी मुली लेझीम, आठवी मुली कलरी पयट्टू आणि नववी दहावी मुली बर्ची-नृत्यात सहभागी होत्या. धडक प्रात्यक्षिकांच्या निमित्ताने प्रबोधिनीच्या भूमिका पोहोचवू शकल्या.

४. **विक्री उपक्रम –** या उपक्रमात इ. ५वी ते १०वी मधील सर्व मुलींचा सहभाग होता. आकाश कंदील, पणत्या, उटणे, दिवे, रांगोळी, भेटवस्तू संच इ. गोष्टींची विक्री दिवाळीच्या काळात झाली. या उपक्रमात इयत्ता दहावी मधील मुलींचे उद्योजकतेचे विकसन व्हावे यासाठी त्यांनी भांडवल मिळवणे, काय उत्पादन विकायचे, कसे बनवायचे इ. निर्णयापासून ते साहित्य पोहोचवण्यापर्यंत सर्व नियोजन करून पथकात एकत्र मिळून काम केले.

५. **सहली-शिबिरे** – वर्षभरात प्रत्येक वर्गाची एक सहल झाली. डिसेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यात पाचवी ते सातवीच्या मुलींसाठी क्रीडा शिबिर, आठवी नववी मुलींसाठी ग्रामीण भागात तंबू शिबिर व दहावी मुलींसाठी अभ्यास शिबिर आयोजित करण्यात आले.

### ◈ प्रबोध शालेय साप्ताहिक दल ◈

गटकार्य, कलासत्र, खेळ, गटचर्चा असे विविध उपक्रम योजले होते. गणेशोत्सवात बर्ची नृत्यासाठी ४० जणींचा गट गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी होता. याच गटातील २५ मुलींनी नवरात्रीच्या निमित्ताने दसऱ्याच्या दिवशी झालेल्या एका मिरवणुकीत सहभाग घेतला. वर्षभरात या गटासाठी एकूण दोन व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरांची योजना केली गेली. त्यामध्ये १५० जणींचा सहभाग होता. या गटातील १० मुलींनी क्रीडा प्रात्यक्षिकात एरोबिक्स या क्रीडा प्रकाराचे सादरीकरण केले.

### ◈ महाविद्यालयीन साप्ताहिक दल ◈

१. महाविद्यालयीन साप्ताहिक दल गटचर्चा, कला, क्रीडा, मार्गदर्शपर व्याख्यान अशा विविध माध्यमांचा वापर केला.

२. **नेतृत्व प्रशिक्षण शिबिर** – नेतृत्व प्रशिक्षण शिबिरात नियोजन कौशल्य, संवाद कौशल्य, कार्यवाही कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य अशा नेतृत्वासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षण दिले. नेतृत्व संकल्पना स्पष्ट करताना उत्तम नेता, नेतृत्वाचे प्रकार असेही समजावून सांगितले. या शिबिरात १७ युवती आणि २ मार्गदर्शिका सहभागी होत्या. गणेशोत्सव, दीपोत्सव अशा सामाजिक उत्सवांच्या निमित्ताने गटासाठी उपक्रम राबविण्यात आले. यासाठी सुमारे १२५ युवतींचा नियमित सहभाग होता. नवरात्र निमित्त मिरवणुकीत १० युवती सहभागी झाल्या. या गटातील सुमारे १५ युवती क्रीडा प्रात्यक्षिकांमध्ये लाठी काठी, जळती बोथाटी, चक्र अशा साहसी खेळांच्या सादरीकरणात सहभागी होत्या.

◈-◈-◈

# १८. युवक विभाग
**प्रारंभ – शके १८८४/ इ.स. १९६२**

## नित्य स्वरूप

१. पुण्यातील शालेय मुलांसाठीची ११ व महाविद्यालयीन युवकांसाठीची ८ क्रीडा व विज्ञान दले चालू.
२. वर्षभर मैदानावर भरपूर मनसोक्त खेळ खेळायची, रगडून व्यायाम करण्याची, कडक शिस्तीतील संचलन करण्याची, मोठ्या दादांकडून ऐतिहासिक गोष्टी ऐकायची, देशभक्तीपर समूहगीते गायची, स्वतःच्या क्षमता ताणायची, मार्गदर्शक दादांकडे पाहत मोठं होण्याची जागा म्हणजे दैनंदिन दल.
३. युवकांच्या व मुलांच्या वृत्तीघडण व प्रेरणाजागरणाचे काम.

## संख्यात्मक आढावा

१. क्रीडा आणि विज्ञान ही माध्यमे वापरून ४००+शालेय व १५०+ महाविद्यालयीन युवक वर्षभर जमले. एकूण १२०+ युवकांनी प्रतोद, मार्गदर्शक, दल-प्रतिनिधी अशा विविध जबाबदाऱ्या घेऊन काम केले.
२. मित्रमेळा सत्र मालिका भाग १ व भाग २ – उपस्थिती १००
३. स्वयंअध्ययन शिबिरमालिका – उपस्थिती २५
४. शाळांमध्ये बरचीनृत्य प्रशिक्षण शिबिरे, मिरवणुका सहभाग – उपस्थिती २२५
५. शाळांमध्ये लेझिमनृत्य प्रशिक्षण – १००
६. धमाल शिबिर (किशोर वयोगट) – कोथरूड भागातील २ दलांची सुरुवात – सरासरी उपस्थिती – १५ (पट – ५०, नवीन ४०+) – १५०
७. किशोर क्रीडा सामने – दैनंदिन रचनांवरचा भर ( नवीन भर ५०)
८. पाचवी प्रवेश परीक्षा दल– १०० जण
९. किल्ले सिंहगड दुर्गभ्रमण मोहीम– ५०
१०. दलावरचा पट वगळता **एकूण ८५० नवीन मुलांपर्यंत यावर्षी गट पोचला.**



**गणेशोत्सव : प्रात्यक्षिकानंतरची प्रार्थना**

### प्रतिसाद

ज्ञान प्रबोधिनीचा गणेशोत्सव हा उत्सवापुरता मर्यादित न राहता समाजप्रबोधन, नेतृत्व विकास व राष्ट्रीय भावनेचा जागर करणारा झाला. यंदाच्या वर्षी एकूण १७ प्रतिष्ठापना आणि विसर्जन मिरवणुका पार पडल्या. वनवासी बांधवांचे नृत्य गट, शाळा, मंडळं, सोसायट्या, वृद्धाश्रम आणि विशेष मुलांची शाळा या सर्वांचा यात समावेश होता. विशेष म्हणजे धनकवडी येथे ११ मंडळांच्या संयुक्त मिरवणुकीत वनवासी गटांना मुख्य चौकात प्रथम सादरीकरणाची संधी देण्यात आली, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीच्या मिरवणुकीत १२० जणांचा लेझीम-बरची गट फक्त ९ ढोलांच्या साथीने उतरला. प्रबोधिनीची विसर्जन मिरवणूक १५०० सहभागींनी भरलेली असून, ठरलेल्या वेळेवर सुरू होऊन संपणारी पुण्यातली सर्वात शिस्तबद्ध मिरवणूक होती. ३० ढोलांमध्ये शेकडो युवकांनी बरची नृत्य या मिरवणुकीत सादर केले.

यंदा अनेक मंडळांनी व सोसायट्यांनी स्वतःहून ७०-८० जणांच्या गटात बरची नृत्य सादर केले. एकूण ३६ बरचीनृत्य प्रात्यक्षिके झाली. ७ शाळांमध्ये लेझीम व बरची प्रशिक्षण, १४०० घरांमध्ये अथर्वशीर्ष पठण, २३ मंडळांमध्ये पठण सेवा, एक ठिकाणी मातृभूमी पूजन आणि १० ठिकाणी विज्ञान प्रदर्शन झाले. या विज्ञान प्रदर्शनांना १०,८०० नागरिकांनी भेट दिली.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने होणाऱ्या या विविध उपक्रमांमागे आहे ती एक भूमिका - 'कृती मागच्या कार्याचं, विचारांचं स्मरण'. उत्सवातील प्रत्येक सादरीकरण हे सामाजिक जाणीवा जागृत करणाऱ्या कार्यशीलतेचं रूप असतं - हेच या वर्षीच्या गणेशोत्सवाचं खरं वैशिष्ट्य!

**- अभिषेक जोग**

### ◈ वर्षातील ठळक मध्यवर्ती घडामोडी ◈

१. सप्टेंबर २०२३ मध्ये वीरव्रत घेतलेल्या मार्गदर्शकांचा वीरव्रत स्मरण कार्यक्रम १३ जानेवारी रोजी झाला. मार्गदर्शकांनी नवीन संकल्प केले व वीरव्रत पोथीतील निवडक भागातील उपासना एकत्र केली.
२. दि. ३१ जानेवारी – सर्व महाविद्यालयीन दलांवरील व्रतमित्रांसाठी व्रतमित्र प्रशिक्षण सत्र झाले. व्रतार्थींसोबत अधिमित्रता कशी असावी याबद्दल सौगंधदादा देशमुख यांनी सत्र घेतले. २० मार्गदर्शकांची उपस्थिती होती.
३. वीरव्रत प्रक्रियेची संख्या : व्रतार्थी– ८७, व्रतमित्र– १७, मार्गदर्शक वीरव्रतार्थी– १५
४. ज्ञान प्रबोधिनी युवक विभाग, पुणे यांचे एकूण ३१ दौरे ह्या वर्षी वाई गावास झाले. या पैकी ८ दौरे निवासी झाले तर २३ दौरे अनिवासी झाले.
वाई मधील गणपती घाटावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. वाई गावातील ५०० + लोकांनी ह्या प्रदर्शनाला भेट दिली. या उपक्रमांच्या सोबतच नियमित पाक्षिक दौऱ्यांमधून शाळा, शिक्षक, युवक व नागरिक भेटी झाल्या.








• **गणेशोत्सवातील युवक मेळावा** • **महाविद्यालयीन दले मार्गदर्शक राजगड दुर्गभ्रमण** • **विज्ञान प्रदर्शन**

५. देवगड विज्ञान दल – देवगड येथे वर्षभर विविध उपक्रम सातत्याने झाले. गणेशोत्सवात खवळे महागणपती, देवगड येथे विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या प्रदर्शनाला १,२०० लोकांनी हजेरी लावली. देवगडच्या तीन शाळांतील १६ विद्यार्थी आणि चार युवकांनी या प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

### ◈ शालेय मार्गदर्शक दल-प्रबोधिनी परिचय शिबिर ◈

शालेय दले घेणाऱ्या मार्गदर्शकांचे प्रबोधिनी परिचय शिबिर पार पडले. आपण रोजचे दल का घेतो? याबाबत अधिकाधिक स्पष्टता यावी यासाठी ह्या शिबिराचे आयोजन केले होते. एकूण २४ जणांची उपस्थिती होती.

### ◈ शालेय दलातील अन्य एकत्र प्रक्रिया/ उपक्रम ◈

१. **कुमार सामने –** सलग एक खेळ खेळून त्यातील विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या दलांच्या संघांशी स्पर्धा, खेळाडू उपस्थिती १५०.

२. **किशोर सामने –** किशोर वयातील मुलांच्या एकत्र क्रीडा स्पर्धा खेळाडू उपस्थिती २००.

### ◈ महाविद्यालयीन दले ◈

- एकूण ८ दले साप्ताहिक वारंवारितेने पुण्याच्या विविध भागात चालतात. महाविद्यालयीन युवकांचे एकत्रीकरण म्हणून वर्षारंभ उपासना, दसऱ्याला सकाळी केंद्रावरील ध्वजवंदन, पाडव्याला सकाळी केंद्रावरील ध्वजवंदन अशा निमित्ताने सर्व युवक एकत्र भेटतात. गणेशोत्सवातील प्रबोधिनी वास्तू मधील आरती, एप्रिल महिन्यात झालेला पेहेलगाम वरील हल्ल्याच्या निषेधार्थ झालेली सभा आणि आंतरदलीय क्रीडा सामन्यांच्या दिवशी प्रतिज्ञाग्रहण असे कार्यक्रम झाले.
- **वीरव्रत स्मरण योजना –** जानेवारी महिन्यात सर्व मार्गदर्शक गटाने सामूहिक संकल्प करुन ते पूर्ण केले.
- गुढीपाडव्याच्या दिवशी ध्वजारोहण कार्यक्रमाला जोडून युवक विभागाने प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम आयोजित केला. यात ५४ युवकांनी प्रथम, ९ युवकांनी द्वितीय आणि एका युवकाने तृतीय प्रतिज्ञा घेतली.
- गणेशोत्सवामध्ये श्री गणेश आरती व युवक मेळाव्या निमित्त ८० युवक प्रबोधिनीत उपासना मंदिरात जमले होते. विभागाचे प्रतिनिधी म्हणून तुषारदादा माडीवाले यांनी ज्ञान प्रबोधिनीच्या 'संघटना गणेशाची' आरती केली.

➤ **समूहगुण शिबिर –** मार्गदर्शक दलातून समूहगुण विकसनाची पक्की रचना बसवू हे मार्गदर्शक दलासाठी सर्वात महत्त्वाचं उद्दिष्ट होतं. महाविद्यालयीन मार्गदर्शक दलाचं शिबिर हे उद्दिष्ट समोर ठेवून मार्च महिन्यात वेल्ह्यात झालं.

| | |
|---|---|
| भाग | सदाशिवपेठ, शुक्रवारपेठ, बिबवेवाडी, सहकारनगर, कर्वेनगर, कोथरुड, वारजे, सिंहगडरस्ता, गोखलेनगर |
| नियमित उपस्थिती | किशोर -२०० + , कुमार-१५०+, युवक - १५०+ |
| मार्गदर्शक संख्या | १२० (६२ शालेय + ५८ महाविद्यालयीन युवक) |
| दुर्गभ्रमण किल्ले | राजगड, रायरेश्वर, तोरणा, सिंहगड, जीवधन, गोरखगड, विसापूर, हरिश्चंद्रगड |
| दलांवरील खेळ | डॉजबॉल, फुटबॉल, व्हॉलीबॉल, बेसबॉल, स्टंपबॉल, चौरसधावा, दशहस्तांतरण, कबड्डी, नौकायुद्ध, लंगडी, मल्लखांब, खो-खो, इ. |
| दलांनी केलेले विशेष उपक्रम | अभंग व गुरुपौर्णिमा कार्यक्रम, बलिदान मास उपक्रम, शिवजयंती मिरवणूक, विविध शिबिरे -धमाल शिबिरे, मित्रमेळा शिबिर व मालिका, स्वयंअध्ययन (१०वी) शिबिर, कुमार गट तंबू शिबिर, १२वी झालेल्या युवकांसाठी Bootcamp, शिवजयंती शिबिर, डॉ. आंबेडकर जयंती निमित्त अभ्यास यज्ञ, ५ दिवसीय विज्ञान शिबिरे, प्रयोगशाळा शिबिर, गणेशोत्सवात १८ मिरवणुका, ५ ठिकाणी विज्ञान प्रदर्शने. |
| प्रबोधिनीच्या विस्तार कार्यात सहभाग | वाई, देवगड येथे विज्ञान प्रदर्शने |
| मार्गदर्शक प्रशिक्षण | वीरव्रत स्मरण शिबिरे, प्रबोधिनी परिचय शिबिर, समूहगुण विकसन शिबिर, उपजीविका ध्येय शिबिर |

◈-◈-◈

# १९. नागरी वस्ती अभ्यास गट

**प्रारंभ – शके १९२४/ इ.स.२००२**

**सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान जागृत करणे !**
**कार्यदिशा – राष्ट्रीय एकात्मता, स्त्री शक्ती प्रबोधन !**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य काम

१. आनंदी शिक्षण प्रकल्प, बालविकास, किशोर-किशोरी विकास, क्रीडा दले.
२. शाळांमधील उपक्रम – विद्याव्रत संकल्पनेवर आधारित : 'चांगल्या सवयी, चांगला माणूस' तासिका.
३. युवती विकास – युवतींचे व्यक्ती गुण व नेतृत्वगुण विकसित होणे यासाठी विविध प्रक्रिया.
४. प्रौढ महिला विकास – सावित्री दल.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

▷ नागरी वस्त्यांमधील १,१९८ किशोर – किशोरी

▷ ३० महिला व युवतींनी वर्षभर काम केले.

▷ ३ शाळांमध्ये ८५० विद्यार्थ्यांसाठी नियमित सत्रे

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇




**कार्यक्रमाच्या आचार्य सौ. सरडे मॅडम, शिक्षक व कार्यकर्ता गट**




**अभ्यास अहवाल प्रकाशन कार्यक्रम**

## अनुभव – हाच तो विवेक !

वर्षभर विद्याव्रताच्या तासिका झालेल्या वस्तीतील शाळेत सातवीच्या वर्गाचं विद्याव्रताचं शिबिर होतं. संस्काराच्या दिवशी हर्षल थोडा उशीरा आला. सगळ्यांबरोबर त्यानेही व्रतचिन्ह घेतलं. संस्कारानंतरच्या सभेत हर्षल मनोगतात म्हणाला,''तो ताईंनी 'विवेक' सांगितला आहे ना!! तो काही फार अवघड नाही. ताई जेव्हा समजावून सांगते ना, तेव्हा लक्ष देऊन ऐकलं आणि ती उदाहरणं लक्षात ठेवली की, तो विवेक कळतो आणि 'विवेक' आचरणातही आणता येतो.

हे बघा मित्रांनो, (हर्षल बोलत होता) ''आज सकाळी माझा खेळाच्या सरावाचा क्लास होता, त्याला घरच्यांनी पैसे भरले होते, उद्या तिथे स्पर्धा आहे. तो क्लास बुडवायचा नाही, असं बाबांनी जरा रागातच सांगितलं होतं. आता काय करायचं? मी त्या क्लाससाठी अगदी वेळेवर पोहोचलो. आता माझ्या डोक्यात ताईंनी सांगितलेला 'विवेक' घोळत होता. आपल्यासमोर अनेक पर्याय असतात, त्यात सगळ्यात आधी काय करायचं, महत्त्वाचं असं कोणतं असे त्याला नंबर द्यायचे. आता माझ्या दृष्टीने संस्कार महत्त्वाचा होता; कारण तासिका, शिबिर मी केले आहे; पण माझ्या नाईलाजाने मला सरावाला जावे लागले. माझा रोजचा सराव मी जरा लवकर संपवला आणि बाबांना म्हणालो, 'तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागून झालंय माझं, आता माझं ऐकायचं, मला विद्याव्रत संस्कारासाठी घेऊन चला.' माझ्यादृष्टीने मी आधी तिथेच जायला हवं होतं; पण तुमचं ऐकलं पाहिजे म्हणून सरावाला आलो. आता मला संस्कारासाठी घेऊन चला आणि मी थेट इथे आलो. मुलांनो, संस्कार घ्यायचा तर घरातही प्रसन्नता हवीच ना. ज्ञान प्रबोधिनीच्या ताईंनी सांगितलेला हाच तो 'विवेक'.'' सातवीतल्या मुलाने आज उपस्थितांना 'विवेक' म्हणजे काय ? हे समजावून सांगितले.







• राष्ट्रीय एकात्मता महोत्सव • विद्याव्रत संस्कार कार्यक्रम • एकात्मता महोत्सव

### ◈ नागरी वस्त्यांमधील नियमित काम ◈

१) पर्वती -लक्ष्मीनगर, २) जनता वसाहत, ३) सदाशिव पेठ - मातंग वस्ती, ४) जोशी वाडा, ५) वारजे - माळवाडी, ६) चतु:शृंगी - वैदूवाडी, ७) शिवाजीनगर, ८) लोहगाव - कालवड, ९) हडपसर - वैदूवाडी, १०) खजुरेवस्ती, ११) मार्कंडेयवस्ती, १२) गोपाळवाडी, १३) भवानीपेठ - काशीवाडी, १४) दत्तवाडी - ओटावसाहत, १५) फर्गुसन कॉलेज जवळ - वडारवाडी, १६) वडगाव शेरी, १७) फुरसुंगी - ज्ञानगंगा

या १८ नागरी वस्त्यांमध्ये बाल, किशोर, युवती गटासाठी नियमित उपक्रम चालतात. यावर्षी वर्षातून ४ वेळा यातील सुमारे २०० विद्यार्थी ज्ञान प्रबोधिनी मध्ये विविध मेळाव्यांच्या निमित्ताने येऊन गेले.

### ◈ शाळांमधील उपक्रम ◈

विश्वकर्मा विद्यालय (अप्पर इंदिरा नगर), प्रज्ञा शाळा, फुरसुंगी मराठी शाळा या शाळांमध्ये उपेक्षित गटातील विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकत आहेत. तेथील इयत्ता आठवीतील २४० मुलांसाठी विद्याव्रत तासिका घेतल्या गेल्या. त्याशिवाय व्यक्तिविकसनपर, अभ्यासविषयक व विद्याव्रत जोपासना अशी सत्रे ही अन्य इयत्तांमधील ६०० विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली.

### ◈ विशेष ◈

**एकात्मता महोत्सव** - १२ जानेवारी २०२५ या दिवशी राजमाता जिजाऊंची व स्वामी विवेकानंद यांची जयंती विभागाने एकात्मता महोत्सव म्हणून साजरी केली. यामध्ये १८ व्यक्तींनी, १८ समाज



हडपसर, वैदूवाडी - शारदोत्सव


| एकात्मता महोत्सव सहभागी समाजगट १२ जानेवारी २०२५ | |
|---|---|
| १. बंजारा समाज | ८. जैन समाज |
| २. मराठा समाज | ९. कन्नड समाज |
| ३. विरशैव लिंगायत समाज | १०. वडार समाज |
| ४. गोसावी समाज | ११. जोशी समाज |
| ५. बौद्ध समाज | १२. देशस्थ ब्राह्मण समाज |
| ६. वैदू समाज | १३. कोकणस्थ ब्राह्मण समाज |
| ७. मातंग समाज | १४. राजस्थानी समाज |
| १५. शिकलगार समाज | |

गटांची अभ्यासपूर्वक मांडणी केली. उदा. वासुदेव, वैदू, बौद्ध प्रार्थना इत्यादी. या दिवसभराच्या उपक्रमात १६९ मुले-मुली आणि ४७ महिला, पुरुष असे एकूण २१६ जण सहभागी झाले.

### ◈ अभ्यास अहवाल प्रकाशन व वितरण ◈

सन २००२ ते २०२२ या वीस वर्षातील कामाचा अभ्यास अहवाल प्रकाशित झाला. गटामार्फत २००२ ते २०२२ या कालावधी मध्ये विविध कामाच्या निमित्ताने एकूण- ८० वस्त्यांमध्ये पोहोचलो आहे. त्यामध्ये ४३ समाज गटांबरोबर संपर्क - संवाद झाला आहे. विविध सर्वेक्षणे यांद्वारे ४०,००० कुटुंबांपर्यंत नागरी वस्ती अभ्यास गट पोहोचला. त्यातील विविध वयोगटातील ३०,०३६ लोक विविध उपक्रमात सहभागी झाले.

◈-◈-◈




अभ्यास अहवाल

# २०. नैसर्गिक संसाधने विभाग

**प्रारंभ – शके १८८८/इ.स. १९६६**

**गरजू व प्रतिसादी अशा निवडक गावांमध्ये लोकसहभाग व ग्रामस्थांच्या पुढाकरातून पाणीटंचाई निवारणाचे काम !**




**कहांडोळपाडा- देवळाचा पाडा टाकी उद्घाटन (ता. पेठ, जि. नाशिक)**

## नित्य स्वरूप

१. पाणीटंचाई निवारण कार्यक्रम
२. साठवण टाकी बांधकाम
३. विहीर बांधकाम
४. नळ-पाणी योजना
५. सौर दिवे प्रसार उपक्रम

## संख्यात्मक आढावा

- **साठवण टाकी बांधकाम उपक्रम –** ३३
- **विहिर बांधकाम उपक्रम –** १
- **पिण्याच्या पाण्याची नळपाणी योजना –** १
- **शेतीसाठी पाण्याची योजना –** १
- **सौर दिवे वाटप व प्रसार –** ७५ कुटुंबे
- **ग्रामीण आकाशदर्शन उपक्रम –** ५ गावे

### गावातील बोलक्या प्रतिक्रिया..!

आमच्या धनगर वस्तीवर उन्हाळ्यात अधिग्रहीत विहिरीवरील मोटर चालू असते तोपर्यंत ग्रामस्थ छोट्या ड्रममध्ये अथवा भाड्यांमध्ये पाणी भरून ठेवतात. ते भरून झाले की मोटर बंद करेपर्यंत बरेचसे पाणी साठवणुकीची व्यवस्था नसल्याने टंचाई काळातही वाया जाते. वस्तीवर साठवण व्यवस्था झाल्यास लोकं त्यांना दिवसभरात पाहिजे तेव्हा गरजेनुसार पाणी घेऊन जाऊ शकतील. या वस्तीवरील टंचाईची बिकट परिस्थिती लक्षात घेऊन टाकी बांधण्याची आम्ही संस्थेकडे मागणी केली. श्रमदान व टाकी चौथरा बांधण्याची तयारी दर्शविली. यातून लगेच वस्तीवर १५ हजार लिटर क्षमतेची टाकी बांधली गेली, याचा आम्हाला आनंद आहे.

**– राजू कोळेकर (गाव : रेडे– कोळेकरवस्ती, ता. माळशिरस, जि. सोलापूर)**

### ◈ पाणी टंचाई निवारण कार्यक्रम ◈

पाणीटंचाई निवारणाच्या या उपक्रमात झरेविकास, नवीन विहीरखोदाई, जुन्या विहिरींचे खोलीकरण व रुंदीकरण, नवीन नळपाणी पुरवठा योजना, जुन्या नळपाणी योजनेची दुरुस्ती, पाणीसाठवण टाकीचे बांधकाम आदी विषय लोकांच्या सहभागातून हाताळण्यात येत आहेत.

श्रमदान व लोकवर्गणी याआधारे प्रत्येक गावाचा सहभाग निश्चित करण्यात येत असतो. कामापोटी येणाऱ्या खर्चाच्या मोठ्या रकमेची तजवीज मात्र पुण्यातील विविध कंपन्यांच्या सीएसआर निधी, रोटरी क्लब व अन्य हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्यांमधून करण्यात येत असते. विभागाचे काम सध्या पुणे जिल्ह्यासह एकूण ९ जिल्ह्यातील २१ निवडक तालुक्यांमध्ये विस्तारलेले आहे. यंदा मात्र पुणे, सोलापूर व नाशिक या ३ जिल्ह्यात, ५ तालुक्यात प्रामुख्याने काम झाले.

टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या गावांना यात प्राधान्य देण्यात येत आहे. अन्य जिल्ह्यांमध्ये पाण्याच्या स्रोत उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी पाणीसाठवण टाकी या उपक्रमाचा प्रामुख्याने विस्तार करण्यात येत आहे. टंचाईग्रस्त गावांमध्ये टँकरचे पाणी साठविण्यासाठीही या टाक्यांचा उपयोग होत आहे. काही मोजक्या गावांमध्ये डोंगरातील झऱ्याचे पाणी साठविण्यासाठी या टाक्या उपयुक्त ठरत आहेत.

१. **विहीर खोदाई व बांधकाम उपक्रम –** सातारा जिल्ह्यातील मांढरदेव-गडगेवाडी (ता. वाई) येथील धनगरवस्तीमध्ये गेल्या वर्षी खोदलेल्या विहिरीचे बांधकाम पूर्ण झाले. विभागाने पुणे जिल्ह्याबाहेर बांधण्यास घेतलेली ही पहिलीच विहीर. याचबरोबरीने मुळशी तालुक्यातील टेमघर-खरब येथील धनगरवस्तीसाठी एका विहिरीचे खोदकाम व बांधकाम पूर्ण करण्यात आले. या विहिरीत प्रत्येकी किमान पाच लक्ष लिटरचा पाणीसाठा होऊ शकणार आहे. या दोन्ही विहिरींसाठी एव्हियंट मटेरियल्स इंडिया प्रा. लि. यांचे अर्थसाहाय्य मिळाले. बांधकाम करण्यात आलेल्या या विहिरीच्या जागांचे शासनाच्या नावे बक्षिसपत्र करण्यासाठी मोठ्या चिकाटीने पाठपुरावा करून मिळवण्यात आली. त्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून पाठपुरावा चालू होता. यंदाच्या विहिरींची कामे धरून आत्तापर्यंत ३९ विहिरींचे खोदकाम व बांधकाम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

२. **फेरोसिमेंट टाकी बांधकाम –** पिण्याच्या पाण्याच्या साठवणुकीसाठी एकूण ३३ गावे/वस्त्यांमध्ये फेरोसिमेंट टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. यांपैकी पुणे जिल्ह्यात ७, सातारा जिल्ह्यात १, सोलापूर जिल्ह्यात ७ आणि नाशिक जिल्ह्यात १८ टाक्या बांधण्यात आल्या. विभागातर्फे आत्तापर्यंत एकूण ११९ टाक्या बांधल्या आहेत. या सर्व लोकसहभागातून



• मांढरदेव-गडगेवाडी (ता. वाई) येथे पूर्ण झालेले विहीर बांधकाम



• निवडक आदिवासी कुटुंबांना सौर दिवे वाटप कार्यक्रम



• रोटरीतर्फे विभागाला सेवा गुणवत्ता पुरस्कार

बांधलेल्या आहेत. अनेक गावात साठवणटाकीचा सळईचा सांगाडा बांधण्यात व सांगाड्यावर सिमेंटचा माल लिंपण्यात स्थानिक ग्रामस्थांनी श्रमकार्य केले.

३. यंदाच्या टाक्यांसाठी वैयक्तिक देणगीदारांबरोबरच एव्हियंट मटेरियल्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, केपीआयटी टेक्नॉलॉजीज्, दाबके ट्रस्ट, एमएसएस इंडिया प्रा. लिमिटेड, रोटरी क्लब, ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका यांचे अर्थसाहाय्य लाभले.

४. सातारा तालुक्यातील पारंबे गावातील २० हजार लिटर क्षमतेच्या टाकीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम गट विकास अधिकारी सतीश बुद्धे व केपीआयटीचे अधिकारी रविराज दामले यांच्या हस्ते पार पडला.

५. पेठ तालुक्यातील काहांडोळपाडा (जि. नाशिक) ग्राम पंचायतीतील देवळाचापाडा व सावर्णा या दोन गावातील टाकीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम केपीआयटी टेक्नॉलॉजीज्चे सीएसआर प्रमुख तुषार जुवेकर यांच्या हस्ते नुकताच पार पडला.

६. **शेतीसाठी व दैनंदिन वापरासाठी पाणी योजना –** पाटण तालुक्यातील (जि. सातारा) पिंपळोशी गावात ओढ्यावरून तात्पुरत्या स्वरूपाचा वळण बंधारा करून उताराने पाणी आणण्यासाठी २०० मीटर पाईपलाईन लोकसहभागातून बसविण्यात आली. यात एकूण खर्चाच्या (रु. ५५ हजार) जवळपास ५० टक्के रकमेचा लोकसहभाग ग्रामस्थांनी नोंदविला यामुळे १५ शेतकऱ्यांना थेट फायदा होणार असून अंदाजे २५ एकर क्षेत्रावर भातानंतर गहू अथवा हरभरा ही पिके घेता येऊ शकणार आहेत. भोर तालुक्यातील कोर्ले गावात कालवा ते विहीर या पाईपलाईनसाठी ५०० मीटर लांबीचा एचडीपीई पाईप गावासाठी देण्यात आला. त्यासाठी गावाने ५० टक्के (२७,५०० रुपयांचे) योगदान दिले आहे.

७. **श्रमकार्य उपक्रम –** टेमघर-खरब (ता. मुळशी) येथील विहिरीवर युवक विभागाच्या १० जणांच्या गटाने सलग दोन वेळा श्रमकार्य करून विहिरीभोवती बांधकामाचे दगड गोळा करून ठेवले. या युवकांच्या बरोबरीने चार ग्रामस्थही श्रमदानात सहभागी झाले होते.

### ◈ ठळक घडामोडी ◈

१. **सौर दिवे वाटप –** पेठ तालुक्यातील तोंडवळ (जि. नाशिक) ग्राम पंचायतीतील पोंढयाचा माळ गावात ४५ तर कायरे ग्राम पंचायतीतील सावर्णा या आदिवासी गावात ३० सौर दिव्यांचे वाटप केले.

१. **फेरोसिमेंट सोसायटी पुरस्कार –** पुण्यातील फेरोसिमेंट सोसायटीतर्फे विभागातील बापू जोरकर यांना 'व्ही. डी. जोशी फेरोसिमेंट उत्कृष्ट कारागिर' पुरस्कार फेरोसिमेंट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष पद्माकर लेले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व दीड हजार रुपये असे होते.

२. **जलयोद्धा पुरस्कार –** विभागातील सदस्य विवेक गिरिधारी यांना नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील युवामित्र संस्थेतर्फे 'जलयोद्धा पुरस्कार' शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड व स्नेहालय संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. या राज्यस्तरीय पुरस्काराचे स्वरूप हे सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व रोख रु. ५० हजार असे होते.

३. **रोटरीतर्फे विभागाला पुरस्कार –** रोटरी क्लब ऑफ पुणे युनिव्हर्सिटी यांच्यातर्फे ज्ञान प्रबोधिनीच्या ग्राम विकसन विभागाला 'सेवा गुणवत्ता पुरस्कार' पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू पराग काळकर यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.

४. **ग्रामस्थांसाठी आकाशदर्शनाचा अभिनव कार्यक्रम –** पेठ तालुक्यात शालेय वयोगटातील आकाशदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करता यावे म्हणून आठ इंच व्यासाची खगोलशास्त्रीय दुर्बीण यंदा आवर्जून खरेदी करण्यात आली. अपेक्षित योजनेनुसार आत्तापर्यंत कहांडोळपाडा, पोंढयाचा माळ व शिदमाळ आणि हिरडी या गावांमध्ये मुले व ग्रामस्थ असे ३७५ जण उत्स्फूर्तपणे आकाशदर्शनात सहभागी झाले होते. आडगाव भुवन येथील आदिवासी आश्रमशाळेत १२० मुले व १२ शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते. ग्रामस्थांना फक्त कुतूहलच नव्हे तर खगोलशास्त्रातील प्राथमिक माहिती आहे असे यानिमित्ताने लक्षात आले. आदिवासी जनजाती-जमातीमध्ये तारे व नक्षत्रे याविषयी माहितीही आहे व त्यांच्या आदिवासी भाषेत त्याला वेगळी स्वतंत्र नावेही आहेत; हे अद्भुत व आश्चर्यकारक आहे !

◈-◈-◈

# २1. ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र

प्रारंभ – शके १९०३/इ. स. १९८१

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययामृतमश्नुते।।

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. औपचारिक शिक्षण विभाग
२. गुरुकुल विभाग
३. क्रीडाकुल विभाग
४. अनुभव शिक्षण विभाग
५. मुक्तीसोपान संगीत विभाग
६. जैव तंत्रज्ञान विभाग
७. युवक विभाग
८. युवती विभाग
९. पालक महासंघ

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

1. Grassroots क्रीडाकुल प्रकल्प – १,१५६ विद्यार्थी नोंद, ३१० विद्यार्थी स्पर्धात्मक खेळासाठी निवड.
२. घरकुल – १,६१०
३. इंग्रजी माध्यम – ५९०
४. गुरुकुल – २१५
५. क्रीडाकुल – १२९
६. संगणक बुद्धिबळ स्पर्धा – ३२ शाळा, १,१२० विद्यार्थी
७. समूहगान स्पर्धा – २५,०००

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



क्रीडा प्रात्यक्षिके



प्रतिज्ञाग्रहण सोहळा



क्रीडा प्रात्यक्षिके

## ◇ या वर्षातील ठळक घडामोडी ◇

१. **प्रतिज्ञाग्रहण सोहळा** – ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्रात सौर शके १९४६ मध्ये दोन वेळा सदस्यांचे प्रतिज्ञाग्रहण झाले. दि. २२ नोव्हेंबर रोजी मातृमंदिर वर्धापन दिनानिमित्त पहिल्यांदा तर दि. १६ फेब्रुवारी रोजी कै. वामनराव (भाऊ) नारायण अभ्यंकर यांच्या स्मृतिदिनी दुसऱ्यांदा प्रतिज्ञाग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यंदाच्या वर्षी मराठी माध्यमाच्या इयत्ता ९वीच्या १०९ विद्यार्थ्यांनी आणि इंग्रजी माध्यमाच्या १०वीच्या ५० विद्यार्थ्यांनी शालेय प्रतिज्ञा घेतली. युवक, युवती, पालक व अध्यापक मिळून ३१ प्रौढ सदस्यांनी प्रथम प्रतिज्ञा व ३ सदस्यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली. श्रीराम दादा व शुभमदादा यांनी व्यवहाराला अनुसरून, आणि प्रांजलीताईंनी वैराग्यपूर्वक तृतीय प्रतिज्ञा घेतली.

२. **कुटुंब मेळावा – धनत्रयोदशी** – केंद्रात यंदाचे वर्ष 'कुटुंब संस्कृती' वर्ष होते. शके १९४५ पासून निगडी केंद्रात धनत्रयोदशीला दिवाळी पहाट या कार्यक्रमाला जोडून कुटुंब मेळाव्याचे आयोजन केले जाते यावर्षी हा मेळावा नव्या स्वरूपात घेण्यात आला. यात प्रामुख्याने केंद्रातील सर्व विभागातील सदस्यांच्या कुटुंबियांचे असे सुमारे ४०० सदस्यांचे एकत्र नियोजन करण्यात आले होते. एका गटात सर्व विभागातील काही सदस्य येतील असे योजून १० गट तयार केले. सर्व सदस्य आणि त्यांचे कुटुंबीय यांनी परस्परांशी ओळख करून घेतली. फराळाचा आस्वाद घेता घेता छोटे-छोटे मजेशीर खेळ खेळले.








• संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा • ऑलिंपिक परीषद • Grassroots Kreedakul

३. **उषा लक्ष्मण केळकर सहविकास केंद्र –** ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाच्या मा. डॉ. विजयराव केळकर यांच्या प्रेरणेने आणि निधीतून झालेल्या 'उषा लक्ष्मण केळकर सहविकास केंद्र'चे उद्घाटन दि. १३ जून २०२४ रोजी झाले. शिक्षक प्रशिक्षण व पालक-पाल्य शिबिरांची सुरुवात झाली. आई-वडील दोघेही काम करणाऱ्या कुटुंबांसाठी उपयुक्त ठरतील असे खेळ, गोष्टी व संवाद यांचा समावेश असलेल्या शिबिरांचे आयोजन करण्यात आले. १७ शिक्षकांनी १६ सत्रांत प्रशिक्षण घेतले. पर्यावरण, संवाद, आणि जीवनकौशल्ये यांचा समावेश असलेल्या या शिबिरांमध्ये ४५ पालक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहविकास केंद्राचे काम 'कुटुंब संस्कृती वर्षा'शी सुसंगत ठरून एक सकारात्मक पाऊल ठरले.

## ◈ आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक संशोधन परिषद ◈

ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्रातील क्रीडाकुल प्रकल्पाने ऑलिंपिकच्या प्रेरणेतून खेळाडूंना उच्च स्तरावरील स्पर्धांसाठी तयार करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

राष्ट्रीय रक्षा विद्यापीठ, गांधीनगर येथे पहिल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक संशोधन परिषदेत क्रीडाकुलकडून दोन निबंध सादर झाले. 'ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प' या मॉडेलला श्रोत्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आणि एका निबंध सादरीकरणाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कारही मिळाला. परिषदेनंतर अनेक तज्ज्ञांनी संस्थेशी संपर्क साधला आणि राष्ट्रीय स्तरावर संयुक्त संशोधनासाठी उत्सुकता व्यक्त केली. २०३६ च्या ऑलिंपिकच्या पार्श्वभूमीवर ही परिषद महत्त्वपूर्ण ठरली.

**प्रवास ऑलिंपिकचा –** पॅरिस ऑलिंपिक २०२४ निमित्ताने ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील क्रीडाकुल विभागाने 'प्रवास ऑलिम्पिकचा' हे माहितीपूर्ण प्रदर्शन आयोजित केले. ऑलिंपिक इतिहास, क्रीडाविज्ञान, भारताची कामगिरी आणि खेळाडूंच्या प्रेरक कथा यांचा समावेश असलेले हे प्रदर्शन कै. हेमंत जोगदेव यांना समर्पित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन पिं. चिं. महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त मा. प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते झाले. कु. प्रथमेश फुगे याचा सत्कारही यावेळी झाला. कार्यक्रमात विविध मान्यवरांनी क्रीडाकुलच्या कार्याचे कौतुक करत अशा प्रदर्शनांद्वारे क्रीडा संस्कृतीची मुळे अधिक घट्ट करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमात अभ्यासपूर्ण माहिती मांडणाऱ्या गटाचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

## ◈ Grassroots Kreedakul ◈
## (ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प)

८ ते १४ वयोगटातील मुलांसाठी ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प राबविण्यात येतो. टाटा ट्रस्ट्सच्या सहकार्याने स्थानिक प्रशिक्षित शिक्षकांमार्फत दर आठवड्याला शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्य-जागरूकता व भावनिक सक्षमता यावर आधारित सत्रे घेतली जातात. या प्रकल्पाचा उद्देश खेळ, आरोग्य व जीवनकौशल्य यांचे एकत्रित संवर्धन करून मुलांचा सर्वांगीण विकास साधणे हा आहे

टीमवर्क, शिस्त, मानसिक बळकटी यांसारख्या मूल्यांवर विशेष भर दिला जातो. टाटा ट्रस्ट्च्या साहाय्यामुळे हा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर विस्तारण्याचे ध्येय ठेवतो, ज्यायोगे खेळ हा प्रत्येक मुलाचा विकासाचा हक्क मान्य करून समाजपरिवर्तनासाठी त्याचा प्रभावी वापर होईल.

**मुख्य ठळक बाबी :**

- ▷ ३,५०० + क्रीडा सत्रे पार पडली.
- ▷ १,१५६ मुले नोंदणीकृत (त्यापैकी ३२% मुली)
- ▷ १२ आरोग्य हस्तक्षेप व ७ जीवनकौशल्य प्रशिक्षण मोड्यूल्स पूर्ण
- ▷ ३१० मुले स्पर्धात्मक प्रशिक्षणासाठी निवडली

ऑलिम्पिक सप्ताह, मूल्याधारित उपक्रम व समुदाय प्रदर्शने आयोजित.

## ◈ औपचारिक शिक्षण विभाग ◈

१. **पूर्व प्राथमिक-कारक कौशल्य आधारित खेळांचे सादरीकरण –** ज्ञान प्रबोधिनीच्या पूर्व प्राथमिक विभागात २९ मार्च रोजी मुलांच्या स्थूल स्नायूंच्या विकासासाठी कारक कौशल्य आधारित २५ खेळांचे उत्साही सादरीकरण झाले. Hopping, jumping, throwing, balancing यांसारख्या १३ कौशल्यांचा समावेश होता. प्रमुख पाहुणे म्हणून मा. नरहरी वाघ, मा. स्नेहलताई भिडे आणि मा. नीलमताई बाबर-देसाई हे उपस्थित होते. मा. स्नेहलताईंनी पालकांशी संवाद साधताना मुलांच्या ऊर्जेला सकारात्मक दिशा देण्यासाठी रामरक्षा, शुभंकरोतीसारख्या संस्कारक्षम स्तोत्रांचे महत्त्व अधोरेखित केले. खेळातून शारीरिकच नव्हे तर मानसिक आणि भाषिक विकासही घडतो, हे या सादरीकरणातून अधोरेखित झाले.





• गुरुकुल - स्नेहसंमेलन • आर्यसमाज प्रणित चतुर्वेद मंत्रशतक पारायण यज्ञ • क्रीडाकुल

२. **प्राथमिक गट १–स्नेहसंमेलन –** इयत्ता पहिली–दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी ६ व ७ फेब्रुवारी रोजी साजऱ्या झालेल्या स्नेहसंमेलनाचा विषय ''निसर्ग'' होता. प्राणी, पक्षी, झाडे, आकाश, सूर्य इत्यादी विषयांवर नाट्यछटा, नृत्य, पोवाडा, गायन यांद्वारे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. पाहुण्या मा. चैताली लोंढे व वनस्पती शास्त्रज्ञ मा. विनयाताई घाटे यांनी विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या सहभागाचे कौतुक करत निसर्गसंवर्धनावर भर दिला. नव्याने वैयक्तिक सादरीकरण, अभिनयगीते, अभिवाचन व पालकांचे गायन यामुळे स्नेहसंमेलन अधिक बहारदार झाले.

३. **प्राथमिक गट २ : गीताजयंती कार्यक्रम –** दि. ६ डिसेंबर रोजी गीताजयंतीनिमित्त अध्याय पाठांतर व कथाकथन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तिसरी व चौथीच्या ९६ विद्यार्थ्यांनी पाठांतरात, तर ८७ विद्यार्थ्यांनी कथाकथनात सहभाग घेतला. पालकांसाठीही अध्याय पाठांतर व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. अध्यापकांनी वर्गशः गीताजयंतीचे महत्त्व सांगून पंधराव्या अध्यायाचे पठण केले. विविध परीक्षकांनी स्पर्धांचे परीक्षण केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि संस्कृत श्लोकांवरील आत्मीयता हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कृतीप्रेम आणि आत्मशिस्त वृद्धिंगत झाली.

४. **पूर्व माध्यमिक – निवासी शिबिर –** इयत्ता ५वी ते ७वीसाठी निवासी शिबिरे आयोजित करून विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवन, सामाजिक घटक, स्वावलंबन आणि ऐतिहासिक स्थळांचा अनुभव देण्यात आला. इ. ५वीसाठी साळुंब्रे–इंदोरी, इ. ६वी ७वीसाठी वेल्हे येथे शिबिरे झाली. ग्रामविकसन केंद्र, स्वराज्य स्तंभ, बनेश्वर मंदिर, आठवडा बाजार, शेती, खेकडा पालन, बांबू उद्योग, ग्रामपंचायत, पोलीस स्टेशन यांसारख्या ठिकाणी भेटी दिल्या. सकाळी निसर्ग निरीक्षण, गटकार्य, स्थानिक व्यक्तींशी संवाद यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक भान, जिज्ञासा व आत्मनिर्भरतेचा विकास झाला.

५. **माध्यमिक विभाग – क्रीडा प्रात्यक्षिके** – ११ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद जयंतीच्या पूर्वसंध्येला ज्ञान प्रबोधिनी, निगडी येथे भव्य क्रीडा प्रात्यक्षिके सादर झाली. ५वी ते १०वीतील १०००हून अधिक विद्यार्थ्यांनी १९ विविध क्रीडाप्रकार सादर केले. मल्लखांब, बोथाटी, रिंगण नृत्य आदींच्या सादरीकरणांनी प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. ७०००हून अधिक प्रेक्षक उपस्थित होते. संचालक वाच. गिरीशराव बापट व शिक्षणाधिकारी मा. भाऊसाहेब कारेकर यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, समन्वय, आत्मविश्वास आणि सामूहिकता यांचे मूल्य अधोरेखित झाले. हा कार्यक्रम एक प्रेरणादायी अनुभव ठरला.

## ◈ गुरुकुल विभाग ◈

**मातृभूमी परिचय शिबिर –**दरवर्षीप्रमाणे गुरुकुल विभागाचे मातृभूमी परिचय शिबिर हे दि. ५ ते १३ नोव्हेंबर दरम्यान इयत्तानिहाय घेण्यात आले. यात इयत्ता पाचवीचे जुन्नर येथे, इयत्ता सहावीचे सज्जनगडाच्या पायथ्याशी असलेल्या परळी गावी , इयत्ता सातवीचे कोकणातील भू या गावी तर इयत्ता नववीचे शिबीर आंध्र प्रदेश येथील कुप्पम येथे गेले होते. इयत्ता आठवीचे विद्यार्थी इयत्ता पाचवी ते सातवी सोबत कार्यकर्ते म्हणून नेतृत्वाची संधी घेत होते.

या शिबिराची सांगता शिबिर निवेदनाच्या कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमात प्रमुख अभ्यागत म्हणून शिरूर गुरुकुलाच्या संचालिका मा. अमृताजी घावटे आणि सेंच्युरीयन युनिव्हर्सिटीचे मा. विवेकजी सिनारे उपस्थित होते.

## ◈ क्रीडाकुल विभाग ◈

**हिवाळी शिबिर** – ३० डिसेंबर २०२४ ते १२ जानेवारी २०२५ दरम्यान क्रीडाकुल व टाटा प्रकल्पांतर्गत चिपळूण, बारामती, हराळी व साळुंब्रे येथे निवासी हिवाळी शिबिरे झाली. धाडस, स्वावलंबन व संघटन कौशल्य वाढवणारे कलरीपयट्टू, लाठीकाठी, मल्लखांब, नेमबाजी, तिरंदाजी, योगासने यांचा समावेश होता. क्रीडाकुलच्या ७वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांनी नेतृत्व करत शिबिरार्थींना चार खेळ शिकवले. एकत्रित कृतीतून मैत्री व आत्मविश्वास वाढला. चिपळूण (१५०), बारामती (१३०), हराळी (११०) व साळुंब्रे (१४३) शिबिरार्थींनी सहभाग घेतला. हे शिबिर खेळातून नेतृत्वाची शिकवण देणारे ठरले.

## ◈ अनुभव शिक्षण विभाग ◈

**संगणक – पूर्व संगणकीय साक्षरतेचा नवा अध्याय –** जिल्हास्तरीय संगणक बुद्धिमत्ता स्पर्धा तीन टप्प्यांत यशस्वीरीत्या पार पडली. ३२ शाळांतील ११२० विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला गेला. इयत्ता ३री ते ७वीसाठी ऑनलाईन, ८वी ते १०वीसाठी ऑफलाईन परीक्षा, तर








• जैव तंत्रज्ञान - प्रबोध बांबू सेतू • युवती विभाग - धूप निर्मिती कार्यशाळा • पालक महासंघ - Walkathon

अध्यापकांसाठी ऑनलाईन परीक्षा व ऑफलाईन कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेतील Google व ChatGPT सत्रांनी विशेष आकर्षण निर्माण केले. यंदा बक्षीस समारंभ विजेत्या शाळांमध्ये जाऊन घेण्यात आला. या उपक्रमामुळे संगणकीय साक्षरतेचा प्रसार व अध्यापकांशी सखोल संवाद साधता आला.

## ◈ मुक्तिसोपान संगीत विभाग ◈

**निसर्गगाणी –** सृजनशीलतेचा उत्सव– मुक्तिसोपान संगीत विभाग आयोजित 'निसर्गगाणी' ही खुली स्पर्धा १ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडली. वय वर्षे ५ ते ८० या वयोगटातील ५००+ स्पर्धकांनी सहभाग घेतला. गायन व नृत्य अशा विविध गटांमधून सादरीकरण झाले. कुटुंब गीत व नृत्य या विशेष गटांतूनही आनंददायी सहभाग मिळाला. परीक्षक, वादक व उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांचे कौतुक केले. निसर्ग रक्षणाची प्रतिज्ञा ही स्पर्धेची खास वैशिष्ट्ये ठरली. १२ सप्टेंबरला पारितोषिक समारंभात विजेत्यांची सादरीकरणेही झाली.

## ◈ जैव तंत्रज्ञान ◈

**प्रबोध बांबू सेतू : हरित सोन्याचा संकल्प –** ''शेतकऱ्याचा बांबू म्हणजे हरित सोने'' हे सिद्ध करण्यासाठी जैवतंत्रज्ञान विभागातर्फे मा. संगीताताई यांच्या पुढाकाराने २०२२ पासून प्रबोध बांबू सेतू प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट बांबू संशोधन व जागरूकता असून, टिश्युकल्चर व मॅक्रोप्रोलीफरेशन पद्धतीने ब्लॅक, हुडा व कटांग या प्रजातींच्या रोपांची निर्मिती, लागवड, उत्पादन विकास, प्रशिक्षण व बाजारपेठ संपर्क हे टप्पे यामध्ये समाविष्ट आहेत.

**ATL** (अटल धडपडालय) SIIC कार्यक्रम : शाळा–महाविद्यालय (साहचर्य) – राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट दिली. AICTE व अटल इनोव्हेशन मिशन यांच्या SIIIC कार्यक्रमांतर्गत ही भेट झाली. या वेळी विद्यार्थ्यांनी Robotics, PLC Programming Lab आणि Generative AI यांची माहिती घेतली. विविध Start-Ups व प्रकल्पांचे सादरीकरण पाहून विद्यार्थ्यांना नवतंत्रज्ञानाची ओळख झाली. या अनुभवातून त्यांना अभियांत्रिकी व उद्योजकतेविषयी प्रेरणा मिळाली.

## ◈ युवती विभाग ◈

**निर्माल्यापासून धूप निर्मिती कार्यशाळा –** एक पर्यावरणपूरक उपक्रम गणेशोत्सव २०२४ निमित्त ज्ञानप्रबोधिनी केंद्रात युवती विभाग व पालक महासंघाच्या पुढाकाराने ''निर्माल्यापासून धूप निर्मिती'' ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. जान्हवी क्षीरसागर या युवतीच्या मार्गदर्शनाखाली १२५ सहभागींसमवेत कार्यशाळा यशस्वी झाली. घरच्या घरी सुरक्षित धूप तयार करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास प्रात्यक्षिकातून सादर करण्यात आला. कुटुंब सहभागातून 'कुटुंब संस्कृती'चा अनुभव घेतला गेला.

## ◈ युवक विभाग ◈

नवी रचना, नवी ऊर्जा : २०२४–२५ या वर्षी युवक विभागात मार्गदर्शक दलाची पुनर्रचना करण्यात आली. नव्याने स्थापन झालेल्या प्रबोध सेतू दलाने दुर्गभ्रमण, साप्ताहिक दले, गीतरामायण कार्यक्रम, क्रीडा प्रात्यक्षिके, प्रतिज्ञा अशा विविध उपक्रमांतून ठसा उमटवला. शालेय दलाने क्रीडा प्रशिक्षण व बरची प्रात्यक्षिके राबवली. महाविद्यालयीन दलाने मिरवणुका, प्रात्यक्षिके आणि पुण्यातील क्रीडा सामन्यांत यशस्वी सहभाग नोंदवला. या सर्व प्रक्रियांतून नवे नेतृत्व घडताना दिसले.

## ◈ पालक महासंघ ◈

**आनंददायी Walkathon –** ११ जानेवारी रोजी आयोजित Walkathon या क्रीडा महोत्सवात सुमारे २५०० पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला. कुटुंबासमवेत चालण्याचा आनंद, सामूहिकतेचा अनुभव आणि स्वयंसेवकांचे नेटके नियोजन यामुळे कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. आजीपासून नातवांपर्यंत सर्वांनी सामील होऊन एकसंघतेचे दर्शन घडवले. प्रबोधिनीचे कुटुंब यामार्गे अधिक बळकट झाले.

**स्नातक संघ –** हराळीतील वैद्यकीय शिबिर : दि. १५–१६ फेब्रुवारी रोजी निगडी केंद्रातील वैद्यकीय गटाने हराळी केंद्रात आरोग्य जागृती शिबिर घेतले. ७५ विद्यार्थ्यांची तपासणी, किशोरी वर्गासाठी मासिक पाळीविषयक मार्गदर्शन, तोंड व दातांची स्वच्छता, स्थानिक आशा सेविकांशी चर्चा, पॅलिएटिव्ह केअर रुग्णांची तपासणी, तसेच विद्यार्थ्यांसोबत आरोग्यसंवाद घेण्यात आले. स्वच्छतेच्या सवयी रुजल्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. या उपक्रमामुळे हराळी केंद्राशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ झाले.

◈-◈-◈

सविस्तर वार्षिक वृत्त ▶

# २२. ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र

प्रारंभ – शके १९११/इ. स. १९८९

## नित्य स्वरूप

१. **औपचारिक शिक्षण** – पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा, शिशु अध्यापिका विद्यालय, पूरक शिक्षण

२. **संघटन** – नेतृत्व संवर्धन, युवक-युवती, संवादिनी विभाग

३. **स्त्री-शक्ती प्रबोधन**

४. **राष्ट्रीय एकात्मता**

५. **सामाजिक उद्योजकता**

६. **पौरोहित्य व सत्संग**

## संख्यात्मक आढावा

- **तीनही शाळा** – १,०५० विद्यार्थी
- **युवक युवती विभाग** – १००
- **किशोर किशोरी विकास** – १५०
- **मणिपूर विद्यार्थी सहनिवास** १९, **युवक संपर्क** – ६०
- **स्त्री-शक्ती प्रबोधन** – ६००
- **पिशवी निर्मिती प्रकल्प** – ७०
- **अंकुर प्रकल्प** – ७५
- **छोटे सायंटिस्ट** – १,००० विद्यार्थी
- **पुरोहित** – ५०

१. **माध्यमिक विभाग**– समाजदर्शन उपक्रमाद्वारे माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सोलापूर रेल्वे व्यवस्थेचा परिचय. इ. ५वी ते १०वीमधील ४८० विद्यार्थी, अध्यापक व इतर सदस्य ५०. रेल्वे व्यवस्थेचे सर्व आयाम विद्यार्थ्यांना कळले. त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले.

माध्यमिक विभागात विद्यार्थ्यांनी संकल्प आणि व्रते घेऊन स्वतःचा विकास घडवावा यासाठी मार्गदर्शन केले. यासाठी विविध उपक्रमांची रचना केली.

२. **पूर्वप्राथमिक** – या विभागात 'बालसेवा हीच ईशसेवा' या ध्येयाने कार्य करणारा अध्यापक गट कार्यरत आहे. बालकांच्या सर्वांगीण विकासात पालकांचा सहभाग वाढावा यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले.



ज्ञान प्रबोधिनी सोलापूर न्यासाचे अध्यक्ष पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना

## ◈ औपचारिक शिक्षण विभाग ◈

३. **प्राथमिक शाळा** – शिक्षणाबरोबरच बालकांच्या बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकासासाठी अनेकविध उपक्रमांची रचना केली गेली.

४. **शिशु अध्यापिका विद्यालय** – बालशिक्षणाचे सिद्धांत व बालमानसशास्त्र समजून घेत छोट्या बालकांचे शिक्षण हे कृतियुक्त व आनंददायी करण्याचे प्रशिक्षण देणारे शिशु अध्यापिका विद्यालय आहे. ६ महिन्यांच्या अभ्यासक्रमात ३५ विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

## ◈ युवक-युवती विभाग ◈

किशोरवयीन मुला-मुलींमध्ये वृत्तीघडण व प्रेरणा जागरण व्हावे आणि युवकांमध्ये कृतिशील राष्ट्रप्रेमाची प्रेरणा जागृत व्हावी या उद्देशाने युवक-युवती विभागातर्फे नियमित व नैमित्तिक उपक्रम होतात.

१. **दल** – प्रशालेतील इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी संध्याकाळी क्रीडादल चालते.

२. **शिबिरे व सहली** – इ. ७वीसाठी एप्रिल महिन्यात ३ दिवसांचे सहजीवन शिबिर संपन्न झाले. मुले-मुली मिळून ७१ जण सहभागी झाले. विविध साहसप्रकार, व्यवहार कौशल्ये, कथाकथन, नाट्यछटा, मैदानी स्पर्धा यांसह सहजीवनात राहण्याचा आनंद व प्रशिक्षण मुलांनी घेतले.

इ. ८वीच्या ७१ विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी राजगड सहलीचे आयोजन केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व त्यांच्या गडकोटांवर जाऊन समजून घेण्याचा प्रयत्न सर्वांनी केला. शारीरिक क्षमता ताणण्याचा अनुभव देणारी इ. ९वीतील ३९ विद्यार्थ्यांची वर्षाऋतूतील ९० कि. मी. अंतराची सायकल सहल माचणूर येथे तर २३ विद्यार्थिनींची २५ कि.मी. सायकल सहल विज्ञान केंद्र येथे झाली.

३. **तंबू शिबिर** –साहसाचे व स्वावलंबनाचे धडे गिरवण्यासाठी इ. ९वी विद्यार्थ्यांचे तंबू शिबिर डिसेंबर महिन्यात घेण्यात आले. यामध्ये ७३ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होते. सकाळी व्यायाम, उपासना, निर्भयता बाणवणारे साहस प्रशिक्षण, प्रेरणा देणारे पथकाधिपतींचे चरित्रकथन, यातून विद्यार्थ्यांनी अनुभवांची शिदोरी जमा केली.

४. **गणेशोत्सव** – युवक विभागाच्या नेतृत्वाखाली इ. ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे ६ मंडळात तर विद्यार्थिनींचे ४ मंडळात बरचीनृत्य, वाद्यवृंद, ध्वजगट अशी जोशपूर्ण प्रात्यक्षिके झाली.








• डॉ. स्वर्णलता भिशीकर श्रद्धांजली सभा • प्राणायाम वर्गातील ३३६ महिलांची सहल • मणिपूर विजेता फुटबॉल संघ

५. **प्रतिज्ञाग्रहण** – युवकांनी प्रतिज्ञापूर्वक देशसेवेत रत व्हावे यासाठी युवक-युवती विभागाने प्रतिज्ञाग्रहण पूर्वतयारी मे ते ऑगस्टमध्ये ४ कार्यशाळा घेऊन केली. दि. २१ सप्टेंबर रोजी ४९ युवक, १७ युवती आणि संवादिनी गटातील ३ महिला अशा ६९ जणांनी प्रथम तर ३ जणांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

६. **तंत्रस्नेही प्रकल्प** – कौशल्यातून सक्षमतेकडे- आयटीआयच्या ६० विद्यार्थ्यांना संगणकातील विविध विषय शिकवण्यात आले. आय.टी.आय पूर्ण केलेल्या ३ युवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी साहित्य देऊन मदत केली. या युवकांनी व्यवसाय सुरू झाल्यावर या साहित्याच्या रकमेची परतफेड केली.

## ◈ शिक्षण विस्तार कार्यदिशा ◈

१. **प्रज्ञा विकास व किशोरी विकास उपक्रम** – विडी कामगार कुटुंबातील व उपेक्षित गटातील किशोर-किशोरींसाठी स्वविकासाची संधी व प्रेरणा मिळावी यासाठी हा उपक्रम चालतो. वर्षभर प्रत्येक रविवारी २ तास चालणाऱ्या या उपक्रमात ८० मुले व ५० मुली सहभागी झाल्या.

लेखन, वाचन, गाणी, गोष्टी यासोबतच प्रार्थना, कृतींवर भर देणारी अशी ही तासिका असते. या विकासिकेमध्ये उपासना, गीता पठण, योगासने, प्रज्ञा विकास पैलूंवर सत्रे, छोटे खेळ, राष्ट्रभक्तांच्या कथा अशी योजना असते.

२. **प्राथमिक शाळेतील मुलांसाठीची तासिका** – सोलापुरातील भटक्या विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांच्या प्राथमिक शिक्षणाचे दृढीकरण व्हावे, त्यांना चांगल्या सवयी लागाव्यात व चांगले संस्कार व्हावेत यासाठी घेतल्या जाणाऱ्या या तासिकांमध्ये ६० विद्यार्थी सहभागी झाले.

## ◈ राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा ◈

१. **सहनिवास** – चैतन्यभुवन येथे चालविल्या जाणाऱ्या सहनिवासात वृत्तकाळात १९ विद्यार्थी होते. त्यांनी अभ्यासाच्या प्रगतीबरोबरच कला, क्रीडा कौशल्य प्राप्तीमध्ये देखील उत्तम कामगिरी केली आहे.

२. मणिपूरशी भावबंध जुळण्यासाठी तेथे दूरस्थ पद्धतीने संगणक व गणित-इंग्रजी विषयांचे अभ्यासवर्ग दर रविवारी सुरू करण्यात आले आहेत.

## ◈ स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा ◈

१. **प्राणायाम वर्ग** – प्राणायाम वर्गाच्या निमित्ताने विडी कामागार महिलांनी एकत्र यावे, त्यांचे संघटन व्हावे, आत्मविश्वास वाढावा आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळावी यासाठी मुख्यतः चालविल्या जाणाऱ्या या वर्गांमध्ये ८ प्रभागांमधून ४७ गटांमधून ५०० महिला सहभागी झाल्या. आषाढी एकादशीचे अभंग गायन, वर्षारंभ उपासना, दिवाळी-फराळ वाटप, आरोग्य शिबिर, सहल, योग प्रशिक्षण, सूर्यनमस्कार घालणे या सर्व उपक्रमांमध्ये महिला उत्साहाने सहभागी झाल्या.

२. **महिला व रसमयी महिला बचतगट (खाद्यपदार्थ विक्री उत्पादन)** – महिलांचा आत्मसन्मान वाढावा, आर्थिक स्वयंपूर्णता व साक्षरता या विषयांवर काम करणाऱ्या १३ बचतगटांमध्ये २१६ महिला सहभागी झाल्या, तर स्वयंरोजगाराच्या दिशेने महिलांचा प्रवास व्हावा यासाठी सुरू करण्यात आलेल्या रसमयी महिला बचत गटात ५ महिला सहभागी झाल्या आहेत.

३. **हिरकणी**– ३ ते ६ वयोगटातील बालकांच्या सर्वांगीण विकासात मातापालिकांचा सहभाग वाढविणाऱ्या हिरकणी प्रकल्पात ८ मार्गदर्शिका व ५३ माता-पालिका सहभागी झाल्या.

४. **संवादिनी** – महिलांचे संघटन व्हावे व त्याद्वारे प्रबोधन, मदत, सेवा अशी कामे सुरू व्हावीत या उद्देशाने संवादिनी कार्यरत आहे. त्यामध्ये २० सदस्या सहभागी झाल्या.

५. **सामाजिक उद्योजकता** – विडी कामगार महिलांना तंबाखूपासून होणारा त्रास या प्रश्नावर उत्तर म्हणून आरोग्यदायी व आत्मसन्मानजनक व्यवसाय उपलब्ध करून देत सामाजिक उद्योजकतेचा नमुना उभा करावा, या हेतूने पिशवीनिर्मिती प्रकल्प सुरू केला आहे. गेल्या वर्षात या महिलांनी १ रुपयांची उलाढाल केली.

## ◈ सत्संगसुधा व पौरोहित्य ◈

सत्संग गटामध्ये आध्यात्मिक विषयांवर दर रविवारी एक तास सत्संग व विशेष उपक्रम असतात. यामध्ये ५० जण सहभागी झाले. पौरोहित्य गटातर्फे ७७ विधींचे पौरोहित्य वृत्तकाळात झाले.

◈-◈-◈

**सोलापूर व हराळी केंद्रांचे एकत्रित सविस्तर वार्षिक वृत्त** ▶

# २३. ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र

**प्रारंभ – शके १९१७/इ. स. १९९५**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. **औपचारिक शिक्षण –** पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शाळा, कृषी तंत्र विद्यालय
२. **पूरक शिक्षण –** आनंदशाळा
३. **संघटन –** युवक विभाग
४. **प्रदेश विकसन**
५. **स्त्री–शक्ती प्रबोधन**
६. **स्वयंरोजगार**

या दिशांनी नित्य काम चालते.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

❖ **तीनही शाळा –** १,०९७ विद्यार्थी
❖ **शिक्षक व मार्गदर्शक –** ८२
❖ **कृषी तंत्र विद्यालय –** ६१
❖ **युवशक्ती स्वयंरोजगार –** १६ युवक, ४०० शेतकरी
❖ **प्रदेश विकसन –** १८४
❖ **स्त्री–शक्ती प्रबोधन –** ७७ युवती, ६०० किशोरी, ५२२ महिला
❖ **संघटन –** ५० युवक
❖ **गुरुकुल –** ११८ मुले, १४ मुली

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇


आचार्यव्रत कार्यक्रम


कृषी विद्यालय

### ◇ पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ◇

ग्रामीण भागातील प्राथमिक व पूर्वप्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारावा, हे शिक्षण विद्यार्थ्यांनी आनंदाने ग्रहण करावे यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम दरवर्षी अतिशय जाणीवपूर्वक योजले गेले. भारतीय संस्कृतीचं महत्त्व मुलांच्या मनावर लहानपणापासून ठसविण्यासाठी वर्षभर शालेत आषाढीची दिंडी, दीपपूजन, दहीहंडी, गोपाळकाला, रक्षाबंधन व पाटीपूजन हे सण उत्साहात साजरे झाले. दिवाळी गंमत शिबिर, नळदुर्ग किल्ल्यावरील सहल, वनभोजन, अभिव्यक्ती सादरीकरण यामध्ये मुलं मनापासून सहभागी झाली.



सेंद्रिय निविष्ठा उद्योग

ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये शालेय क्रमिक शिक्षणबरोबरच विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व समृद्ध व्हावे, त्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करावीत यासाठी अनेक उपक्रम योजले जातात.

इ. ९वी–१०वीसाठी स्वयंअध्ययन कार्यशाळा, इ. ६वी ते ९वीसाठी शेती, संगणक, तंत्रशिक्षण या विषयांच्या कार्यानुभव तासिका, काही मुलांसाठी विशेष वाचन तासिका आयोजित केल्या होत्या. या व्यतिरिक्त दर शनिवारी विनादप्तर शाळा झाली. पथकशः विविध स्पर्धांचे आयोजन केले. करिअर मार्गदर्शन, वर्गशः सहली, विद्यारंभ व विद्याव्रत संस्कार, शिक्षक प्रशिक्षण व सहल असे अनेक उपक्रम वृत्तकाळात शाळेत झाले.

### ◇ पूरक शिक्षण ◇

भटक्या विमुक्त समाजातील मुलांसाठी परिसरातील १० गावांमध्ये विकासिका, १३ लमाणताड्यांमध्ये, २ वडारवस्त्यांमध्ये आणि एका मसणजोगी वस्तीत आनंदशाळा या नावांनी इ. १ली ते ७वीच्या शालेय



• पूरक शिक्षण-प्रशिक्षक प्रशिक्षण



• स्वास्थ्य प्रकल्प - रक्त तपासणी



• आरोग्य प्रकल्प

शिक्षणात बळकटी आणण्यासाठी चालू झालेल्या पूरक शिक्षणाच्या या उपक्रमांमध्ये १,७५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

### ◈ कृषी विद्यालय ◈

शेती अभ्यासक्रमाला अनुभव शिक्षणाची जोड देऊन विविध कौशल्ये विद्यार्थ्यांना शिकवण्यात आली. यामध्ये रेशीम उद्योग, शेतमाल विक्री, गुलाबाच्या रोपांची विक्री, पशुसंवर्धन व शेतकऱ्यांमध्ये या विषयासंदर्भात जागृती या विषयांचा समावेश होतो. या २ वर्षांच्या अभ्यासक्रमात ६१ विद्यार्थी सहभागी झाले. ६ शिक्षकांनी त्यांना मार्गदर्शन केले.

### ◈ शेती आणि शेती विस्तार उपक्रम ◈

**सेंद्रिय निविष्ठा उद्योग –** ग्रामीण युवकांसाठी स्वयंरोजगार, स्वावलंबन आणि व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी विविध उपक्रमांची रचना केली होती. १० गावांमधील १५० शेतकऱ्यांना निविष्ठा विक्री झाली. यातून २ लक्ष रुपयांची उलाढाल झाली. ५ गावामंध्ये सेंद्रिय शेती आणि सेंद्रिय निविष्ठांचा वापर या विषयावर शेतकरी माहिती चर्चासत्रे झाली. ४ युवकांचे उद्योजकता प्रशिक्षण झाले. याशिवाय 'प्रबोधक औजारे बँक', तंत्रस्नेही संगणक प्रशिक्षण वर्ग, राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे उपक्रमही राबविले गेले.

### ◈ प्रदेश विकसन ◈

हराळी गावाच्या विकासाबरोबरच परिसरातील इतर गावांच्या विकासाठी प्रदेशविकसन हा विभाग काम करतो. आरोग्य, प्रकल्प, क्रीडा प्रकल्प, पाणी व्यवस्था प्रकल्प यासोबतच भौतिक विकासापलिकडचा ग्रामविकास हे सूत्र मनात धरून विविध सांस्कृतिक उपक्रम, पेयजल गुणवत्ता अभ्यास प्रकल्प, पाण्याची कामे, दुर्धर रुग्णांसाठी आरोग्य प्रकल्प, क्रीडा प्रकल्प यांचे आयोजन केले गेले. यात हराळीच्या पंचक्रोशीतील ५ गावे, लोहारा तालुक्यातील ११ गावे, धाराशिव तालुक्यातील १३ गावे आणि १६ लमाण तांडे अशा एकूण ४५ गावांचा समावेश होतो.

### ◈ स्त्री-शक्ती प्रबोधन ◈

ज्ञान प्रबोधिनीच्या भवितव्य लेखात लिहिल्याप्रमाणे हराळी केंद्रावरील स्वतंत्र स्त्री-शक्ती प्रबोधन विभाग या वर्षी नव्याने सुरू झाला. या विभागात महिला आरोग्य, किशोर-किशोरी गटासाठी युवासाथी असे नवे उपक्रम यंदा सुरू झाले. ६७७ किशोरी, ५२२ महिला यामध्ये सहभागी झाल्या.

### ◈ युवक-युवती विभाग ◈

**युवकांचे संघटन –** प्रेरणा जागरण व वृत्तीघडण होण्यासाठी युवक विभागातर्फे प्रशालेतील मुलांची दले व युवकांसाठी वीरव्रताचे शिबिर, गुजराथ अभ्यास दौरा, गणेशोत्सव इ. उपक्रमांचे आयोजन केले.




युवक विभाग : गुजराथ अभ्यासदौरा



तंत्रस्नेही प्रकल्प

◈-◈-◈

सोलापूर व हराळी केंद्रांचे एकत्रित सविस्तर वार्षिक वृत्त ▶

# २४. ज्ञान प्रबोधिनी, उपकेंद्र साळुंब्रे, ता. मावळ, जि. पुणे

प्रारंभ – शके १९१३/इ. स. १९९१

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य काम

१. महाराष्ट्र बोर्डाची अनुदानित माध्यमिक शाळा
२. शास्त्र व वाणिज्य आरंभ महाविद्यालय, तंत्रशिक्षण विभाग, टाटा क्रीडा प्रकल्प.
३. परिसरातील शाळा व गावकरी यांच्यासाठी विविध कार्यक्रम.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

**सहभागी विद्यार्थी**

- **माध्यमिक शाळा –** ३५०
- **आरंभ महाविद्यालय –** १२०
- **तंत्रशिक्षण –** २५
- **टाटा क्रीडा प्रकल्प –** २२६
- **हिरकणी प्रकल्प –** २८ महिला

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



क्रीडाकुल प्रकल्पातील मुलांचे सादरीकरण



शैक्षणिक गुणवत्ता वाढ विद्यार्थ्यांबरोबर मान्यवरांची भेट



विस्तारित ग्रंथालय



विद्यार्थी प्रयोग करताना

### ◇ ग्राम प्रबोधिनी विद्यालय ◇

- **विविध उत्सव –** दिंडी सोहळ्यात २५ विद्यार्थी व २ शिक्षक सहभागी होते. आषाढी एकादशीला ७५ विद्यार्थी, सर्व शिक्षक यांनी देहू येथे गाथा मंदिर व मूळ मंदिरामध्ये अभंग, गवळणी म्हणत वारकरी नृत्याचा आनंद घेतला.

  विद्यार्थ्यांनी २० हजार रुपयांची राखी विक्री केली. गावातील सर्व पेशाच्या नागरिकांना विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या.

  गणेशोत्सवात पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविणे, दत्तक वृक्ष संवर्धन योजना, सुंदर फलक लेखन स्पर्धा, बरची नृत्य, तंबाखू मुक्तीची शपथ, मतदान जनजागृती रॅली, साक्षरता जनजागृती रॅली असे वैविध्यपूर्ण उपक्रम झाले.

  पवनामाई उत्सवात पवना नदीकाठी असलेल्या गावातील नागरिक व प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पवना नदी स्वच्छतेबाबत जनजागृती केली. त्यानिमित्ताने घेतलेल्या निबंध स्पर्धेत मावळ तालुक्यातील ३८ शाळांमधील ४,०८८ विद्यार्थी सहभागी झाले होते.

- **हिवाळी शिबिर –** इयत्ता पाचवी ते नववी वर्गांची वेगवेगळी शिबिरे घेण्यात आली. व्याख्याने, खेळ, पाठांतर, अभ्यास व अभ्यासेतर कौशल्य, वाचन, सुंदर हस्ताक्षर, शेकोटी, गायन, पद्य, शेतीविषयक अभ्यासक्रम, क्षेत्रभेटी इत्यादी सत्रे झाली.

**नवीन सुविधा –** यावर्षी शाळेत नवीन कलादालन व विस्तारित ग्रंथालय यांची उभारणी देणग्यांमधून करण्यात आली. विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थ या सुविधांचा चांगला उपयोग करत आहेत.



• पवनामाई उत्सव, साळुंब्रे



• पशुपालन मेळावा

**विद्यालयाचे यश –** मातृमंदिर विश्वस्त संस्था, निगडी यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या पोवाडा गायन स्पर्धेमध्ये पश्चिम विभागात प्रथम क्रमांक व श्रमदान स्पर्धेमध्ये राज्यस्तरीय तृतीय क्रमांक, 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा दोनच्या मूल्यमापनामध्ये तृतीय क्रमांक, डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक तालुकास्तरीय स्पर्धेमध्ये इ. ६वी ते ९वीचे ४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण, छोटे सायंटिस्ट समस्या परिहार स्पर्धा विद्यालयात पार पडल्या. या स्पर्धेत इ. ८वी व ९वी या दोन्ही गटांमध्ये दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले.

**पशुपालन मेळावा –** ग्रामप्रबोधिनी विद्यालय, ग्रामपंचायत साळुंब्रे व पशुसंवर्धन मावळ यांच्या संयुक्त विद्यमाने पशुपालन मेळावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना दत्तक दिलेली जनावरे, आसपासच्या गावातील १६९ जनावरांची तपासणी करून जनावरांना लाळ, खुरकूत व लंपी आजाराची लस दिली .

महाविद्यालयातील मुलांचे वीरव्रत तयारी म्हणून विद्यारंभ, विद्याव्रत याची माहिती घेतली तसेच विद्याव्रत दीक्षाग्रहण कार्यक्रमासाठी बसवले तसेच विद्यालयातील गणपती उत्सवासाठी सर्व तयारी करण्यासाठी गट तयार करून सजावट करणे, गणपती आणणे, रोजचे नियोजन विद्यार्थी गटाने केले.

संत तुकाराम सहकारी साखर कारखाना येथे विद्यार्थी क्षेत्रभेटीचे नियोजन केले. त्यात तेथे लागणारा कच्चा माल, कामगार कुठून येतात, तसेच कारखाना किती कालावधी साठी सुरु असतो, माल साठवून कुठे ठेवतात, त्याच्या सुरक्षित राहण्यासाठी काय नियोजन असते, तयार झालेला माल कुठे विकला जातो, तसेच त्याचा हिशोब कसा ठेवला जातो. नफा किती होतो आणि त्यासोबत अजून जोडव्यवसाय कोणते आहेत ही माहिती मिळवली.

## ◈ व्यवसाय प्रशिक्षण केंद्र ◈

व्यवसाय प्रशिक्षण केंद्रात ३ विद्यार्थी प्रशिक्षण पूर्ण करुन जॉब करत आहेत. संगणक प्रशिक्षण यात ४ विद्यार्थी आणि ११वीचे ३९ विद्यार्थी यांनी संगणक बेसिक प्रशिक्षण पूर्ण केला. फॅशन डिझाईन विभागातून इ. ११वीच्या विद्यार्थीनींनी बेसिक कोर्स पूर्ण केला. विभागाने विविध ठिकाणी स्टॉल्स लावले. त्यांच्या सहभागातून १७५ पर्स बनविल्या व विक्री केली त्यात ६,२९०/- येवढी रक्कम यातून विभागाने प्राप्त केली. शिरगाव येथे ९ महिलांनी शिवणकाम प्रशिक्षण घेऊन स्वतःचे व्यवसाय सुरू केले.

## ◈ तंत्रशिक्षण विभाग ◈

**कौशल्य प्रशिक्षण –** एम. एस. एफ. सी.(मल्टी स्किल फाउंडेशन कोर्स)अंतर्गत शेती, पशुपालन, गृह आरोग्य व तंत्रज्ञान या विषयांमध्ये वर्षभर नववीच्या विद्यार्थ्यांनी अनेक उपक्रम केले. विज्ञान आश्रम, पाबळ अंतर्गत इयत्ता आठवी, नववीच्या विद्यार्थ्यांनी विकिपीडिया, डिझाईन मेकिंग, पोस्टर डिझाईनिंग व किचन होल्डर यांचे कौशल्य प्रशिक्षण घेतले.

## ◈ टाटा क्रीडा प्रकल्प ◈

**टाटा हब अंतर्गत खेळाडू प्रशिक्षण उद्घाटन व विविध स्पर्धा –** विद्यालय व परिसरातील मुलांनी खेळातील कौशल्ये प्राप्त करावीत या उद्देशाने टाटा कंपनी व ज्ञान प्रबोधिनी, क्रीडाकुल, निगडीच्या मदतीने गावागावात रोज मुलांसाठी वेगवेगळे खेळ घेतले जातात. प्रकल्पांतर्गत पाच गावातील शाळांमधील मुलांच्या गाव पातळीवरील विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. पाच गावातील २२६ विद्यार्थी सहभागी होते व सहा मार्गदर्शक प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले .

**माजी विद्यार्थी मेळावे –** सन १९९६, १९९९ व २०१० या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचे मेळावे पार पडले. चर्चासत्र, विद्यालयातील आठवणी व शिक्षण, संस्कार याविषयी भरभरून मनोगते विद्यार्थ्यांनी मांडली. शिक्षकांचा कृतज्ञतापूर्वक सत्कार केला.

## ◈ स्त्री-शक्ती प्रबोधन ◈

**हिरकणी प्रकल्प –** साळुंब्रे, कारखाना व दारुंब्रे या ठिकाणी हिरकणी प्रकल्पाची प्रशिक्षणे आयोजित केली होती. छोट्या मुलांचे आरोग्य, विविध बाबींमधून व्यक्तिमत्त्व घडवून 'स्व' ची ओळख यावर मार्गदर्शन केले.

**माहेरवाशीण मेळावा –** माजी विद्यार्थिनी व परिसरातील नवविवाहित युवतींसाठी महिलांचे सामाजिक व मानसिक स्वास्थ्य व सुरक्षितता जपण्यासाठी विविध डॉक्टर व इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

◈-◈-◈

## २५. अंबाजोगाई विस्तार केंद्र

**प्रारंभ – शके १९२१ / इ.स. १९९९**




**पर्यावरण स्नेही गणेशोत्सव : ज्ञान प्रबोधिनी अंबाजोगाईचे प्रतिनिधी**

### नित्य स्वरूप

१. अंबाजोगाई तालुक्यामध्ये विद्यार्थी, नागरिक, प्रदेश विकसन, शैक्षणिक कार्य, संघटनात्मक कार्य, राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य करणारे मनुष्यघडणीचे केंद्र.

### संख्यात्मक आढावा

| अ. क्र. | नियमित उपक्रम | प्रबोधक संख्या | सहभाग |
|---|---|---|---|
| १. | आषाढी एकादशी | ५२ | शिशुविहार |
| २. | भजन संध्या | ६३ | ५ गटांचे सादरीकरण |
| ३. | वर्षारंभ उपासना | ३१ | कार्यकर्त्यांची उपस्थिती |
| ४. | सामूहिक दिवाळी | ४५ | पालक, कार्यकर्ते उपस्थिती |
| ५. | विवेकानंद जयंती | २६ | युवती गट,कार्यकर्ते |
| ६. | अभिव्यक्ती | – | पालक, विद्यार्थी, कार्यकर्ते |
| ७. | वर्षांत उपासना | २१ | कार्यकर्ते |

ज्ञान प्रबोधिनी अंबाजोगाई केंद्राला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. १९९९ साली सुरू झालेला शिशुशाळेचा प्रयोग आजही दिमाखात चालू आहे. या पंचवीस वर्षाच्या निमित्ताने अभिव्यक्ती २०२५ या कार्यक्रमात २५ वर्षात शिशु शाळेत अध्यापन कार्य केलेल्या अध्यापकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यासोबत २५ वर्षाच्या कार्याबद्दल गणेशोत्सवाच्या दरम्यान प्रसाददादा चिक्षे यांची मुलाखत घेण्यात आली.

### ◈ शिशुविहार कार्य ◈

यावर्षी आपण शिशुविहारमध्ये तीन वर्षाचा वेगळा 'किलबिल' गट सुरू केला. शिशुगटामार्फत दिनांक १ मार्च रोजी बाल शिक्षण परिषद घेण्यात आली. या बालशिक्षण परिषदेमध्ये ३५ महिला शिक्षकांची उपस्थिती होती. पंचकोशाधारित शिक्षणावर वेगळा प्रयोग त्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गणेशाची मूर्ती देखील कागदापासून बनवण्यात आली. या गणेशमूर्ती निर्मितीमध्ये अंबाजोगाईतील श्री. गणेश कदम यांनी सहकार्य केले. विक्री उपक्रम, प्रसाददादा चिक्षे यांची मुलाखत, मातृभूमिपूजन, दैनंदिन जीवनातील पर्यावरण या विषयावर डॉ. शुभदा लोहिया यांचे व्याख्यान इ. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध स्पर्धांमध्ये एकूण ३६ हजार रुपयांची बक्षीस रक्कम ज्ञान प्रबोधिनीच्या गणेश मंडळाने जिंकली. जवळपास ५० विद्यार्थ्यांचे बरची पथक व वीस ते पंचवीस मुलींचे ढोल पथक बसवण्यात आले.

### ◈ छात्र प्रबोधन नोंदणी ◈

५०५ मराठी अंक, १०३ इंग्रजी अंक,
२२१ ग्रामीण अंक व २४१ दिनदर्शिका

असे एकूण १,०७० अंक वितरित केले गेले. स्वामी विवेकानंद

**प्रतिसाद**

- अंबाजोगाई येथील ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या भगिनी निवेदिता गटाच्या महिला कार्यकर्त्या सागरमित्र ही संकल्पना अंबाजोगाई शहरामध्ये राबवत आहेत. पर्यावरणासाठी हानिकारक असलेले कचऱ्यातील प्लास्टिक घराघरातून शालेय विद्यार्थ्यांमार्फत संकलित केले जाते. पर्यावरण रक्षणाच्या या कार्याची गरज हा गट पूर्ण करत आहे. त्याचे कौतुक करावे, तेवढे कमी आहे. या कार्याला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! हे कार्य अंबाजोगाईपुरते मर्यादित न राहता ते संपूर्ण देशभर चालावे, ही माझी मनोकामना आहे. पुनश्च आपले अभिनंदन व शुभेच्छा !

**– संजय दि. कांबळे, जनआधार संस्था, लातूर**

- उत्तम संस्काराचे केंद्र, सक्षम बालसंस्कार रुजविणारे, मूल्याधिष्ठित शिक्षण अविरत देणारे, विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती साधण्यास सतत प्रयत्नशील असणारे अशा एक ना अनेक पैलूंनी बहरलेले हे संस्कार केंद्र आणि त्याचे कार्य चिरायू होवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**– शेखर देशपांडे**



• गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेला उपक्रम



• छात्र प्रबोधन वाचक मेळावा

बाल विद्यामंदिर व बालनिकेतन या शाळांमध्ये छात्र प्रबोधन वाचक मेळावा घेण्यात आला.

### ◈ वस्ती कार्य ◈

नवीन शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेत जावे, यासाठीचे प्रयत्न वस्तीवरील कार्यात प्रामुख्याने करण्यात आले. या कामातून शिक्षणाची आवड निर्माण होऊन वस्तीवरील पाच वर्षांच्या कामानंतर गणेश सवादे हा ७८% गुण घेऊन नववीची परीक्षा उत्तीर्ण झाला. तर केवळ जिद्दीच्या जोरावर सुनीताने थेट पाचवीत प्रवेश घेऊन देखील दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. वस्तीवरील अनेकांचे आधार कार्ड तयार करून घेण्याचे प्रमुख कार्य या वर्षात झाले. मुले व प्रबोधिनी यांच्यात एक बंध निर्माण झाला.

### ◈ पालक गट उभारणी ◈

अभिव्यक्ती सादरीकरणात पालकांचे गट मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. तसेच पालकांच्या शिबिरामधून पालक ज्ञान प्रबोधिनीशी जोडले गेले. भजन संध्येच्या कार्यक्रमात देखील पालकांचा गट सहभागी झाला. गणेशोत्सवात पालक गटाच्या सदस्यांनी युवती गटाला खूप सहकार्य केले. राजभाषा मराठी दिनानिमित्त महिलांसाठी कार्यक्रम, पालक गटासाठी एक दिवसीय शिबिराचे आयोजन युवती गटाने केले.



शिकलकरी वस्ती, फकीर वस्ती, धनगर वस्तीवरील कार्य

### ◈ निवेदिता गट ◈

निवेदिता गटामार्फत प्लास्टिक पुनर्निमितीचे काम जोरदार चालू आहे. वेगवेगळ्या शाळांमधून प्लास्टिक गोळा करून घेतले जाते. यावर्षीच्या वेगळ्या उपक्रमात त्यांनी कुटुंबाला देखील समाविष्ट करून घेतले. वैयक्तिक कुटुंबाची व शाळांची वेगवेगळी स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेमुळे प्लास्टिक मोठ्या प्रमाणात जमू लागले. स्पर्धेचे बक्षीस वितरणही जोरदार करण्यात आले. यासाठी नगरपरिषद अंबाजोगाई यांचे सहकार्य लाभले.

निवेदिता गटाच्या मार्फत 'ओळख स्पर्शाची' हा आणखी एक वेगळा कार्यक्रम या वर्षभरात घेण्यात आला. निवेदिता गटाच्या सदस्यांनी वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन 'ओळख स्पर्शाची, जाणीव जागृती' या विषयावर कार्यशाळा घेतल्या. खोलेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, लोकमान्य विद्यालय पोखरी, अशा शाळांमधून या कार्यशाळा संपन्न झाल्या.

### ◈ युवती विभाग ◈

युवती गटामार्फत मुलींसाठी शिबिरे, नवरात्र उत्सव, भगिनी निवेदिता जयंती निमित्त व्याख्यान, आधुनिक नवरात्रात वेगवेगळ्या विषयांवर वाचन सत्र, भित्तिपत्रक स्पर्धा असे विविध उपक्रम घेण्यात आले.

दि. २९ डिसेंबर रोजी इ. ३री ते ९वीच्या मुलींसाठी 'पुस्तक मुलींच्या हाती' या साप्ताहिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत मुली रविवारच्या साप्ताहिक बैठकीदरम्यान वाचनासाठी पुस्तक घेऊन जातात व पुढच्या साप्ताहिक बैठकीत वाचलेल्या पुस्तकाबद्दल माहिती लिहून आणतात व ती माहिती सर्व मुलींना वाचून दाखवतात.

◈-◈-◈

## २६. डोंबिवली विस्तार केंद्र

**प्रारंभ – शके १९१७ /इ.स. १९९५**

### नित्य स्वरूप

१. प्रबोधक मंडळ
२. विद्याव्रत संस्कार व जोपासना
३. संवादिनी
४. पौरोहित्य
५. प्रासंगिक शिबिरे, कार्यक्रम

### संख्यात्मक आढावा

- **प्रबोधक मंडळ –** २ ठिकाणी, ७५ विद्यार्थी
- **विद्याव्रत –** ३ ठिकाणी, ६६ विद्यार्थी
- **प्रासंगिक कार्यक्रम, शिबिरे –** ६ कार्यक्रम, ३०० विद्यार्थी
- पौरोहित्य – १,२००
- संवादिनी सदस्या – २५
- कार्यकर्ता मेळावा – ७०
- कार्यकर्ते संख्या – १६



**डोंबिवली कार्यकर्ता मेळावा**



**रात्र शिबिर - इयत्ता ८वी - १०वी**

### प्रतिसाद

डोंबिवली विस्तार केंद्र कार्यकर्ता मेळावा छान पार पडला. सर्व जुन्या कार्यकर्त्यांना, ज्यांच्या समवेत मी डोंबिवली विस्तार केंद्राच्या विविध उपक्रमांमध्ये कार्यकर्ता म्हणून काम केले होते, त्यांना भेटून खूप आनंद झाला. या कार्यक्रमाने जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि अनेक दिवस आणि रात्री (रात्र शिबिरे) आठवल्या. मागे वळून पाहताना मला वाटते की, आम्ही तरुणांनी मुलांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिरे घेत असताना, या अनुभवाने आमचे व्यक्तिमत्त्व घडवण्यास आणि आमचे नेतृत्व कौशल्य आणि अनेक जीवन कौशल्ये विकसित करण्यास मदत केली. मेळाव्याच्या निमित्ताने सर्व जुन्या आणि नवीन गट डोंबिवली सदस्यांना एकत्र आणण्यात मदत झाली.

**– गौरव दादा मोडक**

माझा मुलगा स्वर्ण किरण भोईर २०२२-२३ मध्ये प्रबोधक मंडळात व २०२३-२४ मध्ये विद्याव्रत उपक्रमात होता. तो खूप हुशार व एकपाठी आहे; परंतु अत्यंत चंचल आहे. त्यामुळे एकाग्रतेचा प्रॉब्लेम होता. त्याला नेहमी नवीन नवीन गोष्टी करायला खूप आवडतात. ज्ञान प्रबोधिनीमध्ये आखलेले सर्व उपक्रम करताना त्याला फार मजा आली व एक वेगळा अनुभवही मिळाला. अभिवाचन स्पर्धा, वर्तमानपत्रापासून निर्माल्यासाठी पिशव्या बनवणे, राख्या बनवणे व यावर्षी राख्या विकणे अशा उपक्रमात तो सहभागी झाला. त्यामुळे अनोळखी माणसांशी संवाद साधून आपल्याकडील गोष्ट त्याला विकणे, त्याचे महत्त्व पटवून सांगणे हे त्याला जमले. त्याला Casio वाजवता येतो. त्याचा वापर मावशींनी अभिवाचनात सुद्धा करून घेतला. त्यामुळे त्याचा उत्साह वाढला व आपल्याकडील कला आपण कोणासमोरही सादर करू शकतो हा आत्मविश्वास त्याला मिळाला.

पेबच्या किल्ल्यावर काढलेली सहल म्हणजे एकमेकांना सोबत घेऊन आपले ध्येय कसे गाठायचे याचा जणू तो एक धडाच होता. दर रविवारच्या वर्गातील खेळ तर खासच होते. त्यामुळे तो आवर्जून सगळ्या वर्गांना हजर होता (मोजके रविवार अपरिहार्य कारणामुळे तो येऊ शकला नाही). सगळ्या मावश्यांनी आणि ज्ञान प्रबोधिनीने आखलेल्या कार्यक्रमांनी बऱ्याच चांगल्या गोष्टींचे व गुणांचे रोपण मुलांमध्ये केले आहे. आत्ता जरी ही बीजे सुप्तावस्थेत असली तरी ह्या सगळ्या गुणांची झाडे एक दिवस त्यांच्या आयुष्यात त्यांना नक्कीच सावली देतील. त्यासाठी लागणारी मेहनत आम्ही पालक म्हणून नक्कीच करू. त्यांच्या यशात ज्ञान प्रबोधिनीचाही महत्त्वाचा वाटा असेल. आम्हीही ज्ञान प्रबोधिनीचा एक भाग आहोत याचा अभिमान वाटतो

**– रूपाली किरण भोईर (पालक)**







• ओळख स्पर्शाची कार्यशाळा, अशोक विद्यालय • मातृभूमी पूजन : अनंतम् वसाहत • ओळख स्पर्शाची कार्यशाळा

### ◈ प्रबोधक मंडळ (ग्रामीण व शहरी) ◈

१. **शिवाई बालक मंदिर शाळा :** इ. ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी १३ सत्रे झाली. विषयांमध्ये ऋषी, सप्तऋषी, मेक इन इंडिया, जिल्ह्यांची माहिती इ. होते. हस्तकौशल्य सत्रात तोरण व रांगोळी शिकवण्यात आली.

२. **टिळकनगर खुला गट (शहरी) :** विविध प्रबोधन गीते, मनाचे श्लोक, वैज्ञानिक विषय (स्टीफन हॉकिंग, कल्पना चावला),स्मरण व निरीक्षण कौशल्य यांवर सत्रे झाली. हस्तकौशल्यात राख्या, कागदी पिशव्या, घड्याळे, टॅनग्राम, आकाशकंदील तयार केले गेले. विविध सत्रांमध्ये पर्यावरण, सण, प्रदूषण या सामाजिक विषयांवर नाट्यसत्रे, चर्चासत्रे व प्रात्यक्षिक सत्रे झाली.

३. **विकासिका उपक्रम** : स. वा. जोशी विद्यालयात इ. ५वीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम घेतला गेला. यामध्ये वाचन, लेखन, निरीक्षण कौशल्य वाढवण्यासाठी विषयानुरूप सत्रे झाली. दीप अमावस्या, गणपती उत्सव, क्रांतिदिन आदी सणांवर आधारित उपक्रम राबवले गेले.

### ◈ विद्याव्रत कार्यक्रम ◈

१. **शिवाई बालक मंदिर :** दि. ११ ते १३ एप्रिल रोजी अर्धनिवासी शिबिर आणि १४ एप्रिल रोजी ३७ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार झाला. वैशाली विभांडिक यांनी आचार्यपद सांभाळले.

२. **बाळे वाकण :** १४ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार झाला. विद्यार्थ्यांनी 'उजळती वाट' मधील संकल्प लिहिले. ओंकारदादा बाणाईत यांनी मार्गदर्शन केले.

३. **टिळकनगर (बदलापूर) :** निवासी शिबिरात १५ विद्यार्थी सहभागी होते. मनाचे श्लोक, सापशिडी सत्र, चरित्र कथन, स्वयंपाक, मातृआरती, नृत्य व लघुनाट्य यांचा समावेश होता. दि. २१ एप्रिल रोजी आदित्यदादा शिंदे यांच्या उपस्थितीत विद्याव्रत संस्कार झाला.

### ◈ विद्याव्रत जोपासना ◈

१. **ग्रामीण :** विद्यार्थ्यांना ॲकॅडेमिक, करिअर आणि जीवन ध्येयाविषयी मार्गदर्शन केले गेले. स्वयंअध्ययन, संवाद कौशल्य, गणेशोत्सवावर भाषण, ऑपरेशन गंगा व आयर्न मॅन तेजोनंद गणपत्ये यांच्यावर सत्रे झाली.

२. **शहरी :** १७ विद्यार्थी सहभागी. आहार, अनुवंशिक रोग, श्रवण कौशल्य, सुचेता कडेठाणकर यांची मुलाखत, दासबोधातील श्रवण महत्त्व, आत्मिक व मानसिक विकासाचे विषय हाताळले गेले.

### ◈ संवादिनी ◈

वर्षभरात ३ नवीन गट स्थापन करण्याचे उद्दिष्ट होते. बहिणाबाई गट दोन वर्षांनी पुन्हा सुरू झाला. विविध बैठकीत 'परीघाबाहेरील नाती', संकल्पना, पिंक टॅक्स यावर चर्चासत्रे झाली. वाचक मेळावे, मातृभूमिपूजन, भाषिक खेळ, मराठी भाषा गौरव दिन यांसारखे उपक्रम घेतले गेले.

### ◈ विशेष कार्यक्रम व प्रशिक्षण ◈

इ. ५वी ते १०वीच्या १९१ विद्यार्थ्यांनी रात्रशिबिरामध्ये सहभाग घेतला. ३१ कार्यकर्ते कार्यरत होते.

दि. ८-९ मार्च रोजी १९ विद्यार्थ्यांच्या प्रयोगांचे विज्ञान प्रदर्शन भरवले होते. त्याला ५०० हून अधिक लोकांनी भेट दिली.

गुढीपाडवा स्वागत यात्रेमध्ये ३० सदस्यांचा सहभाग होता. प्रबोधिनीचे कार्य फलकांद्वारे सादर करण्यात आले.

कार्यकर्ता मेळाव्यामध्ये ६१ सदस्य सहभागी होते. १० वर्षांचे कार्यसंकलन, मार्गदर्शन व चर्चासत्र असे स्वरूप होते.

प्रशिक्षण वर्गामध्ये २० कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. आदित्यदादा व इतरांनी मार्गदर्शन केले.

### ◈ शिक्षक, पालक, मुलांसाठी विशेष सत्रे ◈

दि. १४ एप्रिल रोजी शिक्षक सत्रामध्ये ३० शिक्षक सहभागी झाले होते, प्रशांत सर व ओंकारदादा यांचे मार्गदर्शन लाभले.

पालक मंडळ : दि. १७ व २३ फेब्रुवारीला टिळकनगर शाळेत १८ व १६ पालक उपस्थित होते. विषय 'व्यक्तिमत्त्व विकास व पालकत्व' हा होता.

छात्र प्रबोधन मासिकावर आधारित वाचक मेळावे झाले. विविध साहित्यिक चर्चा, संकल्प व मुलाखत झाली.

◈-◈-◈

# २७. चिपळूण उपक्रम केंद्र

**प्रारंभ – शके १९४५/इ.स. २०२३**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. वर्षारंभ समारंभ, मातृभूमिपूजन, साप्ताहिक उपासना.
२. साप्ताहिक प्रबोधिनी वाङ्मयाचे एकत्रित वाचन.
३. पूरक शिक्षण उपक्रम.
४. युवक विभाग.
५. स्त्री शक्ती प्रबोधन गट.
६. आरोग्य तपासणी.
७. ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा –

**सहभागी विद्यार्थी**

❖ स्वयंअध्ययन शिबिरे – १०७
❖ विद्याव्रत संस्कार – ३५
❖ निरीक्षण कौशल्य शिबिरे – १९५
❖ युवक गट विविध कार्यक्रम – १०५
❖ ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प – ३६०

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



मातृभूमिपूजन चिपळूण केंद्र कार्यालय



निरीक्षण कौशल्य सत्र, देवखेरकी, चिपळूण




आरोग्य शिबिर, स्वयंदेव, चिपळूण



पालक महासंघ प्रतिनिधी व चिपळूण केंद्र सदस्य

### ◇ पूरक शिक्षण ◇

तीन शाळांमध्ये 'स्वयंअध्ययन शिबिरे' घेण्यात आली. चिपळूण येथील युनायटेड इंग्लिश स्कूल शाळेच्या गुरुकुलमध्ये विद्याव्रत संस्कार कार्यक्रम पार पडला.

छात्र प्रबोधनचे ५०० दिवाळी अंक व दिनदर्शिका यांची नोंदणी व वितरण २० शाळांमध्ये झाले. वाचक मेळावे घेणारा गट तयार होण्यासाठी दातार-बेहेरे-जोशी महाविद्यालय येथे इ. ११वी मधील १०५ विद्यार्थ्यांसमोर वाचक मेळाव्याचे प्रात्यक्षिक झाले. निरीक्षण कौशल्य शिबिरे २ शाळांमध्ये झाली.

### ◇ युवक विभाग ◇

चिपळूण शहरातील दातार-बेहेरे-जोशी महाविद्यालयात विज्ञान प्रथम वर्षातील भौतिकशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांसमोर फॅरेडेचा पहिला नियम यावर प्रयोगासाहित सत्र झाले.

कला शाखेतील विद्यार्थ्यांसोबत 'भारतपुत्र-जपानमध्ये आठवले भारतात विसरले' याविषयी प्रकटवाचन करून चर्चासत्र घेण्यात आले. 'भैरवगड' ट्रेक ६ युवकांनी केला. दुर्गभ्रमण व त्यानिमित्ताने स्वच्छता मोहिमेचे आयोजन खेड तालुक्यातील चोरवणे गावातील नागेश्वर येथे केले. ९ युवक या मोहिमेत सहभागी झाले.

### ◇ अन्य महत्त्वाचे ◇

दि. १७ जुलै या दिवशी वर्षारंभ समारंभ संपन्न झाला. एकूण ६७ सदस्य उपस्थित होते. केंद्राने कार्यालय म्हणून २ खोल्या असलेली जागा भाड्याने घेतली व सामूहिक उपासना करून जागेच्या वापराचा शुभारंभ केला. मातृभूमिपूजन संपन्न झाले.

आरोग्य सजगता या उद्दिष्टांतर्गत चिपळूण तालुक्यात विविध सत्रे घेण्यात आली. नांदिवसे व स्वयंदेव या गावांमध्ये १०५ जणांची आरोग्य तपासणी झाली.

न्यू इंग्लिश स्कूल, आंबडस या शाळेत 'हिरकणी' उपक्रमाची सहा सत्रे झाली.

### ◇ ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्प ◇

ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल, निगडी आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या प्रकल्पांतर्गत वर्षभरात चिपळूण आणि खेड तालुक्यातील आंबडस, सती, आकले, भोम आणि पेढे अशा पाच ठिकाणी उपकेंद्रे कार्यरत होती. ही ५ उपकेंद्रे मिळून प्रकल्प सुरू होण्याआधी ३५९ विद्यार्थ्यांच्या प्राथमिक चाचण्या घेण्यात आल्या. वर्षभरात मुले-मुली मिळून ३४० ते ३८० खेळाडू सातत्यपूर्वक क्रीडा सत्रांमध्ये सहभागी झाली. प्रत्येक उपकेंद्रांवर आरोग्यविषयक १० व क्रीडामानसविषयक ९ सत्रे घेतली.

मुलांचे एकत्रित हिवाळी क्रीडा शिबिर क्रीडा संकुल, सावर्डे, ता. चिपळूण. (डेरवण) येथे झाले. मुलांच्या क्रीडा स्पर्धेत एकूण १९५ खेळाडू सहभागी झाले. चिपळूण केंद्रावरून ८० मुले-मुली क्रीडाकुल निगडी येथे झालेल्या आंतरकेंद्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झाली. या वर्षात झालेल्या अंतिम मैदानी व आरोग्य चाचणीमध्ये चिपळूण केंद्राच्या पाचही उपकेंद्रांमधील २७० खेळाडूंनी सहभाग घेतला.

◇-◇-◇

# २८. ठाणे
# स्थायी संपर्क केंद्र
**प्रारंभ – शके १९३८ / इ.स. २०१६**



प्रबोधक मंडळ शिबिर

## नित्य काम

१. प्रबोधक मंडळ

२. विकासिका

३. संवादिनी

४. प्रासंगिक उपक्रम

५. वंचित गटासाठी अभ्यासिका

## संख्यात्मक आढावा

❖ वर्षभरात २९५५ विद्यार्थी, १३० प्रौढ, १६ शिक्षक, समन्वयक यांच्यापर्यंत पोचलो.



विद्याव्रत शिबिरातील गटकार्य



वंचित गट तासिका

१. **प्रबोधक मंडळ –** यावर्षी ८वीच्या १३ विद्यार्थ्यांचा पालक, कार्यकर्ते, आधीचे विद्याव्रती, हितचिंतक यांच्या उपस्थितीत विद्याव्रत संस्कार संपन्न झाला. महिन्यात २ रविवारी दोन तास, एकदिवसाचे शिबिर याप्रमाणे विद्याव्रताची व्याख्याने व त्याला पूरक उपक्रम, गटकार्य, गटचर्चा अशा विविध सत्रांचे नियोजन करण्यात आले.

२. **विकासिका –** वर्तकनगर माध्यमिक विद्यालयातील इयत्ता सहावी मधील ४० मुलांसाठी वर्षभरात एकूण ४ तासिका घेण्यात आल्या. गटाने काम करणे व मुलांमधे कृतज्ञताभाव जागृत करणे हे उद्दिष्ट ठरवून तासिकांचे नियोजन केले गेले.

३. **संवादिनी –** ठाणे येथे संवादिनी सख्यांचा सेतुबंधन मेळावा घेण्यात आला. त्यात पुण्याहून ज्येष्ठ कार्यकर्त्या तसेच डोंबिवली, बदलापूर, ठाणे, बोरिवली आणि भाईंदर अशा विविध केंद्रातून ४२ जणी सहभागी झाल्या.

४. आधुनिक नवरात्र अंतर्गत जानेवारी महिन्यात ‘कुटुंब संस्थेचा अभ्यास’ हा विषय घेतला होता. त्या अंतर्गत ठाणे गटातील सख्यांनी तीन पिढ्या व्यवसाय करणाऱ्या ९ कुटुंबांचा अभ्यास केला.

५. पाच ठिकाणी मातृभूमिपूजन कार्यक्रम झाले. त्यात महिला, पुरुष, शिक्षक आणि विद्यार्थी मिळून सुमारे ३७५ जणांपर्यंत मातृभूमिपूजन, त्याचा अर्थ आणि संकल्प पोचवायचा प्रयत्न केला. १० शाळांमध्ये २८०० विद्यार्थ्यांसाठी ओळख स्पर्शाची या विषयावरील सत्र घेतले.

६. महाराष्ट्र विद्यालय ठाणे येथे यावर्षी इ ५वी आणि ६वीसाठी विज्ञान दल तासिका घेतली गेली. छात्र प्रबोधनच्या १४० दिवाळी अंकांची नोंदणी केली गेली. शारदा अभ्यासिकेतील उपेक्षित गटातील किशोर मुलांसाठी वर्षभर साप्ताहिक तासिका घेतल्या गेल्या. शारीरिक, मानसिक विकसन वाढवणे आणि मुलांना लिहिते करणे, ही दोन उद्दिष्टे ठरवून नियोजन केले गेले.



चांगल्या, वाईट स्पर्शाची ओळख करून घेताना इ. ६वीतील विद्यार्थी

◈-◈-◈

# २९. बदलापूर अस्थायी संपर्क केंद्र

**प्रारंभ – शके १९४५/ इ.स. २०२३**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

१. विद्यार्थ्यांसाठी विकासिका,
२. विद्याव्रत संस्कार व पूर्वतयारी,
३. विज्ञान दल, छात्र प्रबोधन दिवाळी अंक नोंदणी व वितरण,
४. स्वयं पौरोहित्य कार्यशाळा

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## संख्यात्मक आढावा

- ❖ **सहभागी विद्यार्थी –** नियमित – १००, प्रासंगिक – ५०
- ❖ **गणेश प्रतिष्ठापना, लक्ष्मीपूजन स्वयं पौरोहित्य कार्यशाळा –** १०६ प्रौढ सदस्य
- ❖ **दिवाळी अंक नोंदणी –** ३४१
- ❖ **दिनदर्शिका –** ६४
- ❖ **कार्यकर्ते –**१२

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



**विद्याव्रत उजळणी शिबिर**



**विस्तार कार्यदिशा प्रदीर्घ बैठक**




**गणेश प्रतिष्ठापना कार्यशाळा**



**न्यू भारत मॉडर्न हायस्कूल, वाचक मेळावा**




**शिशुविहार विद्या मंदिर, बालशिक्षण मेळावा**

### ⟐ विद्यार्थ्यांसाठी नियमित कार्यक्रम ⟐

विकासिका उपक्रमात निरीक्षण, श्रवण, स्मरण कौशल्याची ओळख वेगवेगळ्या खेळातून मुलांना दिली गेली.

विद्याव्रत उपक्रमात पाचही विकसनांची माहिती मुलांना देण्यात आली. प्रत्येक विकसनासाठी पूरक कार्यक्रम घेतला गेला; जेणेकरून विकसनातील मुद्दे मुलांना अधिक चांगले समजतील. ३० विद्यार्थ्यांनी विद्याव्रत संस्कार ग्रहण केला.

### ⟐ ठळक प्रासंगिक उपक्रम ⟐

स्वातंत्र्यदिनानिमित्त मातृभूमिपूजन कार्यक्रम झाला.

डोंबिवली पौरोहित्य गटातील सहा पुरोहितांनी गणेश प्रतिष्ठापना कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत ७२ नागरिकांनी भाग घेतला.

दीपावली निमित्त घेतलेल्या लक्ष्मीपूजन कार्यशाळेत ३४ नागरिक सहभागी झाले होते. बदलापूरमधील वेगवेगळ्या शाळांमधून, छात्र प्रबोधनच्या एकूण ३४१ दिवाळी अंकाचे व ६४ दिनदर्शिकांचे वितरण झाले.

न्यू भारत मॉडर्न इंग्लिश हायस्कूल येथे इ. ८वी मधील ४० विद्यार्थ्यांसाठी वाचक मेळावा घेतला. कुळगाव बदलापूर नगरपरिषद-डिजिटल शाळा क्र १. येथील इयत्ता सहावीतील ४० विद्यार्थ्यांसाठी विज्ञान दल घेण्यात आले.

⟐-⟐- ⟐

# ३०. कमला मेहता नेत्र रुग्णालय, शिरवळ

**प्रारंभ – शके १९२७/इ.स. १९९७**

**ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान न्यास संचालित नेत्ररुग्णालय**

## नित्य स्वरूप

१. नेत्र तपासणी – ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांची तसेच औद्योगिक संस्थांच्या कामगारांची.

२. आठवड्यातून दोन वेळा नेत्रशिबिर, रुग्णांची विनामूल्य ने-आण व शस्त्रक्रिया.

## संख्यात्मक आढावा

❖ बाह्यरुग्ण विभाग : एकूण १६,०५६

❖ शस्त्रक्रिया – मोतीबिंदू व अन्य : एकूण १०००

❖ मोफत नेत्रतपासणी शिबिरे : ८१

❖ शाळेतल्या विद्यार्थ्यांची शाळेत जाऊन तपासणी : ४५६४ विद्यार्थी



**मोफत नेत्रतपासणी**




**मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर**



**हिरकणी सदिच्छा भेट**

ग्रामीण भागात नेत्रसेवा करण्याच्या उद्देशाने या रुग्णालयाची स्थापना १९९७ मध्ये सातारा जिल्ह्यात शिरवळ येथे झाली. आजतागायत दोन लाखांहून अधिक रुग्णांना नेत्रसेवा पुरवण्यात आली आहे.

### ◈ रुग्णालयाची वैशिष्ट्ये ◈

१. बाह्य रुग्ण विभागात द्विपदवीधर स्थायिक नेत्रविशारद उपलब्ध
२. दरमहा आठ शल्यविशारदांची भेट व शस्त्रक्रिया
३. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे विविध sub speciality नेत्रतज्ज्ञ आठवड्यातून एकदा बाह्य रुग्ण विभागामध्ये उपलब्ध
४. पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध
५. आठवड्यातून दोन वेळा मोतीबिंदू फेको (Feco) शस्त्रक्रिया
६. शिकाऊ नेत्रविशारदांसाठी योग्य मार्गदर्शन व अनुभवांची व्यवस्था
७. महिन्यातून दोनदा काचबिंदू शस्त्रक्रिया
८. दिव्यांग व्यक्तींसाठी शिबिरे
९. शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी.
१०. नवीन अत्याधुनिक शस्त्रक्रियेसाठी Phacoemulsification machine, घेतले.
११. अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज रुग्णालय, सर्वोत्तम दर्जाची नेत्रचिकित्सा व चष्म्याचे दुकान

◈-◈-◈

# ३१. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ॲल्युमनाय फौंडेशन (JPPAF)

प्रारंभ – शके १९४१ / इ.स. २०१९

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

## नित्य स्वरूप

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांनी, माजी विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी व सामाजिक कामासाठी स्थापन केलेली sec 8 कंपनी

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



गुरुपौर्णिमा कार्यक्रम २०२४

### ◇ ऐस-पैस गप्पा ◇

मंडळाने ही मालिका सुरू केली ज्यामध्ये माजी विद्यार्थी आपापल्या अनोख्या जीवनप्रवासांच्या आणि वैयक्तिक अनुभवांच्या कथा इतरांसोबत अनौपचारिक 'गप्पा' स्वरूपात शेअर करू शकतात.

१. **ऐस-पैस गप्पा सत्र ९ : 'मंदिरात अंतरात..' चेतना गोसावी (१९८३)** – प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व ह्या विषयांचा अभ्यास करत असताना आलेले अनुभव, आपल्या संस्कृती आणि इतिहासाबद्दलच्या शिकलेल्या अनेक नव्या गोष्टी आणि मंदिरशिल्पकलेकडे पाहण्याची मिळालेली एक वेगळीच दृष्टी या गप्पांमधून उलगडली.

२. **ऐस-पैस गप्पा सत्र १० : 'औषधापासून मुक्ती देणारा 'डॉक्टर' मंदार गद्रे (१९९९)** – आपल्या शरीराचं मूलभूत जीवशास्त्र आपल्याला काय सांगतंय हे मंदारने समजावून सांगितले. अनेकांना चुकीच्या जीवनशैलीमुळे निर्माण झालेल्या आजारातून (मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार) सुटका करून दिलेले त्याचे विलक्षण अनुभव त्याने सांगितले.

३. **ऐस-पैस गप्पा सत्र ११ : 'Honouring Wishes Avoiding Family Disputes' सायली गानू (२०००)** – बदलत्या काळानुसार डिजिटल युगात 'इच्छापत्र / मृत्युपत्र' करताना कुठल्या गोष्टींचा विचार करायचा?, 'लिविंग विल' म्हणजे नक्की काय? या विषयीची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

४. **ऐस-पैस गप्पा सत्र १२ : 'समालोचकांचे अनुभव' – प्रकाश वाकणकर (१९७८)** – विख्यात समालोचक प्रकाश वाकणकर यांच्याशी अनेक सामन्यांचे समालोचन आणि दिग्गज खेळाडूंशी होणाऱ्या भेटी यांचे रंजक किस्से ऐकायला मिळाले. खेळाच्या तांत्रिक बाबींचे विश्लेषण करण्याबरोबरच, क्षणा-क्षणाचे वार्तांकन करून आपल्यासमोर खेळाचे शब्दचित्र समालोचक कसे उभे करतात आणि त्याकरिता काय कौशल्य लागते हे सर्वांपर्यंत पोहोचले.

५. **ऐस-पैस गप्पा सत्र १३ : 'मुलाखतकाराची मुलाखत' स्वाती महाळंक (१९८५)** – पुणे आकाशवाणी आणि दूरदर्शनवर कार्यरत असणाऱ्या स्वातीताई पत्रकार तसेच उत्तम निवेदक, वक्त्या आणि मुलाखतकार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यांच्याशी झगमगतं माध्यमातलं जीवन कसं असतं तरी तितकंच ते काटेरीही असतं हे गप्पांद्वारे ऐकायला मिळाले.

### ◇ चित्रकला कार्यशाळा ◇

ज्ञान प्रबोधिनी माजी विद्यार्थी मंडळाच्या कला व संस्कृती विशेष उद्दिष्ट गटातर्फे 'आर्टिस्ट कट्टा'च्या सहकार्याने आयोजित 'प्रतिमा उत्कट रंग कथा-२४' या चित्र प्रदर्शनात अस्मिता अत्रे यांची कार्यशाळा वंचित, कर्णबधीर विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. ज्ञान प्रबोधिनीच्या आनंदी शिक्षण प्रकल्पामधील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले. ज्ञान प्रबोधिनीचे सहकार्यवाह आशुतोष बारमुख यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

### ◇ स्नेहमेळावा २०२४ ◇

➤ दरवर्षी वार्षिक मेळाव्याच्या निमित्ताने आपले माजी विद्यार्थी मंडळ, आयोजित स्नेहमेळावा दि. २२ डिसें. या दिवशी संपन्न झाला.

➤ दिवसाची सुरुवात सकाळी सव्वासहाला सार्थ उपासनेने झाली. यानंतर मैदानावर दल भरले आणि मोठ्या उत्साहाने माजी विद्यार्थी खेळात सहभागी झाले. दुपारच्या सत्रामध्ये चार गटांतून चर्चा आणि व्याख्यान याची योजना केली होती.

➤ आपल्या आठवणींचा ठेवा आपल्या पुढ्यात येताना, शाळेत असतानाचे विभाग व आत्ताचे विभाग यातले साधर्म्य किंवा वैविध्य समजून घेतले गेले. संध्याकाळी सुवर्ण आणि रौप्य महोत्सवी वर्गांचा कौतुक-समारंभ आणि काही महत्त्वपूर्ण घोषणा असा कार्यक्रम झाला.

◇-◇-◇

## ३२. ज्ञान प्रबोधिनी अटल सामाजिक नवोन्मेष केंद्र (ACIC)

प्रारंभ – शके १९४६ / इ.स. २०२४

नवोपक्रमातून ग्रामीण विकासाकडे !



महिला कार्यशाळा

### नित्य स्वरूप

१. आयडियाथॉन व डिझाईन थिंकिंग कार्यशाळा
२. व्यावसायिक मार्गदर्शन व साहाय्य

### संख्यात्मक आढावा

- **आयडियाथॉन व डिझाईन थिंकिंग कार्यशाळा** – ८
- **सहभागी प्रशिक्षणार्थी** – ५२०
- **निवड केलेले नवोन्मेषक प्रशिक्षणार्थी** – १०
- **प्रदर्शन सहभाग** – १ (IMDR, पुणे)

### नव्या कल्पना नव्या शक्यता...

ज्ञान प्रबोधिनीच्या नीती आयोग मार्गदर्शित अटल कम्युनिटी नवोन्मेष (इनोव्हेशन) केंद्रामार्फत आमच्या महाविद्यालयामध्ये 'आयडियाथॉन व डिझाईन थिंकिंग' कार्यशाळा घेण्यात आली. सुरुवातीला आमच्या सर्वांसाठी हा विषय नवीन असल्यामुळे त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी केंद्राचे प्रतिनिधी यांनी सर्वांसाठी त्या कार्यशाळेचे महत्त्व, सध्याची गरज, भविष्यातील संधी लक्षात आणून दिल्या.

प्रत्यक्ष कार्यशाळा झाल्यावर आम्हाला त्याची प्रचीती आली. आमच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामीण भागातील समस्या व त्याला सोडवण्याचे विविध पर्याय विद्यार्थ्यांनी सादर केले. अशा प्रकारच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता व नवकल्पनांना चालना मिळेल. प्रत्यक्ष जीवनात येणाऱ्या प्रश्नांना तांत्रिक व सर्जनशीलतेने विद्यार्थी उत्तरे शोधतील. त्यांच्या उद्योजकीय विचारसरणीला प्रोत्साहन मिळेल.

**– डॉ. आर.व्ही.शेटे, राजगड ज्ञानपीठ कॉलेज ऑफ फार्मसी**

### ◈ विस्तार कार्यक्रम ◈

१. **संपर्क विस्तार कार्यक्रम** – ग्रामीण आणि दुर्गम भागातील नवउद्योग, कृषी, शिक्षण आणि अन्य क्षेत्रांतील कल्पकता आणि उद्योजकता विकसित करण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा उद्देश सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी व त्या भागात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये यांचे अधिकारी यांना भेटून त्यांना प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्यात आली. त्यामुळे अनेकांशी चांगला संपर्क झाला व प्रकल्पाची मांडणी, उद्दिष्टे पोहोचवणे शक्य झाले. ज्ञान प्रबोधिनी हराळी केंद्र येथे शेतकऱ्यांसाठी, भोर येथे महाविद्यालयीन विद्यार्थांसाठी व मावळ परिसरात महिला गटांसाठी कार्यशाळा ठरवण्यासाठी विस्तार कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोचलो.

### ◈ आयडियाथॉन व डिझाईन थिंकिंग कार्यशाळा ◈

१. **आयडियाथॉन व डिझाईन थिंकिंग कार्यशाळा** – या कार्यशाळेची पूर्वतयारी करताना ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थी, महिला, शेतकरी यांना त्यांच्या सोप्या भाषेत समजेल, अशाप्रकारे त्या कार्यशाळेच्या विषयाची रचना केली. वेळोवेळी दैनंदिन व्यवहारातील उदाहरणे देऊन प्रशिक्षणार्थींना अनुकूल असे सत्र घेतले. अनेक जणांनी त्यांच्या भागातील समस्या, त्यावर शोधता येणारे उपाय, अशी बरीच नावीन्यपूर्ण समर्पक उत्तरे दिली.

२. **डिझाईन थिंकिंग** – या विषयावर कार्यशाळा घेण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा. किरण जोशी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्यक्ष ३ कार्यशाळांमध्ये सहभाग घेऊन उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

### ◈ व्यावसायिक मार्गदर्शन व साहाय्य ◈

१. **निवड झालेल्या नवोदितांना व्यावसायिक मार्गदर्शन व साहाय्य** – या कार्यशाळेतून १० नवोदितांची निवड करण्यात आली. ज्यांनी कार्यशाळेत वेगळ्या कल्पना मांडल्या अथवा ज्यांना त्यांचा व्यवसाय आणखी मोठ्या प्रमाणात वाढवायचा आहे, या सर्वांना केंद्रामार्फत व्यावसायिक मार्गदर्शन व आवश्यक ते साहाय्य प्रत्यक्ष त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणी जाऊन केले गेले. ज्यामध्ये बाजार सर्वेक्षण, भांडवल उभारणी, व्यवसाय प्रस्ताव, मार्केटिंग, यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश होतो.

२. **बांबू प्रदर्शन सहभाग** – डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पुणे येथे बांबू आधारित हस्तकला, फर्निचर, बांबूतील विविध नावीन्यपूर्ण वस्तूंचे प्रदर्शन घेण्यात आले. आपण प्रकल्पाद्वारे मार्गदर्शन व साहाय्य करत असलेल्या उद्योजकांना त्यांच्या वस्तूंना विक्रीसाठी स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले. या प्रदर्शनाला शेकडो नागरिकांनी भेटी दिल्या, तसेच मा. सुरेशजी प्रभू (माजी केंद्रीय रेल्वेमंत्री) यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली.

◈-◈- ◈

# ३३. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF)

**प्रारंभ – शके १९४१ / इ.स. २०१९**

## नित्य स्वरूप

१. भारतातील उपेक्षित समाजगटातील विद्यार्थी व महिलांसाठी अमेरिकेमध्ये निधी उभारणी.
2. JPF Analytics या स्वरूपामध्ये सामाजिक प्रश्नांवर विश्लेषण आणि संशोधन.
३. ५ ते ११ वयोगटातील जगभरातील मुलांसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाचे उपक्रम.
४. ज्ञान प्रबोधिनीद्वारा प्रकाशित पुस्तकांचा इंग्रजी अनुवाद.
5. iBreta - Biomedical क्षेत्रातील संकल्पनात्मक, विश्लेषणात्मक,

## ⟐ ठळक घडामोडी ⟐

१. २०२४मध्ये फाउंडेशनने ५वा वर्धापनदिन साजरा करतानाच एकूण देणग्यांचा आकडा १ दशलक्ष डॉलरच्या पार नेला.
२. ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या लर्न इंडिया मोहिमेतून २०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी $७१,००० (₹ ६०.८ लाख INR) निधी उभारण्यात आला.
3. JPF Analyticsने पुण्यातील कोविड-१९ मृत्यूंवर आधारित संशोधन नेचर या संस्थेच्या 'Scientific Reports' मध्ये प्रसिद्ध केले.
४. सॅन होजे (कॅलिफोर्निया) येथे २७-३० जून २०२४ दरम्यान झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळ संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात फौंडेशनला सन्मानित करण्यात आले.



JPF सदस्यांची प्रबोधिनीतील बैठक



बे एरिया सदस्य मेळावा

२०२४ मध्ये, ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनने दोन महत्त्वाचे टप्पे गाठले; पाच वर्षांचा प्रवास पूर्ण केला आणि एकत्रित देणग्यांचा आकडा १ दशलक्ष डॉलर्स (सुमारे ₹८ कोटी रुपये) च्या पुढे गेला. ग्लोबल नेटवर्किंग (जागतिक संपर्क जाळे), निधीसंकलन, प्रकल्प क्षेत्र समन्वय (ज्ञान प्रबोधिनीचे विविध विभाग, प्रकल्प यांची अद्ययावत माहिती ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनला पोहोचविणारी समिती) या चार प्रमुख समित्यांच्या माध्यमातून फौंडेशनने प्रबोधिनीच्या भारतातील स्थानिक विभागांशी आणि केंद्रांशी असलेला संवाद अधिक दृढ केला आणि संस्थेचा विस्तारही साधला.

## ⟐ ग्लोबल नेटवर्किंग ⟐ (जागतिक संपर्क जाळे)

फौंडेशनच्या जागतिक संपर्कजालामध्ये आता १२ प्रदेश आणि ४ खंडांमध्ये मिळून एकूण १,५२९ सदस्य आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी १९% वाढ झाली. यावर्षी, संघटन गटाने १२९ कार्यक्रम आयोजित केले, ज्यात १,४००हून अधिक सदस्यांनी सहभाग घेतला. बे एरिया कॅलिफोर्नियामध्ये पाचव्या वर्धापन दिनानिमित्त एक नाटकाचा कार्यक्रम झाला. तेथील स्थानिक संस्थेने ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या सहकार्याने हा कार्यक्रम केला. त्याला सुमारे २३० प्रेक्षक उपस्थित होते. याशिवाय एक आभासी मेळावा झाला, त्याला ६१ सदस्य उपस्थित होते.

तसेच, सॅन होजे, कॅलिफोर्निया येथे सुमारे पाच हजार प्रेक्षकांच्या उपस्थितीत



**बाल प्रबोधिनी**

झालेल्या २०२४ च्या बृहन्महाराष्ट्र मंडळ संमेलनाच्या उद्घाटन समारंभात ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचा विशेष सन्मान केला गेला, तसेच ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनचे संपर्क दालन होते. त्याला देणगीदार, मित्र, यांनी भेटी दिल्या. याशिवाय या दालनास आणि ज्ञान प्रबोधिनी पुणेचे कार्याध्यक्ष डॉ. रवी पंडित आणि ज्ञान प्रबोधिनी सोलापूरचे सन्मान्य अध्यक्ष गोविंददेव गिरीजी महाराज यांनी भेटी दिल्या. आलेल्या प्रेक्षकांपर्यंत फौंडेशनची माहिती पोहोचवण्याचे प्रयत्न केले. प्रसार, प्रचार आणि विस्तार यासाठी यांचा नक्कीच उपयोग झाला.

परदेशात शिकायला आलेल्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी चालवण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये २०२४मध्ये लक्षणीय वाढ झाली. आमचा 'व्हॉट्स अप'च्या गटांचा समूह आता ५००हून अधिक विद्यार्थ्यांना आणि मार्गदर्शकांना विविध क्षेत्रांतून जोडतो. व्यवसाय मार्गदर्शन मंचाने (करिअर फोरमने) योजलेल्या तीन आभासी सत्रांमधून ८७ विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व परस्पर संपर्काच्या (नेटवर्किंगच्या) संधी मिळाल्या.

### ◈ निधीसंकलन ◈

निधी संकलन समितीने यावर्षी एकूण २.२६ लक्ष डॉलर्स (सुमारे १.९३ कोटी रुपये) इतक्या देणग्या गोळा केल्या. लर्न इंडिया २०२४ अभियानातून २०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ७१ हजार डॉलर्स (६०.८ लाख रु.) उभे करण्यात आले. शिक्षण, महिलांचे नेतृत्व, ग्रामीण विकास अशा क्षेत्रातील १६पेक्षा अधिक प्रकल्पांना फौंडेशनच्या माध्यमातून मदत करता आली. 'कॉर्पोरेट मॅचिंग' आणि स्थानिक प्रयत्नांमुळे निधी संकलनात मोठा हातभार लागला. आपल्या समर्पित स्वयंसेवकांमुळे, उदार देणगीदारांमुळे आणि शुभेच्छुकांमुळे फौंडेशनने गेल्या ५ वर्षांत ३०हून अधिक प्रकल्पांसाठी १.१५ दशलक्ष डॉलर्सपेक्षा (सुमारे ८ कोटी रुपये) अधिक निधी उभारला.

### ◈ प्रकल्प नियोजन समिती ◈

फौंडेशनच्या प्रकल्प समितीने सहा महत्त्वपूर्ण उपक्रम चालवले.

1. Beyond Language Barriers या इंग्रजी संवादावर आधारित उपक्रमात ३० स्वयंसेवकांनी ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी येथील ७० विद्यार्थ्यांसोबत वर्षभर काम केले.

२. प्रेरणा सेतू या करिअर मार्गदर्शन उपक्रमाच्या दोन शाखा आहेत.

   २.१ अखिल भारतीय कार्यक्रमात ७ राज्यांतील १२५ विद्यार्थ्यांनी १८ सत्रांमध्ये सहभाग घेतला.

   २.२ निगडी व सोलापूर ज्ञान प्रबोधिनीच्या शाळांमधील १५०पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी २५ सत्रांमध्ये सहभाग घेतला.

३. बाल प्रबोधिनी हा अमेरिकेतील मराठी मुलांसाठीचा सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम. त्यामध्ये यावर्षी ३० विद्यार्थ्यांसाठी ४५ सत्रे आयोजित केली. यातून ७,००० डॉलर्स (₹६ लाख INR) पेक्षा अधिक निधी जमा झाला, जो ज्ञान प्रबोधिनी हराळीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी वापरण्यात आला.

JPF च्या Analytics Team ने पुण्यातील कोविड-१९ मृत्यूविषयीचा संशोधन लेख नेचरच्या Scientific Reportsमध्ये प्रकाशित केला. त्यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकांदरम्यान घेतलेल्या लोकशाहीविषयक सर्वेक्षणावर आधारित एक अहवालही प्रसिद्ध केला. IBRETA या उपक्रमाअंतर्गत, ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडीमध्ये जीवशास्त्र अधिक रंजक कसं करता येईल आणि प्रत्यक्ष जीवनाशी कसं जोडता येईल यावर सत्र झाले, तसेच प्रौढ 'ADHD' म्हणजे अतिचंचलता विषयक सत्रही आयोजित झाले.

भाषांतर गटाने प्रबोधिनीच्या ईशान्य भारतातील प्रसार कार्यासाठी अनेक लेख मराठीतून इंग्लिशमध्ये अनुवादित केले. त्याशिवाय दोन पुस्तकांचे भाषांतर करण्याचे काम चालू केले आहे. क्षेत्र नियोजन समितीने (field coordination committee) ज्ञान प्रबोधिनीच्या भारतातील प्रकल्पांशी समन्वय साधून प्रकल्पांची माहिती मिळवली, त्याचा अहवाल लेखनासाठी तर उपयोग झालाच; पण यानिमित्त होणाऱ्या नियमित संवादातून स्थानिक अडचणी समजून घेण्यास मदत झाली.

सप्टेंबर २०२४ मध्ये, फौंडेशनच्या सहविचार समितीमधील आठ सदस्य सिएटल, वॉशिंग्टन येथे दोन दिवसांच्या वार्षिक प्रदीर्घ बैठकीसाठी जमले होते, तर दोन सदस्य आभासी माध्यमातून सहभागी झाले. या बैठकीत फौंडेशनच्या पुढच्या पाच वर्षांची उद्दिष्टे, धोरणे आणि यशाचे मापदंड यावर सखोल चर्चा झाली. २०१९ पासूनचा संस्थेच्या प्रवासाचा आढावाही घेतला गेला.

◈-◈-◈

सविस्तर वार्षिक वृत्त ▶

# ३४. भौगोलिक विस्तार कार्यदिशा (महाराष्ट्र)

प्रारंभ – शके १९१७/इ. स. १९९५

## नित्य काम

१. ज्ञान प्रबोधिनीचा भौगोलिक विस्तार म्हणजे ज्ञान प्रबोधिनीचे काम करू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांचा नवीन गट नवीन गावात सुरू करणे.

२. अशा कार्यकर्त्यांचा गट प्रबोधिनीच्या एका उपक्रमापासून सुरू होऊन अनेक विभागांचे वेगवेगळ्या प्रकारचे व काही वेळा एरवी प्रबोधिनीत कुठेही न चालणारे कामही नव्याने करू लागतो. असा गट जमवणे व त्यांचे नित्य प्रशिक्षण करणे म्हणजे ज्ञान प्रबोधिनीचे विस्तार कार्य.

## संख्यात्मक आढावा

महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी सातारा, सांगली, रायगड, रत्नागिरी, ठाणे, नाशिक, जळगाव, अमरावती, अकोला, संभाजीनगर, लातूर, नांदेड, नागपूर व वर्धा या १४ जिल्ह्यांमध्ये कामाचा विस्तार प्राधान्याने करायचे असे ज्ञान प्रबोधिनीने ठरवले आहे. या १४ पैकी ६ जिल्ह्यांमध्ये आस्थापनेसह प्रबोधिनीचे मुख्य केंद्र पुढील ७ वर्षांमध्ये उभारले जावे, असे प्रबोधिनीचे दहा वर्षांसाठीचे उद्दिष्टच मांडलेले आहे. यासाठी विस्तार कार्यकर्त्यांचे नियमित प्रवास सुरू आहेत.

### ◈ विस्तारासाठी कार्यकर्त्यांची प्रशिक्षणे ◈

१. दि. १२ ते १४ जुलै या तीन दिवसांमध्ये, चिपळूण, अंबाजोगाई, ठाणे, बदलापूर, डोंबिवली, सोलापूर, पौड रस्ता (पुणे), शिरूर व कराड या विविध केंद्रांवरील सुमारे २८ जणांचे प्रशिक्षण वेल्हा येथे असलेल्या प्रबोधिनीच्या वास्तूत निवासी प्रशिक्षण वर्गात झाले, तर प्रशिक्षण देण्यासाठी १२ कार्यकर्ते विविध वेळी सहभागी झाले. उपक्रम केंद्र बनणे, उपक्रम केंद्राचे रूपांतर विस्तार केंद्रात व विस्तार केंद्रांनी मुख्य केंद्र बनणे हा येत्या १० वर्षांसाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे. त्या दृष्टीने हा प्रशिक्षण वर्ग अतिशय उपयुक्त ठरला.

२. पुणे, निगडी, हराळी, सोलापूर, साळुंब्रे, डोंबिवली, चिपळूण, बदलापूर, ठाणे इ. विविध मुख्य केंद्रे, उपकेंद्रे, विस्तार केंद्रे व स्थायी संपर्क केंद्रे येथील एकूण मिळून ७५ हून अधिक कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण दि. २२-२४ नोव्हेंबर या कालावधीत झाले. चालू केंद्रांवर विस्तारासाठी सध्याच्या विभागांद्वारा योजना करणे सुलभ व्हावे हा या प्रशिक्षणाचा हेतू होता.

वरील १४ पैकी ज्या जिल्ह्यांमध्ये वृत्तान्त वर्षात प्रयत्न झाले त्याचे वृत्त प्रशासकीय विभागांनुसार देत आहोत.



**विद्याव्रत संस्कार समारंभ, नाशिक - आयोजक गट**



**विज्ञान प्रदर्शन : गणपती घाट, वाई**

### ◈ पुणे विभाग –सातारा जिल्हा ◈

१. **कराड** – येथे विद्याव्रताच्या पूर्वतयारीसाठी ३० मुलांचे मैत्री शिबिर झाले. हे शिबिर पूर्णतः स्थानिक गटाने योजले होते. शिक्षण संपवून पुढे कामाला लागलेल्या पाच युवकांसाठी वीरव्रताची मांडणीही या वर्षात सुरू झालेली आहे. विविध शाळांमध्ये निवडक संपर्क झालेले असून, काही प्रासंगिक प्रशिक्षणे योजण्यात आली.

२. **वाई** – ज्ञान प्रबोधिनी युवक विभाग, पुणे येथील एकूण ३० जणांनी मिळून एकूण ३१ दौरे वाई गावात ह्या वर्षी झाले. यापैकी ८ दौरे निवासी झाले तर २३ दौरे अनिवासी झाले. वृत्तांत वर्षाच्या सुरुवातीला तेथील स्थानिक १० कुमारांची राजगड येथे सहल झाली. सप्टेंबर महिन्यात २० विद्यार्थ्यांनी सुमारे २-३ आठवड्यांच्या प्रशिक्षणानंतर विज्ञान प्रदर्शन भरवले. त्यात ३०० हून अधिक प्रेक्षक येऊन गेले. स्थानिक युवक समीहन देशपांडे याने अनेकवेळा स्वतः पुढाकार घेत पागा तालमीच्या मैदानावर पाक्षिक दल घेतले. या दलाला सरासरी १० जणांची उपस्थिती आहे.

३. **सातारा** – साताऱ्यातील हिंदवी गुरुकुलाशी प्रबोधिनीतील निगडीच्या गुरुकुलाचे हृद्य संबंध तयार झाले असून, गुरुकुलाचे आदर्श समोर ठेवून आपली शैक्षणिक रचना उभी करण्यासाठी हे गुरुकुल प्रयत्नरत आहे. या प्रयत्नांमध्ये निगडीहून कार्यकर्ते अध्यापक नियमितपणे योगदान देत आहेत. गणेशोत्सवाच्या काळात हिंदवी गुरुकुल आणि DES संस्था अशा दोन मिरवणुका साताऱ्यात झाल्या. त्यात निगडी युवक विभागाचे बरची पथक (४० शालेय, ९० महाविद्यालयीन) सहभागी झाले होते.

### ◈ जळगाव व नाशिक जिल्हे ◈

१. **जळगाव–** जळगाव जिल्ह्यात श्री. ओंकारदादा बाणाईत यांचे प्रवास मागील वृत्तांत वर्षाच्या अगदी शेवटी शेवटी पार पडले. चोपडा, अंमळनेर, जळगाव, सावदा, खिरोदा इ. ठिकाणी दादांच्या भेटी झाल्या. वर्षभरात संपर्क चालू राहिल्यामुळे, चोपडा येथील समाजशास्त्र पदविकेचे २७ विद्यार्थी प्रबोधिनीच्या पुणे केंद्राला फेब्रुवारी महिन्यात भेट देऊन गेले.

२. **नाशिक –** विद्याव्रत गट – नाशिकमध्ये मुख्य काम म्हणजे स्थानिक संयोजकांचा एक गट तयार होऊन त्यांनी वर्षभराच्या विद्याव्रत कार्यक्रमाची योजना केली. प्रबोधिनीतील विविध कार्यकर्त्यांच्या अनुभवकथनातून गुरुकुल (निगडी), वेल्हा–किशोरी विकास, डोंबिवली अशा विविध ठिकाणी विद्याव्रत कसे होते हे गटाने समजून घेतले. 'माझे आरोग्य माझी जबाबदारी', 'माझा अभ्यास माझी जबाबदारी', 'माझ्या भावना माझी जबाबदारी', 'माझा निसर्ग माझी जबाबदारी', 'माझं समाजभान माझी जबाबदारी' ही पाच–सहा सूत्रवाक्ये व 'या सगळ्यांचं विकसन हेच माझं विद्याव्रत – यातूनच घडणार आहे माझं चारित्र्य' असा बोध होईल अशा प्रकारे सत्रांचे नियोजन केलेले होते. ह्या सत्रांशिवाय योजलेल्या निवासी शिबिरात आकाशनिरीक्षण, जैवविविधता पाहणी इ. अनेक सत्रे योजली होती. मुलांनी डिसेंबर महिन्यात विक्री उपक्रम केले. कमीतकमी एक हजार ते १५–१६००० रुपये इथपर्यंतची उलाढाल मुलांच्या ५ गटांनी केली.

सर्वात शेवटी विद्याव्रत सप्ताह योजून पोथीचे प्रशिक्षण / सराव करणे व नंतर वर्षभर जे शिकलो त्यावर काही तक्ते तयार करणे अशी प्रक्रिया झाली. वर्षभरात २–३ वेळा पालकसभा होऊन मुलांच्या प्रगतीविषयी पुरेशा चर्चा झाल्या. मुलांसाठी योजलेल्या नाशिक शहरातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींपर्यंत या गटाचे काम पोचले व एका संस्थेद्वारे गटाचा सत्कारही झाला.

३. या शिवाय नाशिक जिल्ह्यात चांदवड, पिंपळगाव बसवंत, त्र्यंबक, पेठ, सिन्नर अशा विविध तालुक्याच्या ठिकाणांच्याही वर्षभरात भेटी झाल्या. दोन महाविद्यालयांमध्ये भौतिकशास्त्राचे प्रशिक्षणही देण्यात आपला सहभाग होता.

### ◈ मुंबई विभाग –रायगड जिल्हा ◈

१. **रोहा –** रोहा येथे श्री. ओंकारदादा बाणाईत यांचे नियमित प्रवास होऊन विकास मित्र प्रकल्प अतिशय सुनियोजित पद्धतीने चालू होता. शिक्षण विस्ताराच्या औपचारिक कामाच्या जोडीला गावांमध्ये प्रबोधिनी पोचावी म्हणून मातृभूमिपूजनाचे १७ कार्यक्रम ११ संस्थांच्या १४ विविध शाळा व एका महाविद्यालयामध्ये मिळून योजण्यात आले. या सर्व कार्यक्रमांमध्ये मिळून साधारण १५०० इतकी उपस्थिती होती

२. **रोहा सोडून उर्वरित भाग** – यावर्षी गोवा, रत्नागिरी, ठाणे या ठिकाणी मातृमंदिर विश्वस्त संस्थेच्या वतीने समूहगायन स्पर्धा घेण्यात आली. यानिमित्ताने सुमारे २५ शाळांशी संपर्क झाला. रत्नागिरी येथील कै. भाऊराव जोग गुरुकुल येथे संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते. संस्थेचे सुमारे ५० अध्यापक, संस्थाचालक यावेळी उपस्थित होते.

### ◈ नागपूर विभाग – नागपूर जिल्हा ◈

दि. १४ ते १७ नोव्हेंबर २०२४ या चार दिवसांमध्ये शुभंकर केळकर व हृषीकेश कुलकर्णी नागपूरमध्ये विस्ताराच्या दृष्टीने प्राथमिक भेटी करण्यासाठी गेले होते. या ४ दिवसांत एकूण १६ व्यक्तींच्या भेटी झाल्या व ३ ठिकाणी क्षेत्रभेट झाली. सामाजिक काम करणाऱ्या व्यक्ती, उद्योजक, प्रशासकीय अधिकारी, शाळा व शाळांचे अध्यापक, प्राचार्य, संचालक अशा विविध व्यक्तींच्या भेटी घेतल्या व त्यांचे काम समजून घेतले, प्रबोधिनीच्या कामाचा व विस्ताराचा उद्देश सांगितला.

### ◈ अमरावती विभाग – अमरावती जिल्हा ◈

मातृमंदिर विश्वस्त संस्थेतर्फे आयोजित विविध स्पर्धांच्या निमित्ताने शाळांशी संपर्क होतो. तसे या वेळी विस्तार कार्यकर्त्यांनीही समूहगान स्पर्धेसाठी परीक्षकांच्या गटात सहभागी होऊन प्रवास केला. अमरावती जिल्ह्यातील विस्तार प्रवासात विरुळ, धामणगाव, चांदूर रेल्वे, पिंपरी थुगाव, मोझरी, काटपूर ही गावे व अमरावती शहरातील अनेक शाळांना भेटी झाल्या. अमरावतीमध्ये प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते कै. विवेकराव पोंक्षे यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन अनेक प्रयोग करत असलेली शाश्वत कन्सेप्ट स्कूल या शाळेमध्ये वर्षात तीन वेळा भेटी झाल्या व चार दिवसांचा विज्ञानातील संशोधनात्मक प्रकल्पांसाठीचा प्रशिक्षण वर्ग योजण्यात आला.

### ◈ लातूर, नांदेड व छ. संभाजीनगर जिल्हे ◈

१. लातूर शहरातील प्रबोधिनीच्या संपर्कातील जुन्या व्यक्तींना भेटणे, संपर्कात नवीन भर घालणे, नवीन उपक्रम सुरू करणे अशा दृष्टीने गेल्या वर्षभरात हराळी केंद्रावरून तीन कार्यकर्ते वर्षभरात ५ वेळा जाऊन आले. विविध शाळांमध्ये संपर्क साधणे, प्रतिसादी शाळा कोणत्या हे पाहणे, असे करून मग त्या शाळांमध्ये काही सत्रे योजनापूर्वक घेणे असे काम या वर्षात झाले.

२. लातूरचे प्रथितयश उद्योजक श्री. आशिष बेळंबे, हे पुण्यातील शाळेचे पालक. आपल्या जन्मभूमीत काही प्रबोधिनीपण निश्चितपणे पोचावे यासाठी तळमळीने ते काम करतात. त्यांच्या आग्रहावरून प्रबोधिनीने अनेक शाळांमधील शिक्षकांसाठी एकत्रितपणे विज्ञान अध्यापन, प्रकल्प–प्रशिक्षण व वाचन कौशल्ये इ. विषय प्रशिक्षणाद्वारे पोचवले.

३. नांदेड जिल्हा येथे सप्टेंबरमध्ये एक दौरा झाला. या दौऱ्यात विविध शाळांमध्ये पूर्वी असलेल्या प्रबोधिनीच्या संपर्कांना उजाळा देणे, विविध संस्थांमध्ये सध्या काय काम चालते असे समजून घेणे, प्रबोधिनीकडून काय काम होऊ शकते याबद्दल चाचपणी करणे अशांसाठी व्यक्तिभेटी झाल्या.

◈-◈-◈

## ३५. सीमावर्ती राज्यांतील विस्तार

**प्रारंभ – शके १९०२/ इ.स.१९८०**

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### नित्य स्वरूप

१. काम चालू असलेली सीमावर्ती राज्ये – आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, छत्तीसगड, जम्मू-कश्मीर लडाख.

२. ज्ञान प्रबोधिनीचा शैक्षणिक व संघटनात्मक विस्तार या राज्यांमध्ये वाढावा यासाठी काम चालू.

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇

### संख्यात्मक आढावा

स्पर्धा परीक्षा केंद्राद्वारे मार्गदर्शन

(अरुणाचल प्रदेश व आसाम)

APPSC (Prelims) : ४० विद्यार्थी

APPSC (Mains) : ३० विद्यार्थी

UPSC (Prelims) : ३० विद्यार्थी

Co-Apt Test : १६९ विद्यार्थी

१. विविध प्रशिक्षण व नेतृत्व कार्यशाळा – १०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग.

२. **छोटे सायंटिस्ट** : विद्याभारती, जातीय विद्यालय, VKSPV, सेवाभारती : १९३ शिक्षक, १७० शाळा, १७,३०० विद्यार्थी

**३. ज्ञानसेतू** – आसाम, अरुणाचल, छत्तीसगड, जम्मू-काश्मीर-लडाख येथे दौरे, स्वयंसेवक : १७१, शाळा : १८४, विद्यार्थी : १५,१६५

◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇◇



**अरुणाचल प्रदेश : स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन**

**प्रतिसाद**

मणिपूरमध्ये तणावपूर्ण परिस्थितीतही ज्ञान प्रबोधिनीच्या उपक्रमांनी स्थानिक विद्यार्थ्यांशी घट्ट भावबंध निर्माण केले. सैनिकी तणावाच्या वातावरणात ''आप महाराष्ट्र से इतने दूर क्यों आये हो?'' असा प्रश्न सैनिकांनी विचारला, तरी शिक्षण व संस्काराच्या कार्याची धडपड थांबली नाही.

दि. १८ एप्रिल २०२४ रोजी प्राथमिक शाळेच्या उपासना मंदिरात 'मणिपुरी विद्यार्थी भावबंध कार्यक्रम' पार पडला. यात विद्यार्थ्यांनी मणिपुरी नृत्य, वाद्यवृंद सादरीकरण, योग, दोरीवरील क्रीडा व विज्ञान-गणित प्रयोगांद्वारे कौशल्यांची ओळख करून दिली. 'सागरा प्राण तळमळला' गीत व 'सेतू बांधा रे' नृत्यनाट्याने राष्ट्रभक्तीचा संदेश दिला. सहनिवासातील दैनंदिन दिनक्रमात विज्ञान, गणित, इंग्रजी, संगीत, बुद्धिबळ, फुटबॉल, योग, जलतरण व संगणक प्रशिक्षण यांचा समावेश होता. जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत विद्यार्थ्यांनी १५ वर्षांखालील गटात ७ विरुद्ध ३ असा विजय मिळवून सोलापूर जिल्ह्यात आपला ठसा उमटवला.

आपल्या संस्कृतीशी एकरूप होण्यासाठी विशेष उपक्रम झाले. रक्षाबंधनाला मणिपुरी विद्यार्थ्यांनी पुण्यातील विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन कौटुंबिक स्नेहबंध अनुभवले. दिवाळीत गृहनिवास योजनेतून त्यांनी भारतीय सणांची आपुलकी अनुभवली.

या सर्व प्रयत्नांमुळे मणिपुरी विद्यार्थ्यांना शिक्षण, संस्कार, खेळ व संस्कृतीचा समृद्ध असा अनुभव मिळाला. मणिपूरमध्ये तणावपूर्ण वातावरण असूनही शिक्षण, संस्कृती व राष्ट्रीय एकात्मतेचा सेतू बांधण्यात यश आले.

**- अनंत अल्लिशे, सहनिवास प्रमुख, सोलापूर केंद्र**

### ◇ मणिपूर ◇

वृत्त वर्षात हैरोक, मची, तामेंलोंग, कांगकोक्पी येथे दूरस्थ शिक्षण व संगणक प्रशिक्षण केंद्रे उभारणी झाली.

- तामेंलोंग – ३ संगणक वर्ग, – ५० विद्यार्थी
  ७ स्थानिक समन्वयकांचा पुणे दौरा झाला.
  cultural documentation – ३ समन्वयक
- कांगकोक्पी – १ संगणक वर्ग – २० विद्यार्थी
- कांगकोक्पी – २ शाळांमध्ये ज्ञानसेतु उपक्रम झाला.
- मणिपूर राज्य समन्वयक गट – ७ सदस्य कार्यरत
- मणिपूर राज्य विस्तारित गट – ४० सदस्य कार्यरत

१९ शालेय विद्यार्थी सोलापूर सहनिवासात दाखल; योग, विज्ञान, गणित, संगीत, क्रीडा प्रशिक्षण सुरू. सहनिवासातील मुलांचे क्रीडा स्पर्धांमध्ये राज्य व जिल्हास्तरीय यश. सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमांत सक्रिय सहभाग. सोलापूर सहनिवासातील विद्यार्थी पुण्यातील विद्यार्थ्यांच्या घरी राहून गेले.

### ◇ छत्तीसगड ◇

रायपूर छत्तीसगड येथील 'नेतृत्व साधना केंद्र संस्थेच्या ९१ विद्यार्थ्यांची CoApt चाचणी झाली आणि त्यांचे गटात समुपदेशन सुरू आहे (४६ जणांचे पूर्ण किंवा ते अधिकारी झाले). बस्तर, बीजापूर, गीदम, बालोद, धमतरी या ठिकाणी विज्ञान कार्यशाळा घेण्यात आल्या. वनवासी कल्याण आश्रमास भेट; स्थानिक मुलांमध्ये विज्ञान प्रयोग, गणित खेळ, कला व संवादाद्वारे सांस्कृतिक देवाणघेवाण झाली.








● Cultural Documentation, RIWATCH ● स्पर्धा परीक्षा केंद्र मार्गदर्शन वर्ग ● स्पर्धा परीक्षा केंद्र मार्गदर्शन वर्ग

## ◈ अरुणाचल प्रदेश व आसाम ◈

१. **सांस्कृतिक दस्तऐवजीकरण** (Cultural Documentation) - अरुणाचल प्रदेशातील रोईंग, तवांग आणि तेजू या ठिकाणी सांस्कृतिक दस्तऐवजीकरण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या. स्थानिक तरुणांनी smartphone चा वापर करून आपल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे दस्तऐवजीकरण आणि प्रसार करावा या हेतूने या कार्यशाळा घेण्यात आल्या. रोईंग येथे RIWATCH, तवांग येथे All Mompa Students Union, तर तेजू येथे करुणा ट्रस्ट या स्थानिक संस्थांच्या साहचर्याने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. आसाममधील दिब्रुगढ येथे शिक्षा व्हॅली शाळेतील शिक्षकांसाठी असे प्रशिक्षण घेण्यात आले. चारही कार्यशाळांमध्ये मिळून १४० जणांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला

अरुणाचल प्रदेश सिव्हिल सर्व्हिसेस (APCS) होममध्ये श्री. अजय तामांग यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक युवकांना प्रशिक्षण दिले गेले.

2. **APPSC मार्गदर्शन कार्यक्रम** – स्पर्धा परीक्षा केंद्र

२.१ अरुणाचल प्रदेशमध्ये पूर्व भागात रोइंग येथे RIWATCH या संस्थेत APPSC पूर्व परीक्षेसाठी १८ विद्यार्थी संख्येचा निवासी आणि पश्चिम भागात तवांग येथे २२ विद्यार्थी संख्येचा असे प्रशिक्षण वर्ग झाले. या ४० विद्यार्थ्यांपैकी RIWATCH मधील ७ विद्यार्थी पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाले. पुण्यातून एकूण १४ शिक्षकांनी यामध्ये योगदान दिले.

2.2 **APPSC मुलाखत तयारी मार्गदर्शन** – APPSC मुख्य परीक्षेतील ३० विद्यार्थ्यांपैकी ७ जण मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. एकूण १७ विद्यार्थ्यांसाठी मुलाखत तयारीचा वर्ग झाला. ९ जणांची अधिकारी म्हणून निवड झाली आहे.

**2.3 Online UPSC Prelims मार्गदर्शन :** जानेवारीपासून सुरू झालेल्या या उपक्रमात एकूण ११२ जण अरुणाचल, जम्मू काश्मीर, आसाम, मणिपूर, छत्तीसगडच्या विविध भागातून सहभागी असून ३० विद्यार्थी नियमित सराव परीक्षा देत होते.

२.४ अरुणाचल प्रदेशच्या ९ विद्यार्थ्यांची पुण्यात आणि ७ विद्यार्थ्यांची दिल्लीत CoApt चाचणी झाली.

३. प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे रोईंग व तेजू येथे इ. १०वी झालेल्या २०० विद्यार्थ्यांची कलचाचणी व समुपदेशन घेण्यात आले.

## ◈ जम्मू-काश्मीर ◈

१. **ज्ञानवाहिनी :**

सहभागी संस्था : ज्ञान प्रबोधिनी (JP), जम्मू-काश्मीर नॉलेज नेटवर्क (JKKN), शालेय शिक्षण विभाग (SED).

उद्दिष्ट : जम्मू आणि काश्मीरमधील इ ९वी ते १२वी मधील विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन सत्रे घेतली.

प्रकार : आठवड्यातून दोन सत्रे

(एक जम्मूसाठी, एक काश्मीरसाठी).

विषय : स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण संधी, Design अभियांत्रिकी, वाणिज्य इ. २२ जिल्ह्यांतील २०० शाळांमधील ३,००० विद्यार्थी सहभागी.

२. **डिजिटल साधने व सामग्री निर्मिती :** चित्रपट निर्मिती, व्हाईटबोर्ड ॲनिमेशन, व्हिडिओचे प्रकार, मोबाईलवर चित्रफिती संपादन, जिओजेब्रा, PhET सिम्युलेशन, कंटेंट लायसेंसिंग असे प्रशिक्षणाचे विषय होते.

३. **प्रगत शैक्षणिक तंत्रज्ञान :** ऑगमेंटेड रिॲलिटी (AR), व्हर्च्युअल रिॲलिटी (VR), शैक्षणिक व्हिज्युअल नॉव्हेल्स, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) असे विषय हाताळण्यात आले.

४. **शैक्षणिक नवकल्पना–** किशोरावस्थेचे आकलन, Foundational Literacy Numeracy (FLN), वर्कशीट तयार करणे, संकल्पना शिकण्यासाठी आणि मूल्यमापनासाठी गेमिफिकेशन, वेब आधारित व ॲप आधारित गेमिफिकेशन (खेळ व शैक्षणिक व्हिडिओ तयार करणे) अशा संकल्पनांवर काम करता आले.

५. **व्हर्च्युअल किऑस्क शाळा-शाळांत बसविणे व प्रशिक्षण** – २० पेक्षा अधिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित. टीचर मास्टर ट्रेनर्स तयार. एका शाळेमध्ये हर्च्युअल किऑस्क, एका शाळेमध्ये व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) प्रयोगशाळा बसविण्यात आली. मनकोट येथे शिक्षक प्रशिक्षण घेण्यात आले.

◈-◈- ◈

# सन्माननीय देणगीदार

## सन २०२४-२०२५

- ज्ञान प्रबोधिनीच्या अनेक हितचिंतकांनी सन २०२४-२०२५ मध्ये देणग्या दिल्या आहेत. जागेअभावी रु. १०,०००/- वरील दात्यांचीच नावे पुढील यादीत समाविष्ट केली आहेत. रु. १०,०००/- पर्यंतच्या देणग्यांची एकूण वार्षिक रक्कम रु. २६,८५,२५१ इतकी असून ११८८ दात्यांनी ही रक्कम दिलेली आहे. रु. १०,००० पेक्षा अधिक देणगीदारांची यादी पुढे दिली आहे. १० हजार ते १ लक्ष रुपयांपर्यंतच्या देणगीदारांची नावे त्या-त्या गटात अकारवेल्हे दिली आहेत. व रु. एक लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या देणगीदारांची नावे देणगीच्या रकमेनुसार दिली आहेत, यामध्ये निगडी केंद्राचा समावेश आहे. या सर्वांविषयी आम्ही मनःपूर्वक कृतज्ञ आहोत.
- अनवधानाने एखादे नाव राहिले असल्यास त्याबद्दल क्षमाप्रार्थी आहोत. ज्या व्यक्तींनी दि. १ एप्रिल २४ ते ३१ मार्च २५ या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा देणग्या दिल्या आहेत, त्यांची रक्कम शक्यतो एकत्रित दर्शविली आहे. यासंबंधी आपल्या काही शंका अथवा सूचना असल्यास आपण ज्ञान प्रबोधिनीच्या मध्यवर्ती लेखा कार्यालयात ०२०-२४२०७२२९ या क्रमांकावर संपर्क साधावा. ज्ञान प्रबोधिनीच्या संलग्न न्यासांना दिलेल्या देणग्यांचा उल्लेख त्या-त्या न्यासाच्या वृत्तात स्वतंत्रपणे केला जाईल.
- गेल्या आर्थिक वर्षातील सर्व देणग्यांची एकूण रक्कम रु. १८,१०,३६,२८६/- इतकी आहे.

### रु. १०,००० प्रत्येकी

१. आपटे जयश्री
२. उटगीकर अविनाश
३. करंदीकर उर्मिला
४. करंदीकर भूषण
५. कलाटे रोशनी
६. कानेटकर ज्योती
७. काळे विनित
८. कुलकर्णी नरेंद्र
९. खोत सचिन
१०. गाडगीळ नंदिता
११. गावनर अमोल
१२. गोस्वामी महेश
१३. गोळे मानसी
१४. गोळवलकर नितीन
१५. चावरे समीर
१६. जगताप रवींद्र
१७. जोशी अद्वैत
१८. जोशी अद्वय
१९. जोशी माधव
२०. डेंगवेकर अभिजीत
२१. डॉ. गायकवाड शीतल
२२. डॉ. गोडबोले सुनील
२३. डॉ. पाटील वैशाली
२४. डॉ. म्हात्रे सुवर्णा
२५. डॉ. रायते नीरज
२६. डॉ. वाळिंबे अमित
२७. तुळापूरकर सुनिती
२८. दामले कपिल
२९. दिवाण बन्सीधर
३०. दिघोलकर शीतल
३१. देशपांडे योगेश
३२. नातू वर्षा
३३. पगारिया श्रेयस
३४. पत्की प्रतीक
३५. पटवर्धन अलका
३६. पाध्ये आनंद
३७. पाटणकर चैतन्य
३८. पाटील कुणाल
३९. पाटील राहुल
४०. पोटे पद्मजा
४१. प्रधान संजय
४२. फडके मयुरेश
४३. फडके विवेक
४४. बर्वे अविनाश
४५. बाबर वैशाली
४६. भागवत किशोर
४७. भागवत हृषीकेश
४८. मराठे अतुल
४९. मुन्शी मालिनी
५०. मेहता शिरीन
५१. रायकर सुधीर
५२. राव शुभांगी
५३. लुंकड आनंद
५४. वाटवे सुरेंद्र
५५. वाळे अरूण
५६. शहापूरकर अनिरुद्ध
५७. शिंदे विमल
५८. साठे चिंतामणी
५९. सावंत ज्ञानेश्वर
६०. सुगंधी विशाल
६१. सोमण आदित्य
६२. हर्डीकर श्रावण

### रु. १०,००१ ते २०,०००/-

१. अदवंत वृषाली
२. आळेकर शुभदा
३. एदलाबादकर अतुल
४. कर्डिले राजेश
५. करंदीकर आदित्य
६. कामठे वंदना
७. कामत प्रत्युमा
८. कानडे सागर
९. कुलकर्णी मनीषा
१०. कुलकर्णी मीनल
११. कुलकर्णी रंजना
१२. खांदवे विनायक
१३. खरे शिरीषा
१४. खापरे जागृती
१५. खोत वैभव
१६. गरदाडे तात्यासाहेब
१७. गावस्कर दिवाकर
१८. गुप्ता प्रशांत
१९. गोखले रश्मी
२०. गोखले धनंजय
२१. गोडबोले श्रीराम
२२. गोंधळेकर बी. एम.
२३. घाटपांडे संज्योत
२४. घावटे विश्वास
२५. चितळे अपर्णा
२६. चितोडकर अनिकेत
२७. जोशी एन. व्ही.
२८. जोशी अनंत
२९. जोशी मनोहर
३०. जोशी प्रसाद
३१. जोशी राहुल
३२. जोशी सौमित्र
३३. डॉ. देसूरकर विनायक
३४. डॉ. संगमनेरकर राधा
३५. दाते निरामय
३६. दाढे सुनील
३७. देवधर विद्यानंद
३८. देशमुख सौरभ
३९. देशकुलकर्णी विश्वनाथ
४०. धर्माधिकारी राजेश
४१. नांगरे राहुल
४२. पटवर्धन वनिता
४३. परांजपे अमर
४४. परांजपे उमा
४५. पवार सुशांत
४६. पळसकर गिरीश
४७. पानसरे बाळकृष्ण
४८. पारखी आनंद
४९. पालकर अनिल
५०. पुराणिक माधव
५१. पेठकर मनाली
५२. पै नीरज एन.

५३. पोंक्षे राघवेंद्र
५४. प्रधान निनाद
५५. फडके आसावरी
५६. फणसीकर प्राची
५७. बागले लखन
५८. भगत स्वाती
५९. भिडे अजित
६०. भोंडवे दीपक
६१. मांडके अपर्णा
६२. मुसळे माधव
६३. मेनकर सुचेता
६४. मेहेर सिद्धेश
६५. मुळ्ये जयंत
६६. रणदिवे सलील
६७. राणे चारुदत्त
६८. लिमये अभय
६९. लेले रेखा
७०. वाणी राहुल
७१. विश्वनाथन उमा
७२. विभूते यशोदीप
७३. व्यास प्रशांत
७४. सिंगवी पुनमचंद उत्तमचंद
७५. सोहोनी मयुरेश
७६. शहा जान्हवी
७७. श्री आणि श्री उद्योग

## रु. २०,००१ ते ३०,०००/-

१. कसबेकर अखिलेश
२. कानडे तुषार
३. कुलकर्णी धनंजय
४. कुलकर्णी सागर
५. कुलकर्णी श्रीपाद
६. कुंटे अंजली
७. कोठाळे कल्पेश
८. खरे स्मिता
९. गडीकर विनय
१०. गद्रे अमित
११. गांधी समीर
१२. गाडगीळ अमित
१३. गोखले अजित
१४. गोखले संजीव
१५. गोडबोले अमित
१६. घळसासी सुबोध
१७. चावरे स्मिता
१८. चावरे संजय
१९. चांदेकर आदित्य
२०. चिकणे सोपान
२१. चिपळूणकर शर्मिष्ठा
२२. चुटके विनय
२३. चंकेश्वरा अनिता
२४. डॉ. कुर्लेकर उत्क्रांत
२५. डॉ. गोरे सतीशचंद्र
२६. डॉ. गोडबोले गिरीश
२७. डॉ. गांधी सचिन
२८. डॉ. नायर हेमंत
२९. डॉ. मोघे मृणालिनी
३०. डॉ. वैद्य प्रद्युम्न
३१. डॉ. शेलगीकर किशोर
३२. डॉ. क्षीरसागर सचिन
३३. दर्प मिलिंद
३४. दलाल प्रतिभा
३५. दांडेकर दिलीप
३६. देवळेकर मेधा
३७. देशमुख धनंजय
३८. देशपांडे तुषार
३९. धर्माधिकारी राहुल
४०. नवरे अमेय
४१. निकम विशाल
४२. निंबाळकर सुनील
४३. पटवर्धन युतिका
४४. पालशेतकर अविनाश
४५. फडके सुरेखा
४६. फाटक संजीवनी
४७. बर्वे संजय
४८. बाठे मनीषा
४९. बोकील चैतन्य
५०. बोधनी धनश्री
५१. बोल्ली अभिषेक
५२. भालेकर शरद
५३. मोडक गौरव
५४. राजहंस नितीन
५५. रास्ते नीलिमा
५६. लिमये अभिजित
५७. वाले अरविंद
५८. शिंदे गोपाळ
५९. शेटे अजित
६०. शेंडे उत्कर्षा
६१. सहस्रबुद्धे माधवी
६२. सहस्रबुद्धे विद्याधर
६३. सेठिया महेंद्र
६४. सोनवणे प्रशांत
६५. हांडे संगीता

## रु. ३०,००१ ते ५०,०००/-

१. आपटे रवींद्र
२. आवटे किरण
३. आवटे रवी
४. ओंकार बाणाईत
५. कामठे विक्रम
६. कासट रमेश
७. कुलकर्णी यशश्री
८. केळकर आदित्य
९. कोतवाल प्रशांत
१०. चौधरी वैशाली
११. जयस्वाल सोनाली
१२. जोगळेकर अतुल
१३. जोगळेकर ऋतुजा
१४. ठाकूरदेसाई सुरेंद्र
१५. डॉ. जोशी अश्विनी
१६. डॉ. केळकर धनंजय
१७. डॉ. गुजराथी आदिती
१८. डॉ. गुप्ता रसिका
१९. डॉ. पेठे निनाद
२०. डॉ. मोडक मिलिंद
२१. डॉ. रहाळकर जयेश
२२. तारकुंडे अभिजित
२३. देव मधुरा
२४. देवगावकर मंदार
२५. धाकड धीरज
२६. निंबाळकर रुपाली
२७. देवेंद्र मेटल्स आणि जनरल स्टोअर्स
२८. पटवर्धन आरती
२९. पत्के सुधीर
३०. पुरोहित किरण
३१. प्रबोधिनी स्केटिंग क्लब
३२. फडके अमित
३३. बडवे सत्यजित
३४. बेहेरे उन्नती
३५. बोडस योगेश्वर
३६. मुळिक प्रीती
३७. यादव राकेश
३८. रामटेके उमेश
३९. लेले आनंद
४०. वर्धा स्वाती
४१. वाटवे प्रकाश
४२. वाळे सदाशिव
४३. विसे सुवर्णा
४४. शुक्ला केदार
४५. शंकर मांडरे
४६. साठे हृषिकेश
४७. सोहोनी गुरुदत्त

## रु. ५०,००१ ते ९९,९९९/-

१. अदवंत बिपिन
२. अनुप मोअर सोशल अँड स्पोर्ट्स फाउंडेशन
३. आठल्ये जयंत
४. उपाध्याय अर्जुन
५. कणसे उमेश
६. काशीकर नीलेश
७. किर्वे हर्षा
८. कुंटे/औरंगाबादकर मृणालिनी
९. कुलकर्णी विश्वनाथ
१०. कुलकर्णी हृषीकेश
११. खेचा अनिल कुमार
१२. खैरनार प्रशांत
१३. गिरिधारी विवेक
१४. गोडबोले प्रज्ञा
१५. घाटे प्रकाश
१६. डॉ. कर्णे स्वप्नील
१७. थोरात निर्मलचंद्र
१८. देशमुख किशोर
१९. पटवर्धन विवेक
२०. पटवर्धन स्वानंद
२१. परांजपे मंगेश
२२. परांजपे सीमा
२३. पाटील पराग

२४. पारखी वामन
२५. पिंपुडे शिवराज
२६. प्रभुदेसाई अपूर्वा
२७. प्रभुदेसाई पूर्वा
२८. पैठणकर जितेंद्र
२९. फाळके अमोल
३०. भगत विजय
३१. भगत सचिन
३२. माने स्मिता
३३. राजपूत अभिश्री
३४. राणे निलेश
३५. राव सीमा
३६. रेलकर अंजली
३७. लवळेकर अनघा
३८. वैद्य प्रिती
३९. सुसर समाधान

## प्रत्येकी रु. १,००,०००/-

१. कामठे अशोक
२. काळे हेमलता
३. कुलकर्णी सुलभा
४. केसकर धनंजय
५. गुजर संपत
६. घाणेकर राजेंद्र
७. घुगरी माधव
८. चिपळूणकर सई
९. चिपळूणकर रेखा
१०. टिळक वसुधा
११. डॉ. उपाध्ये मुकुंद
१२. डॉ. गोडबोले आरसीए
१३. डॉ. घोरपडे अश्विनी
१४. द्रविड अरुण
१५. बोडस मोहना
१६. मरगळे अनंता
१७. महाकाळ मोनिका
१८. लवळेकर अनिश
१९. लिमये यशवंत
२०. लिमये शीला
२१. साने मीना
२२. साठे सुहासिनी

## रु. १,००,००१/- व पेक्षा अधिक

| | | |
|---|---|---|
| १. | ले. कर्नल अभ्यंकर एस एम | १,००,००१ |
| २. | आठवले महेश | १,००,००१ |
| ३. | इनामदार अपूर्व | १,००,००१ |
| ४. | दळवी नम्रता | १,००,००१ |
| ५. | करंदीकर हेमंत | १,०५,००० |
| ६. | कुलकर्णी प्रफुल्ल | १,१०,००० |
| ७. | राव आनंद | १,१०,००० |
| ८. | कानडे नंदकुमार | १,१०,००१ |
| ९. | गोडबोले मंदार | १,११,००० |
| १०. | लिमये अर्णव | १,११,३५० |
| ११. | देशमुख शिरीष | १,२१,००० |
| १२. | देशपांडे अनुज | १,२१,२०२ |
| १३. | मेहता शलाका | १,२१,७२७ |
| १४. | गोखले-गोडबोले आभा | १,५०,००० |
| १५. | मिरजकर विभाकर | १,६०,००० |
| १६. | बापट गिरीश | १,८१,००० |
| १७. | करंदीकर रमेश | २,००,००० |
| १८. | चांदोरकर शशांक | २,०७,००० |
| १९. | जोशी रवींद्र | २,५०,००० |
| २०. | पटवर्धन मिलिंद | २,५६,००५ |
| २१. | वाघमारे दीप्ती | ३,००,००० |
| २२. | पाटील सुरेंद्र | ३,००,००० |
| २३. | कुलकर्णी विजय | ३,०७,००० |
| २४. | शिंदे शंकर | ३,५०,००० |
| २५. | फाटक मृणालिनी | ४,००,००० |
| २६. | गाडगीळ सचिन | ४,५५,२३४ |
| २७. | सेवक गायत्री | ४,७५,००० |
| २८. | गुजराथी मोहन | ५,००,००० |
| २९. | संत मिलिंद | ५,५१,००० |
| ३०. | इनामदार प्रभावती | ८,००,००० |
| ३१. | गुजराथी नलिनी | ९,००,००० |
| ३२. | देसाई चंद्रशेखर | १०,००,००० |
| ३३. | घैसास स्वाती | १०,००,००० |
| ३४. | घैसास अमित | ११,००,१०१ |
| ३५. | देशमुख नरेंद्र | ११,२५,१०० |
| ३६. | गोगटे आशा | १५,००,००० |
| ३७. | थत्ते ललिता | १५,००,००० |
| ३८. | केळकर लता | २०,००,००० |
| ३९. | चितळे दत्तात्रय | २०,००,००० |
| ४०. | पाटील अनुपमा | ३०,००,००० |
| ४१. | कारिया नितीन | ५१,००,००० |
| ४२. | पंडित शशिशेखर | २,००,००,००० |

## न्यास, कंपन्या, फौंडेशन, इ. रु. १,००० ते १०,०००/-

१. अमेय फ्लुइड कंट्रोल सिस्टम्स प्रा. लि.
२. अमरनाथ ग्रुप ऑफ कंपनीज विंग सी
३. अशोक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज
४. आंबेकर हॉस्पिटल
५. इनरव्हील क्लब ऑफ पुणे इम्पीरिअल
६. एरोसॉफ्ट कन्सल्टन्सी
७. गेटझनर इंडिया प्रा. लि.
८. डॉ. गोडबोले लॅबोरेटरी
९. थिंकस्टार्टअप लर्निंग प्रा. लि.
१०. नाट्यसंस्कार कला अकादमी
११. नायकॉन एफएमएस प्रा. लि.
१२. नृत्य कला मंदिर
१३. मनोहर व्ही. जोशी ट्रस्ट
१४. पुणे पर्वती रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट
१५. पुणे साऊथ रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट
१६. प्रबोध संपदा
१७. प्रांतिकरण ज्येष्ठ नागरीक संघ
१८. प्रा. शंकर यादव पोंक्षे पब्लिक ट्रस्ट
१९. प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प. अभ्यास, चिंचवड, पुणे
२०. बडवे इंजिनिअर्स प्रा.लि.
२१. भारत स्वाभिमान ट्रस्ट
२२. महेश विद्यालय इंग्रजी माध्यम
२३. मिलके चलो असोसिएशन
२४. लायन्स क्लब ऑफ पुणे फिनिक्स
२५. रामकृष्ण विवेकानंद सेवा संस्था
२६. रोटरी क्लब ऑफ पुणे डेक्कन जिमखाना
२७. विवेकानंद शिलास्मारक आणि विवेकानंद केंद्र
२८. वुमन्स एनर्जी
२९. शिवशक्ती पेंट्स
३०. सद्‌गुरू एंटरप्रायझेस
३१. हरी परशुराम औषधालये

## रु. १०,००१ ते ३०,०००/-

१. आनंद रेसिडेन्सी अपार्टमेंट-कंडोमिनम
२. जनजागृती मंडळ
३. डी.व्ही.ब्रह्मे अँड सन्स सेल्स, सर्व्हिस प्रा. लि.
४. द महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी को. प्रा. लि.
५. पु. ना. गाडगीळ
६. मंगेश एजन्सीज
७. श्री कमला आयुर्वेद हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर प्रा. लि.

८. रोटरी प्रगती ट्रस्ट
९. लोकमत मिडिया
१०. शार्प इंजिनिअरिंग
११. शारदा-विष्णू चॅरिटेबल ट्रस्ट
१२. शिवाई बालक मंदिर ट्रस्ट
१३. सेवा सहयोग फाऊंडेशन
१४. स्वर्गीय तात्या बापट स्मृती समिती
१५. श्री भगीरथ तापडिया ट्रस्ट
१६. श्री वेंकटेश एजन्सीज
१७. ज्ञानगंगा विश्व विद्यालय
१८. ज्ञान प्रबोधिनी सेवक सहकारी पतसंस्था
१९. ICERTIS सोल्यूशन्स प्रा. लि.

## रु. ३०,००१ ते १,००,०००/-

१. अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशन
२. आर्य समाज सेवा फाउंडेशन
३. कासट एक्सक्लुझिव्ह
४. खुशबू चॅरिटेबल ट्रस्ट
५. गुरुकुल ट्रस्ट
६. जयगोपाल गरोडिया फाऊंडेशन
७. डसॉल्ट सिस्टीम्स फाऊंडेशन
८. डेव्हक्रिएट सोल्यूशन्स एलएलपी
९. तामिळनाडू आर्य समाज शैक्षणिक संस्था
१०. नातू फाऊंडेशन पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट
११. पुणे गांधी भवन चॅरिटेबल ट्रस्टचा रोटरी क्लब
१२. पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ
१३. पुणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन
१४. मैत्रेय चॅरिटेबल सोसायटी
१५. व्हील्स ग्लोबल फाऊंडेशन
१६. संयुक्त कोकणी सभा, पुणे
१७. श्री नूतन मंडळ
१८. श्री श्री परमहंस योगानंद विद्यालय
१९. हरताळकर हॉस्पिटल

## रु. १,००,००१/- व पेक्षा अधिक

| | | |
|---|---|---|
| १. | लोकमान्य टिळक शिक्षण समिती | १,१०,००० |
| २. | फाऊंडेशन फॉर कम्युनिटीज् ऑफ लर्निंग | १,२०,००० |
| ३. | हिंदवी पब्लिक स्कूल | १,२०,००० |
| ४. | श्रीनिधी एज्युकेशन सोसायटी | १,२०,००० |
| ५. | आत्मजा फाऊंडेशन | १,४०,००० |
| ६. | ऑनलाइन गिव्हिंग फाऊंडेशन | १,५६,२८४ |
| ७. | ज्ञान प्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट | १,८०,००० |
| ८. | गंगा ई एस डी व्ही व्ही प्राथमिक शाळा | २,२०,००० |
| ९. | श्री श्रीनिवास एज्युकेशन फाऊंडेशन | ५००,००० |
| १०. | श्री विवेकानंद संशोधन आणि प्रशिक्षण संस्था | ५,२५,००० |
| ११. | सायबेज आशा ट्रस्ट | १३,८५,६०० |
| १२. | एन जी परांजपे प्रतिष्ठान | १७,८५,००० |
| १३. | मातृमंदिर विश्वस्त संस्था | ४०,५०,००० |
| १४. | प्रबोध अर्थसंचय प्रा. लि. | ३८,००,००० |
| १५. | प्रबोध अर्थसंचय | २५,००,००० |
| १६. | सर दोराबजी टाटा ट्रस्ट | १,४१,०१,४०० |
| १७. | ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था | २,००,००,००० |

## सीएस्आर देणगी

| | | |
|---|---|---|
| १. | कॉटमॅक इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. | ५०,००० |
| २. | हेल्थएज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. | १,००,००० |
| ३. | एमएसएस इंडिया प्रा. लि. | ३,००,००० |
| ४. | शोगिनी टेक्नॉर्ट्स प्रा. लि. | ३,००,००० |
| ५. | ऑरा लेसरफॅब प्रायव्हेट लिमिटेड | ५,००,००० |
| ६. | इकोक्लीन मशीन्स प्रा. लि. | ५,००,००० |
| ७. | रविराज हाय टेक प्रा. लि. | ५,००,००० |
| ८. | डब्ल्यूटीई इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. | ५,२०,००० |
| ९. | ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ६,१०,००० |
| १०. | इंटॉक्स प्रा. लि. | ७,००,००० |
| ११. | बोस्टन सायंटिफिक टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. | ७,१७,५०० |
| १२. | मीबा ड्राइव्हटेक इंडिया प्रा. लि. | ९,७५,००० |
| १३. | प्रेस्टिसिएंट टेक्नॉलॉजीज प्रा. लि. | १५,३०,००० |
| १४. | मर्क्स् ग्लोबल सर्व्हिस सेंटर्स (आय) प्रा. लि. | १७,००,००० |
| १५. | डॉज इंडस्ट्रियल इंडिया प्रा. लि. | १९,१०,००० |
| १६. | साई सर्व्हिस प्रा. लि. | २२,७५,२४५ |
| १७. | भारत फोर्ज लि. (इन्व्हॉइस) | २८,६९,९९६ |
| १८. | डोहलर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड | २९,००,००० |
| १९. | एव्हिएंट मटेरियल्स इंडिया प्रा. लि. | ३७,६०,००० |
| २०. | कोफोर्ज बिझनेस प्रोसेस सोल्युशन्स प्रा. लि. | ४७,००,००० |
| २१. | ग्लोबंट इंडिया प्रा. लि. | १,२६,५६,०२३ |
| २२. | केपीआयटी टेक्नॉलॉजीज | १,४६,०९,८०० |

## परदेशी योगदान

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभाकर साठे | १,००,००० |
| २. | सविता पांडुरंग भागवत | ९,६२,००२ |
| ३. | यूके ऑनलाइन गिव्हिंग फाऊंडेशन व्यवस्थापन | १०,९०,३८४ |
| ४. | ब्लूम कम्बशन | ३२,३९,६४० |
| ५. | ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन | १,०४,०९,५२९ |

◈-◈-◈

## ज्ञान प्रबोधिनीची प्रार्थना

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची
ही हिंदुभू परमश्रेष्ठपदास न्याया
आम्ही कृती नित करू झिजवोनि काया ।।धृ।।

विज्ञान-ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो
अभ्यास देशस्थितिचा समतोल चालो
निष्ठा विवेक प्रकटो मन पूर्ण शुद्ध
वर्तू अम्ही दृढप्रसन्न नि ध्येयधुंद ।।१।।

होती अनेक हृदये जरि एकरूप
सामर्थ्य तेथ प्रकटेल तरी अमूप
हा मंत्र संघरचनार्थ सदा जपू या
हे ज्ञान-कर्म-युत भक्ती-व्रत आचरू या ।।२।।

की पुण्य-श्रेय-यश-कीर्ति सदैव लाभो
निंदा-प्रहार अथवा नच कोणि लोभो
आशा हसो विमल वा भिववो निराशा
सोडू कधी न पथ हा चिर ठेवु आशा ।।३।।

दाही दिशांत घुमुनी जयनाद जेव्हा
होई अखंड प्रियभूमी अजिंक्य तेव्हा
हृन्मंदिरातिल निवेल तृषा कधीची
हे देव आस पुरवी तव पूजकांची ।।४।।

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्ध-प्रकाश-इतिहास-निसर्गमाने
जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ।।५।।

◈-◈-◈

प्रार्थना ऐकण्यासाठी ▶



साहस शिबिर नेतृत्व संवर्धन केंद्र



भातलावणी करताना पुणे प्रशालेतील विद्यार्थिनी



ग्रामीण क्रीडा प्रकल्प – आकले प्राथमिक शाळा, चिपळूण – प्राथमिक चाचणी



विद्याव्रत कार्यक्रम



अनुभव शाळा



साहित्य मेळावा

# अन्य राज्यांमधील काम



डी.जी.व्ही. चेन्नई कॉलेज पत्रकारिता –चिकित्सक विचारपद्धती अभ्यासक्रम.



चेन्नई शिक्षक प्रशिक्षण



सीमावर्ती राज्य – प्रशिक्षण कार्यशाळा




गुवाहाटी




Virtual Kiosk Inaugaration by DC Poonch for Aspirational Block Mankot



अरुणाचल प्रदेश लोकसेवा आयोग, पूर्व परीक्षा वर्ग – RIWACH रोईंग, तवांग

**ज्ञान प्रबोधिनी**

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००/००१

www.jnanaprabodhini.org contact@jnanaprabodhini.org